
महात्म्याची अखेर

जगन फडणीस



महात्म्याची अखेर

जगन फडणीस

लोकवाङ्मय गृह

महात्म्याची अखेर

जगन फडणीस

म / ८०१

प्रकाशक

प्रकाश विश्वासराव

लोकवाङ्मय गृह

भूपेश गुप्ता भवन, ८५, सयानी रोड

प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५

मुद्रणस्थळ

न्यू एज प्रिंटिंग प्रेस

भूपेश गुप्ता भवन, ८५, सयानी रोड

प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५

मुखपृष्ठ

चंद्रमोहन कुलकर्णी

पहिली आवृत्ती

ऑक्टोबर १९९४

दुसरी आवृत्ती (I)

३० जानेवारी १९९८

तिसरी आवृत्ती (I)

जुलै १९९८

चौथी आवृत्ती (I)

एप्रिल २०००

पाचवी आवृत्ती (I)

मे २००४

सहावी आवृत्ती (I)

नोव्हेंबर २००९

सातवी आवृत्ती (I)

जानेवारी २०१३

किंमत

१४० रुपये

ISBN 81-86995-78-1

स्वातंत्र्यलढ्यात भाग घेतलेल्या
सर्व ज्ञात-अज्ञात आबालवृद्ध व
महिला स्वातंत्र्यसैनिकांना...

अनुक्रम

प्रास्ताविक

'महात्म्याची अखेर' हे माझे चौथे पुस्तक. महात्मा गांधींच्या आयुष्याची अखेर आणि त्यांच्या राजकारणातील अखेरच्या घटना यावर आधारित पुस्तक असल्यामुळे 'महात्म्याची अखेर' असे शीर्षक पुस्तकाला दिले आहे. महात्मा गांधींचे हे चरित्र नव्हे. गांधींवर आतापर्यंत देशातील व जगातील विद्वानांनी विपुल लिखाण केले आहे. पण या लिखाणातून एक विचार सुटला आहे असे मला वाटते आणि तो म्हणजे महात्मा गांधींचा खून कोणत्या कारणांतून करण्यात आला हा! गांधींच्या खुनाने ज्यांचे हात रक्ताने बरबटलेले आहेत असे गुन्हेगार आणि महात्मा गांधींच्या खुनाचे, तसेच खून करणाऱ्याचे समर्थन करणारे कधी फाळणीला गांधी जबाबदार होते म्हणून त्यांचा खून केला असे सांगतात तर कधी महात्मा गांधींमुळे पाकिस्तानला पंचावन्न कोटी रुपये द्यावे लागले म्हणून गांधींचा खून केला असे म्हणतात. पण महात्मा गांधींचा खून या दोन्ही कारणांतून झालेला नाही. त्याही पलीकडे असलेल्या मूलभूत स्वरूपाच्या कारणांतून महात्मा गांधींचा खून करण्यात आला आहे. या कारणांचा ऊहापोह १९३४ पासून १९४६ पर्यंत घडलेल्या घटनांच्या पुराव्यानिशी करण्याचा प्रयत्न मी केला आहे. तो किती यशस्वी झाला हे मी नाही सांगू शकणार! ते काम वाचकांनी करावयाचे आहे. 'महात्म्याची अखेर'मध्ये नमूद केलेल्या प्रत्येक घटनेला आधार आहे. पण हे संशोधन माझे नाही. फाळणी किंवा पंचावन्न कोटी रुपये या कारणांकरिता महात्मा गांधींचा खून झालेला नाही हे दाखवून देण्याकरिता देशातील काही विद्वानांच्या विचारांचे आधार देण्याचाही प्रयत्न केलेला आहे.

महात्मा गांधींसंबंधात या भूमिकेतून पुस्तक लिहिण्याचा माझा विचार बऱ्याच वर्षांपासूनचा होता. १९८८ पासून या विषयावर पुस्तक लिहावे असे वाटत होते. बऱ्याचजणांजवळ या विषयाची चर्चा करीत होतो. स्वातंत्र्य चळवळीत भाग

घेतलेल्या काही नेत्यांनाही गांधींच्या खुनाचे किती प्रयत्न झाले याची माहिती नव्हती. मी जी माहिती मांगत असे ती त्यांना नवी वाटत होती. त्यामुळे या पुस्तकाची गरज आहे असे मला वाटायचे! त्याचवेळी असेही वाटायचे की गांधींवर इतके लिखाण केले गेले आहे, त्यामुळे माझ्या पुस्तकाची खरोखरच काही गरज आहे का? मात्र गेल्या दोन-तीन वर्षांत महात्मा गांधींच्या खुनाचे जाहीर समर्थन केले जाऊ लागले. लोकांना खुनाची कारणे खरी वाटावीत म्हणून खोटा प्रचार केला जाऊ लागला. गांधींना 'राष्ट्रपिता' मानण्यास विरोधाची भाषा सुरू झाली. खोटी कारणे पुढे केली, तीच तरुणांना खरी वाटू लागली तेव्हा यासंबंधात पुराव्यांचा आधार घेऊन पुस्तक लिहिण्याची आवश्यकता अधिक जाणवू लागली. मोठमोठे खंड घेऊन वाचले जात नाहीत. त्यामुळे पुस्तक आकाराने थोडे लहान झाले तरी चालेल, पण फाळणीवरील गांधींची भूमिका आणि पाकला पंचावन्न कोटी रुपये देण्याचे प्रकरण, ही दोन्ही कारणे नव्हती तेव्हापासून म्हणजे १९३४ पासून गांधींच्या हत्येचे झालेले प्रयत्न आणि महात्मा गांधींचा खून होणार याची खुनाच्या पंधरा दिवस आधी माहिती मिळूनही राष्ट्रपित्याचे प्राण का वाचवता आले नाहीत? असा मर्यादित विषय येथे हाताळला आहे. 'दैनिक पुढारी'चे अग्रलेख लिहिण्याची जबाबदारी तीन वर्षांपूर्वी माझ्याकडे आली. त्यावेळी गांधींवर प्रसंगोपात लिहिलेल्या अग्रलेखांमुळे 'आम्हाला हे माहीत नव्हते' असे सांगणारे खूप जण भेटले. त्यातूनही पुस्तकाची निकड जाणवू लागली. 'गावकरी'च्या दिवाळी अंकाकरिता माझे मित्र दत्ता सराफ यांनी लेख मागितला. गांधींच्या खुनासंबंधातील माहितीवर लेख लिहून पाठवला. महाराष्ट्र टाइम्समधील परीक्षणात माझ्या लेखासंबंधी लेख मुळापासूनच वाचण्यासारखा आहे असे म्हटले होते. 'गावकरी'च्या लेखावरही प्रतिक्रिया चांगली झाली. कित्येकांनी आम्हाला यातील काहीच माहीत नव्हते असे कळवले. या प्रतिसादातून 'महात्म्याची अखेर' हे पुस्तक साकारले.

पुस्तक लिहिण्याचा निर्णय झाला आणि मित्रांनी भराभर मदत करण्यास सुरुवात केली. प्रा. ओमप्रकाश कलमे, डॉ. अशोक चौसाळकर, बाळ पोतदार, प्रा. सुरेश शिरोडकर यांनी त्यांच्याकडील साहित्य संदर्भासाठी पुरविले. शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या शाखेचे प्रमुख प्रा. कलमे यांच्यामुळे माझे काम फारच सोपे झाले. व्यवहाराचा विचार केला तर प्रा. कलमे यांच्या दूरदृष्टीमुळे माझे पैसेही वाचले. प्रा. कलमे यांनी कोठून कोठून मिळतील तेथून 'टाइम्स ऑफ इंडिया', 'हिंदू', 'हितवाद', 'सकाळ' आदी दैनिकांच्या १९३० पासूनच्या फायली आपल्या विभागात आणून ठेवल्या आहेत. एरव्ही त्यातील संदर्भ पाहण्याकरिता पुणे, मुंबई, मद्रास येथे जावे लागले असते. प्रा. कलमे यांच्या दूरदृष्टीमुळे मला १९३० पासूनची

ही दैनिके कोल्हापुरातच उपलब्ध झाली. प्रा. कलमे यांनी केवढे मोठे काम केले आहे, हे संदर्भ पाहणाऱ्यांनाच कळून येईल! बाळ पोतदार यांना तर मी पुस्तक लिहिण्याच्या काळात 'पठाण'च म्हणत असे. कर्जवसुलीला जसा पठाण उभा राहतो तसे पोतदार आज किती पाने लिहिलीत याचा हिशोब मागायला यायचे! प्रा. शिरोडकर यांनी हस्तलिखित तपासण्यापासून मदत व मार्गदर्शन केले. तीनच वर्षांपूर्वी मी मृत्यूच्या दारातून डॉ. व्ही. पी. गोखले यांच्यामुळे परत आलो. डॉ. गोखले यांनीच मृत्यूच्या दारातून मला ओढून आणले. मोठी शस्त्रक्रिया त्यांनी केली. सलाईन व रक्त यांच्या बाटल्याच बाटल्या लावाव्या लागल्या. त्यामुळे हातावर ताण पडताच हात सुजतात. लिखाण करता येत नाही. पण माझे तरुण मित्र सुभाष पवार यांनी पुस्तक लिहून दिले. लेखनिकाचे काम पवार यांनी केले नसते तर कदाचित पुस्तक तयारही झाले नसते! या सर्वांचे कितीही आभार मानले तरी ते कमीच पडतील. या सर्वांच्या मदतीमुळेच पुस्तक पूर्ण झाले आहे. मदतीचा मी योग्य उपयोग करून घेतला आहे की नाही हे मला सांगता येणार नाही!

महात्मा गांधींवर पुस्तक लिहिण्याचा बेत बोलून दाखवताच अनिल मेहता यांनी 'कधी हस्तलिखित देता?' असाच प्रश्न केला. आधीची दोन पुस्तके मेहता यांनीच प्रकाशित केली होती. मेहतांनी सांगितलेल्या मुदतीत मी त्यांना हस्तलिखित देऊ शकलो नाही. मेहतांनी तयारी दर्शविल्यामुळेच पुस्तक प्रकाशित होऊ शकते. पुस्तकातील चुका, अपुरेपणा यांना मीच जबाबदार आहे. पण पुस्तकात जर काही चांगले असेल तर ते या सर्व मित्रमंडळींचे श्रेय आहे, माझे नाही.

कोल्हापूर
२ ऑक्टोबर १९९४

– जगन फडणीस

दुसऱ्या आवृत्तीच्या निमित्ताने

महात्मा गांधींचे जीवन आणि त्यांचे तत्त्वज्ञान यासंबंधाने जगभर हजारो पुस्तके लिहिली गेली असताना मी 'महात्म्याची अखेर' हे महात्मा गांधींची हत्या, त्यामागची कारणे आणि गांधींचे प्राण वाचवण्याच्या बाबतीत झालेला हलगर्जीपणा यावर पुस्तक लिहावयास घेतले तेव्हा त्याला प्रतिसाद कसा मिळेल अशी शंका मनात होतीच! त्यातच अलीकडच्या काही वर्षांत बोलघेवड्या वर्गात महात्मा गांधींविषयीच्या अज्ञानातून प्रतिकूल चर्चा जोरात चालली आहे. अशा वातावरणात माझ्या पुस्तकाला प्रतिसाद मिळणार नाही असे वाटत होते. त्याचबरोबर या वातावरणातच मी जो विषय पुस्तकात हाताळणार होतो तीही आजची गरज आहे असे वाटत होते. यातून माझ्या हातून 'महात्म्याची अखेर' हे पुस्तक पूर्ण झाले. 'महात्म्याची अखेर' पुस्तकाला महाराष्ट्राच्या सर्व भागांतून चांगला प्रतिसाद मिळत आहे हे वाचकांची मला पत्रे येऊ लागली तेव्हा समजले. वाचकांच्या प्रतिसादाने एकप्रकारचा हुरूपही आला. काही वाचकांनी खिलापत चळवळीची माहिती द्यावयास हवी होती, हुतात्मा भगतसिंग व नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्यासंबंधी गांधींची भूमिका तुमच्या पुस्तकात का सांगितली नाही अशी विचारणा केली. महात्मा गांधींच्या हत्येमागची खरी कारणे मांडणे हा पुस्तकाचा प्रधान हेतू होता. माझे पुस्तक हे गांधींचे चरित्र नाही. त्यामुळे त्यांच्या सर्वच विचारांचा व तत्त्वज्ञानाचा उल्लेख केलेला नाही. आम्हाला गांधीसंबंधात हे कोणीच सांगितले नव्हते किंवा आम्ही ते वाचले नव्हते त्यामुळे गांधींविषयी आमची चुकीची मते झाली होती, असे प्रांजळपणे मान्य करणारी आणि गांधीच्या खुनामागच्या कारणांची आजवर जी मीमांसा झाली नव्हती ती मीमांसा करून तुम्ही एक नवा विचार मांडला आहे असे कळविणारीही पत्रे आली. हे कितपत खरे आहे हे मला सांगता येणार नाही. पण आचार्य श्रीपाद केळकर यांचे गांधींचे 'एकला चलो रे' हे चरित्र अलीकडेच प्रकाशित झाले आहे. त्यात आचार्य केळकर

यांनी ''प्रसिद्ध पत्रकार जगन फडणीस यांनी 'महात्म्याची अखेर' या नावाचे गांधी, फाळणी व गांधी हत्या या विषयावर मराठीतील बहुधा पहिलेच अभ्यासपूर्ण व उद्‌बोधक पुस्तक लिहिले आहे'' असे म्हटले आहे. गौरवपूर्ण उल्लेख केला म्हणून हे नमूद करीत नाही. पण गांधीच्या हत्येमागच्या सर्व कारणांचे विवेचन करण्याची गरज होती हे सांगण्याकरिता आचार्य केळकर यांचे मत उद्धृत करीत आहे. महात्मा गांधींचा खून फाळणी, ५५ कोटी रुपयांचे प्रकरण किंवा मुसलमानांचे लाड याकरिता झालेला नाही हे देशभर सांगण्याची गरज आहे. मी माझ्यापरीने प्रयत्न केला आहे. त्यात उणिवा आहेत, अपुरेपणा आहे हे मला मान्य आहे.

'मेहता पब्लिशिंग हाऊस'ने 'महात्म्याची अखेर'ची पहिली आवृत्ती प्रकाशित केली होती आणि दुसरी आवृत्तीही ते प्रसिद्ध करणार होते. पण पुस्तक प्रकाशनाचा त्यांचा कार्यक्रम आधीच तयार झालेला होता. त्यामुळे ३० जानेवारी १९९८ रोजी 'महात्म्याची अखेर'ची दुसरी आवृत्ती प्रकाशित होणे अवघड होते. दरम्यान राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात काम करणाऱ्या मित्रांनी महात्मा गांधींचा खून कोणत्या विचारसरणीतून झाला हे लोकांपुढे मांडण्याचा कार्यक्रम घेतला. त्यात या पुस्तकाचे पुनर्मुद्रण करण्याची योजना आली. ३० जानेवारी १९९८ रोजी महात्मा गांधींच्या हौतात्म्याला पन्नास वर्षे पूर्ण होत आहेत. म्हणून त्याच दिवशी 'महात्म्याची अखेर'ची दुसरी आवृत्ती प्रकाशित करण्याचे ठरले. मेहता पब्लिशिग हाऊसचे श्री. अनिल मेहता यांना ही कल्पना सांगितली. संकेत, प्रथा व व्यवहार याच्या कोणत्याही सबबी वा कारणे पुढे न करता माझे मित्र अनिल मेहता यांनी दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन दुसऱ्या प्रकाशकाकडून करण्यास मान्यता दिली. त्याबद्दल त्यांचे आभार मानलेले श्री. मेहता यांना आवडणार नाही. तरीही त्यांचे आभार मानणे हे माझे कर्तव्य आहे.

माझ्यावर १९८९ साली मोठी शस्त्रक्रिया झाली आणि मी मृत्यूच्या दारातून परत आलो. नव्हे पुण्याचे डॉ. व्ही. पी. गोखले यांनी मला तेथून बाहेर काढले होते. त्यानंतर मी पूर्ण बरा झालो असे वाटत होते. पण 'जीनने' म्हणजे अनुवंशिकतेने पुन्हा डोके वर काढले. माझ्यावर १९९७ साली पुन्हा मोठी शस्त्रक्रिया करावी लागली. त्यात मला कॅन्सरची सुरुवात झाल्याचे आढळून आले. कॅन्सर म्हटले की केमोथेरपी आलीच. त्याचा भयानक त्रास होतो. त्याच्याशी झुंज देत असतानाच हृदयाने 'माझ्याकडेही लक्ष दे' म्हणून दार ठोठावले. तपासणीत अँजिओग्राफी करण्याची गरज असल्याचे निष्पन्न झाले. मी दुसऱ्यांदा मृत्यूच्या दारात उभा होतो. याहीवेळी पुण्याचे डॉ. व्ही. पी. गोखले, डॉ. शैलेश पुणतांबेकर, डॉ. एम. एस. हिरेमठ व कोल्हापूरचे डॉ. दिलीप कुलकर्णी यांनी माझ्यावर उपचार

करून मला जीवदान दिले त्यांचाही मी ऋणी आहे. माझे मेव्हणे डॉ. सुधीर डोंगरे यांनी मी बरा व्हावा याकरिता जे परिश्रम घेतले त्याबद्दल त्यांचे आभार मानीत नाही. पण डॉ. डोंगरे यांचा उल्लेख केला नाही तर मी कृतघ्न ठरेन। दुसरे मेव्हणे श्री. प्रदीप डोंगरे यांच्या मित्रांनी दोन्ही शस्त्रक्रियांच्यावेळी रक्त देऊन मला उपकृत केले. त्यामुळे 'हर लहुका रंग लाल है।' म्हणजे काय हे मला समजले. कोल्हापूरचे माझे मित्र दिलीप पवार, विशेषत: त्यांची कन्या माधवी, अनुराधा व पुतणी इंद्रायणी आणि त्यांचे सर्वच कुटुंबीय यांचे आभार मानण्याला शब्दच अपुरे आहेत. मला अनेकांनी आजारपणात सर्वप्रकारची मदत केली. आर्थिक मदतही केली. या सर्वांचा मी अतिशय आभारी आहे, ऋणी आहे.

अत्यंत कमी वेळेत भारती मुद्रणालयाचे श्री. निहाल शिपूरकर यांनी पुस्तकाची सुंदर छपाई करून दिली. मुखपृष्ठाबद्दल श्री. चंद्रमोहन कुलकर्णी यांचे आणि लोकवाङ्मय गृह, प्रा. विलास रणसुभे आदी सर्वांनी केलेल्या मदतीबद्दल या सर्वांचा मी आभारी आहे.

— **जगन फडणीस**

कोल्हापूर
३० जानेवारी १९९८

तिसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना

महात्मा गांधींच्या हत्येमागची कारणे आणि गांधींची हत्या टाळता येणे शक्य होते, या विषयावरील 'महात्म्याची अखेर' या पुस्तकाची तिसरी आवृत्ती वाचकांच्या हातात देताना मला अतिशय आनंद होत आहे. 'महात्म्याची अखेर'ची पहिली आवृत्ती अपेक्षेपेक्षा लौकर संपली. पण त्यामानाने दुसरी आवृत्ती थोडी उशिराच निघाली आणि दुसरी आवृत्तीही हातोहात संपून आता तिसरी आवृत्ती प्रकाशित होत आहे. आजकाल वाचनाची आवड दिवसेंदिवस कमीच होत आहे. पुस्तके विकत घेऊन वाचण्याची वृत्ती दुर्मीळ बाब होऊ लागली आहे. त्यात राजकीय विषयांवरील पुस्तकांना तर आणखीनच वाईट दिवस आले आहेत. महात्मा गांधी यांच्याविषयी पद्धतशीरपणे तिरस्कार निर्माण करण्यात येत आहे. गांधींविषयी तिरस्काराची लाट अचानक निर्माण झालेली नाही. गेली पन्नास वर्षे प्रयत्नपूर्वक ही लाट निर्माण करण्याचे प्रयत्न होत आहेत. काँग्रेसने गांधींच्या नावाचा निवडणुका जिंकण्याकरिता वापर केला. पन्नास वर्षांच्या सत्तेच्या मक्तेदारीकडे आणि काँग्रेसच्या कारभारामुळे काँग्रेसविरोधी तिरस्काराची भावना निर्माण झाली. काँग्रेसने गांधींच्या नावाचे नुसते भांडवल केले. त्यामुळे काँग्रेस वाईट ठरू लागली. त्याच्याबरोबरीनेच गांधीविरोधी वातावरण बनत गेले. गांधींशी काँग्रेसचे नाव जोडले गेले, त्याचा हा परिणाम आहे! या पार्श्वभूमीवर महात्मा गांधींच्या खुनामागच्या मूळ व खऱ्या कारणांचे विश्लेषण करणारे पुस्तक उपलब्ध होताच वाचकांनी त्याचे स्वागत केले. त्यामुळेच 'महात्म्याची अखेर'ची तिसरी आवृत्ती इतक्या लौकर प्रकाशित होऊ शकली.

हिंदुत्ववादी विचारसरणीने निर्माण केलेल्या द्वेषाच्या वातावरणातून आणि हिंदुत्ववाद्यांच्या विफलतेतून महात्मा गांधीचा खून झाला. हिंदुत्ववादी विचारसरणी आणि ही विचारसरणी पोसणाऱ्या हिंदुत्ववादी संघटनांचा द्वेष पसरवणाऱ्या राजकारणाने महात्मा गांधींचा बळी घेतला. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही संघटना

हिंदुत्ववाद्यांची मोठी संघटना आहे. रा. स्व. संघाच्या विचारसरणीतूनच महात्मा गांधींचा खून झाला हे सरदार वल्लभभाई पटेल यांनीच म्हटले आहे. त्यामुळे माझे 'महात्म्याची अखेर' हे पुस्तक संघवाल्यांनी वाचावे आणि त्यांचे मत बदलावे, यासाठी हे पुस्तक लिहिलेले नाही. संघवाल्यांनी हे पुस्तक वाचले आणि त्यांच्या मनात फरक पडला तर आनंदच आहे. पण 'महात्म्याची अखेर' लिहिण्यामागे तो हेतू नाही. हिंदुत्ववाद्यांच्या खोट्या प्रचाराला त्यांच्या संघटनांशी संबंध नसलेला सामान्य माणूस बळी पडत आहे. अशांच्या वाचनात 'महात्म्याची अखेर' हे पुस्तक आले तर त्याने खुनामागच्या कारणांचा विचार करावा आणि मग आपले मत बनवावे. त्याला त्याचे मत बनविण्याकरिता पुरावे उपयोगी पडावेत या उद्देशाने हे पुस्तक लिहिले आहे. पुस्तकाची तिसरी आवृत्ती प्रकाशित होत आहे, यातच माझा पुस्तक लिहिण्यामागचा हेतू साध्य होत आहे, असे नम्रपणे नमूद करण्याचा मोह होतो!

मला वाचकांची असंख्य पत्रे आली. त्यात सर्वांचा एकच सूर आहे आणि तो म्हणजे 'आम्हाला फाळणीपूर्वी गांधींच्या खुनाचे प्रयत्न झाले होते, याची कोणी माहितीच दिली नव्हती. महात्मा गांधींच्या खुनामागची तुम्ही सांगितलेली कारणे कोणी आम्हाला सांगितली नव्हती! आता आमचा गैरसमज दूर झाला आहे.' अशा प्रतिक्रिया वाचकांनी पत्रे पाठवून कळविल्या आहेत. मराठीत किंवा एखाद्या प्रादेशिक भाषेत मांडलेल्या विषयांची व विचारांची दखल इंग्रजी वृत्तपत्रे सहसा घेत नाहीत. पण 'टाइम्स ऑफ इंडिया'ने ३१ जानेवारी १९९८ च्या अंकात संपादकीय स्फूट लिहून महात्मा गांधींच्या खुनामागच्या कारणांची दखल घेतली याचाही मला अभिमान वाटतो! काहींनी मी ब्राह्मणांच्या विरोधी आहे असे समजूनही पत्रे पाठवली आहेत. मी ब्राह्मणविरोधी नाही. पण मी ब्राह्मण्याच्या विरोधी आहे. जातीवादी राजकारणाच्या विरोधी मी आहे. ब्रिटिशांनी वेगवेगळ्या काळात प्रांतातील निरनिराळ्या सत्ताधाऱ्यांकडून सत्ता घेतली. नबाबाकडून काही प्रांतातील सत्ता घेतली तर काही प्रांतात रजपूत, जाट अशांच्याकडून सत्ता घेतली. ब्राह्मणांकडून ब्रिटिशांनी सत्ता घेतली असे प्रमुख राज्य हे महाराष्ट्रच आहे. महाराष्ट्रातील तेव्हाचा प्रस्थापित समाज ब्राह्मणच होता. या प्रस्थापित ब्राह्मणवर्गातील बहुसंख्य जणांना पुन्हा आपल्या हातात सत्ता येईल असे वाटत होते. लोकहितवादींनी १ एप्रिल १८४९ रोजी 'इंग्लिश राज्यापासून फळ' या शीर्षकाखाली लेख लिहिला होता. त्यात पुण्यातील ब्राह्मण काय चर्चा करीत ती लोकहितवादींनी उद्धृत केली आहे. ''अहो बाबा, मागे यादव कसे मेले? रावणाने प्रलय थोडा केला होता काय? सर्व देव बंदीस घातले होते. नंतर रामाने वानरांकडून लंका घेतली की नाही? पाण्यावर दगड

तरले की नाही? तसेच इंग्रज कधीतरी बुडतील. धर्मसंस्थापना होईल. ब्राह्मण सुखी होतील व इतर लोकही आपले वर्णाश्रम व धर्म करून वागू लागतील. पुन्हा ब्राह्मणांचे राज्य येईल.'' अशी चर्चा पुण्यातील ब्राह्मण करीत होते. ब्राह्मणांचे वर्चस्व पुन्हा प्रस्थापित होईल, ही त्यांची इच्छा, आकांक्षा होती. लोकमान्य टिळकांनी स्वराज्याची चळवळ सुरू केल्यावर अशा ब्राह्मणांना स्वराज्य मिळून पुन्हा ब्राह्मणांच्या हातात सत्ता येईल, अशी फार मोठी आशा वाटत होती. महात्मा गांधींनी स्वातंत्र्याच्या चळवळीत समाजातील सर्व घटकांचा सहभाग मिळविला. त्या सहभागामुळे पुन्हा ब्राह्मणांच्या हातात सत्ता येणार नाही याची खात्री झालेले ब्राह्मण गांधीविरोधी झाले. यात सर्वच ब्राह्मण नव्हते, हे मी नावे घेऊन लिहिले आहे. ब्राह्मणी व्यवस्था व प्रवृत्ती यांचे विश्लेषण हा वर्ग प्रस्थापितवर्ग असल्यामुळे अपरिहार्य आहे. हे ब्राह्मणलोकांसंबंधात विवेचन नसून प्रस्थापितवर्गाच्या हितसंबंधांचे मी विवेचन केलेले आहे. अन्य राज्यांतील सत्ताधारी — प्रामुख्याने जाट-रजपूत — बहुजन समाजाच्या हातात सत्ता गेल्यावरही ते त्यातीलच घटक असल्यामुळे पुन्हा सत्तेवर आले आहेत, ब्राह्मण वर्चस्वाचे तसे नाही. त्यामुळे महाराष्ट्रात गांधीविरोधी जसे विषारी वातावरण खोट्यानाट्या प्रचाराच्या आधारे निर्माण करण्याची मोहीम काढली गेली तशी अन्य राज्यात गांधीविरोधी मोहीम काढली गेली नाही. अशी मोहीम काढण्याचा काहींनी प्रयत्न केला तरी तिला महाराष्ट्रासारखे यश मिळालेले नाही.

लोकमान्य टिळकांविरुद्धही भूमिका घेतलेली नाही. लोकमान्य टिळक यांनी बॅ. महंमद अली जिना यांच्याबरोबर 'लखनौ करार' केला आणि मुस्लिम सहकार्य मिळवण्याचा प्रयत्न केला. स्वदेशी चळवळ, असहकार चळवळ ह्याही लोकमान्य टिळकांच्या चळवळी होत्या. महात्मा गांधींनी बहुजन समाजाचा स्वातंत्र्यलढ्यात सहभाग मिळवून लोकमान्य टिळकांच्या भूमिकेलाच व्यापक पाया मिळवून दिला, असे मी मानतो. लोकमान्य टिळकांच्या विरुद्ध भूमिका असती तर हे विवेचन मी केले नसते. सामाजिक प्रश्नांबाबत लोकमान्य टिळकांचे विचार मान्य होण्यासारखे नाहीत. सहिष्णुतेच्या बाबतीत लोकमान्य टिळक टोकाची भाषा वापरीत. आगरकरांशी मतभेद होताच लोकमान्य टिळकांनी आगरकरांना 'गंजीवरील कुत्रे' असे म्हटले आहे. स्वत:ला टिळकपंथीय म्हणवून घेणारे बरेचजणसुद्धा असहिष्णू होते. ज्यांच्याबरोबर मतभेद अशांच्यावर टिळकपंथीय म्हणवून घेणारे खोट्यानाट्या आरोपांची चिखलफेक करीत. त्यातून नामदार गोपाळ कृष्ण गोखलेही सुटलेले नाहीत. लोकमान्य टिळकांना राजद्रोहाच्या खटल्यात शिक्षा झाल्यावर लोकमान्यांना ही शिक्षा व्हावी याकरिता गोखले यांनी मोर्ले यांच्याशी संगनमत केले, गोखल्यांनी आपल्या राजकीय शत्रूचा (लोकमान्य टिळक) काटा काढला, असे आरोप नामदार

गोखले यांच्यावर पुण्याच्या 'हिंदू पंच'ने केले होते. आपल्या विरोधकांचे चारित्र्यहनन करणे, ही स्वत:ला टिळकपंथीय म्हणवून घेणाऱ्यांची प्रवृत्तीच होती. याच असहिष्णू वृत्तीतून गांधींचा खून करण्याची कल्पना पुढे आली.

नथुराम गोडसे रा. स्व. संघात येण्यापूर्वी काँग्रेसमध्ये होता. गोडसेचा आणि संघाचा संबंध नाही असे सरसंघचालक प्रा. राजेंद्रसिंह यांनी 'झी इंडिया' या खाजगी वाहिनाला ९ जुलै १९९८ रोजी दिलेल्या मुलाखतीत म्हटले आहे. नथुराम गोडसे संघात जाण्यापूर्वी काँग्रेसमध्ये काही दिवस असेलही! पण काँग्रेसची ध्येय-धोरणे, कार्यक्रम त्याला मानवला नाही. म्हणून नथुराम गोडसेने काँग्रेसशी संबंध तोडले आणि तो हिंदुत्ववादी रा.स्व. संघात दाखल झाला. संघाच्या विचारसरणीचा नथुराम गोडसे याच्यावर प्रभाव होता. संघाच्या विचारसर्णीतून गांधींचा खून झाला. त्यामुळे नथुराम गोडसे संघात येण्यापूर्वी काँग्रेसमध्ये होता, असा युक्तिवाद करून राजेंद्रसिंह हे संघाचा आणि गोडसेचा संबंध नाही असे म्हणतात तेव्हा त्यांच्या युक्तिवादाची कीव करावीशी वाटते. काही वाचकांनी हाही मुद्दा पत्राने कळविला असल्याने त्यासंबंधी तिसऱ्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत खुलासा करणे उचित होईल! नथुरामचा भाऊ गोपाळ गोडसे यानेही, 'नथुरामचा संघाशी संबंध होता, संघवाले अप्रामाणिक आहेत, त्यामुळे ते हे मत नाकारतात.' असे 'टाइम्स ऑफ इंडिया'ला (३० जानेवारी १९४८) दिलेल्या मुलाखतीत कबूल केले आहे. ब्राह्मणी वर्चस्वाला ज्यांच्यामुळे धक्का बसला आहे अशांवर हल्ला, छळ याबरोबरच त्यांचे साहित्य बाद करून खोटा इतिहास प्रसृत करण्याचे भारतीय इतिहासात प्राचीन काळापासूनचे दाखले आहेत. जातीवादी शक्तींचा जोर वाढल्याबरोबर या शक्तींनी महात्मा गांधींविषयी विकृत इतिहास निर्माण करण्याची मोहीमच सुरू केली आहे. हे प्रयत्न चालू असताना 'महात्म्याची अखेर' या पुस्तकाचे वाचकांनी तिसरी आवृत्ती काढण्यापर्यंत स्वागत केले याचा आनंद वाटतो.

— जगन फडणीस

कोल्हापूर
१५ जुलै १९९८

वर्चस्वाची आशा

भारतामधील सारा प्रकाश बरोबर घेऊनच त्या दिवशीचा सूर्य अस्ताला गेला आणि भारतावर काळरात्रीने घाला घातला. ती संध्याकाळ जर आलीच नसती तर भारताच्या राजकारणाला फार मोठी कलाटणी मिळाली असती. दिवस उगवतो अन् मावळतो. हा क्रम कोणाला रोखता येत नाही. दिवस जरी रोखता आला नाही तरी ३० जानेवारी १९४८च्या संध्याकाळची ती महाभयंकर घटना टाळता आली नसती काय? ती घटना रोखता येणे अजिबातच शक्य नव्हते काय? महात्म्याला आपले प्राण सोडावे लागले; एका युगपुरुषाचा देह धरतीवर कोसळला. महात्म्याचा आत्मा त्यांच्या शरीरातच सुरक्षित ठेवता येणे अवघड होते का? 'महात्मा गांधींचा खून करण्यात येणार आहे याची माहिती मलाही माझ्या सूत्रांकडून समजली आहे' असे भारताचे गृहमंत्री, पोलादी पुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांनी मुंबईचे गृहमंत्री मोरारजीभाई देसाई यांना गांधी खुनाच्या दहा दिवस आधीच सांगितले होते. गांधींच्या खुनाच्या कटाची कुणकूण सरदार पटेल यांना खुनापूर्वी पंधरा दिवस आधी लागली होती आणि त्यानंतर २० जानेवारी १९४८ रोजी गांधींच्या प्रार्थना सभेत बॉम्बस्फोट झाला होता. बॉम्बस्फोट करणारा मदनलाल पाहवा याला पोलिसांनी पकडले होते. त्याच्या जबाबात गांधींच्या खुनाच्या कटात सामील असणाऱ्यांची नावे समजली होती. ते कोठले आहेत याचा ठावठिकाणाही समजला होता. पण त्यांना पोलीस पकडू शकले नाहीत. मदनलाल पाहवाने दिलेल्या माहितीच्या आधारे पोलादी पुरुष पटेल यांच्या गृहमंत्रालयाकडे असलेल्या पोलिसांनी कारवाई केली असती तर महात्मा गांधींचा ३० जानेवारी १९४८ रोजी खून झाला नसता. त्यामुळेच प्रश्न पडतो, महात्मा गांधीच्या खुनाला केवळ नथुराम गोडसे आणि त्याच्या कटातील त्याचे साथीदार एवढेच जबाबदार आहेत का? की ती जबाबदारी आणखीही कोणावर येते? आणि गांधींच्या खुनामागे काही कारणे होती की तो एका

विचारसरणीचा भाग होता? काही तथाकथित घटना म्हणजे देशाची फाळणी, पाकिस्तानला द्यावयाचे पंचावन्न कोटी अथवा गांधीनी केलेले मुसलमानांचे लाड ही कारणे पुढे करून हिदू जातीयवादी गांधींच्या खुनाचे समर्थन करू पहात आहेत? गांधीच्या जीवनातील काही घटनासंबंधी बोलावयाचे झाल्यास फाळणी, पंचावन्न कोटी रुपये, मुसलमानांचे लाड यासंबंधीचा आढावा घेता असे लक्षात येईल की, खुनाच्या समर्थनासाठी पुढे केलेली ही कारणे तकलादू नव्हेत तर ती खरीच नाहीत. गांधींच्या खुनामागे या कारणांपेक्षा खुनामागे असलेली विचारसरणी, प्रवृत्ती खुनाला कारणीभूत आहे. म्हणूनच फाळणीमागचे सत्य, पंचावन्न कोटी रुपयांचा खरेखोटेपणा हा प्रकाशात येऊनही आणि तो बुद्धीला पटला तरी त्याबाबत गांधींच्या खुनाचे समर्थन करणाऱ्यांना पश्चात्ताप होत नाही. उलट, त्याचे उदात्तीकरण केले जात आहे. अलीकडच्या पिढीला तिच्या इतिहासाविषयीच्या अज्ञानामुळे आणि जुन्या पिढीतील लोकांच्या विस्मृतीमुळे त्यांनासुद्धा फाळणी, पंचावन्न कोटी, मुस्लिमांचा अनुयय ही गांधी खुनामागची कारणे आहेत असे वाटते. काँग्रेसजन महात्मा गांधींच्या नावाचा वापर फक्त सत्ता मिळविण्याकरिता करीत आहेत. त्यांना गांधीजींबद्दल प्रेम नाही. गांधींविषयीच्या खोट्या प्रचाराचे त्यांना सोयरसुतक नाही. त्याची त्यांना पर्वाही नाही. त्यामुळे गांधींविषयी सत्य सांगावे असे काँग्रेसजनांना गेल्या पन्नास वर्षांत कधी वाटलेच नाही. निवडून येणे हीच काँग्रेस उमेदवाराची कसोटी झाली आहे. त्यामुळे एखादा गुन्हेगार निवडून येणार आहे तर त्यालाही तिकीट द्या असे होते. एखादा चित्रपट अभिनेता, अभिनेत्री विजयी होणार असेल तर त्यांना उमेदवारी द्या. अशांना तिकीट देऊन उभे केले जाते. गांधींच्या तत्त्वांशी, ध्येयधोरणांशी कसलाही संबंध नसणारा पण हमखास विजयी होणारा सरंजामदार, जहागिरदार यांना काँग्रेसचे तिकीट दिले जाते. ह्या उमेदवारांना काँग्रेसचे मूळ धोरण किंवा गांधींविषयी हिंदुत्ववाद्यांनी खोटा प्रचार करून जे वातावरण तयार केले आहे त्याचा फोलपणा लोकांपुढे उघडा करण्यासाठी सत्य सांगण्याची आवश्यकताच वाटत नाही. त्यामुळे हिंदुत्ववादी जे गोबेल्सच्या प्रचार तंत्राप्रमाणे सांगत होते ते सत्य आहे अशी धारणा सर्वसाधारण माणसाची झाली. पुरोगामी विचारांच्या पक्षांना महात्मा गांधी कधी आपले वाटले नाहीत. त्यामुळे गांधींच्या विरोधात हिंदुत्ववादी करत असलेल्या खोट्या प्रचाराचे पितळ उघडे करून ते लोकांना दाखवावे याची निकड या पक्षांना वाटली नाही. पंडित जवाहरलाल नेहरू जातीयवादाविरुद्धची लढाई लढत होते. किंवा त्यांच्या व्यक्तिमत्त्वामुळे, आंतरराष्ट्रीय राजकारणातील त्यांच्या प्रभावामुळे आणि वैचारिक दृष्टिकोणामुळे नेहरूंच्या काळात जातीयवादी शक्ती दबल्या होत्या. पण या दबलेल्या शक्ती दबलेल्या होत्या, त्यांचा पुरता बीमोड

झालेला आहे अशी वस्तुस्थिती नव्हती. मात्र समस्त धर्मनिरपेक्षतावाद्यांनी या शक्तींचा पुरता बीमोड झाला आहे अशी समजूत करून घेतली. इंदिरा गांधींच्या कारकिर्दीमध्ये काँग्रेस पक्षात एकछत्री कारभार प्रस्थापित झाला आणि हा एकछत्री कारभार लोकांच्या डोळ्यांत भरू नये म्हणून त्यांनी आर्थिक कार्यक्रम आणि गोरगरिबांचे राजकारण यांची भाषाच केली. त्यामुळे जातीयवादी शक्तींना त्यांच्या काळातही डोके वर काढता आले नाही. राजीव गांधी यांचे नेतृत्व अपरिपक्व होते. त्यांच्याजवळ कसलीच दूरदृष्टी नव्हती. त्यामुळे राजीव गांधी तात्पुरत्या लाभासाठी मूलभूत स्वरूपाचे बदल झटपट रंगाऱ्याच्या पद्धतीने करू लागले. म्हणूनच शहाबानोला पोटगी मिळाली पाहिजे हा न्यायालयाचा निर्णय येताच मुल्ला-मौलवी आणि धनिक हितसंबंधी मुसलमान यांच्या दबावाखाली येऊन राजीव गांधी यांनी गोरगरीब, तलाकपीडित मुस्लिम महिलांना न्याय देणारा कायदा होता तोच बदलला. त्यामुळे मुस्लिमांचा अनुनय चालला आहे असा प्रचार करणाऱ्या जातीयवाद्यांना कोलीतच मिळाले आणि ते लोकांची मने पेटवत चालले. जातीयवाद्यांनी अशा गोष्टींचा फायदा घेऊन हिंदू-मुस्लिम द्वेष वाढविण्यास सुरुवात केली. त्यावर उतारा म्हणून व हिंदूंना खूष करण्यासाठी राजीव गांधींनी वादग्रस्त बाबरी मशिदीतील बंदिस्त दालनाचे कुलूप काढले आणि शिलान्यासालाही परवानगी दिली. या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर महात्मा गांधींच्या खुनाचे जोरदार समर्थन करण्यात येऊ लागले आणि पुन्हा एकदा फाळणी आणि पंचावन्न कोटी रुपये पाकिस्तानला देण्याला महात्मा गांधी कारणीभूत आहेत असे लोकांच्या मनावर ठसविण्याचा पद्धतशीर प्रयत्न सुरू झाला. त्यामुळेच इतके दिवस दबलेल्या जातीयवादी शक्ती बेमुर्वतखोर बनल्या असून त्या गांधींच्या खुन्यांचे उघडपणे सत्कार करू लागल्या आहेत.

महात्मा गांधींचा खून भारताची फाळणी किंवा पाकिस्तानला पंचावन्न कोटी रुपये देण्याच्या घटनेतून झालेलाच नाही. महात्मा गांधींनी १३ जानेवारी १९४८ पासून सुरू केलेले बेमुदत उपोषण हे पंचावन्न कोटी रुपयांच्या प्रश्नासाठी नव्हतेच मुळी! भारतीय स्वातंत्र्याचा सूर्य केव्हा उगवणार आणि तो कसा उगवणार याविषयी सारेच काही अंध:कारमय होते. आणि फाळणी किंवा पंचावन्न कोटी रुपये देण्याचा प्रश्नही येत नव्हता; अशा काळात महात्मा गांधींना ठार मारण्याचे प्रयत्न झाले. त्यातील काही प्रसंगी नथुराम गोडसेचे नावही आलेले होते. पोलीस ठाण्यात त्याला डांबण्यातही आले होते. मग त्या वेळेला हे प्रयत्न का व्हावेत? स्वातंत्र्यापूर्वी पुण्यामध्येच गांधींच्या खुनाचे किती प्रयत्न झाले? आणि गांधींचे खुनी महाराष्ट्रातीलच का निघावेत? फाळणी, पंचावन्न कोटी किंवा मुस्लिमांचा अनुनय

यासाठी गांधींचा खून झाला हे जर खरे असते तर देशाच्या अन्य भागातही गांधींविषयी तिरस्काराची भावना निर्माण झाली असती व या तिरस्कारातून स्वातंत्र्यानंतर देशाच्या अन्य भागातील एखाद्या गटाकडून एखादा तरी प्रयत्न झाला असता. पण तसे घडले नाही. गांधींच्या खुनांचे जे प्रयत्न झाले ते महाराष्ट्रातील लोकांनीच केले व गांधी खुनाचा कलंक महाराष्ट्राला लागला. स्वातंत्र्यानंतर गांधी खुनाचे दोन प्रयत्न झाले. त्यातील एक यशस्वी झाला पण स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी गांधींच्या खुनाचे चार अयशस्वी प्रयत्न झाले. या सर्व घटनांचा तपशीलवार ऊहापोह पुढच्या प्रकरणात केला आहे. पण पुण्यातील एका जीवघेण्या घटनेच्या, मृत्यूच्या जबड्यातून सुटल्यावर महात्मा गांधींनीच म्हटले होते, ''परमेश्वरकृपेने मी सात वेळा मृत्यूच्या जबड्यातून सहीसलामत सुटलो आहे.'' गांधींचा खून होण्याच्या १४ वर्षे आधी गांधींना ठार मारण्याचा प्रयत्न पुण्यात जून १९३४ मध्ये झाला होता. त्यात सातजण जखमी झाले होते. सुदैवाने गांधी वाचले. त्या वेळेला फाळणी नव्हती आणि पंचावन्न कोटींचे प्रकरणही नव्हते. मग तेव्हा का पुण्यात गांधींच्या जीवावर हिंदुत्ववादी उठले होते? पाचगणी, सेवाग्राम आणि पुण्याजवळ गांधींची रेल्वे उलथवून टाकण्याचा प्रयत्न करून गांधींना ठार मारण्याचे आणखी जे प्रयत्न झाले ते कोणत्या कारणांसाठी झाले होते? महात्मा गांधींना पळवून नेण्याचा कट होता असा सुगावा तेव्हाचे मुंबई पोलीस उपायुक्त जे. डी. नगरवाला यांना लागला होता. हे सारे प्रयत्न, ज्या कालखंडात झाले तो कालखंड विचारात घेता, निश्चितच पंचावन्न कोटी रुपये आणि फाळणी यासाठी झालेले नव्हते. या पुस्तकाचा विषय अतिशय मर्यादित आहे. गांधींचे चरित्र सांगणे, त्यांचे माहात्म्य सांगणे हा याचा हेतू नाही. फाळणीविषयी गांधींची भूमिका काय होती? फाळणी कशी झाली? कोणामुळे झाली? पंचावन्न कोटी रुपये हे काय प्रकरण आहे? आणि स्वातंत्र्य मिळण्याची सुतराम् शक्यता वाटत नव्हती तेव्हापासून गांधींच्या खुनाचे प्रयत्न होत होते. ते का? आणि हे प्रयत्न करणारे प्रामुख्याने महाराष्ट्रातील हिंदुत्ववादी विचाराचेच लोक का होते? याची मांडणी होणे आजच्या घडीला गरजेचे आहे.

महात्मा गांधींचा खून करण्याची प्रवृत्ती महाराष्ट्रातच निर्माण झाली. याला महाराष्ट्रातील राजकीय व सामाजिक परिस्थिती कारणीभूत आहे. या कारणांच्या आधारे गांधींचा खून फाळणी किंवा पंचावन्न कोटी यांसाठी नाही हे अधिक स्पष्ट होते. मदनलाल पाहवा याचा अपवाद करता गांधींचे खुनी व त्यांचे साथीदार महाराष्ट्रातील आहेत. पाहवा हा पाकिस्तानातून आलेला निर्वासित आहे. महात्मा गांधींच्या विरोधात देशाच्या अन्य काही भागांत वातावरण होते; पण तेथील

गांधीविरोधक महाराष्ट्रातील विरोधकांइतके कडवे, भडक विचारांचे नव्हते. हे तरी का घडावे? व्यापाराकरिता आलेल्या ब्रिटिश व्यापाऱ्यांनी भारतावर ब्रिटिशांचे दीडशे वर्षे साम्राज्य गाजवले. ब्रिटिश व्यापारी, ईस्ट इंडिया कंपनी व ब्रिटिश सत्ताधारी यांना बंगालमधील हिंदू सावकार, जमीनदार यांनी मदत केलीच! (आधुनिक भारत, आचार्य शं. द. जावडेकर; १७५६-५७ या सालचा बंगाल, एस. सी. हिल; 'ब्रिटिश हिंदुस्थानचा इतिहास', पी. ई. रॉबर्ट्स; इतिहास संशोधक शेजवलकर यांचे 'भारत इतिहास संशोधक मंडळा'च्या अंकातील लेख.) ब्रिटिशांनी प्रथम बंगाल मुसलमानांकडून ताब्यात घेतला. त्यानंतर इतर संस्थाने, प्रांत हे रजपूत, जाट यांच्याकडून जिंकून घेतले. महाराष्ट्रात संभाजीमहाराजांच्या खुनानंतर पुण्याच्या शनिवार वाड्यावर ब्रिटिशांचे निशाण १८१८ मध्ये फडकेपर्यंत ब्राह्मणांच्या हातात सत्ता होती. महाराष्ट्राची सत्ता ब्रिटिशांनी ब्राह्मणांकडून जिंकून घेतली. *ब्राह्मणांकडून सत्ता घेतलेले महाराष्ट्र हेच एकमेव राज्य!* लोकहितवादींनी १ एप्रिल १८४९ रोजी लिहिलेल्या लेखातील काही ओळी उद्‌धृत करणे उचित होईल. "... ब्राह्मणांचा हाहा:कार ईश्वराचे कानावर कधी जाईल? - त्यात मग कोणी बहुत शहाणा (ब्राह्मण) जुने काळचा असला म्हणजे तो म्हणतो, अहो बाबा, मागे यादव कसे मेले? रावणाने प्रलय थोडा केला होता काय? सर्व देव बंदीस घातले होते. नंतर रामाने वानरांकडून लंका घेतली की नाही? पाण्यावर दगड तरले की नाही? तसेच इंग्रज कधी तरी बुडतील. धर्मसंस्थापना होईल. ब्राह्मण लोक सुखी होतील." अशी चर्चा ब्राह्मण लोक ब्रिटिश सत्ता महाराष्ट्रात प्रस्थापित झाल्यावर करीत असा उल्लेख लोकहितवादींच्या या लेखात केला आहे. एक दिवस ब्रिटिशांच्या हातातून सत्ता जाईल व ती पुन्हा ब्राह्मणांच्या हातात येऊन धर्मसंस्थापना होईल व ब्राह्मण सुखी होतील असे ब्राह्मणांना वाटत होते.

ब्राह्मणांना हे जे वाटत होते ते फार महत्त्वाचे आहे. पुण्यात ब्रिटिशांचे निशाण लागल्यानंतर ब्रिटिशांनी काही ब्राह्मणांना हाताशी धरले. त्यातील काहींना रावबहादूरकी, सरबहादूरकीही दिली. ब्रिटिशांच्या मेहेरनजरेतून काही ब्राह्मण सुटले. त्यांच्यात या ना त्या कारणातून असंतोष निर्माण होऊ लागला होता. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी या असंतोषाला ब्रिटिशांविरुद्धच्या असंतोषाची डूब दिली. राष्ट्राभिमान चेतवण्याचा प्रयत्न केला. चिपळूणकर यांना बाळ गंगाधर टिळक, गोपाळ गणेश आगरकर यांची पुढे साथ मिळाली. त्यापूर्वी १८७६च्या दुष्काळात शेतकऱ्यांचा दंगा झाला. त्याचा फायदा घेऊन वासुदेव बळवंत फडके यांनी बंडाचा झेंडा उभारला होता. या पार्श्वभूमीवर बाळ गंगाधर टिळक प्रवृत्तींनी स्वराज्याचा मंत्र पुकारला. टिळकांच्या चळवळीमुळे मिळणाऱ्या स्वराज्यात पुन्हा आपल्या म्हणजे

ब्राह्मणांच्या हातात सत्ता येईल या आशेने ब्राह्मणवर्गातील काही लोक टिळकांच्या चळवळीकडे आकृष्ट झाले होते. त्यातील बऱ्याचजणांना टिळकांच्या चळवळीचा अर्थच उमगला नव्हता. टिळकांच्या चळवळीचा चुकीचा अर्थ या मंडळींनी लावला. टिळक स्वत: जहाल विचारांचे होते. पण टिळकांचे अनुयायी बनलेले टिळकांच्या निधनानंतर आणखी जहाल बनले. त्यातूनच ते स्वत:ला टिळक पंथीय म्हणवून घेऊ लागले. या टिळक पंथीयांपैकी काही हिंदुत्ववादी बनले, तर काही गांधींच्या मागे गेले. या बदलापूर्वी इ.स. १८४० मध्ये बाळशास्त्री जांभेकर यांनी समाजसुधारणेचा पुरस्कार केला तेव्हा ब्राह्मणांनी त्यांच्यावर हल्ला चढवून बाळशास्त्री जांभेकर यांचा छळ केला होता. लोकहितवादी देशमुख, समाजसुधारक आगरकर, सत्यशोधक समाजाची स्थापना करणारे महात्मा जोतीराव फुले यांनी ब्राह्मण वर्चस्वाविरुद्ध चळवळ केली तेव्हा त्यांचाही ब्राह्मणांनी छळ केला. ब्राह्मणी वर्चस्व प्रस्थापित करण्याची आशा यामागे होती. ब्राह्मणी वर्चस्वाच्या जे विरुद्ध आहे ते कसेही करून नष्ट करणे, नेस्तनाबूत करणे हाच ध्यास यामागे 'जैसे थे'वादी प्रवृत्तींना लागलेला होता. तो पुढेही टिकून राहिला. ब्रिटिशांच्या आगमनानंतर ब्राह्मणांकडे असलेले सामाजिक, राजकीय नियंत्रण ढिले पडले आणि समाजव्यवस्थेमध्ये मोठ्या प्रमाणावर उलथापालथी होऊ लागल्या. वरिष्ठ जातींचे नियंत्रण सुटले. त्यामुळे त्या वर्गांपुढे आव्हान निर्माण झाले. शेतीव्यवस्थेतील समस्या पुढे येऊन त्यांना महत्त्व प्राप्त होऊ लागले. १८८९ मध्ये युरोपमधील शेतीतज्ज्ञ डॉ. ओल्कर यांना ब्रिटिश सरकारने बोलवून घेतले आणि भारतीय शेतीव्यवस्थेची पाहणी करण्यास सांगितले. भारतीय शेतकऱ्यांच्या शेतीविषयाच्या अज्ञानावर डॉ. ओल्कर यांनी बोट ठेवले आणि शैक्षणिक अभ्यासक्रमात शेतीविषयाचा समावेश करावा अशी शिफारस केली. हा विषय शिक्षणामध्ये आला असता तर मध्यमवर्गीय जे शिक्षण घेत होते त्या शिक्षणामुळे मध्यमवर्गाला जे महत्त्व प्राप्त झाले त्यावर शेतीविषयाने परिणाम झाला असता आणि या शिक्षणामुळे बहुजन समाज पुढे आला असता. म्हणूनच त्या वेळेच्या प्रस्थापितांनी डॉ. ओल्कर यांची शिफारस अमलात आणली नाही. महात्मा फुले यांनीही आपल्या काळात खालच्या जातींच्या लोकांना शिक्षण मिळाले पाहिजे हा आग्रह धरला होता आणि त्यांच्या शिक्षणात शेतीचे शिक्षण असले पाहिजे यावर भर दिला होता. सरकार प्राथमिक शिक्षणाची आबाळ करीत आहे आणि उच्च शिक्षणावर अधिक खर्च करीत आहे. याचा फायदा ब्राह्मण व उच्च जातींतील मुलांनाच होईल, ही फुले यांची तक्रार होती. ग्रामीण भागात प्राथमिक शिक्षणाची सोय उपलब्ध करावी, महार-मांगांसाठी शाळा काढाव्यात अशी त्यांची मागणी होती. याउलट लोकमान्य टिळक आणि आगरकर यांनी माध्यमिक

व महाविद्यालयीन शिक्षणाची आवश्यकता प्रतिपादली. १८८३च्या न्यू इंग्लिश स्कूलच्या इतिवृत्तात माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षणाची आवश्यकता प्रतिपादन करताना या दोन महान नेत्यांनी असे म्हटले की, "धार्मिक, नैतिक व भौतिक शिक्षणाच्या आधारे भारताची उतरती कळा रोखता येईल." टिळक-आगरकर यांनी माध्यमिक शाळा काढून उच्चवर्णीय व उच्च जातीच्या समाजातील मुलांच्या शिक्षणाची पुढची सोय पाहिली. बहुजन समाजातील मुलांनी प्राथमिक शिक्षणाची गरज होती. त्यांचे प्राथमिक शिक्षणच झालेले नसल्याने टिळक-आगरकरांनी काढलेल्या हायस्कूल व कॉलेज यांचा लाभ बहुजन समाजातील मुलांना होतच नव्हता. या पार्श्वभूमीवर लोकमान्य टिळकांनी जी राजकीय जागृती केली व ब्रिटिश विरोधात असंतोष निर्माण केला तो प्रामुख्याने या उच्चवर्णीयांच्या हितसंबंधांचा होता. शिक्षण घेऊनही ज्यांच्या नोकऱ्यांचा प्रश्न सुटलेला नव्हता आणि सत्तांतरातून घडलेल्या बदलामुळे ज्यांच्या वर्चस्वाला धक्का बसलेला होता अशा मध्यमवर्गीयांत असंतोष निर्माण होत गेला. लोकमान्य टिळकांनी देशाला नेतृत्व दिले आणि लोकांच्या मनात राष्ट्रीयत्वाची भावना जागवली. सरकारविरुद्धच्या आंदोलनासाठी टिळकांनी लोकांना प्रवृत्त केले. पण त्यांच्या नेतृत्वाच्या काळात ग्रामीण भागात चळवळ म्हणावी तशी गेली नाही. आणि बहुजन समाजही या चळवीत ओढला गेला नव्हता. म्हणजे, त्यांच्या चळवळीला आपोआपच शहरी व मध्यमवर्गीयांच्या असंतोषाचे स्वरूप प्राप्त झाले. प्रस्थापितवर्गाच्या हातातून सत्ता व सामाजिक नियंत्रण सुटू लागले. या प्रक्रियेला सत्यशोधक समाजाच्या चळवळीमुळे महाराष्ट्रात गती येत गेली होती. या कारणाने आपण टिळकांच्या चळवळीत सामील झालो आणि टिळकांची ताकद वाढविली तर हे जे परिवर्तन येऊ घातले आहे ते रोखता येईल आणि आपले वर्चस्व पुन्हा प्रस्थापित करता येईल ही भावना त्या वेळच्या शहरी व मध्यमवर्गीय तरुणांत निर्माण झाली. त्यामुळे उच्च जातीमधील मध्यमवर्गीयांचा ओढा टिळकांकडे वाढत गेला. महाराष्ट्रातच टिळकांचे अनुयायी प्रामुख्याने अधिक होते. टिळक महाराष्ट्रातील होते म्हणून हे घडले असे म्हणणे बरोबर होणार नाही; तर बदलत्या सामाजिक, राजकीय परिस्थितीमुळेही हे घडत गेले. लोकमान्य टिळकांच्या राजकारणाचा चुकीचा अर्थ मध्यमवर्गाने लावला. त्यांच्या चळवळीचा आवाका या वर्गातील कित्येकांच्या आकलनशक्तीच्या पलीकडचा होता. त्यामुळे या वर्गाने आपल्या सोयीचा अर्थ लावून टिळकांच्या चळवळीकडे पाहिले. टिळकांच्या नेतृत्वाखालील चळवळीमुळे स्वराज्य आले तर त्या स्वराज्यात आपल्या सामाजिक व राजकीय सत्तेला धक्का बसणार नाही अशी सोयिस्कर समजूत उच्च जातींनी करून घेतली. त्यामुळे या जातीतील लोक

लोकमान्य टिळकांच्या चळवळीविषयी आस्था बाळगून त्यात जमेल तेवढा भाग घेत होते आणि याच वेळी १९२० साली लोकमान्य टिळकांचे देहावसान झाले.

लोकमान्य टिळक यांच्या निधनानंतर मोहनदास करमचंद गांधी यांचा भारतीय राजकारणात झालेला उदय यांतून भारतीय राजकारणालाच एक नवी दिशा व गती आली. महात्मा गांधींनी राजकारणाला नवी दिशा दिली. अहिंसा, सत्याग्रह, असहकार ही गांधींनी लढ्याची हत्यारे बनविली आणि राजकीय चळवळीबरोबरच सामाजिक सुधारणांचा प्रश्नही हातात घेतला. त्यांचे लढ्याचे तंत्र नवे होते. आफ्रिकेतील अनुभव त्यांच्या पाठीशी होता. पण त्या अनुभवाच्या जोरावरच त्यांनी लढ्याला नवे तंत्र दिले असे नव्हे. या देशाचे मानस महात्मा गांधींनी जेवढे ओळखले होते तेवढे कोणीच ओळखले नव्हते. टिळक, गांधी यांच्या पूर्वीही देशातून ब्रिटिशांना घालवण्याचे प्रयत्न झाले. १८५७चा प्रयत्न हा तर फार मोठा प्रयत्न होता. आपल्या सामर्थ्याच्या जोरावर ब्रिटिशांनी १८५७चे बंड चिरडून टाकले. बळाचा, शस्त्रांचा वापर करून ब्रिटिशांना घालविण्याचे ठरविले असते तर ब्रिटिशांनीही आपली सत्ता बळकट करण्यासाठी बळाचा अधिक वापर केला असता आणि हे प्रयत्नही हाणून पाडले असते. त्यामुळे स्वराज्य आणखीच लांबणीवर पडले असते. सशस्त्र उठावाकरिता जे सातत्य, ध्येयावरची निष्ठा, प्रयत्नांची पराकाष्ठा असावी लागते; ती कायम टिकली असती की नाही याची शंकाच होती. सशस्त्र उठाव यशस्वी होण्यासाठी जनतेची सार्वत्रिक मानसिक तयारी लागते. ती सार्वत्रिक मानसिक तयारी भारताची नाही. त्या प्रकारच्या प्रतिकाराला भारतभूमी अनुकूल नाही. हा देश शांततेवर अधिक प्रेम करतो हे गांधींनी चांगले ओळखले होते. त्यामुळे गांधींनी लढ्याचे नवे तंत्र स्वीकारले. आपल्यासाठी स्वराज्य आणायचे आहे ही भावना सर्वसामान्य माणसात निर्माण झाली पाहिजे व तशी त्याची खात्री झाली पाहिजे, तरच ही लढाई व्यापक होईल हे ओळखून महात्मा गांधींनी सर्वसामान्यांच्या आशाआकांक्षांचे राजकारण केले. त्यांच्या जीवनाच्या मूलभूत प्रश्नांची सांगड स्वातंत्र्य चळवळीशी घातली. म्हणून गांधींच्या नेतृत्वामुळे काँग्रेसची चळवळ म्हणजेच स्वातंत्र्याची चळवळ खेड्यापाड्यांपर्यंत पोहोचली. त्यांनी अधिकाधिक लोकांचा सहभाग चळवळीत मिळवला. एका जातीची, विशिष्ट समाजाची स्वातंत्र्य चळवळ बनली तर ती कदापिही यशस्वी होणार नाही हे ओळखून गांधींनी सर्व जातीजमातींना काँग्रेस ही आपली आहे असे वाटेल असे राजकारण केले. हे टिळकांच्या राजकारणात नव्हते. त्यामुळे टिळकांच्या चळवळीकडे आकृष्ट झालेला वर्ग आपले वर्चस्व पुन्हा प्रस्थापित होईल या भावनेने त्यात सामील झाला होता. महात्मा गांधींच्या राजकारणाचा परिणाम, त्यांचे

तत्त्वज्ञान, त्यांची चळवळ यांचा प्रभाव खेड्यापाड्यांतीलही सर्वसामान्य माणसांवर पडत गेला. त्यामुळे आपले वर्चस्व पुन्हा प्रस्थापित होईल या आशेने जो वर्ग टिळकांच्या चळवळीत सामील झाला होता, त्याची स्वप्ने विरू लागली. टिळकांनीही राजकारणात धर्माला प्राधान्य दिलेले होते. त्यामुळे टिळकप्रेमाची ढाल पुढे करून हा वर्ग हिंदुत्वाच्या राजकारणाची कास धरत गेला आणि आपले गेलेले वर्चस्व पुन्हा प्रस्थापित करावयाचे झाले तर महात्मा गांधींचा विचार, त्यांचे तत्त्वज्ञान, चळवळीचे मार्ग यांचा प्रभाव पसरता कामा नये याची खूणगाठ या वर्गाने बांधली. गांधींच्या राजकारणात सर्व धर्म, जाती, पंथ होते. या कारणांनी गांधींच्या चळवळीमुळे स्वातंत्र्य मिळाले तर सर्व जाती-जमाती व पंथ यांच्या घटकांची सत्ता येईल याची जाणीव या वर्गाला झाली. म्हणून त्यांनी गांधींच्या प्रवाहात येण्याचे नाकारले. त्यांच्या या नकारात्मक भूमिकेमुळेच त्यांनी आपल्याला स्वातंत्र्याच्या चळवळीपासून दूर ठेवले होते. डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्यासारख्या हिंदू महासभेच्या नेत्याने ते ब्रिटिशांच्या काळातील बंगालमधील मुस्लिम लीगच्या हक मंत्रिमंडळात अर्थमंत्री असताना २६ जुलै १९४२ रोजी गव्हर्नरला पत्र लिहून ब्रिटिशांच्या युद्ध प्रयत्नाला आपला पूर्णपणे पाठिंबा आहे, असे कळविलेच. परंतु त्याचबरोबर बंगालमधील काँग्रेसची चळवळ कशी दडपून टाकता येईल हे कळविले होते. "युद्ध प्रयत्नाच्या वेळी सामुहिक आंदोलनाची भावना निर्माण करणे, त्यातून अंतर्गत अशांतता माजविणे व असुरक्षितता वाढविणे हे कोणत्याही सरकारने रोखलेच पाहिजे. प्रश्न आहे तो बंगालमधील ही चळवळ कशी दडपायची तो! काँग्रेसने कितीही प्रयत्न केले तरी काँग्रेसची चळवळ बंगालमध्ये मूळ धरून वाढणार नाही आणि ती अपयशी होईल यासाठी मी उपाय सुचवीत आहे." असे पत्र डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी सर जॉन हर्बर्ट यांना पाठविले होते. (क्विट इंडियाज् अपोनंट्स अन्मास्क्ड, सुमित गुहा, इंडियन एक्स्प्रेस, १७ ऑगस्ट १९९२) श्यामाप्रसाद मुखर्जी हे त्या वेळी हिंदू महासभेचे नेते होते. त्यांच्यासारख्यांनी स्वातंत्र्य चळवळ ऐन बहरात असताना गव्हर्नरना हे पत्र का पाठविले या प्रश्नाच्या उत्तराची बीजेसुद्धा हिंदुत्ववाद्यांनी स्वातंत्र्याच्या चळवळीपासून आपल्याला अलग का ठेवले होते त्यात पाहावयास मिळतात. हिंदुत्व व हिंदू राष्ट्रवाद या संकल्पना जोपासणारा रा. स्व. संघ त्यामुळेच स्वातंत्र्याच्या चळवळीत सामील झाला नव्हता. कारण गांधींच्या नेतृत्वाखाली मिळणारे स्वातंत्र्य हे फक्त उच्चवर्णीयांचा लाभ करणारे स्वातंत्र्य नव्हते. म्हणूनच १५ ऑगस्ट १९४७ रोजी हिंदुत्ववाद्यांनी स्वातंत्र्यदिन न मानता तो सुतक दिवस पाळला होता आणि आजही राजकीय, सामाजिक, आर्थिक न्याय व समता प्रस्थापित करण्याची हमी देणारी भारतीय घटना

त्यांना मान्य नाही. ते प्रजासत्ताकाच्या ऐवजी धर्मराष्ट्राचा पुरस्कार करतात. याचे कारणही हेच आहे. धर्मराष्ट्रामध्ये धर्माचे नियंत्रण राखणाऱ्यांना महत्त्व राहील आणि धर्माचे नियंत्रण राखण्याचे काम किंवा कर्तव्य धर्मशास्त्राने उच्चवर्णीयांवरच सोपविलेले आहे. हे लक्षात घेता हिंदुत्ववाद्यांनी गांधींच्या काळात धर्म व धर्मराष्ट्र या भावनांना हात घालूनही जनता गांधींच्या चळवळीपासून दूर झाली नव्हती. उलट महात्मा गांधींचाच प्रभाव देशभर वाढत होता. थोडक्यात, गांधींचे विचार आणि त्यांचे नेतृत्व ही आपल्या मार्गातील फार मोठी अडचण आहे असे हिंदुत्ववाद्यांना वाटत होते. आपल्या विचारसरणीच्या जोरावर म्हणजे धर्मराष्ट्राच्या संकल्पनेच्या आधारे गांधींची चळवळ रोखता येणे अशक्य आहे हे स्पष्ट झाले. तेव्हापासून गांधींना नाहीसे करावे हा विचार हिंदुत्ववाद्यांत बळावत गेला आणि गांधींना ठार मारण्याचे प्रयत्न सुरू झाले. हा जो गट होता तो प्रामुख्याने महाराष्ट्रातच होता. तो टिळकांना मानणारा होता आणि टिळकांचे अनुयायी प्रामख्याने महाराष्ट्रातच होते म्हणून हा हिंदुत्ववादी गट महाराष्ट्रात सक्रिय होता. तो गांधी हत्येच्या प्रयत्नामागे सातत्याने होता. गांधींचा प्रभाव कमी करण्यासाठी या घटकाने प्रथम मुस्लिम द्वेष वाढविला आणि मग गांधी मुस्लिमांचा अनुनय करतात, गांधी मुस्लिमांचे लाड करतात, असा प्रचार चालवला. या प्रचाराच्या जोरावर तरी गांधींचा जनतेतील प्रभाव कमी करावा हा त्यांचा हेतू होता. म्हणून ते गांधींवर मुस्लिमधार्जिणेपणाचा आरोप करीत.

महाराष्ट्रातून होणाऱ्या गांधी विरोधाचे विश्लेषण गांधींचे चिटणीस प्यारेलाल यांनीही केले आहे. "कर्मठ व कट्टर ब्राह्मणांचा महाराष्ट्र हा बालेकिल्ला आहे. त्याचबरोबर नि:स्वार्थीबुद्धीने, समर्पित भावनेने व निष्ठेने काम करणाऱ्या देशभक्तांचा (महाराष्ट्र) आदर्श आहे. काही वेळा येथील ध्येयवाद अत्यंत टोकाच्या भूमिकेवर आधारलेला असतो. इतरांच्या जीवनासंबंधी व त्यांच्या राजकारणाबाबत तुच्छतेची भूमिका घेणारा ध्येयवाद असतो. ही भूमिका महात्मा गांधींच्या विचारसरणीच्या व भूमिकेच्या विरोधी आहे. महात्मा गांधींच्या उदयामुळे लोकमान्य टिळकांच्या स्मृती मागे पडल्या आहेत. गांधींची विचारसरणी आणि त्यांचे लढ्याचे तंत्र टिळकांच्या कार्याची महती कमी करणारे आहे. देशाच्या राजकारणातील लोकमान्य टिळकांचे आणि महाराष्ट्राचे देशातील स्थान महात्मा गांधींमुळे कमी झाले अशी भावना (काहींनी) करून घेतली आहे. त्यामुळे महात्मा गांधींच्या विचारांचा प्रभाव जसा वाढत गेला आणि गांधींची अहिंसक चळवळ पसरत चालली तसे (या गटाने) गांधींविषयी, त्यांच्या विचारांविषयी आणि लढ्याच्या तंत्राबाबत हाडवैर आरंभले. त्यांच्यातील नैराश्य व वैफल्यातून त्यांनी गांधींच्या निंदा नालस्तीची

मोहीमच काढली. तरीही गांधींचा प्रभाव वाढतच गेला. गांधीची चळवळ जशी अधिकाधिक पसरत गेली तसे हिंदुत्ववाद्यांचे नैराश्यही वाढत गेले."[१] प्यारेलाल यांनी महाराष्ट्रातील गांधीविरोधकांचे केलेले हे विश्लेषण माझ्या यापूर्वीच्या विश्लेषणाला बळकटीच देते.

महाराष्ट्रातील सर्वच ब्राह्मण यात मोडत नाहीत. गांधींच्या प्रारंभीच्या काळात ब्राह्मणांतीलच अनेकजण महाराष्ट्रात गांधींचे अनुयायी झाले आहेत. सामाजिक सुधारणांनाही महाराष्ट्रातील काही ब्राह्मणांनी हात घातला होता. गांधींचा विचार पुढे नेण्यात महाराष्ट्रातील ब्राह्मणांचा वाटा मोठा आहे. मात्र, बहुसंख्य ब्राह्मणांचा गांधींना पाठिंबा होता असेही म्हणता येणार नाही. त्यांची सहानुभूती गांधीविरोधी ब्राह्मणी गटाला होती. काही ब्राह्मण उघडपणे काही छुपेपणाने या गटाच्या मागे होते. गांधींची चळवळ वाढत गेली या सुडापोटी ते गांधींविरोधी होते, इतकी साधी, सरळ व सोपी कारणमीमांसा मात्र बरोबर ठरणार नाही. प्यारेलाल हे गांधींचे शिष्य होते. त्यामुळे विरोधकांविषयी कडवटपणा निर्माण होणार नाही असा शब्दांत त्यांनी विश्लेषण केले असावे. गांधींच्या चळवळीच्या रूपाने आपली राजकीय व सामाजिक नियंत्रणाची जी पकड आहे ती सुटणार आहे आणि कालांतराने ती अजिबात नाहीशी होणार आहे याच जाणिवेतून हिंदुत्ववादी गट गांधींना कट्टर दुश्मन मानत होता. महात्मा गांधींनी कधी कोणाला शत्रू मानले नाही की दुश्मन! टिळकवाद्यांकडे सहिष्णुता किंवा प्रामाणिक मतभेद ठेवूनही सलोख्याचे संबंध ठेवण्याच वृत्ती नाही. लोकमान्य टिळकांचे ते अनुकरण करत असावेत! कारण आगरकरांशी मतभेद होताच लोकमान्य टिळकांनी 'केसरी'त लिहिलेल्या लेखांमध्ये आगरकरांना 'गंजीवरले कुत्रे' म्हटले आहे. टिळकांसारखा मोठा नेता जेव्हा आपल्या वैचारिक विरोधकाबाबत अशी भाषा वापरतो तेव्हा टिळकांचे नाव घेणारे, भाषेच्या बाबतीत त्यांच्या पुढची पायरी गाठणार नाहीत तर काय करणार! म्हणूनच हिंदुत्ववाद्यांचे काही नेते सोडले तर कार्यकर्त्यांपासून नेत्यांपर्यंत ते शिवराळ भाषा वापरतांना दिसून येतील. विचारांच्या आणि युक्तिवादाच्या जोरावर गांधी विचारसरणीचा पराभव करता येणे शक्य नाही आणि गांधींपासून जनतेला आपल्या बाजूला वळविता येणे शक्य नाही म्हणून त्यांनी गांधींना या जगातून नाहीसे करण्याचे ठरविले होते. गांधींमुळे लोकमान्य टिळक काळाच्या पडद्याआड जातील आणि टिळकांची विस्मृती होईल असे मानणेच मुळी महामूर्खपणाचे आहे. लोकमान्य टिळक आणि महात्मा गांधी यांची कामगिरी महान म्हणूनच ओळखली

१. महात्मा गांधी, द लास्ट फेज, खंड २, प्यारेलाल

जाते आणि जाईल!

हिंदुत्ववाद्यांची कॉंग्रेसविरोधी भावना होती. पण त्यातही महाराष्ट्रातील हिंदुत्ववाद्यांचा भरणा अधिक होता. काही प्रमाणात देशाच्या अन्य भागांत गांधींविरोधी लोक होते पण त्यांचा कडवेपणा आणि महाराष्ट्रातील हिंदुत्ववाद्यांचा कडवेपणा यांच्यात फरक पडतो. देशातील अन्य हिंदुत्ववाद्यांनी गांधींना ठार मारण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येत नाही. काही वेळा त्यांची भाषा चिथावणीखोर असे. मात्र पुण्यातीलच हिंदुत्ववाद्यांनी गांधींच्या हत्येचे वेळोवेळी प्रयत्न केल्याचे दिसून येईल. महात्मा गांधी मुसलमानांचा अनुनय करतात म्हणून त्यांच्या राजकारणाला महाराष्ट्रातील हिंदुत्ववाद्यांनी जसा कडवा विरोध केला तसा अन्य भागांतील हिंदुत्ववाद्यांना करावा असे का वाटले नाही? गांधींना नाहीसे केल्याशिवाय त्यांच्या मुस्लिम अनुनयाच्या राजकारणाला पायबंद बसणार नाही असे का वाटले नाही? गांधींचे प्राण घेण्याचे कमी प्रयत्न झाले नाहीत. मृत्यूच्या जबड्यातून मी सातवेळा परत आलो आहे, असे गांधींनी स्वत:च म्हटले आहे. गांधीहत्येच्या प्रयत्नात महाराष्ट्रातील हिंदुत्ववादीच पुढे होते. गांधींच्या राजकारणामुळे ब्राह्मणांमधील हितसंबंधी वर्गाच्या राजकारणाला खीळ बसली. बहुजन समाजाच्या राजकारणाचे वारे गांधींच्या राजकारणाने सुरू झाले आणि गांधींच्या उदयामुळे 'हिंदुत्ववादी राजकारण' रोखले गेले. याचा राग, चीड आणि असूया येथील मध्यमवर्गीयांत अधिक होती. गांधींच्या उदयाने टिळकपंथी राजकारण मागे पडले हे कारण असल्याचे प्रारंभीच म्हटले आहे. यातच गांधीहत्येच्या प्रयत्नांची बीजे आहेत. म्हणून महाराष्ट्रातील हिंदुत्ववादी आणि उर्वरित भारतातील हिंदुत्ववादी यांचे मार्ग थोडेसे वेगळे झाले आहेत.

महाराष्ट्रातील इतिहास संशोधक न. र. फाटक यांनी या संदर्भात केलेले विश्लेषण माझ्या प्रतिपादनाला पुष्टी देणारे आहे. फाटक हे काही गांधीवादी नव्हेत. तसेच त्यांच्यावर ब्राह्मणद्वेष्टेपणाचा शिक्का मारता येणार नाही. कारण ते ब्राह्मण होते आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे ते थोर इतिहास संशोधक होते. म्हणून त्यांच्यां विश्लेषणाला वेगळे महत्त्व प्राप्त होते. "पुण्याला राजकीय दृष्टीने मान मिळण्याला रानड्यांचे श्रम कारणीभूत होते. टिळकांनी १८९१ मध्ये राजकीय क्षेत्रात प्रवेश केल्यानंतर दोन वर्षांनी रानडे मुंबईला गेले व टिळकांनी ते क्षेत्र आपलेसे करून सोडले. १८९३ मधील हिंदूंची सभा, त्यानंतर सार्वजनिक सभेचा कब्जा, असे त्यांच्या (टिळकांच्या) चढत्या कमानीचे काही टप्पे सहज ध्यानात येणारे आहेत. पुण्यात गोखले होते, पण ते धर्माच्या नावाने चालणाऱ्या राजकारणाकडे कधी फिरकले नाहीत. त्यांचे (गोखल्यांचे) राजकारण धर्म, पंथ, जाती, अवतार, आचार्य

यांच्यापैकी कुणाच्याही नावाच्या आधाराशिवाय चालले होते. धर्म आणि ब्राह्मण यांची युती सनातन आहे. संमती कायद्याबाबत भांडारकर, तेलंग, आगरकर यांच्याशी झगडा केला म्हणून 'धर्मरक्षक' या नात्याने टिळकांचा जो बोलबाला एकदा वाढला तो 'काँग्रेसच्या मंडपात सामाजिक परिषद भरू नये' असल्या कटकटींच्या मागे राहून त्यांनी (टिळकांनी) कायम राखला. सामाजिक सुधारणेचा रोख ब्राह्मण समाजावरच होता. ब्राह्मणांना समाजसुधारणेचा उद्योग संमत नव्हता. त्या उद्योगाच्या (चळवळीच्या) रानडे-भांडारकरांसारख्या वजनदार पुढाऱ्यांची सडकून हजेरी घेणारा टिळकांसारखा पुरुष पुढे सरसावताच ब्राह्मण समाजाने त्यांच्या (टिळकांच्या) सभोवती जयजयकार करीत गोळा व्हावे हे स्वाभाविक आहे. **सामाजिक सुधारणेची गडबड (चळवळ) मागासली की मानवी समतेच्या तत्त्वाने, ब्राह्मणी वर्चस्वाला लागलेले ग्रहण टळेल अशी ब्राह्मण समाजाची अटकळ असल्यास आश्चर्य नाही. जिल्हा, तालुके, महाल या ठिकाणी वकील, डॉक्टर किंवा सरकारी अंमलदार हे सगळे ब्राह्मणच असत. महाराष्ट्रात आणि विशेषतः ब्राह्मण समाजात टिळकांचे कौतुक विशेष केले जात असे.** राज्यसुधारणा म्हणजे स्वराज्याची पूर्वतयारी असा प्रकार ओळखून, जे पुढारी आपल्या हक्कांचा विचारच करत नाहीत त्यांच्या पाठीशी राहिल्यास लोण्याचा गोळा ते उपटतील व ताकाच्या पाण्यावर आपल्याला गुजारा करण्याची पाळी येईल असे भय अब्राह्मण बहुजनसमाजाला वाटले. टिळकांच्या पुढारीपणाचा तो परिणाम होता. गांधींच्या चळवळीने त्या परिणामाला आवरले.[२] न. र. फाटक यांचे हे विश्लेषण लक्षात घेता हिंदुत्ववाद्यांचा गांधींना विरोध का होता हे जे मी मांडतो आहे, त्याची स्पष्टता अधिक होईल.

महात्मा गांधींविषयी हिंदुत्ववाद्यांना द्वेष होता व आहे, तो एखाद्याच्या व्यक्तिद्वेषासारखा नाही. गांधींच्या विचाराने हिंदुत्ववाद्यांच्या विचाराला रोखले आणि त्यांच्या राजकारणाला पायबंद बसला म्हणून गांधींविषयी द्वेष होता. हिंदुत्ववादी ज्या वर्गातून आले तो वर्ग पेशवाई संपल्यापासून सत्तेवरून फेकला गेला होता. टिळकांच्या राजकारणामुळे या वर्गाच्या आशा पुन्हा पल्लवित झाल्या होत्या. त्या गांधींच्या राजकारणाने करपून गेल्या. म्हणून हिंदुत्ववाद्यांचा गांधींच्या विचारसरणीवर द्वेष होता. त्यांतही हिंदुत्ववाद्यांमध्ये पुण्याचा गटच अधिक भडक विचारांचा होता. तो का होता? मुंबईमध्येही ब्राह्मणवर्ग होता. त्यांच्यापैकीही काहीजण हिंदुत्ववादी होते. मग मुंबईच्या हिंदुत्ववाद्यांचा गांधीद्वेष पुण्याच्या हिंदुत्ववाद्यांपेक्षा कमी का?

---

२ भारतीय राष्ट्रवादाचा विकास, इतिहास संशोधक न. र. फाटक

याचाही विचार केला पाहिजे आणि तो विचार करावयाचा झाल्यास असे लक्षात येईल की, संभाजीच्या हत्येनंतर महाराष्ट्राचे राजकारण ब्राह्मणांच्या हातात गेले ते पेशवाई बुडेपर्यंत त्यांच्याच हातात होते आणि टिळकांच्या काळात ब्राह्मणांकडे राजकारणाची सूत्रे होती. त्यामुळे पुण्यातील ब्राह्मणांनी काळानुरूप बदलण्याचे नाकारले. ते त्यांना जमले नाही. पेशवाई गेल्यानंतर राजकारणाच्या हालचाली मुंबईत केंद्रित झाल्या. मुंबईत हिंदू, मुसलमान, पारशी यांच्या व्यवहारात सरमिसळपणा होता. पुण्याप्रमाणे मुंबईत ब्राह्मणांचे मोठेपण राहिलेले नव्हते. तसेच मुंबईत ब्राह्मणवर्ग पुण्याप्रमाणे एकजिनसी राहिलेला नव्हता. टिळकांसारखा नेता उदयास आल्यावर पुण्यातील ब्राह्मणी प्रवृत्तीच्या वर्गाला जी आशा वाटत होती तिलाच धक्का बसला. त्यातून गांधीद्वेषाचे राजकारण सुरू झाले तसे मुंबईत घडले नाही. सर्वच ब्राह्मण गांधीद्वेष्टे नव्हते. केळकर, खापर्डे यांच्यासारखी मंडळी गांधींपासून दूर राहिली तरी कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर, शंकरराव देव, काकासाहेब गाडगीळ, आचार्य जावडेकर, आचार्य स. ज. भागवत अशी कितीतरी ब्राह्मण मंडळी गांधींच्या प्रभावाखाली आली. त्यामुळे हिंदुत्ववाद्यांचे पित्त आणखीच खवळले. ब्राह्मणवर्गातील काहींनी गांधी विचारसरणी स्वीकारली. पण ज्यांनी नव्या बदलाला सामोरे जाण्याचे नाकारले, ते कट्टर हिंदुत्ववादी बनले आणि ते द्वेषाने अंध झाले. नवा विचार व नवे राजकारण यांचा देदीप्यमान प्रकाश पाहून त्या प्रकाशाचा स्वीकार करण्याऐवजी स्वत:चे डोळेच त्यांनी मिटून घेतले. ज्या गांधींमुळे हा प्रकाश पडला होता, त्या प्रकाशाचे ते विरोधक बनले. आणि गांधींना ठार मारल्याशिवाय त्यांचा विचार रोखता येणार नाही या निर्णयाप्रत ते आले. विचारांचा मुकाबला विचाराने करण्याइतका प्रभावी विचार हिंदुत्ववाद्यांजवळ नव्हता. तसेच प्रभावी नेतृत्वही त्यांच्याजवळ नव्हते. जुन्या विचारांचा टिकाव लागत नाही आणि नव्या विचारांचा बदल स्वीकारण्याची तयारी होत नाही; त्यावेळी अशीच विकृती तयार होते. म्हणूनच हिंदू धर्मांधांजवळ जी विकृती आहे तशीच विकृती मुस्लिम धर्मांधांजवळही आहे. कारण दोन्ही धर्मांध नव्या सुधारणा, नवे विचार स्वीकारण्यास तयार नाहीत. विचारांचा मुकाबला करण्याचे वैचारिक सामर्थ्य हिंदुत्ववाद्यांजवळ नसल्याने त्यांनी व्यक्तिगत हत्येचा पुरस्कार केला आणि त्यामागे ते लागले. या संदर्भात इतिहास संशोधक प्रा. न. र. फाटक यांनीही प्रकाश टाकला आहे.

"गांधींनी प्राण असेतोवर आपण आपले कर्तव्यक्षेत्र सोडणार नाही असे जाहीर करताच गांधींविषयी दारुण वैरबुद्धी बाळगणाऱ्यांना मोठा पेच पडला. ते राजकारणातून बाहेर पडत नाहीत आणि लवकर मरण्याच्या गोष्टी बोलत नाहीत. तेव्हा त्यांच्या जीविताचा नाश करणे हा उपाय महाराष्ट्रात कित्येकांना सुचला.

महाराष्ट्रातील टिळकांच्या तालमीतील वर्ग गांधींच्या चळवळीशी बहुधा असहकारानेच 'सुखं च मे शयनं च मे' अशा वृत्तीने वागला. पण याच वेळी त्याच वर्गातील काहीजणांना गांधीचा नाश या कल्पनेचा हृद्रोग जडला.[३]

लोकमान्य टिळकांच्या चळवळीचा सनातन्यांनी, हिंदुत्ववाद्यांनी चुकीचा अर्थ लावला आणि ते गांधींचे हाडवैरी झाले. वास्तविक गांधींच्या बऱ्याच चळवळीचे मूळ टिळकांच्या चळवळीतच होते. ते हिंदुत्ववाद्यांना कधी समजले नाही. गांधींच्या चळवळीमुळे हिंदुत्ववाद्यांची ही अटकळ धुळीस मिळाली. म्हणून गांधी त्यांना त्यांच्या मार्गातील फार मोठा अडसर वाटत होते. "महात्मा गांधींच्या कार्याबद्दल व राजकारणाबद्दल ज्यांना ज्यांना म्हणून कोणत्याही कारणांमुळे असंतोष वाटत आहे, ते ते सर्व आपणास टिळकभक्त समजू लागले आहेत. ज्यांना खादी वापरायची नसेल, ज्यांस अस्पृश्यता निवारण पसंत नसेल, हिंदू-मुसलमानांच्या ऐक्याचे प्रयत्न ज्यांना आवडत नसतील किंवा कायदेभंग अगर करबंदीसारख्या चळवळीत ज्यांना भाग घ्यावयाचा नसेल ते सर्व लोक अशा गोष्टींना टिळकभक्तीच्या नावाखाली विरोध करू शकतात व असे असंतुष्ट टिळकभक्त सध्या तरी महाराष्ट्रात बरेच आहेत." असे आचार्य जावडेकर यांनी 'लोकमान्य टिळक व महात्मा गांधी' या पुस्तकात म्हटले आहे. टिळकपंथीयांना महात्मा गांधींचे राजकारण समजलेच नव्हते आणि टिळकपंथीय म्हणजे लोकमान्य टिळक नव्हेत किंवा टिळकांचे खरे राजकारण चालविणारे नेते वा कार्यकर्तेही नव्हेत. लोकमान्य टिळकांनी राष्ट्रकार्याचा रथ जेथे आणून ठेवला होता तेथून तो रथ महात्मा गांधींनी त्याच्या पुढे नेला. स्वदेशीची चळवळ, असहकार, हिंदू-मुस्लिम ऐक्याचे प्रयत्न हा लोकमान्य टिळकांच्या राजकारणाचा एक भाग होता. त्यालाच महात्मा गांधींनी व्यापक पाया मिळवून दिला होता. लोकमान्य टिळकांनी जनतेत अस्वास्थ्य निर्माण केले. त्याला महात्मा गांधींनी सत्याग्रह व आत्मबळाच्या सामर्थ्याची जोड देऊन ब्रिटिश साम्राज्यशाही हादरवून सोडली होती. ब्रिटिशांनी ७०० संस्थानिक व राजे यांच्याकडून सत्ता मिळवली होती. त्यानंतर देशात एक 'राष्ट्र' ही संकल्पना आली आणि काँग्रेसच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्याची चळवळ सुरू झाली. या चळवळीला गांधींमुळे व्यापकता आली. देशभर स्वातंत्र्याचा लढा, वणवा पेटून पसरत जावा त्याप्रमाणे पसरत गेला. एका झेंड्याखाली स्वातंत्र्याचा लढा उभा राहिला, तो महात्मा गांधींमुळे! म्हणूनच महात्मा गांधींना सर्वप्रथम नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी ६ जुलै १९४४ रोजी 'राष्ट्रपिता' (Father of the Nation) असे संबोधले होते. आम्ही ज्यांच्याकडून देशाची सूत्रे

३ भारतीय राष्ट्रवादाचा विकास, न. र. फाटक

हातात घेतली होती, त्या ७०० संस्थानिकांच्या हातात सत्ता सोपवून निघून जातो असे ब्रिटिश म्हणत होते. महात्मा गांधींनी त्याला विरोध केला आणि ब्रिटिशांचा डाव हाणून पाडला. म्हणून महात्मा गांधी 'राष्ट्रपिता' ठरतात! संपूर्ण देशाच्या स्वातंत्र्याचा लढा देशभर एका झेंड्याच्या नेतृत्वाखाली आणि तोही सर्व जातीजमातींच्या लोकांना बरोबर घेऊन लढला गेला आणि त्याने स्वातंत्र्य मिळवून दिले म्हणून गांधींना 'राष्ट्रपिता' म्हटले जाते. संघासारख्या ज्या संघटना स्वातंत्र्य चळवळीत नव्हत्या त्या संघटना किंवा संघ परिवारातील संघटनाच तेवढ्या गांधींना 'राष्ट्रपिता' मानावयास तयार नाहीत.

गोपाळकृष्ण गोखले यांना गांधी आपले राजकीय गुरू मानत पण, गांधींच्या नैतिकतेमुळे गोखलेसुद्धा प्रभावित झाले होते. राजकारणाचा सैद्धान्तिक पाया नैतिकतेचा आणि लढ्याचा मार्ग साधनशुचितेचा होता. माणसाच्या अंत:करणातून होणाऱ्या परिवर्तनावर त्यांचा भर होता. हृदयपरिवर्तनाच्याद्वारे मतपरिवर्तन करावे, त्यातून सर्व प्रकारच्या सुधारणा, बदल घडवून आणावेत. समोरचा माणूस आपल्याशी अनीतीने वागत असला तरी आपण नीतीने वागण्याचे सोडू नये. सत्ताधाऱ्यांच्या बाबतीतही गांधींची हीच भूमिका होती. शांततामय मार्गांचा अवलंब, आपल्या समोरच्या माणसाशी जवळीक वाढवून, त्याला आपल्या लढ्याची पूर्वसूचना देऊन आंदोलन करणे हे गांधींचे सूत्र होते. अमुक वाजता अमुक ठिकाणी अमुक दिवशी सत्याग्रह करणार असे घोषित करून ते सत्याग्रह करीत व अनुयायांनाही याच पद्धतीने वर्तन करण्यास सांगत. अनुयायांचे नीतिधैर्य कायम राखण्यासाठी त्यांनी आत्मक्लेशासाठी उपवास केले. उपवासाने तत्त्व मान्य झाले की, तपशिलाबाबत तडजोड करणे, देवाण-घेवाणीचे तंत्र अवलंबणे यांवर त्यांचा भर होता. टिळकांच्यापेक्षा गांधींचा राजकीय चळवळीकडे पाहण्याचा दृष्टिकोण निराळाच होता. राजकीय बाबतीत मार्गांच्या संदर्भात टिळकांनी नैतिकतेपक्षा परिणामकारकतेला प्राधान्य दिले. आपला शत्रू नैतिकता पाळत नसेल तर आपण ती पाळण्याची गरज नाही. 'शठं प्रति शाठ्यम्' ही टिळकांची भूमिका होती. गांधींनी हा मार्ग स्वीकारला नाही. ते साधनशुचितेचे आग्रही होते. गांधी श्रीकृष्णाच्या गीतेचेही दाखले द्यायचे, पण कधी कधी प्रश्न असा पडतो की, साधनशुचितेचा आग्रह धरणाऱ्या महात्मा गांधींना त्या व्याख्येत न मोडणाऱ्या श्रीकृष्णाचे डावपेच कसे काय पसंत पडत होते? कारण गांधींनी साध्याइतकेच साधनांच्या पावित्र्याला महत्त्व दिले. श्रीकृष्णाने सूर्याच्या पुढे हात धरून अंधार पाडला आणि अंधार झाला म्हणून धर्मयुद्धानुसार युद्ध बंद झाले तेव्हा सूर्यापुढचा हात काढून घेऊन कौरवांशी युद्ध करणारा डावपेच केला. तो साधनशुचितेत बसत नाही. गांधींनी अशा

चलाखीचे दूरान्वयानेही समर्थन केलेले नव्हते. कारण गांधींच्या चळवळीत साध्याइतकेच साधनांना महत्त्व होते. एवढ्याचपुरता विचार केला तर श्रीकृष्ण हा जगातील पहिला कम्युनिस्ट ठरावा! गांधींनी जे शांततामय अहिंसक मार्गाचे तंत्र अवलंबले, विरोधकांशी सहवास ठेवून त्यांचे परिवर्तन घडविण्यावरचा विश्वास, ज्याच्या विरुद्ध लढा द्यायचा त्यालाही गाफील ठेवायचे नाही, हे जे लढ्याचे स्वरूप होते व सत्याग्रहाचे तंत्र होते ते जगातील अन्य लढ्यांच्या तंत्रापेक्षा वेगळे होते. गांधींच्या या तत्त्वज्ञानाचा, दृष्टिकोणाचा आणि लढ्याच्या नव्या तंत्राचा परिणाम सर्वसामान्य माणसाच्या मनावर पडत होता आणि तो प्रभाव लोकांना चळवळीकडे खेचून घेत होता. टिळकांचे राजकारण प्रामुख्याने मध्यमवर्गीयांचे राजकारण होते. गांधींनी शेतकरी, कामगार, दलित, मंहिला यांच्या प्रश्नांचा विचार केला आणि त्यांचे प्रश्न हातात घेतले. सर्व धर्मीयांचा सहभाग मिळविल्याशिवाय चळवळ निर्णायक स्वरूपाची होणार नाही, हे गांधींनी ओळखलेले होते. त्यामुळे त्यांची चळवळ, विचार ग्रामीण भागापर्यंत पसरत गेला. गांधी धर्म मानीत पण सामाजिक सुधारणांचाही ते पुरस्कार करीत. लोकमान्य टिळकांचे श्रेष्ठत्व कोणाला नाकारता येईल? पण टिळकांच्या राजकारणाला मर्यादा होत्या. टिळकांनी सामाजिक सुधारणांना विरोध केल्याचे प्रसंग त्यांच्या जीवनात अधिक सापडतात. या पार्श्वभूमीमुळे ब्राह्मणवर्ग हा टिळकांचा प्रामुख्याने अनुयायी बनला. त्या वेळचा मध्यमवर्ग टिळकांच्या राजकारणाचा कणा बनला. आधीच ब्रिटिशांच्या आगमनामुळे या वर्गाची मक्तेदारी संपली होती. त्यामुळे टिळकांच्या राजकारणाने आपल्या वर्गाचे हित त्याला अधिक दिसू लागले. गांधींच्या उदयानंतर त्यांच्या राजकारणात आपले वर्गीय हितसंबंध हे बाजूला पडले आहेत.याची खंत या वर्गाला प्रकर्षाने वाटत होती. हा मध्यमवर्ग ती खंत कदाचित उघडपणे बोललाही नसेल. पण तो गांधींच्या राजकारणापासून दूरच राहत गेला. मध्यमवर्ग गांधींचा विरोधक बनल्यासारखा झाला आणि बहुजनसमाज गांधींकडे आकृष्ट होत गेला. जातीच्या नावाने ब्राह्मण घटकाला राजकारणात स्थान मिळण्याची शक्यता नव्हती. त्यामुळे त्यांनी धर्माच्या नावाने राजकारण मांडले. टिळकांनी राष्ट्रजागृतीचे महान कार्य केले. त्यात त्यांनी स्वधर्म, भाषा, संस्कृती यांचा वापर करून अभिमान जागृत केला. टिळक बहुजन समाजाच्या आशाआकांक्षांशी कधी समरस झाले नाहीत. उच्च जातींची बाजू घेऊन वर्णव्यवस्था, रूढी, परंपरा यांचे त्यांनी समर्थन केले. उलट गांधी स्वत:ला सनातनी हिंदू म्हणवून घ्यायचे पण त्यांनी समाजसुधारणांना विरोध केला नाही. त्यामुळे टिळकांना मानणाऱ्या त्यांच्या अनुयायांनी गांधींना आपल्या शत्रूच्या ठिकाणीच मानले. हिंदुत्ववाद्यांनी उच्च जातींच्याच हिताचा विचार मनात ठेवून राजकारण केले

म्हणून ते संकुचित राजकारणात गुरफटले गेले. त्यांनी त्या बाबतीत इतर समाजांना गौणच लेखले होते. अथणी येथे ११ नोव्हेंबर १९१७ रोजी लोकमान्य टिळक यांनी केलेले भाषण उदाहरणाकरिता नमूद करण्यासारखे आहे. ''शेतकऱ्यांनी विधिमंडळात जाऊन काय नांगर धरावयाचा आहे? शिंप्यांनी तेथे जाऊन काय शिलाई मशीन चालवायचे आहे? आणि वाणी तेथे जाऊन काय तराजू धरणार?'' असे लोकमान्य टिळक अथणीच्या सभेत म्हणाले होते. लोकमान्य टिळक यांच्या अखेरच्या काळातील त्यांचे हे भाषण आहे. बहुजन समाजाविषयीचे त्यांचे हे विचार त्या समाजाला कमी लेखणारेच नव्हते काय? सर्वसामान्य ब्राह्मण माणूसही विधिमंडळात जाऊन काय दिवे लावणार होता? पण त्याच्या संबंधात टिळकांनी ही भाषा कधी वापरली नाही. २४ मार्च १९१८ रोजी मुंबईत भारतातील पहिली अस्पृश्यता निवारण परिषद झाली. या परिषदेत 'टिळक केसरीकार म्हणून नव्हे तर व्यक्तिगतरीत्या आपण या परिषदेत भाग घेऊ' असे सांगून टिळक या परिषदेला आले. या परिषदेचे वर्णन कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांनी 'धर्म, जीवन व तत्त्वज्ञान' या ग्रंथात केले आहे. परिषदेत सकाळी भाषण करताना लोकमान्य टिळक म्हणाले, ''पेशव्यांचे वेळीही अस्पृश्यांनी भरलेल्या पखालीतील पाणी ब्राह्मण प्याले; अस्पृश्यता देवास मान्य असेल तर मी त्यास देवच म्हणणार नाही.'' लोकमान्यांच्या या वाक्यावर मंडप कोसळून पडतो असे वाटेल असा गजर झाला, अशी आठवण कर्मवीर शिंदे यांनी दिली आहे. मात्र अस्पृश्यता मोडण्यासाठी एक जाहिरनामा तयार करून त्यावर लोकमान्य टिळक यांची सही आणण्यास कर्मवीर शिंदे गेले. कर्मवीर शिंदे यांनी त्या संबंधीची अशी आठवण लिहिली आहे, ''पण लोकमान्य कचरू लागले. एक वेळ ते पुढेही आले. पण दादासाहेब करंदीकर आडवे आले. शेवटी लोकमान्य अगदी काकुळतीला येऊन उभे राहून त्यांनी दोन्ही हात माझ्या खांद्यावर ठेवले व आर्जवू लागले की इंग्लंडमधून परत येईपर्यंत तरी मी (शिंदे यांनी) हा आग्रह सोडावा. परंतु या वर्तनामुळे लोकमान्यांच्या विषयी मोठ्या प्रमाणात जनमत तयार झाले व त्यांना ते १ डिसेंबर १९१९ला विलायतेहून परत आले तेव्हा त्या ठिकाणी ब्राह्मणेतरांच्या व प्रागतिकांच्या विरोधाला तोंड द्यावे लागले. पुणे येथे लोकमान्यांना मानपत्र देण्यास मोठा विरोध झाला.'' बहुजन समाजाच्या मनात लोकमान्य टिळक यांच्याविषयी कशा भावना निर्माण होत गेल्या याची कल्पना यावी याकरिता कर्मवीर शिंदे यांची आठवण दिली आहे. शिवाय सनातनी 'टिळकपंथी' का बनत गेले हेही यामुळे स्पष्ट होण्यास मदत होईल. लोकमान्य टिळक यांच्या राजकारणाने आणि त्यांच्या मार्गांनी स्वराज्य मिळाले तर ब्राह्मणी वर्चस्व पुन्हा प्रस्थापित होईल असे बहुजनसमाजाला का वाटत होते हेही

समजून येईल. गांधींच्या उदयाने टिळकंपथीय राजकारण मागे पडून गांधींचे विचार व त्यांची चळवळ सर्वसामान्यांपर्यंत पोहोचली आणि ब्राह्मणी वर्चस्वाची आशाच गांधींच्या विचाराने उखडली गेली. हाच राग हिंदुत्ववाद्यांचा गांधींवर होता. प्रा. नलिनी पंडित यांनी 'जातिवाद आणि वर्गवाद' या पुस्तकात लोकमान्य टिळक यांच्या संबंधात असे म्हटले आहे, ''मात्र टिळकांसारख्या लोकोत्तर नेत्यालाही मध्यमवर्गीय राजकारणाच्या मर्यादा शेवटपर्यंत ओलांडता आल्या नाहीत. शहरातील सुशिक्षित लोकच त्या काळी राजकीय चळवळीत अग्रभागी होते.'' या लोकांच्या हितसंबंधाच्या राजकारणाला गांधींच्या राजकारणामुळे खीळ बसली होती. ''तत्कालिक राजकीय प्रश्नांना अवास्तव महत्त्व देऊन जहाल राष्ट्रवादी पक्षानेही या उच्चवर्गीय मध्यमवर्गाचाच अनुनय केला आणि बहुजन समाजाच्या भावनांची व हितसंबंधांची उपेक्षा केली. सत्यशोधकांच्या समानतेच्या मागणीला विरोध करून त्यांनी ब्राह्मणेतरांची मने दुखावली. अस्पृश्यता नष्ट करण्याच्या जाहिरनाम्यावर सही करण्याचे नाकारून दलित पुढाऱ्यांची नाराजी त्यांनी (लोकमान्य टिळकांनी) ओढवून घेतली. कूळ कायद्याच्या बाबतीत खोत सावकारांची बाजू घेऊन शेतकऱ्यांची सहानुभूती ते गमावून बसले. म्हणून टिळकांचे कणखर व्यक्तिमत्त्व, उत्कट देशभक्ती, निर्भय व निःस्पृह वृत्ती आणि अतुलनीय स्वार्थत्याग यामुळे सर्वांनाच जरी त्यांच्याबद्दल निस्सीम आदर व स्वाभिमान वाटला तरी महाराष्ट्रातील ब्राह्मणेतर जनता त्यांच्या चळवळीत हिरिरीने सामील झाली नाही.'' असे प्रा. पंडित म्हणतात. हाच भेद पुढे टिळकपंथीय व गांधींचे नेतृत्व मानणारा समाज यांच्यात कायम राहिला. टिळकांच्या विचारांमागे राहिलेल्या मध्यमवर्गीयांतील एक गट सनातनी प्रवृत्तीचाच राहिला आणि या गटाने गांधींना विरोध करण्याचे राजकारण करण्यात धन्यता मानली.

गांधींच्या विचाराने या वर्गाच्या हितसंबंधांना धक्का बसला. एकीकडे हा धक्का आणि दुसरीकडे गांधींचा विचार, त्यांची चळवळ झंजावातासारखी पसरत चालली होती याचा धक्का, यातून निर्माण झालेला द्वेष व असूया यामुळे हिंदुत्ववादी गांधींना पहिल्या क्रमांकाचे शत्रू मानीत. गांधींच्या सर्वव्यापी राजकारणामुळे गांधींच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या चळवळीतून स्वातंत्र्य मिळाले तर ते आपल्या विचारसरणीला मारक ठरणारे आहे आणि गांधींपेक्षा अधिक मोठ्या स्वातंत्र्य चळवळीला जन्म देण्याची कुवत संघ नेतृत्वाजवळ नव्हती, म्हणून संघ स्वातंत्र्य चळवळीत सामील झाला नाही. हिंदुत्ववाद्यांजवळ सर्वसामान्य माणसाच्या हिताचे राजकारण करणारी विचारसरणी नव्हती. गांधी स्वतःला सनातनी हिंदू म्हणवून घेत असल्यामुळे गांधीविरोधात राजकारण करण्यासाठी आणि लोकांना आपल्या बाजूला

घेता आले तर घ्यावे या विचाराने हिंदुत्ववादी गांधी मुस्लिमधार्जिणे आहेत असा प्रचार करीत. पण गांधींनी मुस्लिमधार्जिणेपणा करण्याचे कारणच काय, हे ते लोकांना पटवून देऊ शकत नव्हते. सर्वसामान्य जनतेला सचोटी, प्रामाणिकपणा याविषयी आस्था आहे आणि हिंदुत्ववाद्यांच्या राजकारणात त्याचाच अभाव आहे. लोकमान्य टिळक यांच्याप्रमाणेच हिंदू-मुस्लिम ऐक्य झाल्याशिवाय ब्रिटिशांना भारतातून घालवता येणार नाही ही गांधींचीही धारणा असल्याने त्यांनी मुस्लिमांचा सहभाग मिळविण्यासाठी मुस्लिमांच्या काही दोषांकडे टिळकांप्रमाणेच दुर्लक्ष केले. पण याला गांधींचा मुस्लिमधार्जिणेपणा म्हणता येणार नाही आणि गांधींचा तो मुस्लिमधार्जिणेपणा म्हणावयाचा तर त्यातून मग लोकमान्य टिळकही सुटू शकत नाहीत.

महात्मा गांधींनी देशाच्या फाळणीला निकराचा विरोध केलेला होता आणि आता गांधींमुळे फाळणी झालेली नाही हे देशाला समजून चुकलेले आहे. गांधींच्या राजकारणाचा काळ हा अगदी काल-परवाचा काळ आहे. गांधींना पाहिलेली, त्यांच्या राजकारणात असलेली आणि गांधींच्या सहवासात राहिलेली काही माणसे हयात आहेत. इतक्या डोळ्यांदेखत गांधींचे राजकारण असताना फाळणीला महात्मा गांधी कारणीभूत आहेत किंवा त्यांच्यामुळे देशाची फाळणी झाली असे मानणे हे राजकारणाविषयी किती अज्ञान आहे हेच दाखवून देणारे आहे. फाळणी गांधींमुळे झालेलीच नाही. पण मोहनदास करमचंद गांधी नावाचा माणूस भारतात आहे याविषयी भारताला काहीही माहिती नव्हती आणि त्याची माहिती असण्याचे काही कारण नव्हते अशा काळात फाळणीची बीजे रुजली होती. १८८८च्या सुमारास लॉर्ड डफरीन याने फाळणीची बीजे रुजवली आणि १९०९ साली विभक्त मतदारसंघाची स्थापना झाली. त्याच वेळी या बीजांना कोंब फुटले होते. गांधींनी फाळणीची विषवल्ली मुळापासून उपटण्याचे प्रयत्न केले होते. या प्रयत्नांत ते यशस्वी झाले नाहीत. ते एकाकी पडले होते. फाळणी रोखण्याचे सामर्थ्य जर देशात त्या वेळी कोणामध्ये असेल तर ते फक्त एकट्या महात्मा गांधींमध्येच होते. पण गांधींचे सामर्थ्य कमी पडले त्याला गांधी कारणीभूत नाहीत. तर त्याचा दोष संपूर्ण देशावर येतो! फाळणीचा प्रतिकार करण्यासाठी देश सिद्ध आहे, असे गांधींना दिसले असते तर गांधींनी फाळणी निश्चितच टाळली असती. फाळणीच्या विरोधात फक्त गांधीच शेवटपर्यंत होते.

❑❑❑

फाळणी आणि गांधी

भारताच्या फाळणीची बीजे ब्रिटिशांच्या 'फोडा झोडा' धोरणात आहेत तशीच मुस्लिम लीग, हिंदू महासभा यांच्या धर्माच्या आणि एकमेकांच्या द्वेषाच्या राजकारणात प्रामुख्याने आहेत. तशीच ती काँग्रेस नेत्यांच्या अहंपणात आणि नको त्यावेळी नको ती केलेली विधाने, वक्तव्ये यात आहेत. त्यामुळे फाळणीच्या पापाचे खापर कोणा एका व्यक्तीच्या माथ्यावर फोडणे प्रामाणिकपणाचे होणार नाही. १८५७ चे बंड आणि त्या आधी दक्षिणेत १७६३ नंतर झालेले शेतकरी, जमीनदार यांचे उठाव हे हिंदू-मुस्लिम यांच्या ऐक्यातून उभे राहिले होते. त्यामध्ये ब्रिटिशांनी हिंदू व मुसलमान अशी फूट पाडून आपले साम्राज्य कायम करावयाचे हे धोरण स्वीकारले. त्यातूनच लॉर्ड कर्झनने १९०५ साली बंगालची फाळणी केली. या फाळणी विरोधात हिंदू-मुस्लिम यांच्या ऐक्यातून ब्रिटिशांच्या बंगाल फाळणीला विरोध झाला. फेब्रुवारी १९०५ मध्ये लॉर्ड कर्झनने भारत मंत्र्यांकडे फाळणीची योजना पाठवली व तिला मंजुरी मिळेपर्यंत गुप्तता पाळली. बंगालच्या फाळणीला मंजुरी मिळताच ती १९ जुलै १९०५ रोजी जाहीर केली आणि १६ ऑक्टोबर १९०५ रोजी तिची अंमलबजावणी केली. त्यावेळी बंगालमध्ये ८ कोटी लोक होते. त्यापैकी ४ कोटी ३० लाख बंगाली व २ कोटी १० लाख बिहार व ओरिसामधील होते. राज्यकारभाराच्या सोयीसाठी अगडबंब बंगालची विभागणी बंगाली भाषिकांचा प्रांत निर्माण करून झाली असती तर त्याला विरोधही झाला नसता. पण लॉर्ड कर्झनने राज्यकारभाराची सोय हे लटके कारण पुढे करून पूर्व बंगालमधील मुस्लिम बहुसंख्याकांचा एक प्रांत आणि दुसरा हिंदूंची बहुसंख्या होणार नाही अशा पद्धतीने केला. हिंदू-मुस्लिम यांच्यात फूट पाडून राज्य करावे या हेतूने ही फाळणी केली होती. पण तेव्हा हिंदू-मुस्लिम जनतेवर फोडा-झोडा धोरणाचा परिणाम झाला नाही आणि हिंदू-मुस्लिम यांनी हातात हात घालून, खांद्याला खांदा लावून ब्रिटिशांच्या

गांधींची काय भूमिका होती याचा विस्ताराने ऊहापोह होण्याची आवश्यकता आहे. हिंदू धर्मवादी, जीना आणि मुस्लिम धर्मवादी यांच्यामध्ये बऱ्याच बाबतीत एकसारखेपणा आढळून येतो. गांधींच्या फाळणी संदर्भातील भूमिकेचा विचार करण्यापूर्वी या दोन धर्मांध नेत्यांतील सारखेपणाचे वरवर किरकोळ वाटणारे उदाहरण, विषयांतर वाटले तरी, मांडणे गरजेचे आहे. गांधींना 'महात्मा' म्हटले जाई. पण मुस्लिम लीगचे नेते बॅ. महम्मद अली जीना यांनी गांधींना 'महात्मा' म्हणण्याचे नाकारले. गांधींशी फाळणीवर चर्चा करण्याची जीनांनी तयारी दर्शवली तेव्हा मात्र त्यांनी ५ ऑगस्ट १९४४ रोजी वृत्तपत्रांना निवेदन दिले त्यात गांधींचा उल्लेख 'महात्मा' असा केला आहे. सोयीचे असेल तेव्हा जीना गांधींना महात्मा म्हणत. तसेच हिंदुत्ववाद्यांचेही आहे. भारतीय जनता पक्ष उत्तरेत १९९१ साली चार राज्यांत सत्तेवर आल्यावर भाजपनेही गांधींना 'महात्मा' व 'राष्ट्रपिता' मानण्याचे नाकारले. भारतीय जनता पक्षाची निर्मिती झाली तेव्हा मात्र भाजपने महात्मा गांधींचा गांधीवाद स्वीकारला. हा धर्मवादी राजकारणाचा मतलबाचा भाग आहे.

फाळणी टाळण्याकरता व्हॉईसरॉयला गांधींनी आपली नऊ कलमी योजना सादर केली. ती अशी :

१. मंत्रिमंडळ बनविण्याचा जीनांना पर्याय द्यावा.

२. मंत्रिमंडळातील मंत्र्यांची निवड करण्याचे सर्वाधिकार जीनांना असावेत. मग त्यांच्या मंत्रिमडळातील सर्व मंत्री मुसलमान किंवा मुसलमानेतर असावेत किंवा सर्व जातिधर्मांना प्रतिनिधित्व मिळेल असे मंत्रिमंडळ जीनांनी बनवावे.

३. सर्व भारतीयांच्या हिताच्या कार्यक्रमासाठी जीनांनी मान्य केले तर काँग्रेस जीनांना सर्व प्रकारचे सहकार्य करण्याची हमी देईल.

४. भारतीयांच्या हिताच्या कोणत्या गोष्टी आहेत आणि कोणत्या नाहीत हे लॉर्ड माउंटबॅटन व्यक्तिगतरीत्या एक पंच म्हणून ठरवतील.

५. संपूर्ण भारतात शांतता राहावी यासाठी लीगच्या वतीने किंवा जीना ज्या पक्षाचे सरकार बनवतील त्या सरकारच्या वतीने जीना शांततेसाठी प्रयत्न करतील.

६. या चौकटीत राहून जीनांना अभिप्रेत असलेल्या पाकिस्तानची संकल्पना ते सत्तांतरापूर्वी सादर करतील.

७. नॅशनल गार्ड किंवा खाजगी सैन्य असणार नाही.

८. कायदेमंडळात काँग्रेसला बहुमत असले तरीही या बहुमताचा उपयोग मुस्लिम लीगविरुद्ध काँग्रेस करणार नाही. सर्व भारतीयांच्या हिताच्या आणि कल्याणाच्या ज्या उपाययोजना लीगचे सरकार योजील त्या सर्व योजना व कार्यक्रमांना काँग्रेस पाठिंबा देईल.

९. जर जीनांनी हा प्रस्ताव मान्य केला नाही तर, हीच योजना, पर्याय म्हणून काँग्रेसपुढे ठेवली जाईल.

गांधींची ही सूचना व्हाईसरॉयना चांगली वाटली होती आणि त्यांनी लष्कर प्रमुख लॉर्ड इस्मे यांच्याशी गांधींनी चर्चा करावी म्हणजे गांधींच्या योजनेला इस्मे तांत्रिकदृष्ट्या आवश्यक असलेले योजनेचे स्वरूप देतील असा विचारही केला. फाळणी टाळण्याकरिता महात्मा गांधींनी कोणत्या टोकाला जाऊन जीनांपुढे हा पर्याय ठेवला होता याची यावरून कल्पना येते. महात्मा गांधींनी राजाजी योजनेला पाठिंबा दिला होता. त्या योजनेत सरळ फाळणी हे तत्त्व अभिप्रेत नव्हते. त्यात बरेच जर तर होते. त्यामुळे राजाजी योजना काय होती हे प्रथम समजून घेतले पाहिजे.

१. स्वतंत्र भारताच्या घटनेबाबत पुढे नमूद केलेल्या अटी मान्य झाल्यास हिंदी स्वातंत्र्याच्या मागणीला मुस्लिम लीग मान्यता देईल आणि संक्रमण काळात हंगामी सरकार स्थापण्यासाठी काँग्रेसशी सहकार्य करील.

२. युद्ध समाप्तीनंतर वायव्य व ईशान्य भारतातील मुस्लिम बहुसंख्येच्या सलग जिल्ह्यांची फेररचना करण्यासाठी एक समिती नेमण्यात येईल. याप्रकारे पुनर्रचित अशा विभागात प्रौढ मतदानाने वा इतर व्यवहार्य रीतीने सार्वमत घेऊन हिंदुस्थानातून फुटून निघण्याबाबत निर्णय घेतला जाईल. बहुमताने स्वतंत्र सार्वभौम राज्य स्थापन करण्याचे ठरले तर सीमेवरील जिल्ह्यात दोनपैकी कोणत्या राज्यात सामील व्हायचे हे ठरविण्याचे स्वातंत्र्य राहील.

३. सार्वमत घेण्यापूर्वी सर्व पक्षांना आपापली भूमिका मांडता येईल.

४. अलग होण्याचे ठरले तर संरक्षण, व्यापार, दळणवळण व इतर आवश्यक बाबतींत दोन्ही राष्ट्रांत करार होतील.

५. लोकसंख्येची अदलाबदल त्या त्या लोकांवर अवलंबून राहील.

६. ब्रिटिश सरकार संपूर्ण स्वातंत्र्य देणार असेल व हिंदुस्थानच्या कारभाराची जबाबदारी संक्रमित करणार असेल तरच या सर्व अटी बंधनकारक राहतील.'

या योजनेच्या संबंधात १७ एप्रिलला राजाजींनी जीनांना पत्र पाठविले आणि नंतर ३० जूनला तारेने गांधींचा या योजनेला पाठिंबा असल्याचे कळविले होते. जीनांनी २ जुलैला तारेनेच ही योजना आपल्याला मान्य नसल्याचे राजाजींना कळविले. राजाजी योजनेमुळे आजच्यासारखी फाळणी होणार असती तर जीनांनी ही योजना फेटाळून लावण्याचे काहीच कारण नव्हते. मुस्लिम लीगच्या कार्यकारिणीपुढे जीनांनी ३० जुलै रोजी राजाजींची योजना ठेवली. या कार्यकारिणीत जीना म्हणाले की, ''गांधींनी नि:संदिग्ध शब्दांत पाकिस्तानची मागणी मान्य करावी आणि लीगशी हातमिळवणी करावी. म्हणजे हिंदी लोकांचे स्वातंत्र्य जवळ येईल.

हिंदू-मुसलमानांत एकमत झाल्याखेरीज स्वातंत्र्य मिळणार नाही. राजाजी योजना म्हणजे लुळेपांगळे, कुरतडलेले पाकिस्तान असून गांधी कुरतडलेले पाकिस्तान देऊ पाहात आहेत. ही योजना मांडून गांधी व राजाजी घोड्यापुढे गाडी जोडीत आहेत. ब्रिटिशांनी सत्तांतर केले तरच या योजनेची अंमलबजावणी होऊ शकणार आहे. त्यामुळे ही योजना मुस्लिम लीगला स्वीकारता येणे शक्य नाही.''[४] म्हणजे गांधींनी पाठिंबा दिलेली राजाजी योजना जीनांनी सरळ सरळ धुडकावून लावलेली आहे. त्यामुळे, गांधीजीनी राजाजी योजनेला पाठिंबा दिला आणि त्यामुळे फाळणी घडून आली. हा हिंदुत्ववाद्यांचा दावा निराधार आहे. त्याचप्रमाणे फाळणी टाळण्यासाठी गांधींनी स्वत: जी नऊ कलमी योजना जीनांपुढे ठेवली होती तीही जीनांना अमान्य होती. या दोन घटना गांधींना फाळणी मान्य नव्हती हे तर सिद्ध करतातच, पण त्याचबरोबर फाळणी टाळण्याकरिता गांधी जीनांना विविध पर्यायही सुचवत होते हेही त्यातून दिसून येते. भारतापासून काही भाग काढून घेऊन त्याचे 'पाकिस्तान' बनविण्याचे स्वप्न कशाला पाहता! सारा भारत हेच 'पाकिस्तान' आहे असे समजून त्याचा कारभार करा. तुम्ही पंतप्रधान बना. संपूर्ण मुस्लिम लीगचे मंत्रिमंडळ बनवा. कसेही मंत्रिमंडळ बनवा पण पाकिस्तानची मागणी सोडून द्या, असे गांधी जीनांना विनवत होते. मुसलमानांचा अनुनय करण्यासाठी ते ही विनवणी करत नव्हते तर अखंड भारत टिकवण्यासाठी ते वाटेल ते मोल देण्यास तयार होते, हेच यातून दिसून येते. पण या घटनांचा विचार न करताच हिंदुत्ववादी महात्मा गांधींवर फाळणीचे खापर फोडतात. जीनांबरोबर झालेल्या चर्चेचा वृत्तान्त गांधीजींनी राजाजींना सविस्तरपणे सांगितला. गांधीजी राजाजींना म्हणाले, ''तुमच्या तोडग्याची जीनांनी हेटाळणीच केली आणि तुमची (राजाजींची) ही लुडबूड आहे अशी संभावनाही केली. मी (गांधी) जीनांना म्हणालो की, राजाजींच्या तोडग्याला माझा पाठिंबा आहे. तुम्ही हा तोडगा स्वीकारून त्याला पाकिस्तान हे नाव द्यावे. लाहोरच्या ठरावाविषयी (पाकिस्तानच्या मागणीचा ठराव) जीना माझ्याशी बोलू लागले तेव्हा मी त्यांना म्हणालो, त्या ठरावावर बोलण्याऐवजी आपण राजाजींच्या तोडग्याविषयी बोलूया. या तोडग्यात काय दोष आहेत ते दाखवून द्या. पण जीना यातील काहीच मानावयास तयार नव्हते.'' असा गांधींनी राजाजींना जीनांबरोबर झालेल्या चर्चेतील प्रारंभीचा भाग सांगितला. चर्चेचा पुढील भाग सांगताना गांधी म्हणाले, ''त्यांना आत्ताच्या आत्ता पाकिस्तान हवे. स्वातंत्र्यानंतर नको. (फाळणीच करावयाची असेल तर ती कशी करावी, हे भारताचे नेते आणि जीना आपापसात वाटाघाटी करून

---

४. महात्मा, खंड महा. डी. जी. तेंडुलकर

ठरवतील. भारताची फाळणी करून ब्रिटिशांनी सत्तांतर करण्याला राजाजी तोडग्यात विरोध होता.) पाकिस्तान व भारत यांना एकदमच स्वातंत्र्य मिळाले पाहिजे असे जीना म्हणत होते. त्यांचा तोच आग्रह होता. आपण एकमताचा तोडगा काढू आणि तो ब्रिटिश सरकारपुढे ठेवू. त्यांना आमचा तोडगा मान्य करा असे सांगूया, असे गांधी जीनांना सांगत होते. ब्रिटिशांनी फाळणीची योजना आखावी आणि फाळणी करावी. ही फाळणी आमच्यावर बंधनकारक राहील असे मी (गांधी) स्वत: कधीच ब्रिटिशांना सांगणार नाही यावर गांधींनी जीनांपुढे भर दिला; तेव्हा आम्हाला निखळ पाकिस्तान पाहिजे, आम्ही वेगळेच पाकिस्तान मान्य करू हा घोशा जीनांनी लावला होता. ''मुस्लिम लीग मुसलमानांची मोठी घटना आहे आणि तुम्ही तिचे नेते आहात हे मान्य; पण त्याचा अर्थ भारतातील सर्वच मुसलमानांना पाकिस्तान हवे आहे असा नव्हे; असे उत्तर मी जीनांना दिले. तुम्हाला ज्या भागाचे पाकिस्तान व्हावे असे वाटते त्या भागात सार्वमत घेऊन कितीजणांना पाकिस्तान हवे ते ठरवूया, असेही मी जीनांना सुचविले. त्यालाही जीनांची तयारी नव्हती.'' जीनांबरोबर गांधींनी केलेल्या पहिल्या दिवसातील चर्चेचा हा वृत्तान्त गांधींनी राजाजींना सांगितला. ही चर्चा गांधींची फाळणीला तयार नव्हती हेच सिद्ध करते. तरीही हिंदुत्ववाद्यांचा गेल्या कित्येक वर्षांपासूनचा, गांधींमुळे फाळणी झाली, हा प्रचाराचा भाग झाला आहे. ज्या प्रकारचा इतिहास शाळा, कॉलेजांतून शिकवला जातो आणि इतिहासाविषयीच्या अज्ञानामुळे, मुस्लिम द्वेषाचे विष भारतीय जनतेच्या मनात बरेच भिनलेले आहे. गांधी विचारसरणीला रोखण्यासाठी त्याच पद्धतीचा प्रचार केला पाहिजे. मग सत्याचा मुडदा पडला तरी चालेल; त्याची पर्वा करण्याचे कारण नाही, ही हिंदुत्ववाद्यांची धारणा आहे. म्हणूनच ते 'गांधी फाळणीला कारणीभूत आहेत' असा प्रचार करतात. गांधींचे विचार आणि स्वामी विवेकानंदांचे विचार देश एक ठेवण्याच्या बाबतीत सारखेच आहेत. विवेकानंदांनीही म्हटले आहे, ''जातीजातींनी भांडत बसणे योग्य नाही. त्यामुळे कोणते हित होणार आहे? अशा भांडणाने आपण अधिक विभागले जाऊ, अधिक दुर्बल होऊ, अधिक अधोगतीस जाऊ. जन्मजात हक्कांचे व विशेषाधिकारांचे दिवस आता कायमचे संपले आहेत. भारतातील ब्रिटिश शासनाचे हे वरदानच म्हटले पाहिजे. या जातिविशिष्ट अधिकारांना नष्ट करण्याचे श्रेय मुसलमान शासकांनाही दिले पाहिजे. त्यांचे शासन तसे म्हटले तर पूर्णपणे वाईट नव्हते. कोणतीही गोष्ट सर्वस्वी वाईट वा सर्वस्वी चांगली नसते. भारतावर **मुसलमानांनी मिळविलेला विजय गरिबांच्या व दलितांच्या उन्नतीस कारणीभूत झाला. म्हणूनच आपल्यापैकी एकपंचमांश लोक मुसलमान बनले. केवळ तलवारींनी हे सर्व घडले नाही. तलवार व बंदुका यामुळे हे सर्व (धर्मांतर)**

घडून आले असे समजणे हा कमालीचा वेडेपणाच ठरेल.''[५] गांधी मुसलमानांचा अनुनय करतात असे म्हटले तर मग मुसलमानांच्या बाबतीत ही व अशीच आणखी विधाने करणारे स्वामी विवेकानंद यांना काय म्हणावयाचे?

महात्मा गांधींनी मुसलमानांचा अनुनय केला असा हिंदुत्ववाद्यांचा दावा आहे. याच्या समर्थनार्थ ते गांधींनी जीनांना पंतप्रधान करावे, मुस्लिम लीगला सरकार बनवू द्यावे असे म्हटले होते असे सांगतात. पण लोकमान्य टिळक यांनी गांधींपेक्षा वेगळी भूमिका घेतलेली नव्हती. किंबहुना टिळकांचाच विचार गांधींनी पुढे आणला होता असे म्हणता येईल. लखनौ कराराच्या समर्थनार्थ लोकमान्य टिळक यांनी केलेले भाषण हे त्याचे उदाहरण आहे. ''आम्हास परकीय सरकारशी भांडावयाचे आहे. हे भांडण यशस्वी करावयाचे असेल तर आपापसांतील भांडणे कशीही करून मिटवली पाहिजेत. आणि सर्व जातिभेद, धर्मभेद व मतभेद मिटवून आपण एकमुखी मागणी केली पाहिजे. असे करताना मुसलमानांना अधिक हक्क मिळाले, किंबहुना सर्व राज्य ब्रिटिशांनी मुसलमानांना किंवा हिंदुस्थानातील कोणत्याही जमातीला दिले तरी हरकत नाही. पण हिंदुस्थानातून परकीय सत्ता जाऊन हे राष्ट्र स्वतंत्र होऊ दे, या वृत्तीने आपण हा करार (लखनौ करार) केला.'' असे लोकमान्य टिळक म्हणाले होते.

महात्मा गांधी एकटेच हिंदू-मुस्लिम ऐक्याचा पुरस्कार करीत नव्हते. न्या. महादेव गोविंद रानडे यांनीही तेच सांगितले होते. ''हिंदू-मुस्लिम हे दोघेही एक झाल्यावाचून या विस्तृत देशाची प्रगती मुळीच होणार नाही हाच धडा आपण पूर्वीच्या इतिहासापासून शिकला पाहिजे. अकबर व त्याचे सल्लागार यांनी जो मार्ग दाखवून दिला त्याच मार्गाने जाण्याचा आपण निर्धार केला पाहिजे आणि त्याचा पणतू जो औरंगजेब याने ज्या चुका केल्या त्या आपण निश्चयपूर्वक टाळल्या पाहिजेत.'' असे न्या. रानडे यांनी म्हटले आहे. गांधींचा राजकीय उदय होण्याच्या कितीतरी आधी न्या. रानडे यांनी हे सांगितले आहे.

जातिविद्वेषातून विष पसरवण्याचे प्रयत्न स्वातंत्र्याच्या आधीपासून चालत होते. त्याची परिणती फाळणीत झाली आहे. ''कट्टर हिंदुत्ववाद हेही फाळणीचे एक कारण होते. फाळणी झाल्यानंतर त्याविरुद्ध आवाज उठवणे म्हणजे खून केल्यावर त्याला आपली मान्यता नाही असे खुनी इसमाने सांगावे तसा हा विरोध होता. एक गोष्ट स्पष्टपणे लक्षात घेतली पाहिजे. अखंड भारताची उच्च स्वरात घोषणा करणारा जनसंघ आणि हिंदुत्वाचा भ्रष्ट पुरस्कार करणारे त्याच्या आधीचे हिंदुत्ववादी यांनी

---

५. स्वामी विवेकानंद ग्रंथावली संचयन

ब्रिटिशांना व मुस्लिम लीगला फाळणीच्या कामी वास्तविक साहाय्यच केले आहे. मुसलमानांनी हिंदूबरोबर एकत्र राहावे म्हणून या लोकांनी (हिदुत्ववाद्यांनी) कोणतेही प्रयास केले नाहीत.''[६] असे डॉ. राममनोहर लोहिया यांनी म्हटले आहे. हिंदुत्ववादी अखंड भारताच्या लंब्याचौड्या गप्पा मारतात. पण फाळणीच्या विरोधात त्यांनी स्वत: काय काय केले? आपली जी काय ताकद असेल त्या ताकदीनुसार का नाही त्यांनी आंदोलन केले? रा. स्व. संघाला तर अखंड भारताबाबत बोलण्याचा नैतिक अधिकारही नाही. कारण मुळात संघाने स्वातंत्र्यलढ्यात भागच घेतला नव्हता. मग त्यांनी फाळणीविरुद्ध लढा करण्याचे नावच घ्यायला नको. स्वातंत्र्यलढ्यात भाग न घेणाऱ्या संघटनांना आणि तिच्या नेत्यांना स्वातंत्र्य आणि फाळणी यांविषयी बोलण्याचा नैतिक अधिकारच पोहोचत नाही. फाळणी होऊन का होईना पण भारताला स्वातंत्र्य मिळाले. फाळणी ही दुर्देवी गोष्ट आहे. ब्रिटिशांच्या, हिंदुत्ववाद्यांच्या आणि मुस्लिम लीगच्या राजकारणाचे ते अपत्य आहे. स्वातंत्र्याचा सूर्य उगवत असताना ज्यांनी सुतक दिवस पाळला, त्यांना या देशाबद्दल बोलण्याचा काय अधिकार आहे? आणि अशांनी फाळणीबद्दल महात्मा गांधींना दोष का द्यावा? ज्या संघटना स्वातंत्र्यलढ्यात होत्या, किंवा ज्या संघटनांनी फाळणीच्या विरोधात आंदोलन केले असेल त्यांनाच फार तर गांधींना दोष देण्याचा अधिकार पोहोचतो. तसे म्हटले तर १९४० सालापर्यंत जीनाही अखंड भारतवाले होते. मग ते पाकिस्तानवादी का बनले? याविषयी आत्मसंशोधन केले पाहिजे. "१९३७ च्या निवडणुकीनंतर प्रांतांची फेरमांडणी करून मुस्लिम बहुसंख्येच्या प्रांतांची एक वा दोन राज्ये करण्याची गरज असल्याचे सर महमंद इक्बाल जीनांच्या मनावर पत्राद्वारे बिंबवू लागले. अर्थात जीनांनी त्याबाबतीत घाईगर्दीने पावले टाकली नाहीत. १९३७ च्या निवडणुकीनंतर काँग्रेसने आपल्या प्रांतात लीगबरोबर संयुक्त मंत्रिमंडळे स्थापन केली असती तर पाकिस्तानचा ठराव करण्यापर्यंत जीनांनी कदाचित मजल मारली नसती. १९३० साली इक्बाल यांनी पाकिस्तानची कल्पना मांडली. तेव्हा जीना तिच्याविरुद्ध साशंक होते. इक्बाल यांच्या पाकिस्तानच्या कल्पनेचे अधिष्ठान धार्मिक होते.

इस्लाम, शरियत यांच्या रक्षणार्थ इक्बाल यांना पाकिस्तान हवे होते आणि या दृष्टिकोणातून इक्बाल यांनी द्वि-राष्ट्रवादाचा पुरस्कार केला होता. परंतु ११ ऑगस्ट १९४७ रोजी पाकिस्तानच्या घटना समितीत भाषण करतानाही जीनांनी या रीतीने पाकिस्तानची कल्पना उचलून धरली नाही. किंबहुना इस्लाम हा शब्दही त्यांच्या

---

६. *गिल्टी मेन ऑफ पार्टिशन, डॉ. राममनोहर लोहिया*

भाषणात आला नव्हता. इस्लामी जीवनाच्या पुनरुज्जीवनाचा उल्लेख त्यांनी केला नाही. जीनांनी घटना समितीत सभासदांना भूतकाळ विसरा, नव्या राष्ट्राची उभारणी करताना धर्मभेद आड येऊ देऊ नका, व्यक्तिगत धर्म टिकवूनही समान नागरिकत्व वाढीला लावा असे म्हटले होते.''[७] हे एवढ्यासाठीच नमूद करत आहे की, पाकिस्तानच्या निर्मितीनंतरही जीनांचे हे विचार होते आणि १९४० पूर्वी ते अखंड भारताचे पुरस्कर्ते होते. त्यांच्या भूमिकेत पाकिस्तानची मागणी करण्यापर्यंत बदल का व्हावा याचे कारण शोधले तर त्याचा आजही उपयोग होऊ शकेल आणि त्या आधारे २१ व्या शतकाच्या तोंडावर उभे असताना भारतात सध्या जे वातावरण आहे ते वातावरण बदलण्यास हे सिंहावलोकन उपयुक्त ठरण्याची शक्यता आहे.

खरे म्हणजे पाकिस्तानबाबत जीनांची कल्पनाही स्पष्ट नव्हती. जीनांशी बोलणी करताना महात्मा गांधींनी त्यांना पाकिस्तानच्या कल्पनेविषयी छेडले होते. पण कशा प्रकारचे पाकिस्तान असावे याची कल्पना जीनांना मांडता आली नाही. पाकिस्तानच्या संकल्पनेला तुम्ही पाठिंबा द्या. एवढाच आग्रह जीना गांधीजींजवळ धरत होते. ''पाकिस्तानसंबंधातील मुस्लिम लीगचा प्रचार नकारात्मकच होता. मुस्लिम जनता किंवा ज्यांचा पाकिस्तानच्या संकल्पनेला पाठिंबा होता त्यांच्यासमोरसुद्धा पाकिस्तानचे चित्र रेखाटण्यात आलेले नव्हते. भौगोलिकदृष्ट्या पाकिस्तान कसे असेल हे मांडले जात नाही. पाकिस्तानचे चित्र स्पष्ट केले असते तर लक्षावधी मुस्लिमांनाही त्या पाकिस्तानात स्वारस्य वाटले नसते; म्हणून फाळणीपूर्वी पाकिस्तान कसे असेल याची मांडणी करण्यात आली नव्हती.[८] मुस्लिम लीगने लाहोरच्या अधिवेशनात १९४० साली पाकिस्तानचा ठराव केला त्यानंतर १६ एप्रिल १९४१ रोजी डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी एका निवेदनाद्वारे 'तुमची पाकिस्तानची काय कल्पना आहे. यासंबंधी योजना सादर करा; म्हणजे त्यावर काँग्रेसला विचार करता येईल.' असे जीनांना सुचविले होते. 'तत्त्व म्हणून फाळणीला प्रथम मान्यता द्या' हीच भूमिका जीनांनी जाहीर केली. जीनांना तडजोड करावयाची आहे पण ही तडजोड कशी असावी या विषयाची स्पष्टता त्यांच्या मनात नाही असे गांधींचे जीनांविषयी चर्चेतून मत बनले होते. राजाजींचा तोडगा तडजोडीसाठी चांगला आहे असे गांधींचे म्हणणे होते आणि ते त्यांनी राजाजींजवळ बोलूनही दाखविले होते. या देशातून प्रथम ब्रिटिशांनी निघून जावे. ब्रिटिश गेल्याशिवाय भारतात शांतता नांदणार नाही. एकदा का ब्रिटिश गेले की आमचे आम्ही काय करायचे ते पाहून घेऊ, ही गांधींची भूमिका होती आणि एकत्रित भारताच्या, अखंड भारताच्या

७ मनांतर : १९४७, खंड दोन, गोविंद तळवलकर

८ महात्मा गांधी, द लास्ट फेज, खंड १, प्यारेलाल

स्वातंत्र्याला मुस्लिम लीगने पाठिंबा द्यावा; हा राजाजींच्या तोडग्याचा पाया होता आणि गांधींचेही तेच म्हणणे होते. फाळणी करायची तर ती आपण करू. ब्रिटिशांनी देशाची फाळणी करू नये ही गांधींची भूमिका होती. परंतु हंगामी सरकारच्या वेळी आणि १९३७ च्या संयुक्त मंत्रिमंडळासंदर्भात काँग्रेसने जी भूमिका घेतली त्यामुळे आधीच महत्त्वाकांक्षी असलेल्या जीनांचा काँग्रेसवर विश्वास राहिला नव्हता. त्याचे असे झाले की, हंगामी सरकारबाबत ६ जुलै १९४६च्या काँग्रेस महासमितीच्या अधिवेशनात कार्यकारिणीचा ठराव मंजूर करण्यात आला. हंगामी सरकारची कल्पना काँग्रेस कार्यकारिणीच्या ठरावात मान्य करण्यात आली होती. परंतु १० जुलै १९४६ रोजी अध्यक्ष पंडित जवाहरलाल नहेरूंनी मुंबईत पत्रकार परिषद घेतली आणि त्यात असे सांगितले की, "राष्ट्रीय परिषदेत काँग्रेस प्रवेश करणार ती कोणत्याही कराराने बांधलेली असणार नाही. प्राप्त प्रसंगास अनुसरून धोरण ठरविण्यास काँग्रेस मोकळी राहील. काँग्रेसने घटना समितीमध्ये भाग घेण्याचेच कबूल केले आहे. कॅबिनेट मिशन योजनेत आपल्या इच्छेप्रमाणे वाटेल तो बदल करण्याचा तिला अधिकार राहील." या विधानाने जीना बिथरले. कॅबीनेट मिशन योजनेला मुस्लिम लीग आणि काँग्रेस या दोघांनीही मान्यता दिली होती. त्या योजनेत बदल करण्याचा अधिकार काँग्रेसला नव्हता. असे असताना नेहरूंचे हे विधान महाग पडले आणि इथेच जीना बिथरले आणि ते पहिल्यापेक्षा अधिक दुराग्राही बनले. नेहरूंच्या या विधानाबाबत त्या वेळचे काँग्रेसचे मावळते अध्यक्ष मौलाना आझाद यांनी 'इंडिया विन्स फ्रीडम' या आपल्या पुस्तकात "जवाहरलालांचे हे विधान चुकीचे होते. योजनेत वाटेल ते बदल करण्यास काँग्रेस मोकळी आहे हे म्हणणे बरोबर नव्हते. खरे म्हणजे राज्यघटना संयुक्त (फेडरल) पद्धतीची राहील हे तत्त्व तसेच आम्ही मान्य केले होते. आम्ही (काँग्रेसने) तीन खाती सक्तीने केंद्र सरकारकडे राखीव ठेवून बाकीची प्रांतांच्या अधिकारात राहतील हे मान्य केले होते. प्रांतांची ए, बी व सी गटांत विभागणी होईल हेही ठरले होते. यापैकी कोणत्याही कलमात इतर पक्षांच्या अनुमतीशिवाय काँग्रेस बदल करू शकणार नव्हती. जवाहरलालांचे वरील निवेदन हा जीनांना बाँबस्फोटच वाटला. नेहरूंच्या या मतप्रदर्शनानंतर सर्व परिस्थितीचा फेरविचार करणे अपरिहार्य झाले आहे असे जीनांनी ताबडतोब जाहीर केले आणि लियाकतअली खान यांना लीग कौन्सिलची बैठक बोलविण्यास सांगितले. त्यासंबंधी जीनांनी एक निवेदनच प्रसिद्ध केले. "काँग्रेसने कॅबिनेट मिशन योजना स्वीकारली असून हिंदुस्थानची भावी राज्यघटना त्यावर आधारली जाणार, असे गृहीत धरूनच लीगने ती योजना मान्य केली होती. परंतु काँग्रेस अध्यक्षांनी घटना समितीमधील बहुमताच्या जोरावर कॅबिनेट मिशन योजनेत हवा तो फेरफार

करून घेण्याचा बेत स्पष्ट केला आहे. याचा अर्थ असा की अल्पसंख्याकांचे भवितव्य सर्वस्वी बहुसंख्य जमातींच्या मर्जीवरच अवलंबून राहणार आहे.'' काँग्रेसने कॅबिनेट मिशन योजना अमान्य केली आहे असा जीनांनी नेहरूंच्या निवेदनाचा अर्थ केला आणि लीगने ही योजना स्वीकारली असल्यामुळे व्हाइसरॉयने लीगला मंत्रिमंडळ स्थापण्याचे निमंत्रण द्यावे, अशी सूचना जीनांनी केली. २७ जुलैला मुंबईत मुस्लिम लीग कौन्सिलची बैठक भरली. या बैठकीत भाषण करताना जीना म्हणाले, 'लीगपुढे आता उरलेला एकमेव मार्ग म्हणून पाकिस्तानची पुन्हा मागणी करण्याशिवाय पर्याय नाही.' तीन दिवसांच्या चर्चेनंतर मुस्लिम लीगने एकदा मान्यता दिलेली कॅबिनेट मिशन योजना अमान्य करणारा ठराव संमत केला. जीनांनी पाकिस्तान मिळविण्याकरिता सत्याग्रह करण्याचाही निर्णय जाहीर केला.

ही घटना लक्षात घेता पाचगणी येथे जयप्रकाश नारायण यांच्याजवळ महात्मा गांधींनी 'अखंड भारताचे माझे स्वप्न जवाहरलालने उद्‌ध्वस्त केले' असे का म्हटले होते याचा संदर्भ लागतो. कारण हंगामी सरकारच्या अनुभवामुळे वल्लभभाई पटेल यांनी प्रथम फाळणीला मान्यता दिली होती आणि नंतर नेहरूंनी त्याला संमती दिली होती. असे असताना 'जवाहरलालने माझे स्वप्न उद्‌ध्वस्त केले' असे गांधी म्हणाले त्याला नेहरूंनी १० जुलैच्या पत्रकार परिषदेतील निवेदन कारण असले पाहिजे. घटना समितीचे एक सदस्य मिनू मसानी यांनी नेहरूंच्या विधानामुळे देशाची फाळणी झाली हे मौलाना आझादांचे विधान बरोबर आहे असे प्रेस ट्रस्ट ऑफ इंडिया या वृत्तसंस्थेला १४ नोव्हेंबर १९८८ रोजी दिलेल्या मुलाखतीत म्हटलेले आहे. नेहरूंच्या काही विधानांमुळे देशाची फाळणी झाली हे आझादांचे म्हणणे शंभर टक्के खरे आहे, असे मिनू मसानी यांनी म्हटले आहे. गांधींनी जयप्रकाशांजवळ जे उद्‌गार काढले ते खरे आहेत आणि आपण त्याचा उल्लेख 'ब्लिस, वॉज इट इन दॅट डॉन' या पुस्तकात केलेला आहे याची आठवण मसानी यांनी करून दिली आहे. मौलाना आझाद यांची ही विधाने नेहरूंच्या मृत्यूनंतर प्रसिद्ध झाली असल्यामुळे त्यावर नेहरूंचे काय म्हणणे होते, याचा उलगडा आता कधीच होणार नाही. नेहरूंनी हे विधान कोणत्या संदर्भात केले असेल, त्याची कारणे काय? की याचे परिणाम काय होतील याचा विचार न करताच हे विधान केले गेले, हे प्रश्न अनुत्तरीतच राहणार आहेत. मात्र नेहरूंच्या या विधानामुळे काँग्रेस कार्यकारिणीपुढे पेचप्रसंग निर्माण झाला होता. काँग्रेस महासमितीने केलेला ठराव हेच काँग्रेसचे अधिकृत मत आहे असे म्हणावे तर पक्षाध्यक्षांच्या प्रतिष्ठेचा प्रश्न निर्माण होत होता आणि तसे न म्हणावे तर महासमितीचा नेहरूंच्या त्या विधानाला पाठिंबा आहे असा, त्याचा अर्थ होत होता. अशा विचित्र कात्रीत काँग्रेस सापडली होती. अध्यक्षांचे विधान नाकबूल

करण्याने काँग्रेस संघटनेला बाधा येत होती आणि कॅबिनेट मिशनची योजना अमान्य केली तर देशाचे नुकसान होत होते म्हणून शेवटी कार्यकारिणीने असा ठराव केला, 'मुस्लिम लीग कौन्सिलने आपला पूर्वीचा निर्णय बदलून घटना समितीमध्ये सहकार्य न करण्याचा ठराव केल्याचे पाहून कार्यकारिणीला विषाद वाटतो. परकीय सत्तेचा त्याग करून स्वावलंबनाचे धोरण लवकरात लवकर स्वीकारण्याचा हा काळ. अशा वेळी अतिशय कठीण व विस्तृत स्वरूपाचे राजकीय व आर्थिक प्रश्न आमच्यापुढे असून ते सोडविण्याकरिता देशातील जनतेच्या व त्यांच्या प्रतिनिधींच्या सहकार्याची आवश्यकता आहे. हे सहकार्य लाभले तरच हे संक्रमण सुरळीत व हितकारक बनेल. काँग्रेस व लीग यांच्या वृत्तीत व ध्येयात बरीच तफावत आहे हे कार्यकारिणी जाणते. तरीसुद्धा एकंदर राष्ट्रहिताच्या दृष्टीने व हिंदी जनतेच्या स्वातंत्र्य प्राप्तीकरिता कार्यकारिणी अशी विनंती करते की, ज्यांना देशाचे स्वातंत्र्य व कल्याण साधावयाचे आहे त्यांनी या प्रसंगी सहकार्य करून देशापुढील अनेक प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करावा. मे १६च्या निवेदनात उल्लेखलेली योजना काँग्रेसने सशर्त स्वीकारली आहे, अशी टीका मुस्लिम लीगतर्फे केली जात आहे. हे कार्यकारिणीच्या निदर्शनास आले आहे. कार्यकारिणी येथे स्पष्ट सांगू इच्छिते की, जरी या योजनेतील काही कलमे आम्हाला पसंत नसली तरी आम्ही एकंदर योजना मान्य केली आहे. तिच्यात जी थोडीबहुत विसंगती अथवा उणीव असेल ती पुढे प्रत्यक्ष कार्यक्रमात दूर करणे शक्य होईल, असे कार्यकारिणीने गृहीत धरले आहे. घटना समितीचे काम यशस्वी करण्याच्या इच्छेमुळेच २६ जून १९४६चा ठराव मंजूर केला आहे. हा निर्णय कृतीत उतरवला पाहिजे हे उघडच आहे. या निश्चयानेच आम्ही आता घटना समितीतील आपले कार्य हाती घेणार आहोत! मात्र जीनांनी हा ठराव मान्य केला नाही. त्यांचे म्हणणे असे की, नेहरूंचे निवेदन हेच काँग्रेसचे खरे मत होय. **ब्रिटिश सत्ता देशात अस्तित्वात असताना आणि आपल्या हाती अधिकार येण्यापूर्वीसुद्धा जर काँग्रेस इतक्यांदा आपल्या भूमिकेत बदल करू शकते, तर ब्रिटिश निघून गेल्यानंतर ती आपला आजचा निर्णय बदलून नेहरूंच्या मताचा स्वीकार करणार नाही, अशी खात्री अल्पसंख्याकांनी कशाच्या जोरावर बाळगावी?**[१]

हे महाभारत घडण्यापूर्वी गांधींनी जीनांना असे सांगितले की, ''पाकिस्तानच्या निर्मितीनंतर लोकांचे कल्याण साधले जाणार आहे हे जर मला पटवून दिले किंवा पाकिस्तानची निर्मिती ही इस्लामच्या हिताची आहे हे दाखवून दिले तर मी पाकिस्तानच्या मागणीला पाठिंबा द्यावयास तयार आहे. पण मुस्लिम लीगने जी

१. इंडिआ विन्स फ्रिडम, मौलाना आझाद

पाकिस्तानची मागणी केली आहे ती मुळी इस्लामशी प्रतारणा करणारी आणि दुष्टपणातून करण्यात आलेली अपवित्र मागणी आहे. याविषयी माझ्या मनात संदेह नाही. माझी ती खात्रीच आहे. इस्लाम ऐक्याचे तत्त्वज्ञान सांगते. इस्लामचे भ्रातृभावाचे तत्त्वज्ञान आहे. मानवी समूहांचे विभक्तीकरण करणारे इस्लामचे तत्त्वज्ञान नाही. ज्यांना भारताची फाळणी हवी आहे ते भारताचेच नव्हे तर इस्लामचेही शत्रू आहेत. ते माझ्या देहाचीही फाळणी करू शकतील, पण मला जे अयोग्य वाटते ते स्वीकारण्यास मला ते भाग पाडू शकणार नाहीत'', असे महात्मा गांधींनी म्हटले आहे. फाळणीच्या विरोधात यापेक्षा आणखी कोणती भूमिका असू शकते? गांधी म्हणत, भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतरच पाकिस्तानची निर्मिती करावयाची की नाही हा प्रश्न उपस्थित होतो. भारत स्वतंत्र झाल्याशिवाय बाकीचे कोणतेही प्रश्न उपस्थित होत नाहीत. पाकिस्तानच्या मागणीला अखंड भारत हाच पर्याय आहे. एकदा का फाळणीचे तत्त्व स्वीकारले की मग अडचणींचा सागरच तयार होईल. माझ्या मते काँग्रेसने फाळणीच्या योजनेत कदापिही भागीदार होता कामा नये. पाकिस्तानची मागणी चांगली व योग्य कशी आहे, हे मला पटवून द्या अशी मी गुडघे टेकून विनवणी केली. पाकिस्तानच्या समर्थकांनी आपली बाजू लोकांसमोर मांडावी आणि त्याने लोकांचे कल्याण कसे होणार आहे हे सांगावे, ही गांधींची भूमिका होती. माउंटबॅटनना लिहिलेल्या पत्रात गांधींनी जीनांबरोबरच्या चर्चेच्या वेळी त्यांच्या पाकिस्तानच्या मागणीला मी सातत्याने विरोध केला आहे असे कळविले होते. महात्मा गांधींनी राजाजींच्या तोडग्याला मान्यता दिली होती, या एकाच गोष्टीवरून गांधींनी फाळणीला मान्यता दिली होती हा निष्कर्ष काढणे बालिशपणाचे होईल. राजाजींच्या तोडग्यालाही जीनांचा कडाडून विरोध होता. त्यांच्या तोडग्यात फाळणीचे सूत्र असते तर जीनांनी त्या तोडग्याला विरोध करण्याचे काहीच कारण नव्हते. जीनांना अभिप्रेत असलेली पाकिस्तानची संकल्पना राजाजींच्या तोडग्यात नव्हती, म्हणून जीनांनी त्यांच्या तोडग्याला विरोध केला. काँग्रेसने संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव केलेला होता. त्या ठरावाला काँग्रेस बांधील होती. हंगामी सरकारनंतर नेहरू व पटेल यांच्या भूमिकेत फरक पडत गेला आणि ते फाळणीच्या प्रश्नावर गांधींच्या भूमिकेविरुद्ध भूमिका घेऊ लागले. राजकीय परिस्थितीसंबंधातील गांधींचे विश्लेषण चुकीचे असून फाळणी स्वीकारली तर शांतता प्रस्थापित होईल असे नेहरू, पटेल म्हणत. ''जर फाळणीच अपरिहार्य असेल तर ती ब्रिटिशांच्या हातून होता कामा नये किंवा बिटिश सरकार भारतावर राज्य करीत असताना होता कामा नये असे मी व्हाईसरॉयना सांगितले; तेही नेहरू, पटेल यांना आवडले नाही. त्यांना काय करायचे ते करू द्यात; पण देशाच्या

फाळणीच्या पापाचा गांधी भागीदार होता असे म्हणू नका. सर्वांनाच स्वातंत्र्याची घाई झालेली आहे.'' असे गांधींनी १ जून १९४६च्या प्रार्थना सभेत भाषण केले होते.[१०] गांधीजींचे हे भाषण वाचल्यानंतर डॉ. राममनोहर लोहिया यांनी नेहरू व पटेल यांना फाळणीचे गुन्हेगार का म्हटले याची कल्पना येते.

फाळणीमुळे गांधींचा खून झाला किंवा केला या दाव्यातील फोलपणा या आधीच्या प्रकरणातून आपण पाहिला आणि फाळणी गांधींमुळे झालेली नाही, त्याचप्रमाणे फाळणीचे कसलेही वारे नव्हते अशा काळात म्हणजे १९३४ पासून गांधींना ठार मारण्यासाठी हिंदुत्ववाद्यांनी लक्ष्य केले होते. त्यामुळे गांधींच्या खुनासाठी फाळणी हे कारण सांगितले जाते ते अगदीच तकलादू ठरते. 'वड्याचे तेल वांग्यावर' अशा प्रकारचे ते कारण आहे. तसेच पंचावन्न कोटी रुपयांच्या संदर्भातसुद्धा आहे. वादाकरिता असेही मानले की गांधींमुळे फाळणी झाली व गांधींमुळे पंचावन्न कोटी रुपये द्यावे लागले तरीसुद्धा गांधींच्या खुनाचे समर्थन कसे काय होऊ शकते? खरे म्हणजे कोणत्याच खुनाचे समर्थन होऊ शकत नाही. या दोन गोष्टींचे गांधींच्या खुनाच्या समर्थनार्थ भांडवल केले जात आहे. फाळणी आणि पंचावन्न कोटी रुपये देणे याला जनतेनेही विरोध केलेला नाही. जनतेने स्वातंत्र्य मिळाल्यावर ज्या बेहोषतेने स्वातंत्र्याचे स्वागत केले त्यावरून हे म्हणता येते. मग फाळणीला जनताही जबाबदार आहे असेही म्हणावे लागेल, कारण ती तिने स्वीकारली. मग जनतेचेही सामुहिक खून करावयास हवे होते आणि मग त्यांचेही समर्थन करावे लागेल. जर जनता हिंदुत्ववाद्यांच्या बाजूला असती तर त्यांनी फाळणीच्या विरोधात जनतेचे नेतृत्व केले असते. फाळणीसंबंधातील आतापर्यंत जे मुद्दे मी मांडले त्यात नवीन काहीच नाही. त्यामुळे गांधीवाद्यांना मी गांधींची मते उद्धृत करून कोणती नवी गोष्ट सांगितली असा प्रश्न पडेल. हिंदुत्ववादी प्रामाणिक नसल्यामुळे गांधींमुळे फाळणी झाली नाही हे सत्य स्वीकारण्याची त्यांची तयारी नाही. आणि सत्य उमगले तरी ते जाहीरपणे कबूल करण्यासाठी मोठेपणा आणि प्रामाणिकपणा असावा लागतो, तोही त्यांच्याजवळ नाही. म्हणून ते फाळणीचे कारण काहीसे मागे घेऊन अलीकडच्या काही वर्षांत पंचावन्न कोटींसाठी गांधींचा खून झाला असे म्हणत आहेत. गांधी स्वत: हिंदू धर्माचे अभिमानी होते. पण हिंदुत्ववाद्यांना तेही आकलन झाले नाही. गांधी स्वत:ला सनातनी हिंदू म्हणवून घेत होते. ''मी सनातनी हिंदू आहे. वेद, उपनिषदे, पुराणे व हिंदू धर्मग्रंथांच्या नावाने जे जे साहित्य प्रकाशित झाले आहे त्या सर्वांवर मी विश्वास ठेवतो, म्हणूनच अवतार

१०. महात्मा, खंड सात, डी. जी. तेंडुलकर

व पुनर्जन्मावरही विश्वास ठेवतो. मी वर्णव्यवस्थेवरही विश्वास ठेवतो कारण ते माझ्या विचारापेक्षाही वैदिक आहेत. मी मूर्तिपूजक आहे. वर्णाश्रम धर्म मानवी नैसर्गिकतेचा एक सहज गुणविशेष आहे. वर्णाश्रमतेचा संबंध जन्माशी आहे. कोणतीही व्यक्ती आपल्या इच्छेनुसार वर्ण बदलू शकत नाही.[११] यापेक्षा गांधी हिंदुत्वाचा पुरस्कार करत होते याचा आणखी कोणता दाखला हवा? गांधी हिंदू होते, पण ते सर्व धर्मांना मानत होते. कोणत्याही धर्माविषयी ते द्वेष बाळगीत नव्हते आणि सर्व धर्मांचे तत्त्वज्ञान मानवतेचे आहे असे सांगत होते. स्वत:ला हिंदू म्हणवण्यात अभिमान बाळगणारे हिंदुत्ववादी तरी इतक्या खुल्लमखुल्लेपणाने चातुर्वण्याचा पुरस्कार करू शकतात काय? पण गांधींजवळ आपल्याला जे वाटते ते स्पष्टपणे मांडण्याचा प्रामाणिकपणा होता. मी खरा हिंदू असल्यामुळे इतर धर्माविषयीही मला हिंदू धर्माइतकाच आदर आहे, असे महात्मा गांधी मानत. हिंदुत्ववादी म्हणवून घेणारे आणि गांधी यांच्यात हाच फरक आहे. गांधी सहिष्णू हिंदू होते. हिंदुत्ववाद्यांमध्ये या सहिष्णुतेचाच अभाव आहे. गांधी मुसलमानांचा अनुनय करणारे नव्हते तर, इस्लाम, ख्रिस्ती आदी धर्मांचा आदर बाळगणारे होते. ते कोणत्याच धर्माचे द्वेष्टे नव्हते. खऱ्या अर्थाने ते सर्वधर्मसमभाव मानणारे होते. या देशात राहणारे सर्व भारतीय आहेत. त्यांचे भारतीयत्व धर्मावर अवलंबून नाही. धर्माचा विचार न करता या देशात राहणारा प्रत्येक माणूस भारतीय आहे म्हणून भारत हे राष्ट्र आहे. आणि असे मानले तरच आपण एकत्र राहू शकू. द्वेष नव्हे समन्वय, शांतता, परस्पर विश्वास, एकमेकांविषयीचा आदर, यांच्या आधारे राष्ट्र म्हणून जगू ही गांधींची श्रद्धा होती. त्यांचा हा विश्वास होता. धर्मानुसार राष्ट्रवादाचा विचार केला तर या देशाची अनेक राष्ट्रे करावी लागतील असे गांधीजी मानीत. गांधींचे हे म्हणणे मानले गेले नाही. त्यांच्याच परिणामातून फाळणी झालेली आहे. हिंदुत्ववाद्यांना एक तर गांधी-विचारांचे आकलन झालेले नाही किंवा त्यांना तो विचार पेलवलेला नाही असा तरी निष्कर्ष काढावा लागेल. किंवा या आधी म्हटल्याप्रमाणे गांधी-विचार हा हिंदुत्ववाद्यांचा हितसंबंधी राजकारणाच्या मार्गातील मोठा अडसर होता म्हणून ते गांधींचा द्वेष करीत हे मान्य करावे लागेल. हिंदुत्ववादी राजकारणात धर्माला महत्त्व असले पाहिजे, हा आग्रह हिंदुत्ववादी धरीत आहेत आणि त्यासाठी धर्मराष्ट्राची कल्पना मांडीत आहेत. पण हे मान्य केले तर किती अनर्थ होतात हे त्यांना कळत नाही. ''हिंदू धर्माने सामाजिक बाबतीत ढवळाढवळ केली म्हणून आजवरचे अनर्थ घडले. सामाजिक नियमांचा कर्ता होण्याचाही धर्माला अधिकार नाही. धर्माचा संबंध

---

११ गांधी चिंतन, हिंदू धर्म, यंग इंडिया, ६ ऑक्टोबर १९२१

केवळ आत्म्याशी असून त्याने सामाजिक बाबतीत हात घालू नये. सामाजिक गोष्टींच्या बाबतीत धर्माने ढवळाढवळ केली याचमुळे आजवरचे अनर्थ घडले''[१२] असे स्वामी विवेकानंद यांनी म्हटले आहे. गांधी यापेक्षा वेगळे काय सांगत होते? म्हणजे हिंदुत्ववाद्यांचा हिंदुत्ववादही खऱ्या धर्मावर आधारित नाही. त्यामुळे त्यांचे धर्माचे राजकारणही प्रामाणिकपणाचे नाही.

फाळणीच्या योजनेला मान्यता देण्यासाठी काँग्रेस कार्यकारिणीची बैठक बोलावली होती. या बैठकीला जयप्रकाश नारायण, डॉ. राममनोहर लोहिया यांना खास निमंत्रित म्हणून बोलावले होते. डॉ. लोहिया यांनी बैठकीचा तपशीलवार वृत्तान्त 'गिल्टी मेन ऑफ पार्टिशन' या त्यांच्या पुस्तकात दिला आहे. ''गांधी, सरहद्द गांधी खान अब्दुल गफारखान, जयप्रकाश नारायण व मी अशा चौघांनीच फाळणीला विरोध केला. इतर कोणीही फाळणीच्या योजनेविरुद्ध एक शब्दही काढला नाही.'' असे नमूद करून लोहिया आपल्या पुस्तकात पुढे म्हणतात, ''या बैठकीतील चर्चेत गांधीजींनी हस्तक्षेप केला तो महत्त्वाचा आहे. गांधीजींनी उपस्थित केलेल्या दोन मुद्द्यांचा विशेष विचार केला पाहिजे. फाळणीला मान्यता देण्यापूर्वी नेहरू व पटेल यांनी आपणास त्याची कल्पना दिली नव्हती असे गांधीजी काहीशा तक्रार वजा भाषेत म्हणाले. गांधीजींना आपले म्हणणे पुरे करू न देताच नेहरू जरा आवेशानेच म्हणाले की, आपण गांधीजींना सर्व कल्पना वेळोवेळी देत होतो. गांधीजींनी पुन्हा जेव्हा सांगितले की आपणाला, फाळणीच्या योजनेची माहिती आधी कोणी दिली नव्हती, तेव्हा नेहरूंनी आपले शब्द थोडे बदलले. ते म्हणाले की, गांधीजी त्या वेळी नोआखलीत होते, त्यामुळे योजनेचा सारा तपशील गांधींना सांगण्यात आला नाही.'' डॉ. लोहिया यांनी दिलेला हा तपशील आणि डी. जी. तेंडुलकर यांच्या 'महात्मा, खंड ७ मध्ये जो तपशील आहे तो जवळ जवळ सारखाच आहे. याच बैठकीत गांधी म्हणाले, ''काँग्रेस नेत्यांनी शब्द दिला आहे म्हणून काँग्रेस पक्षाने त्याची लाज राखावी आणि फाळणीचे तत्त्व मान्य करावे. काँग्रेस व मुस्लिम लीगने फाळणीचे तत्त्व मंजूर केल्यावर व्हाईसरॉय व ब्रिटिश सरकार यांनी बाजूला व्हावे. दुसऱ्या कोणाच्या साहाय्याशिवाय व हस्तक्षेपाशिवाय मुस्लिम लीग व काँग्रेसने स्वतःच योजना आखून फाळणी करावी.'' काँग्रेसने शब्द दिला असेल तर तो खाली पडू नये याच कारणाकरिता गांधींनी अखेर फाळणीला मान्यता दिली. भारताला प्रथम स्वातंत्र्य दिले तर भारत फाळणीच्या दिशेने काहीच करणार नाही, अशी भीती जीनांना वाटत असावी, म्हणून ते ब्रिटिशांनी काढता

---

१२. स्वामी विवेकानंद ग्रंथावली संचयन

पाय घेण्यापूर्वी फाळणी झाली पाहिजे हा आग्रह धरीत होते. भारताचे दोन तुकडे करण्याचे टाळून जीनांना हव्या असलेल्या राज्याचा पर्याय स्वीकारण्यास त्यांना भाग पाडू असा विश्वास गांधींना वाटत होता. म्हणून प्रथम ब्रिटिशांनी निघून जावे मग फाळणीचे आम्ही बघून घेऊ, या मुद्द्यावर गांधी आग्रही होते. नेहरू-पटेलांची चिंता वेगळीच होती. या वादात स्वातंत्र्य लांबणीवर पडेल या भीतीने दोघांनीही गांधींना कल्पना न देताच फाळणीला मान्यता देण्याचे ठरविले असले पाहिजे.

मौलाना अबुल कलम आझाद यांनी फाळणीसाठी सरदार पटेल यांना नेहरूंपेक्षा अधिक जबाबदार धरले आहे. हंगामी सरकारात सरदार पटेल यांनी लियाकत अलींना अर्थखाते दिले होते. लॉर्ड वेव्हेल यांनी गृहखाते मुस्लिम लीगला द्यावे आणि अर्थखाते काँग्रेसने घ्यावे असे सुचविले होते. पण पटेल यांच्या त्या वेळी अर्थखात्याचे महत्त्व लक्षात आले नसावे आणि गृहखाते महत्त्वाचे वाटले असावे. म्हणून त्यांनी अर्थखाते लियाकत अली यांना दिले आणि गृहखाते स्वत:कडे घेतले. पण पुढे, अर्थखात्याची मंजुरी घेतल्याशिवाय पटेल यांना एका पोलीस शिपायाचीही नेमणूक करता येईना. लियाकत अलींनी अंदाजपत्रक तयार करताना काँग्रेसवर कुरघोडीच केली. काँग्रेसने आजवर जे ठराव केले होते, त्या ठरावांशी सुसंगत पण हिंदी भांडवलदारांना अडचणीत आणणाऱ्या करपद्धतीचे तत्त्व लागू केले. ही करपद्धती अंमलात आणली असती तर हिंदी भांडवलदार आणि बडे व्यापारी दिवाळखोरीतच गेले असते आणि काँग्रेसवर हे भांडवलदार नाराज झाले असते. लियाकत अलींनी जी करपद्धती सुचविली होती ती काँग्रेसच्या आर्थिक धोरणाबरहुकूम होती. त्यामुळे लियाकत अलींच्या अंदाजपत्रकाला काँग्रेसला विरोधही करता येईना आणि पाठिंबाही देता येईना. मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा विषय आला तेव्हा लियाकत अली म्हणाले, काँग्रेसचीच धोरणे आणि ठराव अंमलात आणणारे हे अंदाजपत्रक आहे. तेव्हा काही मंत्र्यांनी या करपद्धतीचा तपशील आम्हाला सांगितला नाही अशी हरकत घेतली. तेव्हा लियाकत अली म्हणाले, तत्त्वाला मी मान्यता घेतली आहे आणि अंदाजपत्रकातील तपशील गुप्त असतो. त्याची कशी चर्चा करणार! यामुळे वल्लभभाई पटेल फारच अडचणीत आले. अर्थखाते त्यांनी स्वत:हूनच नाकारले होते. आणि लियाकत अलींनी तर ही कोंडी केली होती. वल्लभभाईंच्या मुत्सद्देगिरीविषयी डॉ. लोहियांनी असे म्हटले आहे की, कसोटीच्या क्षणी त्यांची मुत्सद्देगिरी दिसत नाही. या पार्श्वभूमीवर लोहियांच्या या विधानाची समर्पकता अधिक जाणवते. ''मुत्सद्देगिरीच्या क्षेत्रातील पटेलांच्या श्रेष्ठतेची अन्य कोणाशी तुलनाच होऊ शकत नाही. आपला क्षुद्र स्वार्थ ज्या गोष्टीत नसेल त्या गोष्टी करण्यात पटेलांनी कमालीचे कौशल्य व साहस दाखविले. उदा.

संस्थानांचे भारतात विलीनीकरण! तसे पाहिले तर ते काम मूलतः फारसे उल्लेखनीय नव्हते. हे काम करण्यासाठी त्यांना काही एखाद्या मोठ्या विरोधी शक्तीशी टक्कर द्यावी लागली नाही. राजेलोक हातघाईलाच आले होते. पटेलांचे इतर सहकारी छोटे असल्याने त्यांच्या तुलनेने पटेल आपोआपच मोठे ठरले. पटेलांची कामगिरी असाध्य व अतुलनीय होती असे नाही.'' असे डॉ. लोहियांनी पटेल यांच्या मुत्सद्देगिरीविषयी म्हटले आहे. लियाकत अलींचा अर्थमंत्री म्हणून वल्लभभाई पटेल यांना जो अनुभव आला त्या अनुभवानेच सरदार पटेल संतप्त झाले आणि त्यांनी आपल्या डोक्यात राख घालून घेतली. मुस्लिम लीगबरोबर आपल्याला काम करता येणार नाही, त्यामुळे फाळणी हाच पर्याय आहे, असे त्यांच्या मनाने घेतले. फाळणीला प्रथम पटेल यांची मान्यता घेतली. त्यानंतर नेहरूंजवळ लॉर्ड माउंटबॅटन यांनी फाळणीची योजना मांडली. पटेलांनी फाळणीला मान्यता दिली आहे, असे माउंटबॅटन यांनी नेहरूंना सांगितले तेव्हा नेहरूंचा फाळणीला जो प्रखर विरोध होता तो हळूहळू विरू लागला. पटेल फाळणीशिवाय दुसरे काहीच बोलावयास तयार नव्हते.[१३] लोहिया यांच्याप्रमाणे आझाद यांनीही पटेल व नेहरू या क्रमाने त्या दोघांना फाळणीसाठी जबाबदार धरले आहे. लियाकत अलींच्यापुढे पटेल यांना साध्यासुध्या गोष्टींसाठी विनंत्या-विनवण्या कराव्या लागत होत्या. हे शल्य पटेलांना बोचत होते. संघर्ष कमी होत नव्हता. उलट रोज पेचप्रसंग निर्माण होत होते. याच वेळी माउंटबॅटन यांनी पटेल यांच्यापुढे प्रथम फाळणीची योजना मांडली. मुस्लिम लीगबरोबर काम करता येत नाही आणि हे सरकार चालवले नाही तर स्वातंत्र्य मिळत नाही. या अवस्थेपेक्षा भारताची फाळणी स्वीकारून मुस्लिम लीगला पाकिस्तान देऊन टाकावे आणि स्वातंत्र्य घ्यावे हा निर्धार पटेल यांनी केला. या भूमिकेमुळे नेहरू-पटेल यांना त्यांच्या वयोमानामुळे, आता आपल्याला सत्ता मिळाली नाही तर आपल्याला आयुष्यात कधीही मिळणार नाही असे वाटू लागले, अशी कडवट टीका लोहियांनी नेहरू-पटेल यांच्यावर केली आहे.

नेहरू-पटेल सत्तेसाठी हपापलेले होते त्यामुळे देशाची फाळणी करावी लागली तरी चालेल पण आपण सत्ताधारी व्हावे या लालसेने नेहरू-पटेल यांनी फाळणी स्वीकारली असे म्हणणे भडकपणाचे होईल. मुस्लिम लीग आणि काँग्रेस दोन्ही सत्तेत राहिले तर ते एकमेकांवर डावपेचाची कुरघोडी करण्याकडे अधिक लक्ष देतील व कारभार करणेही अशक्य होईल अशा प्रकारचा अखंड भारत होण्यापेक्षा फाळणी झालेली बरी. या परिस्थितीच्या अगतिकतेतून पटेलांनी फाळणी स्वीकारली.

---

१३. इंडिया विन्स फ्रिडम, मौलाना अबुल कलम आझाद

पटेलांनी फाळणीला मान्यता दिली आहे, याच भूमिकेतून नेहरूंनी फाळणी स्वीकारली. सत्ता मिळविण्यासाठी त्यांनी फाळणी स्वीकारली हा निष्कर्ष भडक वाटतो तो यामुळेच!

महात्मा गांधी १९४६ साली पाचगणीला आले असता जयप्रकाश नारायण त्यांना भेटावयास गेले तेव्हा जयप्रकाश नारायण यांचे हात गांधींनी हातात घेतले. त्यांचे डोळे पाण्याने डबडबले, डबडबलेल्या डोळ्यांनी गांधीजी म्हणाले, "जवाहरलालने अखंड भारताचे माझे स्वप्न उद्ध्वस्त केले आहे."

पाचगणीहून जयप्रकाश मुंबईला आले तेव्हा ते मिनू मसानींना भेटले. तेव्हा मसानी काँग्रेस समाजवादी पक्षात होते. जयप्रकाशांनी पाचगणीचा प्रसंग मिनू मसानींना सांगितला. पुढे मिनू मसानींनी पुस्तक लिहिले त्या वेळी जयप्रकाशांनी मसानी यांना पत्र पाठवून पुन्हा हा प्रसंग नमूद केला. हंगामी सरकारच्या अनुभवामुळे पटेल मुस्लिमांवर राग काढू लागले होते. आणि त्यामुळेच फाळणी टाळण्याच्या गांधींच्या प्रयत्नात ते विरोधी भूमिका घेऊ लागले आणि ते हळूहळू गांधींच्या वैयक्तिक विरोधात गेले. गांधींच्याही हे लक्षात आले होते. 'सरदार आजवर माझ्या सांगण्याबाहेर कधी नव्हते. पण आता सरदार माझे होयबा (Yes man) राहिलेले नाहीत. ते आता स्वयंभू बनले आहेत.'[१४] गांधी सरदारांना आपले होयबा का मानत होते? तर सरदारांच्या राजकीय जीवनाची सुरुवात महात्मा गांधींमुळे झाली होती. 'राजकीय शिक्षण' त्यांना गांधींनीच दिले होते. प्रारंभीच्या काळात मला राजकारणातले काही समजत नाही असे गांधींजवळ सरदार म्हणत होते. गांधींनी त्यांना राजकीय दीक्षा दिली. आणि त्यानंतर अखेरचा काळ वगळता वल्लभभाईंनी गांधींचे कोणतेच मत अव्हेरले नव्हते. म्हणून पटेलांना गांधींचे होयबा म्हटले जात होते. डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी प्यारेलाल यांच्या 'द लास्ट फेज' या ग्रंथाला प्रस्तावना लिहिलेली आहे. त्यात राजेंद्रप्रसाद यांनी फाळणीसंबंधात गांधींची मते मांडली आहेत. "महात्मा गांधींचा फाळणीला अतिशय कडवा विरोध होता. काँग्रेसमधील हिंदू-मुस्लिम आदी सर्व धर्मांच्या नेत्यांचा फाळणीला विरोध होता; पण हंगामी सरकार आल्यानंतर सारे चित्रच पालटून गेले. काँग्रेसच्या मंत्र्यांशी मुस्लिम लीगच्या मंत्र्यांनी असहकारच पुकारला. या कारणाने काँग्रेसच्या मंत्र्यांना आता फाळणी हाच एकमेव मार्ग आहे, असे वाटू लागले. काही भागांत दंगली उसळल्या होत्या. अशा परिस्थितीतही महात्मा गांधींनी अखंड भारताचाच आग्रह धरला होता," यावर राजेंद्रप्रसाद यांनी प्रस्तावनेत भर दिला आहे.

---

१४. महात्मा गांधी, द लास्ट फेज, खंड दोन, प्यारेलाल

वेगवेगळ्या वेळी निरनिराळ्या नेत्यांनी महात्मा गांधी फाळणीच्या किती विरोधात होते हे नमूद केले आहे. त्यामुळेच, महात्मा गांधी फाळणीला जबाबदार होते असे दूरान्वयानेही म्हणता येणार नाही. मात्र गांधींमुळे फाळणी झाली, हा प्रचार हिंदुत्ववादी करीत आहेत. तो किती खोटा नि बिनबुडाचा आहे, हे आतापर्यंतच्या सर्व विवेचनावरून लक्षात येईल. हिंदुत्ववाद्यांना आणि त्यांच्या नेत्यांना हे समजत नाही, अशातला भाग नाही, पण गांधी फाळणीच्या विरोधात होते हे मान्य केले तर हिंदुत्ववाद्यांना गांधीविरोधी द्वेष निर्माण करण्याचे साधनच राहात नाही. धर्माच्या आधारे द्विराष्ट्रवादाचा सिद्धान्त स्वीकारला, तर त्यामुळे धार्मिक दंगलीशिवाय दुसरे काहीही घडणार नाही असे गांधी म्हणत आणि प्रत्यक्षात तसेच घडले. फाळणी होऊन इतकी वर्षे झाली तरी आजही दोन्ही देशांत हाच तणाव कायम आहे. भारतातील हिंदू व मुस्लिम धर्मांध नेते आणि पाकिस्तानातील धर्मांध नेते या दोघांनाही आपापल्या देशात स्वत:चे राजकीय स्थान टिकविण्यासाठी हिंदू-मुस्लिम तणाव वाढवीतच ठेवणे हे त्यांच्या गरजेचे राजकारण आहे. मग त्यासाठी पाकिस्तानी राज्यकर्ते काश्मीर प्रश्नावर तेथील असंतुष्टांना मदत करून खतपाणी घालतात आणि तेथील हिंदुत्ववादी बाबरी मशिदीच्या रूपाने मुस्लिम द्वेष आणि हिंदू अस्मिता पसरवण्याचा प्रयत्न करतात, तर भारतातले मुस्लिम धर्मांध 'इस्लाम खतरे में है' असा नारा देऊन मुस्लिमांना हिंदूंपासून अलग ठेवत आहेत. हिंदुत्ववादी मुस्लिमांपासून हिंदूंना अलग पाडत आहेत. स्वातंत्र्यपूर्व काळातही त्यांनी याच प्रकारचे राजकारण केले. आणि महात्मा गांधींनी हिंदू-मुस्लिम ऐक्याचा सातत्याने पुरस्कार केला. त्यामुळे तेव्हाची मुस्लिम लीग आणि हिंदुत्ववादी या दोघांनाही गांधींचा विचार हा आपल्या मुळावर उठलेला विचार आहे असे वाटत होते. म्हणून हिंदुत्ववादी आणि मुस्लिम लीग दोघेही गांधींच्या विरोधात राहिले. याबाबतीत न. र. फाटक यांनी असे म्हटले आहे की, काँग्रेसची व गांधींची मनमुराद बदनामी, मुसलमानांची त्या मानाने सौम्य नालस्ती, अंतिम राजकीय ध्येयासंबंधी उदासीनता अशी हिंदू महासभेची नीती होती. हिंदू महासभेजवळ साक्षात कृतीचे राजकारण नव्हते. हिंदू महासभेच्या लोकांना सिंधमध्ये मुस्लिम लीगविरुद्ध वागण्याची नामी संधी लाभली असता महासभेने मुळीच हातपाय हलविले नाहीत. सिंधच्या कायदेमंडळात पाकिस्तानसंबंधी ठराव मुसलमानांनी पास केला तेव्हा जिव्हा गोठून गेल्याप्रमाणे महासभेवाले गप्प बसले होते. महायुद्धाच्या काळात महासभेने मुस्लीम लीगशी समेट करून राज्यकारभारात शिरकाव करून घेण्याची इच्छा धरली व इतस्तत: साधलीदेखील होती.''

हिंदू-मुसलमान यांच्यात संघर्ष, तणावाचे वातावरण राहावे असेच राजकारण हिंदुत्ववाद्यांनी केले आणि त्याला मुस्लिम धर्मांधांनीही खतपाणी घातले. फाळणीनंतर ज्या दंगली उसळल्या त्या दंगलीची झळ दिल्लीतही लागली आणि दिल्ली कत्तलखानाच बनली. त्यामुळेच गांधींच्या आयुष्यातील अखेरच्या उपोषणाला सुरुवात झाली. १३ जानेवारी १९४८ रोजी गांधींनी बेमुदत उपोषणाला सुरुवात केली. हे उपोषण पंचावन्न कोटी रुपयांसाठी नव्हते. दिल्लीत शांतता प्रस्थापित व्हावी याकरता गांधींनी उपोषण सुरू केले होते. उपोषणाच्या वेळी सरदार वल्लभभाई पटेल यांनी आपले चिटणीस व्ही. शंकर यांच्यामार्फत गांधींना निरोप पाठवला आणि मी काय करू शकतो, असे गांधींना विचारले. तेव्हा गांधी म्हणाले, पाकिस्तानला पंचावन्न कोटी रुपये द्या. उपोषण काळात गांधींनी हे मत व्यक्त केले होते. पण उपोषण त्यासाठी नव्हते. तेंडुलकर-प्यारेलाल या गांधींच्या चिटणीसांनी गांधींवर खंडच्या खंड लिहिले. त्यांत पंचावन्न कोटींसाठी उपोषण असल्याचे कोठेही म्हटलेले नाही. गांधींवर इतरही अनेक विद्वानांनी लिहिलेले आहे. त्यातही पंचावन्न कोटींसाठी उपोषण असल्याचा उल्लेख नाही. आझाद, लोहिया यांच्याही पुस्तकात तो उल्लेख नाही. कारण गांधींनी पंचावन्न कोटींसाठी उपोषण केलेलेच नव्हते. पण हिंदुत्ववाद्यांनी तसा प्रचार मात्र केला. उपोषण काळात गांधी अनेक विषयांवर व प्रश्नांवर आपली मते मांडीत. पण त्यासाठी त्यांनी उपोषणं केले असे म्हणणे हा शुद्ध वेडेपणाच ठरेल. दिल्लीतील दंगलीसंबंधात सरदार पटेल यांच्या समक्ष नेहरूंनी पटेल यांच्याविषयी नाराजी बोलून दाखविली. तेव्हा दिल्लीचा ताबा घेण्यासाठी मुस्लिमांनी शस्त्रास्त्रे गोळा केली आहेत आणि आम्ही ती जप्त केली आहेत, असे सरदार पटेल म्हणाले. लॉर्ड माउंटबॅटन, नेहरू, आझाद यांना ही शस्त्रे पटेलांनी दाखवली. ही 'शस्त्रे' पाहिल्यावर नेहरू, आझाद काय म्हणाले हे येथे उद्धृत करीत नाही. कारण त्याचा विचार करण्याची आवश्यकता येथे वाटत नाही. या दोघांतील एक मुस्लिम आणि दुसरा हिंदुत्ववाद्यांना न आवडणारा! त्यामुळे त्या दोघांच्या मताचा विचार करण्याऐवजी लॉर्ड माउंटबॅटन काय म्हणाले, हे महत्त्वाचे आहे. "भाजी कापण्याचे आणि पेन्सिलला टोक करण्याचे हे चाकू आहेत." त्यांतील दोन चाकू लॉर्ड माउंटबॅटन यांनी उचलले आणि त्याकडे पाहात हसत हसत ते म्हणाले, "या हत्यारांनी दिल्लीचा ताबा घेऊ असे ज्यांना वाटते त्यांना लष्करी डावपेचांची बेताचीच माहिती असली पाहिजे." माउंटबॅटन यांच्या या उद्‌गारावरून शस्त्रसाठा ताब्यात घेतला असे जे पटेल म्हणत होते ती शस्त्रे काय स्वरूपाची होती याची कल्पना येते. या घटनेचे तपशीलवार वर्णन 'इंडिया विन्स फ्रीडम'मध्ये पाहावयास मिळते. दंगलींच्या कहाण्यांनी गांधी फारच व्यथित

झाले होते. त्यांच्या कळकळीच्या विनवण्यांकडे सरकारमधील कोणी लक्ष देईनासे झाले. म्हणूनच गांधी म्हणावयाचे, "मेरी कोई सुनता नही है।" "दिल्लीत शांतता प्रस्थापित करण्याकरिता उपोषण करणे एवढेच आता निर्वाणीचे अस्त्र माझ्याकडे उरले आहे." असे गांधींनी मौलाना आझाद यांना सांगितले. त्यातून त्यांचे १३ जानेवारी १९४८चे उपोषण सुरू झाले. गांधींनी उपोषणाचा विचार सोडून द्यावा यासाठी अनेकांनी प्रयत्न केले पण त्याचा उपयोग झाला नाही. उपोषण सुरू केले तेव्हा सरदार पटेल, नेहरू व आझाद गांधींजवळ बसले होते. पटेल यांनी गांधींच्या उपोषणाबाबत नाराजी व्यक्त केली. तुमच्या उपोषणामुळे माझ्यावर लोकांची नाराजी होईल. माझ्यामुळे तुम्ही उपोषण सुरू केले आहे असं म्हणण्याची संधी लोकांना मिळेल, असे पटेल गांधींना म्हणाले. पटेल यांची अशी भावना का व्हावी? गांधींनी उत्तर दिले, "सरदार, मी सध्या चीनमध्ये नाही. दिल्लीत आहे. आणि माझे डोळे व कान शाबूत आहेत. मी डोळ्याने पाहिलेल्या व कानाने ऐकलेल्या पुराव्यावर विश्वास ठेवू नये आणि मुसलमानांच्या तक्रारीला काही आधार नाही असे मानावे, असे जर तुमचे सांगणे असेल तर मी याबाबतीत तुमच्या मनाची खात्री पटवू शकणार नाही आणि तुम्ही माझी खात्री पटवू शकणार नाही हे स्पष्टच आहे. हिंदू व शीख माझे बांधव आहेत. त्यांच्यात व माझ्यात एकच रक्त आहे. आज ते संतप्त असतील तर त्याबद्दल त्यांना मी दोष देणार नाही. त्यांच्याकडून झालेल्या पापांचे क्षालन मी स्वत: प्रायश्चित्त घेऊन केले पाहिजे. माझ्या या उपोषणाने तरी त्यांचे डोळे उघडतील आणि त्यांना वस्तुस्थितीचे आकलन होऊ शकेल, अशी मला आशा आहे." गांधींच्या या उद्‌गारांवरून पटेल यांच्याविषयी गांधींची धारणा काय झाली असेल याची चांगलीच कल्पना येते. जप्त केलेल्या शस्त्रांसंबंधात लॉर्ड माउंटबॅटन यांनी उपहासाने जी विधाने केली ती विधानेही विदारक आहेत. आपण उपोषण का करीत आहोत, हे गांधींनी स्पष्ट केले. त्यात पंचावन्न कोटी रुपयांसाठी हे उपोषण असल्याचे चुकूनही म्हटलेले नाही. पटेल आणि गांधी यांच्या संभाषणानंतर पटेल उठू लागले तेव्हा मौलाना आझादांनी पटेलांचे हात धरले आणि त्यांना गांधींच्या उपोषण काळात दिल्ली सोडू नका असे विनवले. सरदार पटेल हे घुश्श्यातच होते. "ही जर त्यांची (गांधींची) वृत्ती असेल तर मला त्यांची गरज नाही. माझा कार्यक्रम मला बदलता येणे शक्य नाही. मी ठरल्याप्रमाणे मुंबईला जाणार." असे ते म्हणाले. पटेलांनी गांधींविरुद्ध आपले मन घट्ट केले होते पण दिल्लीच्या जनतेचे तसे झाले नव्हते. गांधीजींनी उपोषण सुरू केले ही बातमी ऐकताच देशभर खळबळ माजली. याचे वर्णन आझादांनी केले आहे. "गांधीजी हिंदूंचे शत्रू आहेत, असा प्रचार करून लोकांना चिथावण्याचे प्रयत्न झाले. एका पुस्तिकेत तर, गांधींनी आपले धोरण

बदलले नाही तर त्यांचा काटा काढण्यात येईल असे म्हटले होते.''[१५] ''बंगालमधील दंगे थांबल्यानंतर पंजाबात जाण्यासाठी गांधी जेव्हा भारताच्या राजधानीत आले तेव्हा जातीय द्वेषाने तेथील वातावरण दूषित झाले होते. ते वातावरण निवळावे यासाठी १९४८च्या जानेवारी महिन्यात गांधींना परत उपोषण करावे लागले.''[१६] ''जर दिल्लीत शांतता प्रस्थापित झाली तर मी माझे उपोषण मागे घेईन.''[१७] असे गांधींनी उपोषण सुरू झाल्यानंतर दुसऱ्या-तिसऱ्या दिवशी म्हटले होते. यावरून हे लक्षात येईल की, गांधींचे उपोषण पंचावन्न कोटी रुपयांसाठी नव्हते. एक गोष्ट खरी, गांधींचे उपोषण सुरू झाल्यानंतर पाकिस्तानला पंचावन्न कोटी रुपये कराराप्रमाणे देण्याचा निर्णय मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. गांधींचे उपोषण सुरू झाल्यावर सरदार पटेल दौऱ्यावर निघून गेले. गांधींच्या उपोषणाने काँग्रेसचे नेते आणि मंत्री हादरून गेले होते. बिर्ला हाऊसमधील ज्या खोलीतील खाटेवर गांधी पडले होते त्या खाटेच्या भोवतीच १५ जानेवारी १९४८ रोजी मंत्रिमंडळाची घाईघाईने बैठक झाली आणि पंचावन्न कोटी रुपये देण्याचे मान्य करण्यात आले. हे सर्व खरे; पण उपोषण त्या कारणासाठी नव्हते हे त्याहून अधिक महत्त्वाचे. हिंदुत्ववाद्यांनी सतत हा प्रचार केला आणि तो खोडून काढण्याचा किमान प्रयत्नही झाला नाही. त्यामुळे सातत्याने जे खोटे सांगितले ते आज खरे वाटत आहे. आता घटनाक्रम पहा. १३ जानेवारीला गांधींनी उपोषण सुरू केले. १५ जानेवारीला पंचावन्न कोटी रुपये देण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला आणि १८ जानेवारी १९४८ रोजी दुपारी पाऊण वाजता गांधींनी उपोषण सोडले. जर पंचावन्न कोटींसाठी १३ जानेवारीचे उपोषण असते तर तसा निर्णय १५ जानेवारीला घेतल्यानंतर त्यांचे उपोषण त्याच दिवशी किंवा १६ तारखेस सुटावयास हवे होते. पण ते १६ जानेवारीलाही सुटले नाही. पंचावन्न कोटी रुपयांच्या निर्णयानंतर तीन दिवसांनी त्यांनी उपोषण सोडले. म्हणजेच पंचावन्न कोटी रुपये आणि गांधींचे उपोषण यांचा अर्थाअर्थी काहीही संबंध नाही. पंचावन्न कोटी रुपये देण्याच्या निर्णयानंतरही त्यांचे उपोषण चालूच राहिले. म्हणजे उपोषणाचे कारण वेगळे होते आणि ते दिल्लीत शांतता प्रस्थापित व्हावी याकरिता होते.

शांततेसाठी गांधींचे उपोषण होते यासाठी आणखी एक महत्त्वाचा पुरावा म्हणजे त्यांचे उपोषण सुटावे याकरिता डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्या अध्यक्षतेखाली सर्व धर्मातील प्रमुख अशा १३० जणांची शांतता समिती नेमण्यात आली होती. त्या समितीत

---

१५. इंडिया विन्स फ्रिडम, मौलाना आझाद

१६. गांधी, प्रा. नन्दिनी पंडित

१७. महात्मा, खंड आठवा, डी. जी. तेंडुलकर

संघ व हिंदू महासभेचे प्रतिनिधीही होते. या समितीच्या वतीने १७ जानेवारीला दिल्लीत जाहीर सभा घेण्यात आली. गांधीनी उपोषण सोडण्यासाठी सात अटी घातल्या होत्या. या सात अटी मान्य करण्यात आल्या आहेत याची घोषणा डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी त्या जाहीर सभेत केली. या मान्य केलेल्या अटी अशा आहेत :

१. हिंदू, मुस्लिम, शीख व इतर धर्मीय दिल्लीत भावाभावाप्रमाणे आणि सौहार्दाने राहाण्याची हमी देत आहोत. मुसलमानांच्या जीवित व वित्ताचे संरक्षण करू अशी प्रतिज्ञा घेत आहोत. असे प्रकार पुन्हा दिल्लीत घडणार नाहीत याची खबरदारी घेत आहोत.

२. गेल्या वर्षीप्रमाणेच याही वर्षी ख्वाजा कुतुबुद्दीन मझरचा उरूस साजरा केला जाईल, असे गांधींना आम्ही आश्वासन देतो.

३. सब्जीमंडी, करोलबाग, पहाडगंज व शहराच्या अन्य भागांत मुसलमानांना पूर्वीप्रमाणेच आपले व्यवहार पार पाडता येतील.

४. ज्या मशिदीचा ताबा हिंदू व शिखांनी घेतला आहे त्या मशिदींचा ताबा ते सोडून देतील आणि मशिदी मुसलमानांच्या स्वाधीन करतील.

५. जे मुसलमान दिल्लीतून स्थलांतर करून गेलेले असतील पण त्यांना परत दिल्लीला यावयाचे असेल तर त्याला हरकत असणार नाही आणि या परत आलेल्या लोकांचे पूर्वीचे व्यवसाय व रोजगार करण्यास त्यांना प्रतिबंधही केला जाणार नाही.

६. हे सारे प्रयत्न आम्ही वैयक्तिकरीत्या करू. त्याकरिता पोलीस व लष्कर यांची मदत घेणार नाही.

७. महात्म्यांनी आमच्यावर पूर्ण विश्वास ठेवावा आणि आपले उपोषण संपवावे आणि येथून पुढेही तुम्ही आमचे नेतृत्व आणि मार्गदर्शन करावे.

महात्मा गांधींच्या उपोषण सोडण्यासाठी असलेल्या या सात अटी १७ जानेवारी १९४८ला मान्य केल्यानंतरच महात्मा गांधींनी १८ जानेवारीला उपोषण सोडले. मान्य केलेल्या कोणत्याही अटींमध्ये पंचावन्न कोटी रुपये देण्याच्या आश्वासनाचा अवाक्षरानेही उल्लेख नाही. यावरून हे स्पष्टच होते की, पंचावन्न कोटींसाठी गांधींचे उपोषण नव्हते. गांधींचा फाळणीला विरोध होता. कराराप्रमाणे पंचावन्न कोटी पाकिस्तानला द्यावेत हे गांधींचे मत होते पण त्यासाठी त्यांचे उपोषण नव्हते. दिल्लीत शांतता प्रस्थापित व्हावी याकरिता त्यांचे उपोषण होते आणि त्यासाठी असलेल्या अटी सर्वधर्म समितीने मान्य केल्यानंतर त्यांनी उपोषण सोडले. हे एका बाजूला आणि दुसऱ्या बाजूला १९३४ साली हे काहीच प्रश्न नसताना गांधींवर पुण्यात बॉंब टाकण्याचा प्रयत्न करण्यात आला. गांधी पाठीमागच्या मोटारीत असल्यामुळे वाचले. पण पुढच्या मोटारीतील सातजण जखमी झाले. या प्रयत्नात

नारायण आपटेचे नाव होते. आणि नारायण आपटे गांधी खुनातही होता. मग याचा संदर्भ कसा लावणार? तो लावायचा झाला तर गांधींच्या खुनामागे फाळणी व पंचावन्न कोटी यांचा काडीमात्र संबंध नाही, असा अर्थ लावला तरच हा संदर्भ लागू शकतो.

❑❑❑

फाळणीची बीजे

फाळणीशिवाय स्वातंत्र्य मिळणे दुरापास्त आहे आणि मुस्लिम लीगच्या धोरणामुळे अखंड भारताचा कारभार करता येणेही अशक्य आहे याची खात्री झाल्यानंतर काँग्रेसने गांधींचा विरोध डावलून फाळणीला मान्यता दिली त्यामुळे ब्रिटिशांचे भारत तोडण्याचे कारस्थान यशस्वी झाले. १४ व १५ ऑगस्ट १९४७ रोजी या प्राचीन भारताची दोन राष्ट्रांत विभागणी झाली. फाळणीच्या नंतर हिंदू व मुसलमान दहा लाख माणसे मारली गेली. एवढा प्रचंड नरसंहार जगाच्या इतिहासात कोठेही झालेला नाही. हा नरसंहार टाळता येणे सहज शक्य होते, असे आता ब्रिटिशांचे गुप्त दस्तऐवज खुले झाल्याने त्याच्याआधारे ब्रिटिश इतिहास संशोधकच म्हणू लागले आहेत. या नरसंहाराबद्दल एकटे लॉर्ड माउंटबॅटनच जबाबदार असून त्यांच्यावर या नरसंहाराबद्दल महाभियोगच चालवावयास हवा असे ब्रिटिश इतिहास संशोधक ॲन्ड्री रॉबर्टस् यांनी म्हटले आहे. (ॲप्रीशियल ऑफ द १९४०-५०) आपल्या पुस्तकात ॲन्ड्री रॉबर्टस् म्हणतात, "३ जून १९४८ पर्यंत भारताला स्वातंत्र्य द्यावयाचे होते पण लॉर्ड माउंटबॅटन यांनी भारताचे स्वातंत्र्य व फाळणी याचे वेळापत्रक बदलले व आपल्याच कारकिर्दीत फाळणी करण्याची घाई केली", असा ठपका ठेवून ब्रिटिश इतिहास संशोधक रॉबर्टस् यांनी असे दाखवून दिले आहे की, "पंजाबच्या सीमेवर २५ हजार पोलिसांची गरज असताना दीड कोटी लोकांच्या संरक्षणासाठी फक्त १८ हजार पोलीस ठेवले होते. याच लॉर्ड माउंटबॅटनननी नॉर्मंडीसाठी दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी लष्कराच्या १४ डिव्हीजन्स किनाऱ्यावर उतरवल्या होत्या पण एवढ्या मोठ्या देशाची फाळणी होत असताना १८ हजार पोलिसांवर हे काम उरकले गेले होते."

सिलीर रॅडक्लिफ यांना भारत पाकिस्तान सीमेची आखणी करण्यास माउंटबॅटन यांनी सांगितले होते. हे काम रॅडक्लिफ यांच्यावर सोपवण्यापूर्वी स्वत: रॅडक्लिफ

कधी भारतात आलेच नव्हते. त्यामुळे त्यांना भारताची भौगोलिक स्थिती माहितीच नव्हती. अशा माणसाला ४० दिवसांत दोन राष्ट्रांच्या सीमेची आखणी करण्यास सांगितले होते. स्वत: रॅडक्लिफ यांनी असे म्हटले आहे की, "दोन राष्ट्रांच्या सीमेच्या आखणीसाठी मला दोन वर्षांचा कालावधी द्यावयास हवा होता, पण तो न देता ४० दिवसांत सीमा आखणीचे काम उरकरण्यात आले." माउंटबॅटन यांची दुसरी चूक अशी की, सीमा संबंधीचा निर्णय सत्तांतरानंतर जाहीर करण्यात आला. रॅडक्लिफ यांनी पंजाबमध्ये सीमा आखणी केल्याबरोबर त्याची घोषणा झाली असती तर ब्रिटिश लष्करी अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली लोकसंख्येची अदलाबदल झाली असती व ब्रिटिश अधिकाऱ्यांनी आपल्याकडे सत्ता असतानाच हे काम केले असते. प्रत्यक्ष सत्तांतर होण्याच्या आधी जर लोकसंख्येची अदलाबदल झाली असती तर सीमा भागात कायदा व सुव्यवस्था प्रस्थापित झाली असती. ही खबरदारी माउंटबॅटन यांनी घेतली नाही म्हणून हा नरसंहार झाला असे ॲन्ड्री रॉबर्टस् या इतिहासकाराचे म्हणणे आहे.

भारताला स्वातंत्र्य मिळून साडेपाच महिने झाले होते. फाळणीच्या परिणामी हिंदू-मुसलमानांच्या कत्तली होऊन रक्ताच्या नद्या वाहत होत्या. लाखो लोकांचे स्थलांतर होत होते. ज्यांच्या हातात सत्ता आली ते देशाचे महान नेते होते. फाळणीच्या परिणामांनी हे नेते गोंधळून गेले, बावरून गेले. त्यांचे सारे आयुष्य, सारी उमेद आणि उभारी आंदोलने करण्यात आणि तुरुंग यातच गेलेली होती. प्रशासनाचा कसलाच अनुभव नसताना एवढ्या मोठ्या देशाची धुरा त्यांच्या खांद्यावर येऊन पडली. या जबाबदारीपेक्षाही फाळणीमुळे आलेली संकटे अधिक अक्राळविक्राळ होती. अनुभव नसताना आलेली जबाबदारी आणि देशभरात घडणाऱ्या घटनांमुळे या नेत्यांची मनेच खचली होती. आधीच वृद्धत्वाने त्यांना कब्जात घेतले होते. या पार्श्वभूमीवर नेहरू-पटेल यांनी सरकारची जबाबदारी घेतली असल्यामुळे त्यांचा आत्मविश्वास त्या क्षणी गळून पडला होता. खचलेल्या मनांनी हे दोन महान नेते गव्हर्नर जनरल लॉर्ड माउंटबॅटन यांच्या भेटीला गेले आणि लॉर्ड माउंटबॅटना आता तुम्हीच सरकार चालवा अशी त्यांनी विनंती केली. माउंटबॅटननी नेहरू-पटेलांच्या विनंतीला नकार दिला होता.[१८] माउंटबॅटन यांनी हा नकार जर दिला नसता तर भारतीय जनतेच्या मनात कोणत्या भावना निर्माण झाल्या असत्या आणि त्याचे परिणाम काय झाले असते याची कल्पनाही करवत नाही. कदाचित फाळणीचा आकांत, त्यामुळे बनलेले स्फोटक वातावरण आणि स्वातंत्र्य

---

१८. फ्रिडम ॲट मिडनाईट, डॉमिनिक लॅपिए व लॅरी कॉलिन्स

मिळाल्यानंतरही स्वकीय राज्यकर्त्यांना कारभार करता येत नाही ही भावना निर्माण होऊन देशात वैफल्यातून अराजकही माजले असते. त्यामुळे माउंटबॅटन यांचा निर्णय हा अतिशय मोलाचा ठरला आहे. याच काळात नेहरू व पटेल यांच्यातील मतभेद तीव्र होत गेले. स्वातंत्र्यलढ्यातील एकमेकांचे जीवाभावाचे सहकारी साडेपाच महिन्यांच्या काळात एकमेकांचे शत्रू झाले नाहीत, तरी दोघांमधील मतभेद व बेबनाव टोकाला पोहोचला होता. हे मतभेद असेच राहिले तर कारभार सुरळीतपणे पार पडणे कठीण होईल अशी चर्चाही सुरू झाली होती. मतभेदाला दोघांपुरतेच मर्यादित स्वरूप राहिले नव्हते. यातून बाहेर पडण्याचा काय मार्ग होता? हे मतभेद मिटविण्याचे प्रयत्न मात्र सुरू होते. त्या दिवशीची संध्याकाळ आलीच नसती किंवा त्या दिवशी गांधींचा खून झाला नसता तर देशाच्या राजकारणाला वेगळीच कलाटणी मिळाली असती. कदाचित संघटनेला पाऊणशे वर्षे होण्याच्या आतच काँग्रेस फुटलीही असती! काय सांगावे? मात्र त्या दिवशीच्या संध्याकाळने भारतापुढे नवेच संकट उभे केले होते. राजकारणाला कलाटणी देऊ शकणारी संध्याकाळ झाली नाही. पण जी संध्याकाळ आली होती, ती मात्र महाभयंकर होती. या संध्याकाळच्या अंधारात बाहेर पडलेल्या दिवाभीतांच्या घुत्कारांचे पडसाद पन्नास वर्षांनंतर आजही ऐकायला मिळतात. म्हणूनच गांधींच्या खुनाला पन्नास वर्षं झालेली असतानाही त्या खुनाचे समर्थन बेमुर्वतखोरपणाने केले जात आहे.

"सरदार, तुमच्या दोघांपैकी एकाने मंत्रिपदाचा त्याग केला पाहिजे. तुम्ही दोघांनीही मंत्रिमंडळात राहणे आता उचित ठरणार नाही. तुमच्यातील दुरावा, मतभेद वाढणे हे देशाला हानिकारक ठरेल. प्रार्थना सभेनंतर जवाहरलाल मला भेटायला येणार आहेत. त्यावेळी हेच त्यांनाही मी सांगणार आहे. नेहरूंबरोबर मला याची चर्चा करावी लागणार आहे आणि त्यासाठी मी माझा सेवाग्रामचा दौराही रद्द करीन. जोपर्यंत तुमच्या दोघांत सामंजस्य, ऐक्य निर्माण होत नाही तोपर्यंत मी दिल्ली सोडणार नाही." असे महात्मा गांधींनी सरदार पटेल यांना ३० जानेवारी १९४८ रोजी सायंकाळी चार वाजता सांगितले होते. त्यानंतर प्रार्थना सभा होणार होती. ती झाल्यावर गांधी नेहरूंबरोबर या वादासंबंधी चर्चा करणार होते. गांधींनी आयुष्यभर सत्य-अहिंसा या नीतिमूल्यांबरोबरच वेळेलाही अमूल्य मानले होते. पण पटेल यांच्याबरोबर चाललेली चर्चाच इतकी गंभीर होती की, गांधींनी आपल्या आयुष्यात प्रथमच वेळ पाळली नाही. गांधी-पटेल चर्चा लांबत चालली तेव्हा गांधींना आधार देणारी आभा वेळ टळू लागली तशी कावरीबावरी झाली होती. पटेलांबरोबरच्या चर्चेत खंड पडावा असेही तिला वाटत नव्हते आणि प्रार्थनेची वेळही टळत होती यामुळे ती अस्वस्थ झाली होती. वेळ संपली आहे हे

सांगण्यासाठी तिने हळूच गांधींच्यापुढे घड्याळ सरकवले. पण त्याचाही उपयोग झाला नाही. वेळ पाळण्याचा शिरस्ता मोडून नेहरू-पटेल यांच्यातील मतभेद कमी कसे करावेत, ते मिटवावेत कसे याचाच गांधी खल करीत होते. यावरून त्या दोघांतील मतभेद किती तीव्र होते हे लक्षात येईल.

महात्मा गांधींनी सरदार पटेल यांच्याशी बोलताना तुम्ही किंवा नेहरूंनी मंत्रिपदाचा राजीनामा दिला पाहिजे असे सांगितले आणि प्रार्थना सभेनंतर नेहरूंनाही हेच सांगणार आहे, असे गांधी म्हणाले असले तरी सरदार पटेल यांनीच मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा हे गांधींना अभिप्रेत असले पाहिजे. सरदार पटेल यांना गांधींनी निर्वाणीचा इशारा दिला होता.'[१९]

नेहरू-पटेल यांच्यातील मतभेद मिटले नाहीत पण त्याच दिवशी गांधींची हत्या झाली. त्यामुळे दोघांनीही गांधींच्या खुनानंतर आपापसातील मतभेदांना मुरड घालण्याचा आटोकाट प्रयत्न केला. सरदार पटेल यांची पक्ष संघटनेवर पकड होती आणि जवाहरलाल नेहरू जनतेत लोकप्रिय होते. गांधींच्या हत्येनंतर नेहरूंच्या असे लक्षात आले की पुरागामी धोरणाच्या बाबतीत संघटनेमध्ये आपली कोंडी होत आहे. पटेल यांच्या हयातीत आणि नंतरही काँग्रेस कार्यकारिणीत नेहरू अल्पमतात होते. पटेलवादी उजवा गट वरचढ होता. नेहरूंना याची प्रकर्षाने जाणीव होऊ लागली म्हणूनच त्यांनी जयप्रकाश नारायण यांच्याशी समाजवाद्यांनी पुन्हा काँग्रेसमध्ये यावे याकरिता बोलणी सुरू केली होती. पटेल यांचा स्वातंत्र्य चळवळीपासून समाजवाद्यांना विरोध होता. त्या विरोधातूनच पटेलांनी काँग्रेसअंतर्गत एखादा गट वा पक्ष असण्यास विरोध केला. त्यामुळे समाजवादी पक्ष व महाराष्ट्रात शेतकरी कामगार संघ (पुढे तोच शे.का.पक्ष झाला.) बाहेर पडले. नेहरू, जयप्रकाश यांची बोलणी फिसकटली. जयप्रकाश नारायण यांनी १४ कलमी कार्यक्रमाच्या कालबद्ध अंमलबजावणीसाठी आग्रह धरला होता आणि याच मुद्द्यावर बोलणी फिसकटली. पटेल यांच्या निधनानंतरची ही घटना आहे. पण पक्षात आणि कार्यकारिणीत आपले बहुमत व्हावे याच हेतूने नेहरू समाजवाद्यांना काँग्रेसमध्ये येण्याचे आवाहन करीत होते. जयप्रकाश नारायण यांनी नेहरूंना पाठविलेल्या पत्रात काँग्रेसमध्ये समाजवादी आले की आम्हांपैकी काहींना मंत्रिपदे मिळतील कदाचित, कार्यकारिणीत तुम्हाला बहुमतही मिळेल पण कार्यक्रमाच्या अंमलबजावणीचे काय? असा त्यांनी प्रश्न केला होता. त्या वेळच्या तात्त्विक राजकारणाची कल्पनाही यावरून येते.

''चळवळीच्या निमित्ताने आम्ही एकमेकांचे सहकारी बनलो, त्या क्षणापासून

---

१९. महात्मा गांधी, द लास्ट फेज, खंड २, प्यारेलाल

जवाहरलालशी माझे अनेक बाबतीत मतभेद आहेत, हे मी यापूर्वीही बोललो होतो आणि आताही सांगत आहे. माझा राजकीय वारस जवाहरलालच आहे. राजाजी नव्हेत.'' इतक्या स्पष्टपणाने महात्मा गांधींनी आपल्या वारसाची घोषणा काँग्रेस कार्यकारिणीत केली होती. हे लक्षात घेता सरदार पटेल यांना तुम्हा दोघांपैकी एकाने राजीनामा दिला पाहिजे, असे सांगून गांधींनी पटेलांनाच इशारा दिला होता. सरदार पटेल यांना गांधींनी निर्वाणीचा इशारा दिला होता असे प्यारेलाल यांनी का म्हटले त्यावर प्रकाश पडतो. नेहरूंनी मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा असे गांधींनी नेहरूंना सांगितले असते असे वाटत नाही. कारण 'एक दिवस असा येईल की जवाहरलाल माझीच भाषा बोलू लागेल' असा विश्वास गांधींनी यावेळी व्यक्त केला होता. तुम्हा दोघांपैकी एकाने राजीनामा देण्याशिवाय गत्यंतर नाही असे पटेलांना गांधींनी सांगितले असले तरी कोणी राजीनामा द्यावे हे गांधींच्या मनामध्ये स्पष्ट होते. स्वातंत्र्यानंतर महात्मा गांधींविषयी पटेल फारसे चांगले बोलत नव्हते. गांधींच्या जीवनातील अखेरच्या उपोषणाच्यावेळी सरदार पटेल त्यांना भेटले नव्हते. ते दिल्लीहून मुंबईच्या दौऱ्यावर निघून गेले. गांधींच्या बेमुदत उपोषणाकडे जगाचे लक्ष लागले होते. भारतवर्ष चिंतेत पडले होते. काँग्रेसच्या साऱ्या नेत्यांनी दिल्लीतच तळ ठोकलेला होता. गांधींच्या उपोषणामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीपेक्षा दौऱ्याचा कार्यक्रम पूर्ण केलाच पाहिजे इतके महत्त्वाचे काम पटेलांच्या दौऱ्यात नव्हते. तरीही पटेल दौऱ्यावर निघून गेले होते. पटेल यांनीच राजीनामा दिला पाहिजे होता असे गांधींच्या मनात का होते, या संबंधात गांधींचे कार्यकारिणीमधील एक भाषण आणखी प्रकाश टाकते. कार्यकारिणीतले हे भाषण आणि मंत्रिपदाच्या राजीनाम्याची सूचना यांच्यातील काळ वेगवेगळा आहे, पण गांधींनी कार्यकारिणीच्या त्या बैठकीतही सरदारांनी पक्ष सोडावा असेच सुचविले होते. ''सरदार पटेल व राजेंद्रबाबू ठरावावर समाधानी नाहीत हे मी ओळखतो. पण तेवढ्याकरिता त्या दोघांनी कार्यकारिणीचा राजीनाम देण्याचे काहीच कारण नाही. सरदार पटेल व राजेंद्रबाबू या दोघांनीही काँग्रेस सोडली तरी काँग्रेसचे कार्य बंद पडणार नाही. ते दोघेही काँग्रेसमध्ये असले काय आणि नसले काय त्याने काही फरक पडणार नाही. काँग्रेसचे कार्य चालूच राहणार आहे. ते काही थांबत नाही. दादाभाई, फिरोजशहा व टिळक यांनी काँग्रेस बांधली पण त्यांच्यानंतर काही काँग्रेसचे काम खंडित झाले नाही.''[२०]

स्वातंत्र्य मिळण्याच्या आधी गांधींनी पटेल यांना काँग्रेसमधून जायचे असेल

---

२० महात्मा, खंड सहा, डी. जी. तेंडुलकर

तर खुशाल जा, असेच वेगळ्या पद्धतीने बजावले होते. आणि आपल्या जीवनाची अखेर काही तासांवर येऊन ठेपली आहे याविषयी कसलीच कल्पना नसताना गांधींनी पटेल यांना मंत्रिपदाच्या राजीनाम्यासंदर्भात ३० जानेवारी १९४८ रोजी निर्वाणीचा इशारा दिला होता. प्रार्थनेची वेळ टळल्यामुळे चर्चा संपवून गांधी घाईघाईने प्रार्थना सभेसाठी चालले असताना काठेवाडचे दोन कार्यकर्ते गांधींना भेटण्यासाठी आले होते. घाईघाईतच ते म्हणाले, "जगलो वाचलो तर प्रार्थनेनंतर आपण भेटू." थोड्या वेळापूर्वीच गांधींनी पटेलांना सांगितले होते की प्रार्थनेनंतर मी नेहरूंशी बोलणार आहे, असे सांगणारे गांधी बाहेर पडताना मात्र 'जगलो-वाचलो'ची भाषा करत होते आणि त्यानंतर काही मिनिटांतच गांधींच्या तोंडातून 'हे राम' हे अखेरचे उद्‌गार बाहेर पडले हा किती विचित्र योगायोग! मी सव्वाशे वर्षे जगणार आहे असे सांगणाऱ्या गांधींची वयाच्या ७८व्या वर्षीच प्राणज्योत मालवली आणि तीही तुम्हाला सव्वाशे वर्षे कोण जगू देतो, असे स्वातंत्र्यापूर्वीच म्हणणाऱ्या नथुराम गोडसेनेच मालविली.

गांधींचा खून होणार याची केंद्रीय गृहखात्याला पंधरा दिवस आधी माहिती मिळूनही गांधींचे प्राण वाचवता आले नाहीत. ३० जानेवारी १९४८ची ही संध्याकाळ आली नसती आणि गांधींनी नेहरूंशी चर्चा केली असती तर त्यातून काय निष्पन्न झाले असते? हा जर-तरचा प्रश्न झाला. राजकारणात जर-तरला काही अर्थ नाही, पण तरीही त्याचा विचार करण्याची गरज नसते असे म्हणूनही चालणार नाही. गांधींच्या सांगण्याप्रमाणे पटेलांनी राजीनामा दिला असता तर पटेल गटाने त्याबाबतीत कोणतीच हालचाल केली नसती? कार्यकारिणीत पटेलांचे बहुमत होते. नेहरू नेहमीच अल्पमतात असायचे आणि गांधींच्या बऱ्याच गोष्टी सरदार पटेलांनी मानलेल्या नव्हत्या; तशीच त्यांची राजीनाम्याची सूचनाही मान्य केली असती कशावरून? काँग्रेस बरखास्त करून लोकसेवा संघात तिचे रूपांतर करावे हे गांधींचे मत पटेलांनी ऐकले नाही. काँग्रेस ठेवायचीच असेल तर मग जयप्रकाश नारायण किंवा आचार्य नरेंद्र देव यांना काँग्रेसचे अध्यक्ष करावे, असेही गांधी म्हणाले होते. पटेलांनी गांधींचे ते म्हणणेही मानलेले नाही. त्याचप्रमाणे मंत्रिपद सोडावे हा सल्ला पटेलांनी मानला नसता तर नेहरूंना राजीनामा द्यावयास सांगून गांधींनी पटेल यांचा मार्ग मोकळा केला असता काय? आणि नेहरूंनी मंतप्रधानपद सोडले असते तर त्याचे परिणाम काय झाले असते? पटेल यांनी मंत्रिपद सोडले असते तर पटेलांच्या अनुयायांनी ते निमूटपणे सहन केले असते काय? या काळात गांधी व पटेल यांच्यात सख्य राहिलेले नव्हते. त्यामुळे पटेल यांनी राजीनामा दिला असता तर पटेल अनुयायांनी त्याविरुद्ध भूमिका घेतली असती आणि कदाचित त्याच क्षणी

काँग्रेस फुटलीही असती किंवा गांधी व नेहरू यांच्याशी पटेल यांचे असलेले तणाव अधिकच वाढत गेले असते. त्यातून राजकारणाने कोणती दिशा घेतली असती हे सांगता आले नसते!

हिंदुत्ववादी विचाराच्या लोकांनी गांधींचा बळी घेतला. गांधींचे प्राण वाचविता येणे, ही गोष्ट खरोखरच अवघड होती का? की ती अशक्यच होती? या प्रश्नांची उत्तरे पुढील प्रकरणांत शोधली आहेत. देशाची फाळणी महात्मा गांधींनी घडवून आणली असा प्रचार गांधी खुनाच्या समर्थनार्थ हिंदुत्ववादी अगदी अलीकडे अलीकडे करीत होते. त्यानंतर गांधीखुनाच्या समर्थनार्थ गांधींमुळे पाकिस्तानला पंचावन्न कोटी रुपये द्यावे लागले असे सांगण्यात येत आहे. पण हे सारे हिंदूंच्या मनात मुस्लिमद्वेष वाढविण्याकरताच आहे. फाळणी व पंचावन्न कोटी रुपये हे प्रश्न निर्माणच झालेले नव्हते, अशा काळातसुद्धा गांधींच्या खुनाचे प्रयत्न झालेच नव्हते काय? या प्रयत्नांच्या संदर्भात नथुराम गोडसेला पकडले नव्हते काय? त्यात गांधी खुनातील एक कटवाला नारायण आपटे नव्हता काय? सेवाग्रामला गांधींना मारण्यासाठी जांबिया जवळ बाळगलेल्यांत नथुराम नव्हता काय? यावेळी फाळणी झालेली नव्हती आणि पंचावन्न कोटींचा प्रश्नही उपस्थित झालेला नव्हता. मग त्यावेळी महात्मा गांधींचे प्राण घेण्याचे प्रयत्न का झाले होते? हिंदुत्ववाद्यांचा महात्मा गांधींच्या विचारांना विरोध होता आणि गांधींच्या विचारांचा प्रभाव जनतेवर पडला होता. गांधींच्या मागे जनता उभी होती. त्यामुळेच त्यांच्या एका हाकेने सारा देश 'करेंगे या मरेंगे' अशा निर्धाराने ब्रिटिशांविरुद्धच्या लढ्यासाठी उभा ठाकला होता. जोपर्यंत गांधींच्या विचारांचा प्रभाव आहे तोपर्यंत हिंदुत्ववादी विचार पसरणार नाहीत. म्हणूनच फाळणी किंवा पंचावन्न कोटी रुपयांचा प्रश्नही निर्माण झालेला नव्हता तेव्हा गांधींना ठार मारण्याचे प्रयत्न झाले होते आणि याच कारणासाठी त्यांचा खून करण्यात आला. गांधींच्या हत्येमागचे हिंदुत्ववाद्यांचे हे कारण आहे. ते जर त्यांनी सांगितले तर मग हिंदुत्ववाद्यांविषयी जनतेत अधिकच घृणा निर्माण होईल. म्हणून खरे कारण दडवून ठेवून फाळणी व पंचावन्न कोटींचे कारण ते पुढे करतात आणि लोकांची सहानुभूती मिळविण्याचा प्रयत्न करतात. महात्मा गांधींना देशद्रोही आणि रक्तपिपासू ठरविण्यापर्यंत हिंदुत्ववादी निर्ढावलेले आहेत. नथुराम गोडसेला पंधरा नोव्हेंबरला फाशी दिले, त्यामुळे हा दिवस हिंदुत्ववादी हुतात्मा दिवस म्हणून पाळतात. मुंबईत १५ नोव्हेंबर १९९३ रोजी गोपाळ गोडसे आदी गांधी खुनातील नथुरामचे साथीदार व खुन्यांचे समर्थक यांची भाषणे झाली. त्यात महात्मा गांधींना देशद्रोही व रक्तपिपासू म्हटले गेले आणि महात्मा गांधींची रक्षा देशातील नद्यांमध्ये विसर्जित केली असल्यामुळे या नद्या अपवित्र झाल्या आहेत असे म्हटले गेले. जर

या नद्या अपवित्र झाल्या असतील तर मग काही वर्षांपूर्वी हिंदुत्ववाद्यांनी गंगेचे पाणी पवित्र म्हणून त्याचा बाजार का मांडला? त्यांनी गंगेच्या पाण्याची विक्री केली नव्हती का? हिंदुत्ववाद्यांची ही अशी दुटप्पी विधाने व वागणूक सातत्याने आढळून येईल. हिंदुत्ववाद्यांच्या प्रचारतंत्राचा हा एक महत्त्वाचा भाग आहे. गोंधळ उडविणे, खोटी विधाने करणे, उलटसुलट प्रचार करणे यांचाही त्यांनी बाबरी मशीद प्रश्नात उपयोग केला होता. गांधींच्या विचारांनी प्रभावित झालेली जनता स्वातंत्र्याच्या लढ्यात उतरली होती; पण हिंदू राष्ट्र आणि हिंदुत्व यांचा पुरस्कार करणारा रा. स्व. संघ स्वातंत्र्यलढ्यात सामील झाला नव्हता. हिंदू महासभा व हिंदुत्ववाद्यांमागे या देशातील जनता गेली नाही. सर्वसामान्य जनतेच्या मनात द्वेषाचे विष लवकर भिनते असे असूनही हिंदुत्ववाद्यांच्या विचाराला जनतेचा पाठिंबा मिळाला नाही. सारा देश गांधींच्या विचारांनी भारला होता. त्यांच्या शब्दाने देश हालत होता आणि ब्रिटिश साम्राज्य हादरत होते. 'उचललेस तू मीठ मूठभर अन् साम्राज्याचा खचला पाया' असे ग. दि. माडगूळकर यांनी गांधींच्या शक्तीचे वर्णन केले आहे. ही व्यक्तीची शक्ती नव्हती. ती गांधीविचाराने निर्मिलेली देशाची शक्ती होती. म्हणून ब्रिटिश साम्राज्य गांधींना घाबरत होते आणि हिंदुत्ववाद्यांचा त्यांच्यापुढे निभाव लागत नव्हता. म्हणून हिंदुत्ववादी गांधींचा द्वेष करत होते. त्यातून गांधींची हत्या झाली. गांधी नसते तर देशाची फाळणी झाली नसती असे ते म्हणतात. महाराष्ट्र टाइम्सचे संपादक गोविंद तळवलकर यांनी २६ नोव्हेंबर १९९३च्या महाराष्ट्र टाइम्समध्ये बी. आर. नंदा यांच्या 'गांधी अँड हिज क्रिटिक्स' या इंग्रजी ग्रंथाचा परिचय करून दिला आहे. "गांधी नसते तर फाळणीच झाली नसती असेही महात्माजींचे या संबंधातील टीकाकार मानीत असतात. ताळतंत्र सोडून बहकण्यात पुरुषार्थ मानण्याचे सध्या काहीजणांनी ठरविले आहे." असे तळवलकर यांनी या ग्रंथपरिचयात म्हटले आहे. हिंदुत्ववाद्यांच्या विचारसरणीला महात्मा गांधींमुळे अडसर निर्माण झाला आहे, म्हणून गांधींचा खून करण्यात आला हेच सत्य आहे. त्यांच्या खुनामागे दुसरे कोणतेही कारण नाही.

महात्मा गांधींची फाळणीविषयीची मते काय होती याची चर्चा केली आहे. पण फाळणीपूर्वीच्या राजकारणाची पार्श्वभूमीही समजून घेतली पाहिजे. महात्मा गांधींच्या राजकीय उदयापूर्वीच १९०९ साली विभक्त मतदारसंघ स्थापन करण्यात आले होते. "राज्यकर्त्यांकडून राजकीय सुधारणा पदरात पाडून घेण्याचा भारतीय राजकारण्यांचा डाव होता. गोपाळ कृष्ण गोखले यांचाही याबाबतीत पाय घसरल्यासारखा झाला. त्याक्षणी त्यांनी सरकारला ठणकावून सांगायला हवे होते, एक वेळ घटनात्मक सुधारणा अमलात आल्या नाहीत तरी चालेल पण ही विभक्त

मतदारसंघाची योजना आम्ही कदापिही मान्य करणार नाही. मात्र गोखले यांनी तसे म्हटले नाही.''[२१]

''नामदार गोखले यांनी निधनापूर्वी एक योजना केली होती. ती योजनाही हिंदू-मुस्लिम ऐक्याची होती. तसेच लोकमान्य टिळकांनी लखनौ येथे करार घडवून आणला होता. मुस्लिम समाजास काही प्रमाणात झुकते माप देऊनही स्वातंत्र्यलढ्याचे तिरंगी स्वरूप दुरंगी करावे असे या दोन्ही पुढाऱ्यांचे मत होते.''[२२]

हिंदू-मुस्लिम ऐक्याचे महात्मा गांधी पुरस्कर्ते होते. त्यांच्या आधी लोकमान्य टिळक व नामदार गोखले यांनीही हिंदू-मुस्लिम ऐक्याचा पुरस्कार केला होता. हे सर्वजण राजकीय नेते होते. भारतासारख्या अनेक धर्म, पंथ असलेल्या देशात त्यांचे ऐक्य असल्याशिवाय स्वातंत्र्याची चळवळ निर्णायक ठरू शकणार नाही या वास्तवाचे भान हे नेते जसे ठेवून होते तसेच प्रत्यक्ष राजकारणाशी संबंध नसलेले हिंदू धर्माभिमानी स्वामी विवेकानंद यांनीही हिंदू-मुस्लिम ऐक्याचाच आग्रह धरलेला होता. ''आपल्या मायभूमीच्या दृष्टीने विचार करता हिंदू धर्म आणि इस्लाम धर्म यांचा समन्वय हेच एकमेव आशास्थान आहे. वेदांती मेंदू आणि इस्लामी देह धारण करून हा भावी भारत उदयास येणार आहे.''[२३]

ज्या ज्या द्रष्ट्या नेत्यांनी भारताच्या हिताचा विचार केला आणि भारताचे हित कशात आहे हे ज्यांना उमगले त्या साऱ्यांनी हिंदू-मुस्लिम ऐक्याचाच विचार मांडला होता. स्वामी विवेकानंद यांचे हिंदू-मुस्लिम संबंधातील विचार आणि महात्मा गांधींचे त्या संबंधातील विचार यांत काय फरक आहे? महात्मा गांधींवर मुस्लिमधार्जिणे असा शिक्का मारणारे स्वामी विवेकानंदांवर हा शिक्का का मारीत नाहीत? १९१६ साली लोकमान्य टिळक व जीना यांच्यात लखनौ करार झाला. या कराराने द्विराष्ट्रवादाच्या सिद्धान्ताला तत्त्वत: मान्यता दिली गेली. ''भारतीय फाळणीचे गुन्हेगार ठरवायचे झाले तर लोकमान्य टिळकांनाही त्यात गोवावे लागेल. टिळकांनाही अपराधी ठरविल्यासिवाय गत्यंतर नाही. कारण लखनौ करारात मोठा पुढाकार टिळकांचाच होता.''[२४]

भारताच्या फाळणीची बीजे १९०९ सालच्या विभक्त मतदारसंघाच्या स्थापनेपासून रुजली जात होती. लोकमान्य टिळकांच्या पुढाकाराने झालेल्या लखनौ कराराने या बीजांना खतपाणी मिळाले आणि काळाच्या गर्भात फाळणीचा अंकुर

---

२१. महात्मा गांधींचे मुस्लिम राजकारण, वसंत पळशीकर, दै. पुढारी, १४ नोव्हेंबर १९९३

२२. महाराष्ट्र टाइम्स, गोविंद तळवळकर, कित्ता २६ नोव्हेंबर १९९३

२३. स्वामी विवेकानंद ग्रंथावली संचयन

२४. महात्मा गांधींचे मुस्लिम राजकारण, वसंत पळशीकर, दै. पुढारी १४ नोव्हेंबर १९९३

वाढू लागला. फाळणीचा दोष कोणत्याही एका नेत्यावर टाकता येणार नाही. महात्मा गांधींनी फाळणी टाळण्याचे आटोकाट प्रयत्न केले. महात्मा मांधींनी फाळणीविरुद्ध घेतलेल्या भूमिकेची स्वच्छ मनाने माहिती घेतली तर कोणताही शहाणा माणूस फाळणीचे खापर गांधींच्या माथ्यावर फोडणार नाही.

महात्मा गांधींच्या खुनानंतर सरदार वल्लभभाई पटेल यांनी रा. स्व. संघ व हिंदू महासभा यांच्या संदर्भात शामाप्रसाद मुखर्जी यांना १८ जुलै १९४८ रोजी पत्र पाठविले होते. संघ व महासभा यांच्या राजकारणातून जे विष पसरवण्यात आले त्यातून महात्मा गांधींचा खून झाला असल्याचे पटेल यांनी या पत्रातून डॉ. मुखर्जी यांना कळविले होते. "संघ व हिंदू महासभा यांच्या कारवायांमुळे विशेषत: संघाच्या कारवायांमुळे महात्मा गांधींचा खून झाला अशी आमची (म्हणजे गृहखात्याची) माहिती आहे. हिंदू महासभेच्या अतिरेकी गटाचा गांधींच्या खुनात हात असावा, याविषयी माझ्या मनात संशय नाही. रा. स्व. संघाने सरकारच्या अस्तित्वालाच आव्हान दिलेले आहे. रा. स्व. संघ विध्वंसक, घातपाती कारवायांत गुंतलेला आहे." असेही सरदार पटेल यांनी मुखर्जींना पाठविलेल्या पत्रात म्हटले आहे. (सरदार पटेल करस्पॉन्डन्स, खंड ६). सरसंघचालक माधवराव गोळवलकर यांनाही सरदार वल्लभभाई पटेल यांनी ११ सप्टेंबर १९४८ रोजी पत्र पाठविले होते. "सुडाने पेटून संघ मुसलमानांवर हल्ले करीत आहे. निष्पाप स्त्री-पुरुष, मुले यांच्यावर ते केवळ मुस्लिम आहेत म्हणून संघ अत्याचार करतो. संघाच्या नेत्यांची भाषणे जातीय द्वेषाने आणि विखाराने भरलेली आहेत. संघाच्या या जातीय विखारानेच महात्मा गांधींचा बळी घेतलेला आहे. गांधींच्या खुनानंतर संघाच्या लोकांनी मिठाई वाटून त्याचा आनंद व्यक्त केला", असे पटेल यांनी गोळवलकरांना पाठविलेल्या पत्रात म्हटले आहे. "संघाच्या लोकांनी विघातक कारवाया सुरू केल्या आहेत. देशाच्या अनेक भागांत संघाच्या लोकांनी हिंसाचार घडवून आणला असून जाळपोळ, दरोडेखोरी, लुटालूट करून अनेकांचे खून पाडले आहेत. संघाने आपल्या कारवायांनी हिंसाचार घडवून आणला आहे. त्यातून अनेकांचे प्राण घेतले आहेत. गांधींच्या खुनालाही संघच कारणीभूत आहे." असे सरदार पटेल यांच्या ४ फेब्रुवारी १९४८च्या पत्रकात म्हटले आहे. (गोळवलकर गुरुजींना पाठविलेले पत्र व ४ फेब्रुवारी १९४८चे पत्रक टाइम्स ऑफ इंडियाच्या २१ ऑक्टोबर १९९०च्या अंकातून). सरदार पटेल यांच्यामुळेच संघावरची बंदी उठविली गेली. त्यामुळेच पटेल यांचे हे निष्कर्ष कट्टर संघविरोधी माणसाने काढलेले नाहीत. म्हणून पटेल यांच्या या मतांना अधिक महत्त्व प्राप्त होते. आपल्या विरोधकांवर प्राणघातक हल्ले करणे आणि त्याच्या खुनाचे समर्थन करणे याविषयी सरदार पटेल यांच्याकडे

असलेल्या माहितीच्या आधारे पटेल यांनी डॉ. मुखर्जी व गोळवलकर यांना पत्रे पाठविली होती. पटेलांना संघाबाबत काही प्रमाणात सहानुभूती होती. त्यामुळेच संघाला काँग्रेसची युवक आघाडी बनवावी असा ठराव पटेल यांनी नेहरूंच्या गैरहजेरीत मंजूर करून घेतला होता. गांधींच्या खुनानंतर हा ठराव झाला होता. संघाविषयी इतके ममत्व असतानाही पटेलांनी संघाबाबत ही विधाने केली आहेत. त्यावरून संघाच्या स्वरूपावरच प्रकाश पडतो. संघाला बदलण्यासाठी संघाला काँग्रेसची युवक आघाडी करण्याचा पटेलांचा प्रयत्न होता असे म्हटले जाते.

❐❐❐

पंचावन्न कोटींचे प्रकरण

महात्मा गांधींच्या खुनाच्या समर्थनाकरिता फाळणीच्या कारणानंतर पंचावन्न कोटी रुपयांचे कारण सांगण्यात येते. पंचावन्न कोटी रुपये पाकिस्तानला द्यावेत असा आग्रह महात्मा गांधींनी धरला. त्यामुळे हे पैसे पाकला दिले. पाकिस्तानला पंचावन्न कोटी रुपये द्यावेत म्हणून गांधींनी उपोषण केले. याच्या असंतोषातून, संतापून गांधींचा खून करण्यात आला असा प्रचार केला जात आहे. देशाची फाळणी, त्यानंतर झालेल्या कत्तली, दंगली, निर्वासितांचे लोंढे या पार्श्वभूमीवर पंचावन्न कोटींचे प्रकरण ही किती लहानशी बाब होती हे त्याची तपशीलवार चर्चा केल्याशिवाय समजणार नाही. फाळणीनंतर भारताचे सैन्य, मालमत्ता याबरोबरच गंगाजळीतील रोख रक्कम यांची वाटणी करण्यात आली.

एकत्र कुटुंबात दोन भावांचे वेगळे संसार थाटतानासुद्धा वडिलार्जित मालमत्तेची वाटणी होते. तशीच ही वाटणीची बाब आहे. दुर्दैवाने फाळणी झाली. ती टळली नाही आणि मग असलेल्या गंगाजळीची, मालमत्तेची वाटणी अपरिहार्य झाली. भारताच्या तिजोरीत त्यावेळी तीनशे पंचाहत्तर कोटी रुपये होते. त्यांचे वाटप करण्यात आले. पाकिस्तानची तातडीची गरज लक्षात घेऊन पाकिस्तानला वीस कोटी रुपयांचा पहिला हप्ताही भारताने दिलेला होता. आणि कायदेशीरदृष्ट्या पाकिस्तानला किती रक्कम द्यावी लागते हे उभय देशांतील करारानुसार निश्चित करण्यात आले. त्यानुसार आणखी पंचावन्न कोटी रुपये भारत पाकिस्तानला देणे लागत होता. ही रक्कम आपण देणे लागतो हे भारताने डिसेंबर १९४७च्या कराराने मान्य केले होते आणि पंचावन्न कोटी रुपये विशिष्ट कालमर्यादेत देण्याचे आश्वासन भारताने पाकिस्तानला लिखित स्वरूपात दिलेले होते. याच सुमारास काश्मीरमध्ये पाकिस्तानने टोळीवाल्यांच्या मार्फत हल्ला चढविला. तेव्हा काश्मीरचा प्रश्न सोडविला जात नाही तोपर्यंत पाकिस्तानला पंचावन्न कोटी रुपये देणार नाही अशी

भूमिका पटेल यांच्या आग्रहामुळे भारत सरकारने घेतली आणि पंडित नेहरूंनी पाकिस्तानला कबूल केलेले पैसे न देण्याच्या भूमिकेचे जाहीरपणे समर्थन सुरू केले. नेहरूंनी २ जानेवारी १९४८ रोजी पत्रकार परिषद घेऊन पंचावन्न कोटी रुपये देण्याचे स्थगित केले आहे असे सांगितले. या पत्रकार परिषदेत नेहरू म्हणाले, "अशा परिस्थितीत एखाद्या देशाने ही रक्कमच गोठवून टाकली असती. (म्हणजेच देण्याचे अमान्य केले असते.) पण आम्ही ही रक्कम गोठवत नाही. पाकिस्तानला पैसे देण्याचा करार आम्ही केलेला आहे. पण इतर प्रश्नांवर समझौता झाल्यावर हे पैसे (पंचावन्न कोटी रुपये) पाकला देण्यास आम्ही तयार आहोत." नेहरूंच्या भूमिकेत एक वेळ काही तात्त्विक आधार होता असे म्हणता येईल! पण हा आधार भक्कम नव्हता. थोडा लेचापेचाच होता. मात्र वल्लभभाईंची भूमिका नेहरूंपेक्षा फारच वेगळी होती. त्यांच्या भूमिकेतून पटेल पाकिस्तानला पंचावन्न कोटी रुपये देण्यास बिलकूल तयार नव्हते हे दिसून येते. पाकिस्तानला हे पैसे न देता त्या पैशांचा उपयोग निर्वासितांच्या पुनर्वसनाकरिता खर्च करावा, असे सरदार पटेल यांचे म्हणणे होते. हा करार करण्यापूर्वी नेहरू-पटेल यांनी गांधींशी चर्चा केलेली नव्हती. स्वतंत्र भारताने दुसऱ्या देशाशी केलेला हा पहिलावहिला करार होता. आणि पहिल्या कराराची अंमलबजावणीच लांबणीवर टाकावी म्हणून त्याची सांगड पाकिस्तानबरोबर असलेल्या अन्य प्रश्नांशी नेहरू घालत होते आणि गृहमंत्री त्या पैशांतून पुनर्वसन करावयाचे म्हणत होते. देशाचा एवढा मोठा प्रदेश सोडून देण्यास जे नेते तयार झाले, गांधींना अंधारात ठेवून तयार झाले, त्या नेत्यांनी पंचावन्न कोटी रुपयांसाठी ही खळबळ करणे हेही बरोबर नव्हते. कारण प्रदेश तोडून देण्याच्या तुलनेत पंचावन्न कोटी रुपये देणे किरकोळच बाब होती असे म्हणावे लागेल. नेहरूंच्या भूमिकेचा विचार करावयाचा झाल्यास पाकिस्तानबरोबर काश्मीरसह इतर प्रश्न सुटल्याखेरीज पैसे द्यावयाचे नाहीत ही भूमिका समजू शकते. पण मग करारात तशी स्पष्ट अट घालावयास हवी होती. सर्व प्रश्न सुटल्याशिवाय पंचावन्न कोटी रुपये दिले जाणार नाहीत, अशी अट करारात का घातली गेली नाही? स्वतंत्र देश म्हणून पहिलाच करार करावयाचा आणि तो पाळावयाचा नाही. यामुळे जगभर भारताची इभ्रतच गेली असती. गांधींना हे मान्य नव्हते. गांधींना नेहरू-पटेलांची भूमिका त्यामुळेच खटकत होती. नेहरूंच्या भूमिकेप्रमाणे तशी अट करारात घातली असती तर मग पैशांच्या देवाणघेवाणीचा करारच फिसकटला असता आणि त्यातून एक वेगळेच राजकारण जन्मास आले असते. ते टाळण्यासाठी पैसे देण्याचे मान्य करण्यात आले पण प्रत्यक्ष पैसे देताना खळखळ केली गेली.

पाकिस्तानला पंचावन्न कोटी रुपये देण्याच्या प्रश्नावर पंतप्रधान पं. नेहरू व

पाकबरोबरच्या करारावर सही करणारे गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या भूमिकेत बराच फरक होता. सरदार पटेल यांना हंगामी मंत्रिमंडळात गृहमंत्री असताना मुस्लिम लीगचे अर्थमंत्री लियाकत अली खान यांचा जो अनुभव आला आणि सरदार पटेल यांच्या मुत्सद्देगिरीचे पितळ उघडे पडले त्याचा राग सरदार वल्लभभाई पटेल यांना होता. त्याचा त्यांनी सूड घेण्याचे ठरवले. त्यातून त्यांनी पाकला पंचावन्न कोटी रुपये देणार नाही अशी भूमिका घेतली. पाकला ५५ कोटी रुपये दिले नाहीत म्हणजे मग पाकपुढे आर्थिक पेचप्रसंग निर्माण होईल. पाकची आर्थिक कोंडी व्हावी हाच सरदार वल्लभभाई पटेल यांच्या विरोधाचा उद्देश होता. आपल्या विरोधाला सरदार वल्लभभाई पटेल तात्त्विक मुलामा चढवू पाहत होते.

पाकिस्तानबरोबरचे सर्व प्रश्न सुटले की मग पाकला ५५ कोटी रुपये देण्याचे ठरले आहे, हा सरदार पटेल यांचा दावा होता. काश्मीरचा प्रश्न सुटेपर्यंत पाकला पैसे द्यावयाचे नाहीत असे ठरलेले आहे असे पटेल म्हणत होते. आपल्या म्हणण्याच्या पुष्ट्यर्थ सरदार पटेल कराराच्या अटींचा आधार घेत नव्हते हे येथे लक्षात घेतले पाहिजे. पाकिस्तानबरोबरचे काश्मीरसह सर्व प्रश्न सुटल्यावर पाकला पंचावन्न कोटी रुपये द्यावयाचे असे जर ठरले होते तर ती अट करारात समाविष्ट करावयास हवी होती. करारात ही अट नाही. सरदार वल्लभभाई पटेल यांच्या मुत्सद्देगिरीचे खरोखरीच दिवाळे वाजले होते. हंगामी मंत्रिमंडळात अर्थखात्याऐवजी गृहखात्याचा आग्रह धरला त्यावेळी एकदा आणि भारताचा पहिला आंतरराष्ट्रीय करार करताना पटेल यांनी करारात काश्मीरसह पाकबरोबरचे सर्व प्रश्न सुटल्यावर पाकिस्तानला पंचावन्न कोटी रुपये दिले जातील ही अट समाविष्ट करण्याचे ते विसरले किंवा त्यांना त्यात यश आले नाही तेव्हा दुसऱ्यांदा पटेल यांच्या मुत्सद्देगिरीचे दिवाळे वाजले होते. अथवा पंचावन्न कोटी रुपये देणे व पाकबरोबरचे इतर प्रश्न यांचा परस्परा संबंध नसताना काश्मीरसह सर्व प्रश्न सुटल्यावर पैसे देऊ ही भूमिका घेण्यात सरदार पटेल यांची चूक झाली होती असे मानावे लागेल!

काश्मीरसह पाकिस्तानबरोबरचे सर्व प्रश्न सुटल्यावर पाकला ५५ कोटी रुपये देण्याचे ठरले आहे. अशी अट करारात आहे हे सरदार पटेल या वादात दाखवू शकलेले नाहीत. करार करण्याच्यावेळी ज्या चर्चा झाल्या त्या चर्चेतील स्वत:च्या मतांचा सरदार वल्लभभाई पटेल आधार घेऊन पाकला कबूल केलेले ५५ कोटी रुपये देण्याचे नाकारीत होते.

सरदार वल्लभभाई पटेल यांनी पंचावन्न कोटी रुपयांसंबंधात वृत्तपत्रांना देण्याकरिता १२ जानेवारी १९४८ रोजी एक प्रदीर्घ निवेदन पाठविले होते. सरदार पटेल यांच्या पत्रव्यवहाराचा सहावा खंड आहे. त्यात हे निवेदन संपूर्णपणे दिलेले

आहे. त्यामुळे या निवेदनाच्या खरेखोटेपणाचा प्रश्नच निर्माण होत नाही. पार्टिशन कौन्सिलमध्ये एकत्रित भारताची मालमत्ता, गंगाजळी, कर्ज यांचा विचार करण्यात आला होता. सरदार पटेल १२ जानेवारी १९४८च्या निवेदनात म्हणतात, "२६ नोव्हेंबर १९४७ रोजीच्या चर्चेत खेळीमेळीच्या वातावरणात काश्मीर प्रश्नावर चर्चा झाली. दुसऱ्या दिवशी २७ नोव्हेंबर रोजी गंगाजळीतील पैशांची वाटणी आणि कर्जाचे दायित्व या दोन मुद्द्यांवर चर्चा होऊन अनौपचारिकपणे त्यासंबंधीचा करार ठरविण्यात आला. पण २७ नोव्हेंबरच्या संध्याकाळीच पाकिस्तानच्या प्रतिनिधींनी या कराराची माहिती वृत्तपत्रांना दिली. दुसऱ्या दिवशीच्या म्हणजे २८ नोव्हेंबर १९४७च्या बैठकीस पाकिस्तानचे पंतप्रधान व अर्थमंत्री आणि मी स्वत: हजर होतो. २८ नोव्हेंबरला या बैठकीत मी माझे निवेदन वाचून दाखवले. या निवेदनात मी असे म्हटले होते की, काश्मीर प्रश्न सुटल्याशिवाय पैसे देण्यास आम्ही बांधलेलो नाही."

सरदार पटेल यांनी २८ नोव्हेंबरच्या बैठकीत हे निवेदन केले. पण ते सरदार वल्लभभाई पटेल यांचे मत होते. पटेल यांनी ते तोंडी मांडले काय किंवा वाचून दाखवले काय त्यामुळे काही फारसा फरक पडत नाही. पटेल यांचे हे मत पाकिस्तानच्या प्रतिनिधींनी स्वीकारले होते काय? त्याला मान्यता दिली होती काय? हे प्रश्न महत्त्वाचे आहेत. सरदार पटेल यांनी या निवेदनात त्या संबंधात मतप्रदर्शनच केलेले नाही आणि आपण काय म्हणालो याचाच तपशील दिलेला आहे. पटेल यांच्या या निवेदनानंतर पाकिस्तानच्या प्रतिनिधींनी बैठकीवर बहिष्कार घातला. त्यांचा बहिष्कार म्हणजे काश्मीर प्रश्न सुटल्याशिवाय पाकला पैसे देण्यास बांधलेलो नाही हे पटेल यांचे मत त्यांनी स्वीकारलेले नव्हते. साहजिकच ते पटेल यांचे मत झाले. दोन्ही बाजूंना मान्य झालेला तो निर्णय नव्हता!

पार्टिशन कौन्सिलमध्ये वाद उपस्थित झाल्यास लवाद मंडळापुढे तो मांडण्याचे ठरले होते. १ डिसेंबर १९४७ रोजी पार्टिशन कौन्सिलमध्ये अनौपचारिकपणे करार निश्चित झाले ते सादर करण्यात आले. त्यातही काश्मीरचा प्रश्न सुटला तरच पंचावन्न कोटी रुपये देण्याचा करार झाल्याचे सांगण्यात आलेले नव्हते. ८ व ९ डिसेंबर रोजी लाहोरमध्ये लवाद मंडळाची बैठक भरली. पंचावन्न कोटी रुपये मिळवण्याचा पाकने दरम्यान प्रयत्न चालविला असे पटेल यांनीच म्हटले आहे. पण काश्मीर प्रश्न सुटल्यावर पैसे देण्याची करारात अट आहे आणि त्याच्या बाहेर जाऊन पाक पैसे मागत आहे असे पटेल यांनी एकदाही म्हटलेले नाही. फक्त बैठकीत मी कसे जोरदारपणे काश्मीर प्रश्न सुटल्याशिवाय पैसे मिळणार नाहीत असे सांगितले होते, यावर पटेल यांनी १२ जानेवारी रोजी वृत्तपत्रांना दिलेल्या निवेदनात

भर देऊन म्हटले आहे. अशी करारातील अट आहे असे सरदार वल्लभभाई पटेल का म्हणत नव्हते? पटेल यांचे मत लक्षात घेऊनच पाकने पैसे मिळविण्याची घाई केली, हे यामुळे स्पष्ट होते. जे अनौपचारिकरीत्या ठरले होते ते पाकच्या उच्चायुक्तांनी ७ डिसेंबर १९४७ च्या पत्रकार परिषदेत जाहीर केले. सर्व करार होईपर्यंत एखाद्या कराराला प्रसिद्धी द्यावयाची नाही असे ठरलेले असताना ही प्रसिद्धी दिली असेही पटेल यांनी म्हटले आहे. ते बरोबरही असेल पण हा औचित्याचा प्रश्न झाला.

काश्मीरसह सर्व प्रश्न सुटल्याशिवाय पाकिस्तानला ५५ कोटी रुपये द्यावयाचे नाहीत अशी करारात अट होती असे सरदार वल्लभभाई यांनी १२ जानेवारी १९४८ च्या निवेदनात म्हटलेले नाही. बैठकीत मी काय म्हणालो, माझे मत कसे मांडले यावर पटेल यांचा या निवेदनात भर आहे. पहिल्या काही चर्चांच्या वेळी पाकच्या प्रतिनिधींनी माझ्या म्हणण्याला विरोध केलेला नव्हता. फक्त २ डिसेंबर १९४७ रोजी पाक पंतप्रधानांनी माझ्या म्हणण्याला हरकत घेतली यावरच पटेल भर देतात. एखाद्याच्या म्हणण्याला हरकत घेतली नाही म्हणजे त्याचे मत हा निर्णय झाला असे होत नाही. सरदार पटेल यांनी १२ जानेवारीच्या निवेदनात असे म्हटले आहे, "३० डिसेंबर १९४७ रोजी पाक पंतप्रधानांना आम्ही तार पाठविली. त्यात आम्ही कराराला बांधलेलो आहोत; पण पाकिस्तानने काश्मीरबाबत आक्रमक भूमिका घेतलेली असल्यामुळे आम्ही आमच्या भूमिकेनुसार पाकला ५५ कोटी रुपये देण्याचे पुढे ढकलीत आहोत." असे म्हटले आहे. या तारेवरूनही हे स्पष्ट होते की, काश्मीरचा प्रश्न सुटल्यानंतर पाकला ५५ कोटी रुपये द्यावयाची करारात अट नव्हती. काश्मीरसह सर्व प्रश्न सुटल्याशिवाय पैसे देणारे नाही ही भारताची भूमिका होती. वल्लभभाई पटेल यांचे तसे मत होते. पार्टीशन कौन्सिलच्या इतिवृत्तान्तातही असे म्हटले आहे की, "पाकला जे वीस कोटी रुपये आधी दिले आहेत त्याशिवाय पंचावन्न कोटी रुपये पाकिस्तानला द्यावयाचे आहेत. ५५ कोटी रुपये दिल्यानंतर पाकला भारत कोणतेही देणे लागू होत नाही! एकत्रित भारताच्या गंगाजळीतून पाकला द्यावयाच्या पैशातून हे ५५ कोटी रुपये दिल्यानंतर भारत कोणतेही देणे लागत नाही."

यावरून पाकिस्तानला एकूण ७५ कोटी रुपये भारत देणे लागत होता. त्यापैकी २० कोटी रुपये आधीच दिलेले होते आणि राहिलेले ५५ कोटी रुपये द्यावयाचे हे भारताने मान्य केले होते. त्या संबंधीच्या करारात काश्मीरसह सर्व प्रश्न सुटल्यावर भारताने पैसे द्यावयाचे अशी अट नव्हती हे निश्चित होते. पार्टीशन कौन्सिलमध्ये सरदार पटेल यांनी काश्मीरसह सर्व प्रश्न सुटल्याशिवाय पैसे मिळणार नाहीत असे

जरूर सांगितले होते. पण ते सरदार पटेल यांचे मत होते. ती कराराची अट नव्हती हे सिद्ध होते.

गांधींनी यावर बरेच दिवस विचार केला आणि ६ जानेवारी १९४८ रोजी गव्हर्नर जनरल लॉर्ड माउंटबॅटन यांची भेट घेतली आणि पंचावन्न कोटी रुपयांच्या प्रकरणातील कायदेशीर बाबी जाणून घेतल्या. ही बाब समजून घेण्यासाठी ते नेहरू-पटेल यांच्याकडे गेले नाहीत. ''करारात ठरल्याप्रमाणे पाकिस्तानला भारताने पंचावन्न कोटी रुपये दिले नाहीत तर, 'करार न पाळणारे राष्ट्र' अशीच जगभर भारताची प्रतिमा होईल आणि त्यामुळे भारताशी अन्य राष्ट्रे व्यवहार करतानाही बिचकतील. ती भारतावर विश्वास ठेवणार नाहीत. म्हणजे जगात भारताच्या शब्दाला किंमत राहणार नाही. म्हणून हे पैसे रोखून धरणे किंवा परभारे खर्च करणे यामुळे भारताच्या नावाला काळिमा फासला जाईल, शिवाय कायदेशीरदृष्ट्याही ते योग्य ठरणार नाही.'' असे मत लॉर्ड माउंटबॅटन यांनी दिले. गांधी म्हणाले, त्यातील कायदेशीर बाबींचा विचार करण्याची मला गरज नाही. पण हे नैतिकदृष्ट्या तरी बरोबर आहे का? असा विचार करून गांधींनी पंचावन्न कोटी रुपये पाकिस्तानला द्यावेत ही भूमिका मांडली. पाकिस्तानला ५५ कोटी रुपये द्यावते या आग्रहासाठी किंवा मागणीसाठी महात्मा गांधींना १३ जानेवारी १९४८ रोजीचे बेमुदत उपोषण सुरू केलेले नव्हते! दिल्लीत शांतता प्रस्थापित व्हावी म्हणून गांधींनी हे उपोषण केलेले होते. गांधींचे हे उपोषण पंचावन्न कोटी रुपयांसाठी होते हा हिंदुत्ववाद्यांचा खोटा प्रचार आहे. त्याचा ऊहापोह केलेला आहे. केवळ एवढ्यापुरताच हा खोटा प्रचार नव्हता तर जीझिया कराराप्रमाणे हिंदूंवर पट्टी लादून ती रक्कम पाकिस्तानला भागवली जाणार आहे, असा प्रचार तावातावाने केला जात होता असे न. र. फाटक यांनी 'भारतीय राष्ट्रवादाचा विकास' या पुस्तकात नमूद केलेले आहे. म्हणजे, असलेल्या गंगाजळीतून पैसे देण्याचे प्रकरण असताना आणि ते कराराने मान्य केलेले असताना ते पैसे देऊ नयेत असे म्हणणे म्हणजे शब्दाला न जागण्याचा प्रकार होता. त्याचप्रमाणे लोकांकडून पट्टी घेऊन वसूल करून हे पैसे दिले जाणार आहेत, अशा प्रचाराने लोकांच्या मनात जहरच पसरले गेले. राजकारणात नैतिकता, साधनशुचिता यांना विशेष महत्त्व देणाऱ्या गांधींनी पाकिस्तानला पैसे द्यावेत असे म्हटले त्यामागची गांधींची भूमिका नेहरू-पटेल यांपैकी कोणीही जनतेपुढे स्पष्ट केली नाही. त्यामुळेही गांधींविषयही गैरसमज पसरत गेले. एकीकडे हिंदुत्ववाद्यांचा खोटा आणि जहरी प्रचार आणि आयुष्यभर गांधींना साथ देणाऱ्या या नेत्यांचे या संबंधातील मौन यामुळे गांधी हे रोषाचे लक्ष्य झाले. गांधींनी भारताच्या वाट्याला आलेल्या पैशातून पाकिस्तानला पैसे दिले पाहिजेत असे म्हटलेले नव्हते.

पाकिस्तानला जे पैसे द्यायचे ठरलेले आहेत तो त्यांचा वाटा पाकिस्तानला द्या, एवढेच गांधींचे म्हणणे होते. हे पैसे देण्याला विरोध म्हणजे नीतीने वागण्याला विरोध! पाकिस्तानला पंचावन्न कोटी रुपये देण्याला हिंदुत्ववाद्यांचा विरोध होता, पण या हिंदुत्ववाद्यांनी देशाचा एवढा मोठा भूप्रदेश तोडला जात होता तो रोखण्यासाठी कसल्याही प्रकारचे आंदोलनही केले नाही. पंचावन्न कोटी रुपयांचा आग्रह गांधींनी धरला असे सांगत त्यांचा खून करण्यात या हिंदुत्ववाद्यांना पुरुषार्थ वाटला. फाळणीच्या विरोधात आंदोलन करून पुरुषार्थ दाखवावा असे न वाटता हिंदुत्ववाद्यांनी पंचावन्न कोटींचे निमित्त करून एका नि:शस्त्र महात्म्याचा त्याच्या पायाला हात लावून नमस्कार करतो असे भासवून खून करावा यात ना शौर्य ना पुरुषार्थ! पाकिस्तानला पंचावन्न कोटी रुपये दिले पाहिजेत असे म्हणणारे गांधी एकटेच होते काय? लॉर्ड माउंटबॅटन, राजाजी आणि रिझर्व्ह बँकेचे तेव्हाचे गव्हर्नर चिंतामणराव देशमुख आदीही पाकिस्तानला पंचावन्न कोटी रुपये द्यावेत याच मताचे होते. मग गांधींच्या खुन्यांनी त्यांचे खून का बरे केले नाहीत? राजकारणात या लोकांचे महत्त्व कमीजास्त असले तरी ते गांधीच्या इतके प्रभावी नव्हते. म्हणून त्यांच्या हत्येचा प्रश्न निर्माण होत नव्हता, असेही म्हटले जाईल. असे म्हणणे म्हणजेच गांधींच्या खुनामागच्या वेगळ्याच राजकारणाची कबुली देणे होय. पंचावन्न कोटी रुपये दिले पाहिजेत असे म्हणणारे आणखीही होते, पण ते गांधींइतके प्रभावी नव्हते म्हणून त्यांच्या खुनाचा प्रश्न उद्‌भवला नाही. गांधी प्रभावी होते म्हणून त्यांचा खून केला याचा अर्थ हाच की, पंचावन्न कोटी रुपये पाकिस्तानला द्या असे म्हणणाऱ्यांवर त्यांचा रागच नव्हता. राग होता तो गांधींवर आणि गांधींच्या राजकारणामुळे हिंदुत्ववाद्यांचा विचार लोकांनी स्वीकारला नाही याच्या सुडातून गांधींचा खून केला गेला आहे. गांधींचा विचार, त्यांचे तत्त्वज्ञान आणि नेतृत्व हे हिंदुत्ववादाच्या प्रसाराआड आले म्हणून त्यांनी फाळणी व पंचावन्न कोटी रुपयांचे प्रकरण नसतानाही १९३४ सालापासून गांधींच्या खुनाचे वेळोवेळी प्रयत्न केले आहेत. हिंदुत्ववाद्यांनी ५५ कोटी रुपयांचे कुभांड रचले आहे. फाळणी व पंचावन्न कोटी रुपये यांसाठी गांधींचा खून केला या हिंदुत्ववाद्यांच्या दाव्यात थोडेही तथ्य असते तर स्वातंत्र्यपूर्व काळात १९३४ सालापासून गांधींच्या खुनाचे प्रयत्न करण्याचे कारणच नव्हते.

नियोजन मंडळाचे माजी सदस्य रा. कृ. पाटील यांनी ५५ कोटी रुपयांसंबंधात जानेवारी १९९४च्या 'आजचा सुधारक'मध्ये असे म्हटले आहे, 'तूर्त तरी पाकिस्तानला त्याचे देणे द्यावयाचे नाही हा भारत सरकारचा निर्णय चूक होता. कारण ते देणे पूर्वीच निर्माण झाले होते. ज्या अटींवर विभाजन झाले त्या अटींचा तो

(पाकला ५५ कोटी रुपये देणे) एक भाग होता. म्हणजे १५ ऑगस्ट १९४७ लाच ते रुपये द्यायला हवे होते. इतके दिवस ते का रोखले गेले हे मला सांगता येणार नाही. परंतु पाकिस्तानने मागणी केल्याबरोबर ते रुपये द्यायला हवे होते. पाकिस्तानने तशी मागणी केल्यावर 'सध्या आम्ही हे रुपये देत नाही, कारण तुमची आमची आता लढाई आहे' असे म्हणणे म्हणजे देणे नाकारल्यासारखे झाले असते. हे अनाठायी औदार्य नव्हते. ती कर्तव्यपूर्ती होती हे अगदी स्पष्ट आहे. चिंतामणराव देशमुख यांचेसुद्धा तसेच मत होते. 'आमच्यावर झाडण्यासाठी बुलेट्स खरेदी करण्याला त्याचा उपयोग होईल म्हणून हे देणे देऊ नये, हा विचार चूक होता. आम्ही कोण ठरविणार पाकिस्तानने या पैशाचा कसा उपयोग करावा ते? युद्धाच्या परिस्थितीत जुने देणे नाकारणे ही भूमिका बरोबर नव्हती.' देणे अगोदर निर्माण झाले. तेव्हा युद्ध नव्हते. ते पैसे मागितल्याबरोबर द्यावयास हवे होते. याशिवाय युद्ध पाकिस्तानने भारतावर लादले हे म्हणणे इतिहासाला धरून नाही. जेव्हा पाकिस्तानने काश्मीरवर चढाई केली तेव्हा काश्मीर स्वतंत्र राष्ट्र होते. भारताशी सामीलनामा तेव्हा झाला नव्हता. म्हणूनच तेव्हाचे गव्हर्नर जनरल लॉर्ड माउंटबॅटन यांनी काश्मीर नरेशांनी जेव्हा मदत मागितली तेव्हा सामीलनामा अगोदर करा, तरच मदत देऊ अशी अट घातली. रा. कृ. पाटील यांनी ५५ कोटी रुपये पाकला देणे कसे रास्त होते याचे चांगले विवेचन केलेले आहे. काश्मीरचा प्रश्न सोडविल्याशिवाय पाकला ५५ कोटी रुपये देणार नाही या सरदार पटेल यांचा विचार काहीसा कांगावखोरपणाचा वाटतो. काश्मीरचा प्रश्न पाकिस्तानने निर्माण करण्यापूर्वी राजा हरिसिंग यांनी निर्माण केला होता. फाळणी झाली तेव्हाच हरिसिंगांनी काश्मीरचे भारतात विलीनीकरण केले असते तर पाक घुसखोरांचा काश्मीरवर हल्ला हे भारतावर आक्रमण आहे असे म्हणता आले असते. पण राजा हरिसिंगांनी १५ ऑगस्ट ते २७ ऑक्टोबर १९४७ पर्यंत काश्मीर हे स्वतंत्र राष्ट्र निर्माण केले. त्यामुळे पाक घुसखोरांनी काश्मीर या राष्ट्रावर आक्रमण केले असा त्याचा अर्थ होतो. आणि काश्मीर या 'राष्ट्रावर' पाकने आक्रमण केले म्हणून भारताने पाकचे पैसे रोखून धरणे न्यायाचे नव्हते. भारताचा हा दुसऱ्या राष्ट्राशी झालेला पहिलावहिला करार होता. तो मोडला असता तर जगात भारताची इभ्रत गेली असती. भारताची इभ्रत जाऊ नये म्हणून गांधींनी पाकिस्तानला पंचावन्न कोटी रुपये द्यावेत असा आग्रह धरला होता. ज्यांचा याला विरोध होता त्यांना भारताच्या इभ्रतीची कसलीच पर्वा नव्हती, हाच त्याचा अर्थ होतो.

□□□

स्वातंत्र्यापूर्वी खुनाचे प्रयत्न

महात्मा गांधींची भाषणे, त्यांची निवेदने आणि जीनाबरोबर झालेल्या चर्चेचा तपशील गांधींनी राजाजींना सांगितला त्या आधारे महात्मा गांधींची फाळणीविषयी काय भूमिका होती, हे पाहिले. त्यावरून गांधी फाळणीच्या विरोधात किती होते हे समजून येईल. हंगामी सरकारमधील लीगच्या मंत्र्यांचा अनुभव आल्यानंतर पटेल यांनी प्रथम फाळणीला मंजुरी दिली आणि नेहरूंनी त्यानंतर फाळणीस संमती दिली हेही विस्ताराने पाहिले आणि काँग्रेस कार्यकारिणीत जेव्हा फाळणीला मान्यता देण्याचा प्रश्न आला त्यावेळी फाळणीसंबंधी तुम्ही मला काहीही कल्पना दिली नाही, पण काँग्रेसने शब्द दिला असेल तर माझा फाळणीला विरोध नाही असे सांगून गांधींनी आपल्या नैतिक राजकारणाचेच दर्शन घडविले. गांधींनी फाळणीला अनिच्छेने मान्यता दिली ही गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट आहे. गांधींमुळे फाळणी झाली हा हिंदुत्ववाद्यांचा दावा धादांत खोटा ठरतो. गांधीच्या मुस्लिमधार्जिण्या भूमिकेमुळे फाळणी झाली असे सांगून त्यांचा खून करण्यात आला. हे एवढ्याचसाठीच सांगितले जाते की प्रथम मुस्लिमद्वेषाचे विष भिनवायचे आणि ते भिनले की मग खुनाच्या आपल्या कारस्थानाला लोकांची सहानुभूती मिळवायची हा त्यांचा मुख्य हेतू आहे. त्यानंतर प्रश्न आला पंचावन्न कोटी रुपयांचा! पंचावन्न कोटी रुपये देण्याचे करार करून मान्य केले आहे त्यामुळे करार न पाळल्याने भारताची इभ्रतच जाणार आहे. ती जाऊ नये आणि भारताच्या नावाला कलंक लागू नये, याकरिता पंचावन्न कोटी रुपये द्यावे असे गांधींनी मत व्यक्त केले होते. त्यांच्या या भूमिकेलाही त्यांच्या नैतिक राजकारणाचाच आधार आहे. सरदार पटेल पाकिस्तानविरुद्धच्या रागातून आणि नाही म्हटले तरी मुस्लिम रागातून पैसे देऊ नयेत ही भूमिका घेत होते. सुडाची भूमिका गांधींच्या राजकीय नैतिकतेत बसत नाही. ज्यांना नैतिकतेच्या पायावरील राजकारण मान्य नाही त्यांचा गांधींच्या

भूमिकेला असणारा वैचारिक मतभेद समजता येईल. पण त्यासाठी गांधींच्या खुनाचे समर्थन केले जाणे हे सुसंस्कृत मनाला पटणारे नाही. चळवळीच्या माध्यमातून किंवा मतपरिवर्तनाच्या द्वारेही सरकारला निर्णय घ्यावयास लावणे वेगळे, गांधींचे मत बदलविण्याचा प्रयत्न करणे वेगळे आणि त्यांचा खून करणे निराळे. ज्या संघटनांच्या जवळ वैचारिक भूमिका नाही त्यांचा हिंसाचारी मार्गावरच विश्वास असतो. हिंसाचारातही फरक करावा लागेल. नक्षलवाद्यांचा हिंसाचार आणि राजकारणातील व्यक्तिगत हिंसाचार यांत काही फरक आहे की नाही? नक्षलावाद्यांचा हिंसाचारही गोरगरिबांचे प्रश्न सोडवू शकत नाही. नक्षलवाद्यांकडून जमीनदार, सावकारांची होणारी हिंसा आणि हिंदुत्ववाद्यांकडून होणारी व्यक्तिगत हिंसा यात फरक आहे. एखाद्याचे विचार पटले नाहीत म्हणून त्या माणसालाच नाहीसे करणे हा हिंदुत्ववाद्यांच्या हिंसेतील भाग आहे. आणि शोषण करणाऱ्यांना ठार मारून किंवा त्यांना दहशत बसवून त्यांना जमिनीवरील त्यांची मालकी सोडावयास भाग पाडणे आणि पिळणूक बंद करणे हा नक्षलवाद्यांच्या हिंसेतील फरक लक्षात घेतला पाहिजे. कोणत्याच हिंसेचे समर्थन होऊ शकत नाही. तरीही हिंसेहिंसेतील फरक लक्षात घेतला पाहिजे. गांधींनी केलेले १३ जानेवारी १९४८ चे उपोषण हे पंचावन्न कोटींसाठी नव्हते. तोही हिंदुत्ववाद्यांच्या खोट्या प्रचाराचा भाग होता, हे गांधींनी उपोषण सोडवण्यासाठी घातलेल्या अटी आणि त्या मान्य करण्यात आल्याची घोषणा यांच्या संदर्भात या अटींचा तपशील दिला आहे त्यावरून कळून येते. ही वस्तुस्थिती सर्वसामान्यांच्या पुढे सातत्याने मांडण्याचे काम होणे आवश्यक होते. पण ते न झाल्यामुळे लोकांच्या विस्मृतीचा व नव्या पिढीच्या अपुऱ्या माहितीचा फायदा हिंदुत्ववाद्यांनी उठवला. गांधींनी उपोषणाचा दबाव आणून पाकिस्तानला पंचावन्न कोटी रुपये देण्यास भाग पाडले अशी समजूत हिंदुत्ववाद्यांच्या प्रचाराने होत आहे. पण यांतील कोणताही प्रश्न निर्माण झालेला नव्हता, त्यावेळी गांधींच्या खुनाचे प्रयत्न का झाले हा प्रश्न राहतोच.

महात्मा गांधी १९३४ साली अस्पृश्यताविरोधी मोहिमेसाठी देशभर दौरा करत असताना १९ जून १९३४ रोजी पुण्यात आले असता २५ जून १९३४ रोजी महात्मा गांधींवर बॉंब फेकण्यात आला. हा बॉंब हिंदुत्ववाद्यांनीच फेकलेला होता. १९३४ साली तर देशाची फाळणी आणि स्वाभाविकपणेच पाकिस्तानला पंचावन्न कोटी रुपये देण्याचा प्रश्न उपस्थित झालेला नव्हता. या बॉंबस्फोटासंबंधी प्यारेलाल यांनी 'लास्ट फेज,' खंड दोनमध्ये जी माहिती दिली आहे, त्यापेक्षा तपशीलवार माहिती डी. जी. तेंडुलकर यांच्या 'महात्मा' खंड तीनमध्ये दिलेली आहे. २५ जून १९३४ रोजी नगरपालिका सभागृहात भाषण करण्यासाठी गांधी निघालेले

असताना त्यांच्यावर बॉंब फेकण्यात आला. या बॉंबहल्ल्यात नगरपालिकेचे मुख्य अधिकारी, दोन पोलीस यांच्यासह सातजण गंभीर जखमी झाले. महात्मा गांधी मागच्या मोटारीत होते म्हणूनच ते वाचले. तेंडुलकर यांच्या म्हणण्यानुसार महात्मा गांधी या बॉंबहल्ल्यातून बालंबाल वाचले. प्यारेलाल म्हणतात, "यावेळची त्यांची कृती अतिशय योजनाबद्ध होती." प्यारेलाल यांच्या या म्हणण्याचा अर्थ २५ जून १९३४ पूर्वीही गांधीहत्येचे काही प्रयत्न झाले आणि त्या प्रयत्नांत योजनाबद्धतेचा अभाव असावा! त्यामुळे प्यारेलाल यांनी 'यावेळची कृती अतिशय योजनाबद्ध होती,' असे म्हटले असावे हा निष्कर्ष निघतो. यानंतरच्या एका प्रयत्नाच्या घटनेनंतर स्वत: गांधींनी मी परमेश्वराच्या कृपेने सात वेळा मृत्यूच्या जबड्यातून सहिसलामत सुटलो आहे, असे म्हटलेले होते. हे पाहता प्यारेलाल यांनी यावेळची त्यांची कृती अतिशय योजनाबद्ध होती हा जो शब्दप्रयोग केला आहे, त्याला एक वेगळा अर्थ प्राप्त होतो. प्यारेलाल पुढे म्हणतात की, "या लोकांच्या बुटामध्ये नेहरू व इतर कॉंग्रेसच्या काही नेत्यांचेही फोटो लपविलेले होते. गांधींचे फोटो देऊन त्यांना पिस्तुलाने अचूक गोळ्या मारण्याचे प्रशिक्षण दिले जात होते. याच गटाने गांधींच्या शांती प्रयत्नांच्या वेळी (दिल्लीतील उपोषणानंतर) गांधींचा खून केला." प्यारेलाल यांनी ही जी घटना दिली आहे त्यामध्ये नथुराम गोडसेचे नाव नाही हे खरे. पण, बॉंब फेकणाऱ्या गटानेच गांधीजींचा पुढे खून केला असे त्यांनी म्हटलेले आहे. म्हणजेच १९३४ साली गांधींवर बॉंबहल्ला करणाऱ्या गटामध्ये नथुराम गोडसे, नारायण आपटे गटाचा हात होता हे वेगळे सांगण्याची गरज नाही. त्याचप्रमाणे बॉंबहल्ला करणाऱ्यांच्या बुटात गांधींशिवाय नेहरू आदी कॉंग्रेस नेत्यांचे फोटो होते असा उल्लेख आहे. त्यामुळे या हल्लेखोरांना पोलिसांनी पकडलेले असले पाहिजे. म्हणूनच त्यांच्या बुटात काय लपविलेले आहे, हे कळून आले. १९३४ च्या बॉंबहल्ल्यात, प्रत्यक्ष खून करणारेच लोक निघाले यावरून फाळणी आणि पंचावन्न कोटी रुपये याकरिता खून झालेला नाही हे माझे म्हणणे भर दुपारच्या बारा वाजताच्या सूर्य प्रकाशाइतके स्पष्ट होते. या बॉंबहल्ल्यानंतर गांधींनी केलेल्या भाषणात ते म्हणतात, "हरिजन कार्याकरिता आलो असताना ही घटना घडावी हे दुर्दैव आहे. हुतात्मा बनण्याची माझी इच्छा नाही, पण तशी वेळ आलीच तर त्यालाही माझी तयारी आहे. माझी हत्या करणे सोपी गोष्ट आहे. पण माझा जीव घेण्याच्या प्रयत्नांत निष्पाप लोकांना का मारता? माझ्या गाडीत माझी पत्नी आणि मला मुलीसमान असलेल्या तीन मुली होत्या. त्यांनी तुमचे काय केले आहे?" गांधींना ठार मारण्यासाठीच हा प्रयत्न होता. गांधींना मारण्याकरिता २० जानेवारी १९४८ रोजी पहिलाच बॉंबस्फोटाचा प्रयत्न झाला असे लोकांना वाटते ते बरोबर

नाही. महात्मा गांधींवर पुण्यात बॉंब टाकण्यात आला त्यावेळी तेथे ल. ब. भोपटकर होते. स्फोटात भोपटकर वाचले म्हणून त्यांचे अभिनंदन करणारी सभा पुण्यातील महाराष्ट्र मंडळात तात्यासाहेब केळकर यांच्या अध्यक्षतेखाली झाली. गांधींना ठार मारण्याकरिताच २५ जून १९३४ चा बॉंबहल्ला होता असे वृत्तान्त त्यावेळच्या बहुतेक वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झाले होते. पण या सभेत अभिनंदन केले ते भोपटकर यांचे! "बॉंब प्रसंगाचे जे अहवाल वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झाले ते खरे नाहीत", असे भोपटकर यांनी या सभेत बोलताना सांगितले (दैनिक सकाळ, २ जुलै १९३४). भोपटकर यांनी स्वत:च आपले महत्त्व वाढवून घेण्याचा प्रयत्न या स्फोटाच्या वेळी केलेला आहे. मला मारण्याकरिता हा बॉंबस्फोट केला. तसे नसते तर मी कसा जखमी झालो असतो असा भोपटकर यांनी युक्तिवाद केला आहे. महात्मा गांधींवर बॉंब टाकण्याचा हेतू नव्हता असा दावा भोपटकर यांनी केला आहे. त्यासंबंधात त्यांनी दिलेले कारण हास्यास्पदच आहे. भोपटकर म्हणतात की, बॉंब टाकण्याचा उद्देश महात्माजींवर तो पडावा असा असता तर महात्माजी साडेसात वाजता आल्यावर पुन्हा बॉंब पडला असता. (दैनिक सकाळ, ११ जुलै १९३४). भोपटकर यांचे म्हणणे असे होते की गांधी येण्यापूर्वी बॉंबहल्ला झाला त्यावेळी मी तेथे होतो त्यामुळे तो माझ्यावरील हल्ला होता. गांधींवर बॉंब टाकण्याचा उद्देश असता तर पहिला बॉंब टाकल्यावर आणि त्यात गांधी नाहीत हे कळल्यावर बॉंब टाकणाऱ्यांनी गांधी आल्यावर दुसरा बॉंब टाकला असता. तसा दुसरा बॉंब टाकला नाही म्हणून गांधींवरील तो बॉंबहल्ला नव्हता असे हे भोपटकरांचे तर्कट आहे. त्यावेळच्या वृत्तपत्रांतील बातम्या अशा आहेत की नगरपालिकेच्या ठिकाणी महात्मा गांधी आले त्यावेळी पहिल्या गाडीवर बॉंब टाकण्यात आला आणि त्यातील सातजण जखमी झाले. महात्मा गांधी त्या मोटारीच्या मागे असलेल्या मोटारीत होते. भोपटकरांनी या बातम्या खऱ्या नाहीत व आपलेच तर्कट खरे आहे असे सांगितले आहे. 'गांधींवर बॉंब टाकण्याचा उद्देश असता तर गांधी आल्यावर पुन्हा बॉंब पडला असता' हे भोपटकर यांचे म्हणणे पटणारे नाही. बॉंब फेकणारा माणूस बॉंब फेकून पळून जाईल की नेमका कोणावर बॉंब पडला आहे हे पाहण्याकरिता तेथेच थांबवून राहील आणि नेम चुकला तर पुन्हा बॉंब फेकण्याची संधी त्याचवेळी साधील? गांधी समजून त्याने पहिल्या मोटारीवर बॉंब फेकला आणि तो पळून गेला. पण गांधींवर दुसरा बॉंब त्यावेळी फेकला नाही म्हणून गांधींवर बॉंब फेकण्याचा उद्देश नव्हता हे भोपटकर यांचे म्हणणे कोणत्याही सुमार बुद्धीच्या माणसाला पटणारे नाही. हा बॉंब फेकण्यात आला त्यावेळी ना. गोखले यांनी स्थापन केलेल्या सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटीच्या वतीने 'ज्ञानप्रकाश' काढले जात होते. त्या 'ज्ञानप्रकाश'चे

तेव्हाचे वार्ताहर विठ्ठल श्रीधर जोगळेकर घटनास्थळी होते. जोगळेकर यांनी मला जी माहिती सांगितली ती अशी : ''गांधी येत असताना त्यांच्यावर बॉंब फेकला. पण गांधी मागच्या मोटारीत होते. बॉब फेकणारा माणूस पळून गेला. त्यामुळे तो कोण होता हे समजले नाही. बॉंब फेकला तेव्हा तेथे भोपटकर होते. त्यांना थोडी जखम झाली. भोपटकर यांनी आपणास थोडी जखम झाली असे सांगितले.'' पण भोपटकर यांनी आपण बेशुद्ध झालो असे म्हटल्याचा उल्लेख त्यांच्या अभिनंदाच्या सभेत केला असल्याचे २ जुलै १९३४ च्या 'सकाळ' च्या वृत्तान्तात म्हटले आहे. पण जोगळेकर म्हणाले, ''भोपटकर तेथे होते आणि ते थोडे जखमी झाले. त्यांनी मला कोठे जखम झाली ते दाखवले.'' भोपटकर बेशुद्ध पडले असते तर जोगळेकर यांना ते कोठे लागले हे दाखवू शकले नसते! महात्मा गांधींना पुणे नगरपालिकेच्या वतीने मानपत्र देण्याचा कार्यक्रम होता. तो भोपटकर यांचा कार्यक्रम नव्हता आणि गांधींच्या मानपत्राच्या समारंभाला भोपटकर येणार आहेत याची कल्पना बॉंब फेकणाऱ्याला असण्याचे कारण नाही. भोपटकर यांच्या म्हणण्याप्रमाणे तो त्यांच्यावरील बॉंबहल्ला होता हे बुद्धीला दोन कारणांमुळे पटत नाही. एक भोपटकर हे एवढे मोठे नव्हते की त्यांची कोणाला हत्या करावी असे वाटावे! दुसरे, भोपटकर तेथे येणार आहेत याची कल्पना हल्लेखोरास नव्हती मग तो बॉंबहल्ला भोपटकरांवरील होता हे कसे? मात्र गांधींना मानपत्र देण्याचा तो कार्यक्रम होता त्यामुळे महात्मा गांधी तेथे येणार याची खात्री होती. त्यामुळे गांधींकरिताच बॉंब फेकला होता याविषयी शंका घेण्याचे काहीच कारण नाही. भोपटकर यांनी आपल्यावरील तो हल्ला होता असे सांगून चौकशीची चक्रे उलटी फिरली तर पाहावे म्हणूनही हे विधान केलेले असावे! जोगळेकर हे 'ज्ञानप्रकाशा'चे वार्ताहर होते. आपण हिंदूमहासभेत होतो असे जोगळेकर यांनी मला सांगितले. 'ज्ञानप्रकाशा'नंतर जोगळेकर नथुराम गोडसेच्या 'अग्रणी' या दैनिकात काम करीत. त्यामुळे भोपटकर यांनी आपल्याला कोठे लागले हे दाखवले असे जोगळेकर म्हणतात ते खोटे असण्याचेही कारण नाही. भोपटकरांनी मात्र बॉंबहल्ल्याने आपण बेशुद्ध पडलो होतो असे त्यांच्या अभिनंदनाच्या सभेत सांगितले.

महात्मा गांधीवरील बॉंबहल्ला प्रकरणात दैनिक 'सकाळ'ने सनातन्यांचा कैवार घेतला होता हे त्याच्या अग्रलेखावरून कळून येते. 'बॉंबने भडकलेले टीकाकार' या शीर्षकाच्या २ जुलै १९३४ च्या अग्रलेखात 'सकाळ'कार म्हणतात, ''मानपत्र देण्याचे प्रसंगी पुण्यात बॉंबचा स्फोट झाल्यापासून त्यावर टीका करणारे व त्याचा निषेध करणारे टीकाकार भडकून गेले आहेत. ते ब्राह्मणांवर आग पाखडीत आहेत. त्यांनी एकेकाळी साताऱ्यात ब्राह्मणवर्गाचा सत्यशोधक म्हणवणाऱ्यांनी किती

संघटित धुमाकूळ केला हे आठवावे व आपण त्याचा कधी निषेध केला आहे काय याचा विचार करावा. सातान्यात एकेकाळी ब्राह्मणांविरुद्ध झालेल्या कारवायांचा निषेध केला नाही म्हणून 'सकाळ'कारांनी या अग्रलेखात छाती बडवून घेतली आहे. पण गांधींवरील हल्ला ही ताजी घटना होती. त्यामुळे त्या हल्ल्याचा निषेध व्हावा हे स्वाभाविक होते. तेव्हा एकेकाळी झालेल्या हल्ल्याचा निषेध झाला नाही म्हणून 'सकाळ'कारांनी तक्रार करावी, हे वेळ-काळ-प्रसंगाशी विसंगतच नाही काय? याच अग्रलेखात 'सकाळ'कारांनी असेही म्हटले आहे, "आज आपल्या मनासारख्या चळवळी करणाऱ्या सनातन्यांस त्यांचे प्रामाणिक मत व नि:स्वार्थी श्रम जर कोणी बाँबचा बादरायण संबंध लावून दडपू पाहील तर ते शक्य नाही. त्यातून ब्राह्मणांसारख्या एखाद्या विशिष्ट वर्गाचा सूड घेण्याची संधी साधू पाहणाऱ्या स्वार्थसाधू लोकांचे अत्याचार सहन करणार नाही हे त्यांनी पक्के लक्षात ठेवावे." वास्तविक पाहता गांधींवर बाँब टाकणाऱ्याचा निषेध करण्यात येत असता 'सकाळ'कारांनी सनातन्यांचा कैवार घेऊन या प्रकारे दमबाजी का करावी हे समजत नाही. गांधींसारख्या नेत्याची कोणी हिंदू हत्या करू शकणार नाही असे 'सकाळ'कारांनी अग्रलेखात ठासून म्हटले होते. पण या सनातनी प्रवृत्तीच्या गटाने आणि तेही पुण्यातील गटाने महात्मा गांधींचा खून केला. यावरून 'सकाळ'कारांची तेव्हाची भूमिका कोणाला पाठीशी घालणारी होती हेही लक्षात येते. 'सकाळ'कारांनी सनातन्यांच्या बाजूने अग्रलेख लिहिला याचा निषेध करणारी पत्रे 'सकाळ'मध्ये प्रकाशित झाली आहेत. ७ जुलै १९३४ रोजी शंकर राघोजी मोहिते यांचेही 'सकाळ'कारांवर टीका करणारे पत्र प्रसिद्ध झाले आहे. हे 'संपादकीय नसून त्याचा वदविता आणि कोणीतरी दुसराच असावा' असे मोहिते यांनी म्हटले आहे. महात्मा गांधींवरील १९३४ च्या बाँबहल्ल्याचा निषेध सर्वच ठिकाणी केला गेला होता. कोल्हापुरातही बाँबहल्ल्याचा निषेध करणारी सभा १५ जुलै १९३४ रोजी झाली होती. 'महात्माजी पुण्यातील बाँबस्फोटात वाचल्याबद्दल श्री. शिवलिंग हवेरी यास त्यांचे विनंतीवरून डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटनी परवानगी दिली.' अशी १४ जुलैच्या 'सकाळ'मध्ये कोल्हापुरातील बातमी प्रसिद्ध झाली होती. "शेठ जमनालाल बजाज यांच्या सूचनेनुसार सर्व देशभर पुणे येथील अत्याचारातून ता. २५ जून रोजी महात्मा गांधी जिवंत निभावले याबद्दल त्यांचे अभिनंदन व ईश्वराची प्रार्थना काल (१५जुलै) करण्यात आली" असे सकाळच्या १६ जुलै १९३४ च्या अग्रलेखात म्हटले आहे. पण 'सकाळ'कारांनी पुण्यातील बाँबहल्ला प्रकरणी सनातन्यांची तळी उचलून धरली होती. १६ जुलै १९३४ च्या 'सकाळ'च्याच अग्रलेखात कराची येथे गांधींना मारण्यास निघालेल्या सनातन्याला पोलिसांनी पकडल्याच्या टाइम्स ऑफ

इंडियामधील बातमीचा उल्लेख आहे. ''कराचीला महात्मा गांधींच्या जीवास धोका होण्यासारखी परिस्थिती होती. एक परशू घेतलेला सनातनी गांधींना भेटण्यास जात होता. पण त्याला पोलिसांनी वेळीच अडवून परशू काढून घेतला.'' असा 'सकाळ'कारांनी १६ जुलै १९३४ च्या टाइम्समधील बातमीचा उल्लेख केलेला आहे. सनातन्यांचा केवळ महात्मा गांधींवरच राग नव्हता तर गांधींच्या स्वयंसेवकांवरही राग होता. स्वयंसेवकांनाही सनातनी मारहाण करीत होते. १९ जुलै १९३४ च्या 'सकाळ'मध्ये कानपूरची बातमी प्रकाशित झालेली आहे. त्यात ''महात्मा गांधींचा सत्कार करून येत असताना सनातन्यांनी त्यांच्यावर हल्ला करून मारहाण केली.'' असे म्हटलेले आहे.

सनातन्यांच्या बातम्या 'सकाळ' तपशिलाने देत होता. त्यावरून सनातन्यांच्या मनात महात्मा गांधींना मारण्याचे विचार कसे होते आणि गांधींना मारण्याचे त्यांचे प्रयत्नही होत होते, पण ते यशस्वी होत नव्हते याची माहिती मिळते. 'सकाळ'च्या २० जुलै १९३४ च्या अंकात प्रसिद्ध झालेली ही बातमी पाहण्यासारखी आहे.

''काशी ता. १५ : येथील गांधी बहिष्कार समितीचे अध्यक्ष श्री. कमलनयनाचार्य यांनी नुकतीच अशी घोषणा केली आहे की काशीत गांधींजींवर असा प्रचंड बहिष्कार घातला पाहिजे की त्यामुळे फक्त हिंदुस्थानातच नव्हे तर इंग्लंडमधील मोठमोठ्या राजकारणपटूंच्या छातीत धडकीच भरली पाहिजे.''

''निरनिराळ्या बुलेटिन्सद्वारे महात्मा गांधींची चळवळ ही आपल्या सनातन धर्मावरील एक प्राणांतिक संकट असून ते दूर करण्याचा प्रत्येक सनातन्याने कसून प्रयत्न केला पाहिजे असा प्रचार चालू आहे.'' बातमीमध्ये गांधींवर बहिष्कार घालण्याची भाषा आहे. पण त्याच्याच पुढे 'इंग्लंडमधील मोठमोठ्या राजकारणपटूंच्या छातीत धडकीच भरली पाहिजे' असे काहीतरी करण्याचे सुचविण्यात आलेले आहे. केवळ बहिष्काराने या प्रकारची धडकी भरणार नव्हती हे उघडच आहे. म्हणजे त्यांच्या मनात धडकी भरविण्याचा दुसरा कोणतातरी मार्ग होता हे सांगण्याची आवश्यकताच राहत नाही. 'यम व तुरुंग यांचे आमंत्रण', 'महात्माजींचे उद्गार', 'लाहोरात महात्मा गांधींचे मनगट मुरगळले', 'हिंदू युवकाचा अविचार', 'महात्माजींचा हात काही केल्या सोडीना' अशा शीर्षकाखाली लाहोरची बातमी 'सकाळ'च्या २३ जुलै १९३४ च्या अंकात प्रसिद्ध झाली आहे. गांधींच्या स्वागताला किती प्रचंड गर्दी झाली होती याच्या वर्णनासह प्रसिद्ध झालेल्या या बातमीत म्हटले आहे,''मोटार रस्त्याने चालू लागली तोच हिंदू युवक मोटारीच्या पायरीवर चढले. त्यातल्या एकाने महात्माजींचा हात धरून एक कागद त्यांच्या हातात दिला आणि म्हणाला हा कागद आत्ताच वाचा.' गांधी त्याला म्हणाले 'तू

माझा हात सोड. मी हा कागद जरूर वाचीन असे मी तुला वचन देतो' तरीही युवकाने धरलेला हात सोडला नाही. तेवढ्यात मागून आणखी जोराची रेटारेटी सुरू झाली. त्यात गांधींचे मनगट मुरगळले. गांधी पुन्हा म्हणाले, 'हात सोड, माझा हात दुखत आहे. हात सोडत नसलास तर मी खाली उतरतो.'' यावर युवकाने हात सोडला नाही तेव्हा दुसऱ्या लोकांनी मुद्दाम त्या युवकाचा हात बाजूला सारला.'' ('सकाळ', २३ जुलै १९३४).

'सकाळ'च्या अग्रलेखावरून 'सकाळ' हा सनातन्यांचा सहानुभूतीदार होता याची कल्पना येऊ शकते. त्यामुळेच महात्मा गांधींसंबंधात 'सकाळ'ने छापलेल्याच बातम्यांचा आधार घेतला आहे आणि या बातम्या 'सकाळ'च्या भूमिकेमुळे सौम्य स्वरूपात छापलेल्या असणार असे अनुमान काढले तर ते चुकीचे ठरू नये. असे असतानाही सनातन्यांची म्हणजेच हिंदुत्ववाद्यांची भूमिका गांधींबाबत किती आक्रमक होती हे कळून येते. 'इंग्लंडमधील मोठमोठ्या राजकारणपटूंच्या छातीत धडकीच भरली पाहिजे' असे काही करण्याची योजना हिंदुत्ववाद्यांच्या डोक्यांत घोळत होती हे काशीच्या बातमीवरून स्पष्ट होते. कराचीमध्ये गांधींना मारण्याकरिता सनातनी निघाला होता या टाइम्समधील बातमीचा उल्लेख 'सकाळ'कारांनी वेगळ्या संदर्भात केलेला असला तरी त्या सनातन्याला पोलिसांनी पकडले होते ही घटना बरेच काही सांगून जाते. ''महात्मा गांधींची चळवळ ही आपल्या सनातन धर्मावरील संकट असून ते संकट दूर करण्याचा प्रयत्न प्रत्येकाने केला पाहिजे,'' असे काशीच्या बातमीत म्हटले आहे. यावरून हिंदुत्ववाद्यांचा गांधींच्या व्यापक धोरणाला विरोध होता. गांधींचे विचार आणि गांधींची चळवळ ही आपल्या मार्गातील अडचण आहे ही खूणगाठ हिंदुत्ववाद्यांनी बांधलेली होती आणि गांधींच्या रूपाने धर्मावर आलेले संकट दूर करण्याच्या हेतूनेच महात्मा गांधींचा ३० जानेवारी १९४८ रोजी खून करण्यात आला आणि १९३४ पासून हिंदुत्ववाद्यांचे तेच प्रयत्न होते. या प्रयत्नांतूनच २५ जून १९३४ रोजी गांधींवर बॉंब फेकण्यात आला होता. याचे सत्कृतदर्शनी पुरावेच या उल्लेख केलेल्या बातम्यांतून उभे राहतात. फाळणी व पंचावन्न कोटी रुपयांकरिता महात्मा गांधींचा खून करण्यात आलेला नाही, हे सिद्ध होण्यास आणखी कोणते पुरावे पाहिजेत? गांधीजी आणि त्यांच्या विचारांना पुण्यात सर्वात अधिक विरोध होता. लोकमान्य टिळकांनी आपल्या समर्थ नेतृत्वाने भारताचे नेतृत्व आपल्याकडे खेचून घेतले होते. त्यांच्या निधनानंतर पुण्याला भीतीने ग्रासले होते म्हणून तर पुण्यातून गांधी व त्यांच्या विचारांना विरोध केला जात नसेल? पुणे नगरपालिकेने महात्मा गांधींना २५ जून १९३४ रोजी मानपत्र देण्याचे ठरविले. पण त्यांच्यावर बॉंब फेकून भडक विचाराच्या हिंदुत्ववादी लोकांनी त्यांचे या प्रकारे

'स्वागत' करण्याचा उलटा प्रयत्न केला. भारताच्या व जगाच्या सुदैवाने गांधी या हल्ल्यातून वाचले असे श्रीपाद जोशी यांनी 'गांधीजी : एक झलक' या हिंदी पुस्तकात म्हटले आहे. बॉबस्फोट झाला त्यावेळी श्रीपाद जोशी तेथे होते. या हल्ल्यासंबंधात आचार्य शं. द. जावडेकर यांनी 'जीवन रहस्य' या पुस्तकात असे म्हटले आहे की, ''गांधीजी मानपत्राचा स्वीकार करण्यासाठी निघाले असता सनातनी म्हणविणाराने गांधींच्या हरिजन उद्धाराच्या कार्यामुळे संताप झाल्याने हा बॉंब फेकला. पण गांधी त्यातून वाचले. सनातनी हिंदू म्हणून घेणाऱ्या लोकांना गांधींना मारले तरच हिंदू धर्म सुरक्षित राहील असे वाटत होते.'' फाळणी व ५५ कोटी रुपयांकरिता महात्मा गांधींचा खून झालेला नाही तर हिंदुत्ववादी विचारसरणी लोकांत गांधी विचारांमुळे रुजत नव्हती म्हणून त्यांची हत्या करण्यात आली. मात्र गांधींची हत्या करणाऱ्यांना सहानुभूती मिळावी याकरिता फाळणी व ५५ कोटी रुपयांसाठी खून केला असा प्रचार केला जात आहे.

२० जानेवारी १९४८च्या स्फोटापूर्वी गांधींना मारण्याचे चार प्रयत्न झाले आहेत आणि गांधी म्हणतात, मी सात वेळा मृत्यूच्या जबड्यातून परत आलो आहे. पुण्यातील बॉबहल्ल्यात गांधींची मोटार समजून पहिल्या मोटारीवर बॉंब फेकण्यात आला. पण नेमके गांधी पाठीमागच्या मोटारीत बसले होते. यावरून गांधींना मारण्याचा विचार १९४७ नंतर झालेला नव्हता. त्याच्या १३ वर्षे आधी गांधींना मारण्याचा विचार व कट हिंदुत्ववाद्यांनी केलेला होता.

पुण्यात जून १९३४ साली गांधींना ठार मारण्यासाठी त्यांच्यावर बॉंब फेकण्यात आला होता. त्यानंतर दहा वर्षांनी म्हणजे १९४४ साली सुरा घेऊन गांधींच्या अंगावर जाणाऱ्या नथुराम गोडसेला पाचगणी येथे पकडले, असे पुण्यातील सुरती लॉजचे मालक मणिशंकर पुरोहित यांनी न्यायमूर्ती कपूर आयोगापुढे सांगितले. नथुराम गोडसेच्या हातातून मी सुरा काढून घेतला असे महाबळेश्वरचे कॉंग्रेसचे माजी आमदार व सातारा जिल्हा मध्यवर्ती बँकेचे विद्यमान (१९९७ मधील) अध्यक्ष भि. दा. भिलारे गुरुजींनीही म्हटले आहे. (अनुभव मासिक, पुणे, ऑक्टोबर १९९७). न्या. कपूर आयोगाने ही घटना घडलेली नाही, असे पोलीस डायरीचा आधार घेऊन म्हटले आहे. पण दुसऱ्या काही घटनांच्या संदर्भात ही पोलीस डायरी कशी विश्वसनीय नाही याचे विवेचन पुढे येईल. आयोगाने पुरोहित यांची हकिगत खरी नाही हे ठरविण्यासाठी असे म्हटले आहे की, डॉ. सुशीला नायर महात्मा गांधींबरोबर होत्या. त्यामुळे ही घटना घडली असती तर डॉ. सुशीला नायर यांना तिची माहिती झाली असती. ज्याअर्थी मला हे काही आठवत नाही असे नायर म्हणतात त्याअर्थी ही घटना घडलेली नसावी, असाही युक्तिवाद अहवालात आहे.

पण सेवाग्राम येथे नथुराम गोडसेला त्याच्याजवळील सुऱ्यासहित आश्रमातील लोकांनी पकडले आणि गांधींच्या जीवाचे वाईट करावे यासाठी त्याने सुरा बाळगला होता असे डॉ. सुशीला नायर यांनी आयोगाला सांगितले तेव्हा मात्र आयोगाने डॉ. नायर यांचे म्हणणे मान्य केले नाही. या घटनेचा तपशील पुढे विस्ताराने देत आहे. आता त्याचा एवढ्यासाठीच उल्लेख केला की, पाचगणीला सुशीला नायर दुजोरा देत नाहीत म्हणून पाचगणीची घटना घडलेली नाही, असे म्हणावयाचे आणि सेवाग्रामची घटना डॉ. सुशीला नायर सांगत असतानाही ती खरी मानायची नाही आणि सेवाग्रामला गांधींच्या मोटारीचा टायर पंक्चर करण्यासाठी तो सुरा बाळगला होता, असे आयोगाने म्हटले आहे हे हास्यास्पद आहे.

महात्मा गांधींचा खून झाला तेव्हा मी सात-आठ वर्षांचा असेन. कोल्हापूरसारख्या एका बाजूच्या शहरात त्यावेळी गांधींचा खून होणार होता, हे आधीच माहिती होते, अशी चर्चा लोक करताना आम्हाला ऐकावयास मिळायचे. आम्हा लहान मुलांनासुद्धा त्यावेळी ही चर्चा ऐकावयास मिळत होती, यावरून ती किती जाहीरपणे चालली होती याची कल्पना येईल. गांधींचा खून होणार हे माहिती होऊनही त्यांचे प्राण का वाचवले गेले नाहीत, असा प्रश्न त्यावेळी पडावयाचा. पण त्याचे उत्तर मात्र मिळत नव्हते. त्यानंतर दहा-बारा वर्षं हा विषय माझ्या डोक्यातून निघून गेला. पुढे पत्रकार झालो आणि मुंबईत शिवाजी पार्कनजीक चुलत मेव्हणे गंगाधरराव देशपांडे यांच्याकडे राहू लागलो. तेथे एक काँग्रेस कार्यकर्ता यायचा. त्याच्याशी मैत्री झाली. त्याच्याबरोबर मुंबईच्या शिवाजी पार्कवर फिरावयास गेलो की तो एका छोट्या बंगल्याकडे बोट दाखवून तेथे प्रोफेसर जैन राहतात. त्यांना गांधींचा खून होणार होता हे आधी समजले होते, असे सांगायचा. पण प्रोफेसर जैन यांना ही माहिती कशी मिळाली हे हा कार्यकर्ता सांगू शकला नाही. तेव्हा पुन्हा गांधींच्या खुनाचा विषय माझ्या मनात सुरू झाला. जैन यांच्याकडे जाऊन त्यांच्याकडून हे समजून घेतले पाहिजे असे वाटू लागायचे. पुढे संयुक्त महाराष्ट्राच्या राजकारणाने गांधी हत्येचा विषय डोक्यातून निघून गेला आणि १९६६-६७ ला गांधीहत्येच्या कटाची चौकशी करण्यासाठी न्यायमूर्ती जे. एल. कपूर यांचा आयोग नेमण्यात आला. या आयोगाच्या कामकाजाचा वृत्तान्त घेण्याकरिता मी प्रत्यक्ष हजर राहू लागलो. हा आयोग नेमण्यापूर्वी गांधी खून कटाची चौकशी करण्यासाठी कायदेतज्ज्ञ जी. एस. पाठक यांच्या अध्यक्षतेखाली केंद्र सरकारने २२ मार्च १९६५ रोजी समिती नेमली होती. त्याच महिन्यात पाठक यांना केंद्रीय मंत्रिमंडळात घेतले गेले. पाठक पुढे उपराष्ट्रपती झाले. यामुळे न्या. जे. एल. कपूर यांचा २१ नोव्हेंबर १९६६ रोजी एक सदस्यीय आयोग आला. आयोगाचा वृत्तान्त घेणारा मी एकटाच पत्रकार होतो.

साक्षीकरिता जयप्रकाश नारायण, मोरारजी देसाई, प्रोफेसर जे. सी. जैन, पोलीस उपायुक्त जे. डी. नगरवाला, अन्य वरिष्ठ अधिकारी आणि नेते यांच्या साक्षी झाल्या. त्या प्रत्यक्ष ऐकल्या. गोपाळ गोडसेची साक्ष मात्र इन-कॅमेरा झाली. त्यावेळी ती ऐकायला मिळाली नाही. आयोगापुढे आलेले पुरावे, कागदपत्र प्रत्यक्ष पाहावयास मिळाले आणि मग वयाच्या सातव्या-आठव्या वर्षी पडलेले प्रश्नचिन्ह हे प्रश्नचिन्ह राहिले नाही.

महात्मा गांधींची मे १९४४ मध्ये तुरुंगातून सुटका झाली. पण ते मलेरियाने आजारी पडले. डॉक्टरांच्या सल्लानुसार जुलै १९४४ मध्ये गांधी विश्रांतीसाठी पाचगणीला आले. त्यावेळी पुण्याहून खास बस करून १८-२० जणांचा एक गट पाचगणीला आला आणि या गटाने दिवसभर गांधींविरोधी घोषणा दिल्या. ही गोष्ट गांधींच्या कानावर गेली. तेव्हां नथुराम गोडसेचे म्हणणे ऐकून घेण्याकरिता गांधींनी त्याला बोलावले. पण गोड़सेने गांधींना भेटण्याचे नाकारले. संध्याकाळी गांधींची प्रार्थना सुरू झाली. नेहरू शर्ट, पायजमा व जॅकेट घातलेला एक तरुण गांधींविरोधी घोषणा देत, जॅकेटच्या खिशातून सुरा काढत गांधींच्या दिशेने धावला, तेव्हा मणिशंकर पुरोहित व आणखी एका तरुणाने त्या तरुणाला पकडले. हा तरुण म्हणजेच साताऱ्याचे भिलारे गुरुजी. ज्या तरुणाला पकडले त्याचे नाव नथुराम गोडसे होते. त्याच्याबरोबर दुसरा तरुण होता तो पळून गेला. या प्रकारामुळे प्रार्थना सभेत गडबड-गोंधळ माजला. पण गांधी शांत होते. त्यांची प्रार्थना सभा नेहमीसारखीच पार पडली. गांधींनी गोडसेला निरोप दिला आणि आठ दिवस माझ्याजवळ राहा म्हणजे तुझे विचार मला समजून घेता येतील असे कळविले. पण त्यालाही गोडसेने नकार दिला. गोपाळ गोडसेने न्या. कपूर आयोगापुढे दिलेल्या साक्षीत नथुराम पाचगणीला गेलेला नव्हता असे सांगितले. पण गोपाळ गोडसे कितपत खरे बोलतो हाही प्रश्नच आहे. 'अग्रणी'त वार्ताहराचे काम करणारे जोगळेकर यांनी माहिती देताना सांगितले की, गांधी पाचगणीला असताना पाचगणीहून महत्त्वाची बातमी येईल असे नथुरामने आम्हाला सांगितले होते त्याप्रमाणे पाचगणीहून बातमी आली होती. गांधी पाचगणीत ज्या दिलखुश बंगल्यात राहात होते तेथे कॉंग्रेस स्वंयसेवकांनी अधिक दक्षता घेतली आणि साध्या वेशातील पोलिसांचाही बंदोबस्त ठेवला गेला. हा बंदोबस्त वरील घटना घडून गेल्यानंतरचा आहे. पण या बंदोबस्तालाही गांधींनी हरकत घेतली. माझ्या संरक्षणाकरिता पोलिसांची गरज नाही असे गांधींनी बजावले. राजाजी, डॉ. जिवराज मेहता, भुलाभाई देसाई व आणखी काही कॉंग्रेस नेत्यांना या प्रकाराची माहिती होती. टाइम्स ऑफ इंडियाच्या २३ जुलै १९४४ च्या अंकात 'रा. स्व. संघाच्या लोकांनी

गांधींच्या सभेत गोंधळ घातला' अशी बातमी आली. पूना हेरॉल्डचे संपादक ए. डेव्हीड यांनी आयोगापुढे ॲफिडेव्हिट देऊन त्या दिवशी पाचगणीला गांधींना ठार मारण्याच्या हेतूने नथुराम गोडसे सुरा घेऊन धावला होता, अशी साक्ष दिली आहे. मणिशंकर पुरोहित यांच्या साक्षीतील तारखांमध्ये थोडी तफावत आहे. पुरोहित यांनी आपटे व थत्ते यांचीही नावे घेतली होती. पोलिसांनी या प्रकाराची नोंद केलेली नाही. जुलै १९४४ च्या पाचगणीला प्रार्थना सभेत काही जणांनी गोंधळ घातला पण नथुराम गोडसे त्यात होता की नाही हे मला आठवत नाही असे डॉ. सुशीला नायर यांनी म्हटले आहे. पाचगणीला प्यारेलाल हजर नव्हते आणि गडबड होताच सुशीला नायर आदींना बाजूला नेण्यात आले. त्यामुळे त्यांना तेथे नेमके काय घडले हे पाहता आले नव्हते. नथुराम गोडसे त्यात होता की नाही हे मला आठवत नाही, पण १९४६ साली सेवाग्राम येथे नथुराम गोडसे व थत्ते गांधींजवळ येऊ लागले तेव्हा आश्रमवासीयांनी त्यांना रोखले. त्यापैकी एकाजवळ सुरा सापडला अशी साक्ष डॉ. नायर यांनी दिलेली आहे. पाचगणीला पोलीस नोंदीत सुरा सापडल्याची नोंद नाही. याबाबतीत अशीही शक्यता आहे की, सुरा काढून घेतल्यानंतर पोलीस तेथे आले असावेत. त्यामुळे त्याची नोंद पोलिसांनी घेतलेली नसावी किंवा आपण तिथे असताना हा प्रकार घडला असल्याने हे प्रकरण आपल्यावर शेकेल म्हणूनही पोलिसांनी त्याची नोंद केली नसावी. ही शक्यता नाकारता येत नाही. पुरोहित यांना या प्रकरणाची खोटी साक्ष देऊन काय मिळणार होते? हाही विचार केला पाहिजे. १९३४ साली गांधींवर पुण्यात बॉंबहल्ला केला. त्यात सातजण जखमी झाले होते आणि ती सूत्रबद्ध योजना होती असे प्यारेलाल व तेंडुलकर या दोघांनीही म्हटले आहे. हे लक्षात घेता पाचगणीला जे घडले म्हणून पुरोहित यांनी जे सांगितले त्यात अजिबात तथ्यांश नाही असे म्हणावयाचे? कारण प्यारेलाल यांच्या म्हणण्याप्रमाणे ३० जानेवारी १९४८ रोजी ज्यांनी खून केला तीच माणसे १९३४ च्या बॉंबस्फोट हल्ल्यात होती. आणि पाचगणीच्या प्रकरणात जी नावे पुढे आलेली आहेत, त्यातही हीच नावे आहेत. पुण्यातील गट गांधींना ठार मारण्याच्या प्रयत्नात होता हे १९३४ च्या बॉंबहल्ल्यातून स्पष्ट झाले आहे. ही सर्व पार्श्वभूमी लक्षात घेता पाचगणीच्या घटनेसंबंधी काय घडले असेल याचा अर्थ ज्याचा त्याने काढणे योग्य होईल. पोलिसांत रा. स्व. संघाचे लोक 'घुसलेले' आहेत असे प्यारेलाल यांनीच आयोगापुढे सांगितले आहे, त्याचाही विचार पाचगणीच्या संदर्भात का करू नये?

पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी २६ फेब्रुवारी १९४८ रोजी गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेलांना पत्र पाठवले आहे. "आपली कार्यालये व पोलीस दल यात रा. स्व. संघाचे लोक घुसलेले आहेत आणि त्यामुळे या लोकांपासून सरकारची

गुप्ततेची माहितीही गुप्त राहात नाही.'' दिल्ली पोलिसात बरेचजण संघाचे आहेत असेही नेहरूंनी वल्लभभाईंना या पत्रातून कळवले होते. सरदार वल्लभभाई पटेल यांनी लगेच दुसऱ्या दिवशी म्हणजे २७ फेब्रुवारी १९४८ रोजी नेहरूंना उत्तर पाठवले होते. त्या पत्रात वल्लभभाई पटेल यांनी, ''सावरकरांच्या नेतृत्वाखालील हिंदू महासभेच्या एका गटाने महात्मा गांधींच्या खुनाचा कट केला आणि तो अमलात आणला'' (सरदार पटेल्स् कॉरस्पाँडन्स्, खंड ६, पृ. ५६) याची कबुली दिली आहे.

जून १९३४ मध्ये पुण्यात बाँबहल्ला झाल्यानंतर २६ जून १९४७ रोजी पुण्याच्या मध्यवस्तीत असलेल्या वाचनालयाच्या इमारतीजवळ बाँब फेकण्यात आला होता. या प्रकरणी एन. आर. आठवले नावाच्या इसमास पकडण्यात आले. आठवले हा हिंदू महासभेचा कार्यकर्ता होता. त्याचा कबुलीजबाब घेतला तेव्हा 'अग्रणी'च्या नारायण आपटेने हा बाँब फेकण्यास सांगितले असा कबुलीजबाब आठवले याने दिला.[२५] समाजवादी नेते रावसाहेब पटवर्धन यांच्या सभेत अहमदनगर येथे मदनलाल व करकरे या दोघांनी बाँब फेकला होता. मदनलालला १६ जानेवारी १९४७ व करकरेला २४ जानेवारी१९४७ रोजी अटक करण्याचे आदेश सरकारने दिले होते. डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटनी मदनलाल व करकरे यांना अटक करण्याची कार्यवाही केली नाही, याबद्दल कपूर आयोगाने नापसंती व्यक्त केली आहे. १९३४ पासून बाँबहल्ले करण्याचा अवलंब हिंदुत्ववादी गटाने वेळोवेळी केलेला होता. त्यात करकरे, आपटे, मदनलाल पाहवा यांची नावे होती. मदनलाल व करकरेला अटक करण्याच्या आदेशांचे पालन झाले नाही आणि पुण्यातील बाँबस्फोट प्रकरणात आठवले यांनी आपटेचे नाव घेऊनही आपटेच्या घरात पुरावे ठेवून हल्ले करावयास जातील असे समजणाऱ्या पोलिसांच्या अक्कलहुशारीचे कौतुक करावे तेवढे थोडेच होईल! रावसाहेब पटवर्धन यांच्या सभेमध्ये बाँबहल्ला झाला म्हणून मदनलाल पाहवा व करकरे यांना १६ व २४ जानेवारी १९४७ रोजी अटक झाली असती तर ३० जानेवारीच्या गांधी खुनाचा हा कट उघडकीस येऊ शकला असता. यावेळी पाहवा व करकरेला पोलिसांनी अटक केली नाही. पोलिसांचे हे वर्तन लक्षात घेता पाचगणी येथे पोलिसांनी नोंद केली नाही म्हणून ही घटनाच घडली नाही असे अनुमान काढणे धारिष्ट्याचे होणार नाही का?

पाचगणीची घटना आयोगाने ग्राह्य धरली नाही. पण ती घटना वादग्रस्त मानता येईल. मात्र सेवाग्राम येथील घटनेच्या बाबतीत संशय वाटावा, संभ्रम निर्माण व्हावा

२५. न्या. कपूर आयोग अहवाल, खंड दोन

अशी परिस्थिती नाही. महात्मा गांधी जीनांबरोबर वाटाघाटी करणार असल्याचे जाहीर झाले होते. गांधींनी जीनांबरोबर वाटाघाटी करू नयेत असे नथुराम गोडसे व ल. ग. थत्ते आदी म्हणत होते आणि या दोघांनी गांधी जीनांशी बोलणी करणार आहेत या संदर्भात अतिशय जहरी प्रचार केला. ९ सप्टेंबर १९४४ रोजी महात्मा गांधींनी जीनांबरोबर बोलणी सुरू केली. ती १८ दिवस चालली होती. वाटाघाटीसाठी सेवाग्रामहून गांधी मुंबईला रवाना झाले. गोडसे, थत्ते यांचा जीनांशी गांधींच्या वाटाघाटी होऊ द्यायच्या नाहीत हा निर्धार होता. त्यासाठी गोडसे, थत्ते आणि त्यांच्या साथीदारांनी गांधींना आश्रमाजवळ रोखण्याचा चंग बांधला. गांधी आश्रमाच्याबाहेर पडूच शकले नाहीत तर गांधी मुंबईला कसे पोहोचू शकतील म्हणून त्यांनी ही योजना आखली होती. महाराष्ट्रातून आलेल्या एका तुकडीला बंगालमधील पाच-सातजण येऊन मिळाले. त्यामुळे गोडसे-थत्ते यांचे साथीदार अधिकच आक्रमक बनले. आश्रमवासींनी गोडसे वा थत्ते या दोघांपैकी एकाकडून मोठा सुरा हस्तगत केला, असे डॉ. सुशीला नायर यांनी न्या. कपूर आयोगाला सांगितले. पण आयोगाने सुशीला नायर यांची यावेळची ही माहिती स्वीकारली नाही. यापूर्वी पाचगणीला सुशीला नायर यांनी माहितीला दुजोरा दिला नाही म्हणून ती स्वीकारण्याचे आयोगाने नाकारले होते आणि येथे सुशीला नायर यांनी सुरा हस्तगत केल्याचे सांगितले. इतकेच काय पण पोलिसांच्या नोंदीतही दोघांपैकी एकाकडून भला मोठा जंबिया जप्त केला अशी नोंद केली आहे. पोलिसांनी सुरा म्हटलेले नाही. पोलिसांच्या नोंदीत जंबियाचा उल्लेख आहे आणि सुऱ्यापेक्षा जंबिया मोठा असतो. हा जंबिया का बाळगला? हे न्या. कपूर आयोगाला सांगताना पोलिसांनी गांधी ज्या मोटारीने वर्धा रेल्वे स्टेशनपर्यंत जाणार होते त्या मोटारीचे चाक पंक्चर करण्यासाठी हा जंबिया बाळगला होता असे नमूद केले. ते आयोगाने स्वीकारले आहे. पण पोलिसांच्या नोंदीत थत्ते याने आम्ही आमच्या संरक्षणासाठी हा जंबिया बाळगला असल्याचे नोंदविले आहे. पोलिसांनी आयोगाला हीसुद्धा माहिती दिली नाही आणि टायरचे चाक पंक्चर करण्यासाठी त्याचा उपयोग केला जाणार होता असे सांगितले आहे. पोलिसांच्या माहितीतील विसंगती पाहता पोलिसांनी केलेल्या लपवाछपवीवरच प्रकाश पडतो. "थत्ते व इतर निदर्शकांना अटक करण्यात आली तेव्हा पोलीस व थत्ते यांच्यात काही संभाषण झाले. ते संभाषणही आयोगाने उद्धृत केले आहे. पोलीस अधिकाऱ्याने गांधींना मारण्याचा इरादा होता काय, असा थत्तेला सवाल केला. मी गांधींना मारले तर गांधी हुतात्मा होतील असे थत्ते म्हणाले. हे संभाषण चालू असतानाच थत्तेजवळ सुरा सापडला" असे आयोग म्हणतो. हिंदुत्ववाद्यांची गांधींसंबंधातील भूमिका, त्यांची आक्रस्ताळी आणि जहरी भाषणे,

१९३४ साली गांधींवरील पुण्यातील बाँबहल्ला आणि सेवाग्रामच्या पोलीस ठाण्यातही ते गांधींच्या खुनाची भाषा करीत होते, पोलिसांनी आयोगाला हे संभाषणही सांगितले आहे. पण निवेदन देताना जी माहिती पुरविली आहे, त्यात मात्र टायर पंक्चर करण्यासाठी त्याने सुरा जवळ बाळगला होता, हा निष्कर्ष पोलीस कशाच्या आधारावर काढतात? याशिवाय रावसाहेब पटवर्धनांच्या सभेत बाँब फेकला म्हणून मदनलाल पाहवा व करकरे यांना अटक करण्याचे आदेश दिलेले असताना त्यांचे पालन झाले नाही, त्यामुळे पोलिसांच्या नोंदीबाबतही संशयाला जागा राहते. परंतु आयोगाने सेवाग्रामच्या घटनेसंदर्भात के. एम. मुन्शी काय म्हणतात याचा हवाला दिला आहे. "पुण्यामध्ये गांधींविरोधी गट होता आणि या गटाचा राजकीय खून करण्यावरच विश्वास होता हे मुन्शी यांनी म्हटले आहे त्यालाच पुष्टी मिळते." हा जो पुरावा आयोगापुढे आला आहे, त्याच्या आधारे आयोगाचे काय मत बनले हे न सांगता मुन्शींच्या तोंडून आयोग बोलत आहे हे न्यायमूर्तींच्या आयोगाच्या प्रतिष्ठेला धरून नाही. पुण्यातील हिंदुत्ववादी गांधींच्या जीवावर उठलेले होते याची अनेक उदाहरणे असताना त्यासंबंधात सरळ सरळ अनुमान न काढता 'मुन्शींच्या विधानाला पुष्टी मिळते' असे हातचे राखून आयोगाने आपले मत मांडले आहे. म्हटले तर आयोगाने पुण्याचा हिंदुत्ववादी गट राजकीय हेतूने व्यक्तिगत खुनावर विश्वास ठेवणारा होता हे मान्य केल्यासारखे होते, त्याचबरोबर आयोगाचे हे मत न होता मुन्शींच्या विधानाला आयोगाने पाठिंबा दिला होता असाही त्याचा अर्थ निघू शकतो. दोन्हींत थोडा फरक आहे. आयोगाने ही पद्धती का अवलंबिली असेल याची कल्पना करता येते. आयोगाचा वृत्तान्त घेत असताना न्या. कपूर यांच्याशी माझा चांगलाच संबंध आला होता. बऱ्याच वेळा न्या. कपूर कामकाज संपल्यानंतर मंत्रालयातील त्यांच्या दालनात मला बोलावून घेत आणि गप्पाही मारत होते. गप्पांच्या वेळी बोलताना एकदा ते बोलले, "यातून काय निष्पन्न होणार? गांधी खुनाला जी माणसे जबाबदार होती त्यांतली बरीचशी आज हयात नाहीत. जी हयात आहेत त्यांचे आयुष्य आणखी किती दिवस राहिले आहे, असाही प्रश्न पडतो. त्यामुळे माझा अहवाल हा सर्वसाधारण असेल." मला तारीख आठवत नाही. पण प्रसंग आठवतो. गोपाळ गोडसेची पहिल्या दिवशी इन्-कॅमेरा साक्ष झाली, त्या दिवशी न्या. कपूर यांनी हे उद्गार काढले होते. कारण गोडसेने दिलेल्या साक्षीचे सार त्याच वेळी त्यांनी मला सांगितलेले होते. इन्-कॅमेरा साक्षीची माहिती न्या. कपूर अधिकृतपणे नंतर सांगत असत.

प्यारेलाल यांनी सेवाग्रामच्या घटनेसंबंधात तेजबहादूर सप्रू यांना लगेच सविस्तर पत्र लिहिले होते. या सविस्तर पत्रात प्यारेलाल लिहितात, "हिंदू

महासभेच्या निदर्शकांच्या निदर्शनाची बातमी तुम्ही वाचली असेलच. पहिल्याच दिवशी निदर्शकांच्या गटाचा नेता एकदम बोलून गेला की, "हे आमचे पहिले पाऊल आहे. जीनांना भेटण्यास गांधी निघाले तर आम्ही बळाचा वापर करण्यासही मागे-पुढे पाहणार नाही." काल त्यांनी तसे आधीच कळविले होते, "गांधी कुटिराबाहेर पडताच आम्ही त्यांना पकडून ठेवू. गांधींना कुटिराबाहेर पडूच देणार नाही." खरोखरच त्यांनी कुटिराबाहेर पण मोक्याच्या ठिकाणी निदर्शकांच्या गटांची विभागणी करून ठेवली."

"आज सकाळीच डिस्ट्रिक्ट सुपरिटेंडेंट ऑफ पोलीस यांचा फोन मला आला. मला ते फोनवर म्हणाले की, फार मोठी गंभीर घटना घडवून आणण्याची निदर्शकांची योजना होती. त्यामुळे त्यांच्याविरुद्ध (निदर्शक) कारवाई करणे भाग पडत आहे. गांधींचे म्हणणे तर असे होते की, निदर्शकांच्या समवेत मी चालत एकटा जाणार. मोटारीने तुम्ही (गांधी) जा असे सांगण्यापर्यंत त्यांच्यात (निदर्शकांत) बदल होत नाही; तोपर्यंत मी त्यांच्याबरोबर चालत राहणार. गांधी आपला हा हट्ट सोडण्यास तयार नव्हते. गांधी निघण्याच्या वेळेपूर्वी डी. एस. पी.तेथे आले आणि त्यांनी निदर्शकांना अटक केली. त्यामुळे निदर्शकांची योजना बारगळी."

"निदर्शकांचा नेता तर अत्यंत कडवा, अतिरेकी विचारांचा आणि आक्रस्ताळी प्रवृत्तीचा होता. त्यामुळे फारच चिंता वाटत होती. ज्यावेळी त्याची झडती घेतली तेव्हा त्याच्याजवळ जंबिया मिळाला. त्याला पोलिसांनी अटक केली. अटक करणारा पोलीस अधिकारी काहीशा उपहासाने त्याला म्हणाला, "काय तुला हुतात्मा व्हायचे आहे काय?" त्यावर निदर्शकांचा नेता म्हणाला, "ज्यावेळी गांधींचा खून होईल त्याचवेळी आमच्यातील कोणी तरी हुतात्मा होईल." पोलीस अधिकाऱ्याने त्याच्याशी संभाषण चालू ठेवले आणि या निदर्शकांच्या नेत्याला पोलीस अधिकारी म्हणाला, हे जे काही तुम्ही चालविले आहे त्या फंदात तुम्ही कशाला पडता? तुम्ही ही सगळीच गोष्ट नेत्यांवर सोपवा. नेते त्यांचे ते पाहून घेतील. सावरकरांवर हे सोपवून द्या. ते काय करायचे ते पाहून घेतील. अटक केलेली व्यक्ती म्हणाली, सावरकरांनी गांधींशी बोलणे हा गांधींचा सन्मान होईल. सावरकरांनी गांधींशी बोलण्याची वेळच येणार नाही. त्यांनी गांधींशी बोलण्यापेक्षा आमचा एक 'जमादार'च गांधींना पुरेसा आहे."

प्यारेलाल यांनी तेजबहादूर सप्रू यांना ही घटना घडल्यानंतर तिचे गांभीर्य लक्षात घेऊन पाठविलेले हे पत्र आहे. प्यारेलाल यांनी असे म्हटले आहे की, अटक झालेल्याने 'जमादार' म्हणून जो उल्लेख केलेला आहे तो उल्लेख नथुराम गोडसेच्या

संदर्भात आहे. म्हणजे गांधींना मारण्याचा विचार हा या गटामध्ये १९४८ साली झालेला नव्हता. त्या पूर्वीपासून गांधींना ठार मारण्याचा त्यांचा विचार होता. कारण जीनांशी वाटाघाटी करण्यासाठी सप्टेंबर १९४४ मध्ये गांधी मुंबईला निघाले होते आणि गांधींना वाटाघाटीसाठी जाता येऊ नये यासाठी बळाचाही वापर करण्याची भूमिका या लोकांनी घेतली होती. त्या दिवशी वेळीच डी.एस.पी. आले नसते तर गांधींवर हल्ला करण्याची मजलही या गटाने मारली असती. म्हणून प्यारेलालही चिंतेत होते. डी.एस.पीं. नीही त्या घटनेचे गांभीर्य वेळीच लक्षात घेऊन फोनवरून प्यारेलालना या गांभीर्याची कल्पना दिला. गांधी-जीना वाटाघाटी ९ सप्टेंबर १९४४ रोजी मुंबईतील माउंट प्लेझंट रोडवरील जीनांच्या निवासस्थानी सुरू झाल्या. (आता या रस्त्याचे नाव बदलून भाऊसाहेब हिरे मार्ग असे करण्यात आले आहे आणि मुख्यमंत्र्यांच्या 'वर्षा' निवासस्थानाच्या समोर हा बंगला आहे.) पुन्हा तोच प्रश्न उपस्थित होतो. सप्टेंबर १९४४ मध्ये प्रत्यक्ष फाळणी झालेली नव्हती किंवा ती होईलच याचीही काही खात्री नव्हती. तसेच पंचावन्न कोटी रुपयांचाही प्रश्न नव्हता, मग गांधींच्या जीवावर बेतणारा प्रसंग तेव्हा का गुदरला होता? गांधींच्या जीवाला धोका आहे असे त्यावेळी फक्त प्यारेलालना वाटले नव्हते तर, डी. एस. पी.चीही तीच माहिती होती. म्हणून त्यांनी ती प्यारेलालना तातडीने कळविली. या घटनांमागचे हेतू काय होते? त्यावेळच्या परिस्थितीत फाळणी, स्वातंत्र्य किंवा पंचावन्न कोटी यांतील काहीच स्पष्ट झालेले नव्हते. म्हणूनच गांधींचा खून का करण्यात आला याचे कारण आज सांगितले जाते त्या कारणासाठी झालेला नाही; त्याचे एकापेक्षा अधिक पुरावे उपलब्ध आहेत. 'आपण हा जंबिया संरक्षणाकरता जवळ बाळगला होता अशी कबुली त्याने पोलिसांना दिली होती. आणि ती पोलिसांनी नोंदवून घेतली.[२६] सप्टेंबर १९४४ मध्ये ही घटना घडली त्यावेळी पोलिसांनी जे नोंदवून घेतले होते तेही पोलिसांनी न्या. कपूर आयोगापुढे आणलेले नाही. गांधींच्या मोटारीचे चाक पंक्चर करण्याकरिता जंबिया जवळ बाळगला होता, असे पोलिसांनी आयोगाला सांगितले. ज्याच्याजवळ जंबिया सापडला त्याने संरक्षणासाठी तो जवळ बाळगला अशी कबुली दिली असताना आयोगाला ती माहितीही पोलिसांनी का देऊ नये? आयोगाने सेवाग्राम घटनेसंबंधी मुन्शींच्या विधानाला पुष्टी देत असतानाच टायर पंक्चर करण्यासाठी सुरा बाळगला होता हा पोलिसांचा जावईशोधसुद्धा मान्य केला आहे. त्यामुळे पाचगणीच्या घटनेची पोलिसांच्या डायरीत नोंद नाही म्हणून ती घटना घडलेलीच नाही, असे मानण्यावर विश्वास बसत नाही.

---

२६. महात्मा गांधी, द लास्ट फेज, खंड पहिला, प्यारेलाल (तळटीप पृ. ७१३)

पुण्यातील हिंदुत्ववादी गटाने महात्मा गांधींचे प्राण घेण्याचा चंगच बांधला होता, हे एकामागोमाग एक झालेल्या प्रयत्नांमुळे सिद्ध होते. पुण्यात १९३४ साली बॉंबहल्ला झाला. १९४४ साली सेवाग्राम येथे गांधींच्या जीवावर बेतले होते. पाचगणीला सुरा घेऊन गांधींच्या दिशेने धावत असलेल्या माणसाला पकडले, तो माणूस म्हणजे नथुराम गोडसे होता असे मणिशंकर पुरोहित व 'पूना हेरॉल्ड'चे संपादक डेव्हिड म्हणतात. आणि महात्मा गांधी २९ जून १९४६ रोजी मुंबईहून पुण्याला रेल्वेने येत असता नेरळ-कर्जत रेल्वे स्टेशनांच्या दरम्यान महात्मा गांधींच्या रेल्वेला अपघात करून त्यांना ठार मारण्याच्या उद्देशाने रेल्वे मार्गावर मोठमोठ्या दरडी टाकण्यात आलेल्या होत्या. रेल्वेचा ड्रायव्हर एम. एल. परेरा यांच्या प्रसंगावधानाने रेल्वेचा अपघात टळला. पण रेल्वे इंजिनचे बरचे नुकसान झाले. "नेरळ-कर्जतच्या दरम्यान गाडी पूर्ण वेगात असताना २९ जूनच्या रात्री गांधींना घेऊन जाणाऱ्या खास रेल्वेची धडक रेल्वे मार्गावर टाकण्यात आलेल्या दरडीवर झाली. रेल्वेमार्गावर मुद्दामच या दरडी टाकण्यात आल्या होत्या. इंजिन ड्रायव्हरच्या प्रसंगावधानामुळेच अपघात टळला. नाहीतर गाडी उलटून प्राणहानी झाली असती."[२७] प्यारेलाल यांनी सात जुलै १९४६ रोजी 'हरिजन'मध्ये या अपघातासंबंधी लेख लिहिलेला आहे. पुण्याच्या पोलिसांनी या घटनेसंबंधी आयोगापुढे असे सांगितले की, मालगाडी उलटवण्यासाठी रेल्वेमार्गावर काहीजणांनी दरडी टाकल्या होत्या. ज्यावेळेला 'गांधी-स्पेशल' गाडी (या गाडीला हेच नाव दिले गेले होते असे रेल्वेचा ड्रायव्हर परेरा यांनी आयोगाला सांगितले.) जाणार होती, त्याच्या आधी किंवा नंतर या मार्गावरून कोणतीही मालगाडी जाणार नव्हती किंवा गेली नाही. त्यामुळे मालगाडी लुटण्यासाठी दरडी टाकल्या होत्या असे मानणे कठणीच होईल. ३० जून १९४६ रोजी पुण्यातील प्रार्थना सभेत बोलताना महात्मा गांधींनी त्यांच्या गाडीला अपघात करण्याचा प्रयत्न झाला त्याचा उल्लेख केलेला आहे. "परमेश्वराच्या कृपेने मी सातवेळा अक्षरशः मृत्यूच्या जबड्यातून सुखरूपणे परत आलो आहे. मी कोणाला कसलीही इजा केलेली नाही. माझे कोणाशी शत्रुत्वही नाही; मग माझे इतक्या वेळा प्राण घेण्याचे प्रयत्न का व्हावेत हे समजत नाही. माझा प्राण घेण्याचा कालचा प्रयत्न फसला आहे. मी इतक्यात मरणार नाही. मी सव्वाशे वर्ष जगणार आहे." असे गांधींनी ३० जून १९४६ च्या प्रार्थनासभेत म्हटले होते.[२८] महात्मा गांधींनी मी सव्वाशे वर्षे जगणार असे म्हटल्यानंतर, 'पण

२७. महात्मा, खंड सात, डी. जी. तेंडुलकर
२८. महात्मा, खंड सात, डी. जी. तेंडुलकर

जगू कोण देतो?' असा सवाल नथुराम गोडसेने केला होता. नथुराम गोडसेच्या मनामध्ये गांधींना ठार मारण्याचा विचार किती जुना होता, हे त्याच्या उद्‌गारावरून आणि त्याच्या आधीच्या प्रसंगावरून स्पष्ट होते. मालगाडी लुटण्यासाठी २९ जून १९४६ रोजी दरडी टाकलेल्या होत्या असे पोलिसांनी म्हटले. पण २९ जूनपूर्वी किंवा २९ जूननंतर या मार्गावर मालगाडी लुटण्यासाठी कधीही प्रयत्न झालेले नव्हते. मग २९ जूनचाच मुहूर्त दरोडेखोरांना मालगाडी लुटण्यासाठी योग्य आहे असे वाटले असे समजायचे का? २९ जून १९४६ पूर्वी किंवा त्या दिवसानंतर दरोडेखोरांना या मार्गावरील मालगाडी लुटण्याची प्रेरणा झालेली नाही आणि फक्त २९ जून रोजीच ही प्रेरणा झाली आहे हे तर्काला पटणारे नाही. या मार्गावर मालगाड्या लुटण्याचे वारंवार प्रयत्न झाले असते किंवा २९ जून वगळता अन्य कधी तरी असा प्रयत्न झाला असता तर पोलिसांच्या म्हणण्यात काही अर्थ होता. पण 'गांधी-स्पेशल' रेल्वेला अपघात करण्याचा प्रयत्न झाला तोच एकमेव प्रयत्न त्या काळात मालगाडी लुटण्यासाठी झाला, असे म्हटले तर त्यावर कोणाचाही विश्वास बसणार नाही. 'गांधी-स्पेशल' जाण्याच्या आधी किंवा नंतर एखादी मालगाडी गेली असती तरीही पोलिसांचा तर्क स्वीकारता आला असता. पण 'गांधी-स्पेशल'च्या आधी किंवा नंतर मालगाडी गेलेली नसल्यामुळे पोलिसांनी दिलेले कारण बनावटच वाटते.

महात्मा गांधी विरोधात हिंदुत्ववाद्यांनी अतिशय हीन पातळीवरचा प्रचार चालवला होता. तो प्रक्षोभक होताच. हीन प्रचाराचे उदाहरण म्हणून संयुक्त प्रांतातील अल्वार संस्थानामधील उदाहरण देता येईल. अल्वार संस्थानचे पंतप्रधान डॉ. ना. भा. खरे होते. ते हिंदू महासभेचे एक नेतेही होते. खरे यांचा गांधीविरोध अतिशय कडवा होता. भडक, प्रक्षोभक विधाने करणे आणि तशी पत्रके काढणे याबद्दल खरे यांची ख्याती होती. कपूर आयोगापुढे अल्वार संस्थानातील प्रचाराची पत्रके व तेथील गांधीविरोधी राजकारणाच्या काही गोष्टी पुढे आल्या. त्यातील एका हिंदी पोस्टरमधून गांधींच्या खुनाची सरळ सरळ चिथावणीच देण्यात आलेली होती. पुरावा म्हणून आयोगाने हे पोस्टर दाखल करून घेतले. ''महात्मा गांधींच्या शरीराचे तुकडे तुकडे करा आणि ते तुकडे कावळे, कुत्रे यांना खाण्यासाठी फेकून द्या'' अशी भाषा या पोस्टरमध्ये होती. गांधींचा खून झाल्यानंतर चौकशीसाठी अल्वारला दिल्लीहून पोलीस पाठविण्यात आले आणि अल्वारचे चीफ पोलीस ऑफिसर यू. एल. मल्होत्रा यांना चौकशी करण्याविषयी सांगण्यात आले. त्यात असे आढळून आले की नागपूरहून नथुराम शुक्ल नावाचा एक माणूस अल्वारला आला. डिसेंबर १९४७ मध्ये त्याने हिंदू महासभेच्या व्यासपीठावरून भाषणे केली. नथुराम

शुक्लाचे जे वर्णन करण्यात आले ते नथुराम गोडसेच्या वर्णनाशी विसंगत होते. मग शुक्लाची वर्णन करण्याची चूक झाली की खरोखरच हा माणूस वेगळा होता हे सांगणे कठीणच. पण गिरिधर सिद्धा नावाचा एक साधू अल्वारबाहेरून अल्वारला आलेला होता. त्याच्याजवळ एक छापील पत्र होते. ते तो काहीजणांना वाटत होता. ३० जानेवारी १९४८ रोजी सायंकाळी पाच वाजता गांधींचा खून झाला पण या पत्रकात गांधींचा खून तीन वाजता झाला असे म्हटलेले होते आणि ही पत्रके तीस जानेवारीलाच अल्वारला वाटण्यात येत होती. अल्वारमध्ये गांधींविरोधी वातावरण निर्माण करण्यात आले होते. त्यात डॉ. ना. भा. खरे यांचा हात होती की नाही याविषयी ठामपणे निष्कर्ष काढता येणे अवघड आहे असे न्या. कपूर आयोगाने म्हटले आहे. आयोगाने डॉ. ना. भा. खरे यांचा हात नव्हता असे स्पष्टपणे म्हटलेले नाही आणि हात होता असेही म्हटलेले नाही. पण ठामपणे निर्ष्कष काढता येणे अवघड आहे, असे म्हणून डॉ. खरे यांच्याकडे अंगुलीनिर्देश केलेला आहे.

व्यक्तिगत हिंसाचारावर हिंदुत्ववाद्यांचा भर होता. विचारांचा मुकाबला विचाराने करण्याइतका प्रभावी विचार त्यांच्याजवळ नव्हता. नव्या विचारांपुढे जुन्या विचारांचा टिकाव लागत नाही आणि नवे बदल स्वीकारण्याची तयारी होत नाही त्यावेळी ही अशीच विकृती निर्माण होते. विचारांचा मुकाबला करण्याचे वैचारिक सामर्थ्य हिंदुत्ववाद्यांजवळ नसल्याने त्यांनी बॉंब व शस्त्रास्त्रांचे साठे करण्याचे तंत्र अवलंबिले होते.

हिंदूंच्या मनात मुस्लिमांविषयी द्वेष निर्माण करण्याकरिता खेड्यांतील लोकांवर हल्ले करण्यासही त्यांनी मागेपुढे पाहिले नाही. न्या. कपूर आयोगापुढे मीरत रेंजचे डी.आय.जी.बी.बी.एस. जेटली यांची साक्ष झाली तेव्हा त्यांनी रा. स्व. संघाने स्वातंत्र्यानंतर लगेच शस्त्रे गोळा करून खेडी आणि काही व्यक्ती निवडून त्यांच्यावर हल्ले करण्याचा कट केला. याबद्दल सातशेच्यावर संघाच्या लोकांवर खटले भरले होते याची माहिती दिलीच. पण रा. स्व. संघावर बंदी घालावी अशी शिफारस गांधींचा खून होण्याच्या आधीच सरकारकडे आपण केली होती असे सांगितले. जेटली यांनी संघावरील बंदीसंबंधी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री गोविंदवल्लभपंत व गृहमंत्री लालबहादूर शास्त्री यांच्याशी चर्चाही केली होती. पंत व शास्त्री या दोघांनी संघावर बंदी घालण्याची आवश्यकता आहे यावर सहमती व्यक्त केली होती. पण सरदार वल्लभभाई पटेल यांच्याशी त्याबाबत विचारविनिमय केला पाहिजे असे ते दोघे म्हणाले. संघावर बंदी घातली गेली पण ती महात्मा गांधींच्या खुनानंतर. ऑक्टोबर-नोव्हेंबर १९४७ मध्ये सरकार पटेल व जेटली यांच्यात चर्चा झाली. तेव्हा जेटली यांनी काहीतरी भयंकर घटना घडणार असल्याचे पटेल यांना सांगितले. त्यावेळी मात्र महात्मा गांधींचा खून होईल असे आपल्याला वाटले नव्हते. पं. जवाहरलाल नेहरूंचा खून होईल अशी आपल्याला माहिती होती

असे जेटली यांनी आयोगाला सांगितले. मी स्वतः १९८८-८९ च्या दरम्यान मदनलाल पाहवा याला भेटलो होतो. महात्मा गांधींच्या खुनाबद्दल त्याला पश्चात्ताप झाला आहे का हे पाहावे हा त्याला भेटण्यामागचा हेतू होता. पाहवाला गांधींना ठार मारले याचा अभिमानच वाटत होता. गांधींबरोबर आम्हाला पं. नेहरू, सुऱ्हावर्दी, जीना यांनाही ठार मारावयाचे होते असे मदनलाल पाहवाने मला सांगितले होते. बी. बी. एस. जेटली हे मीरत रेंजचे डी. आय. जी. होते. कपूर आयोगापुढे जेटली यांनी नेहरूंना ठार मारले जाण्याची शक्यता होती असे जे सांगितले, त्याला मदनलाल पाहवाने मला जे सांगितले होते त्यामुळे दुजोराच मिळतो. रा. स्व. संघाकडून जेटली यांनी शस्त्रास्त्रे जप्त केली. ती महात्मा गांधींना दाखवण्याचा प्रयत्न केला. पण गांधींनी शस्त्रास्त्रांकडे पाहिलेही नाही, असे जेटली यांनी म्हटले आहे. हिंदुत्ववाद्यांनी स्वातंत्र्यापूर्वी ही शस्त्रे गोळा केली होती आणि त्यांनी बॉंबचाही वापर केला होता. अहमदनगर जिल्ह्यात २४ नोव्हेंबर १९४७ ते २६ डिसेंबर १९४७ या काळात चार बॉंबस्फोट केले होते. २४ नोव्हेंबर रोजी कापड बाजार भागात ताझिया मिरवणुकीत एक बॉंबस्फोट केला होता. ७ डिसेंबर रोजी वसंत टॉकीजमध्ये एक स्फोट घडवून आणला होता. १४ डिसेंबर रोजी काझी सुभानभाई यांच्या घरावर आणि २६ डिसेंबर १९४७ रोजी तट्टी दरवाजा मशिदवर असे बॉंबस्फोट घडवून आणले होते. याशिवाय रावसाहेब पटवर्धन यांच्या सभेत बॉंबस्फोट झाला तो वेगळाच होता! मदनलालच्या अटकेसंबंधात १६ जानेवारी १९४८ रोजी मुंबईचे गृहमंत्री मोरारजीभाई देसाई यांनी आदेश दिलेले होते. मोरारजींच्या आदेशाचे पालन करण्यात आले नाही. याविषयी न्या. कपूर आयोगाने नाराजी व्यक्त केली आहे. ही यंत्रणेतील केवळ दिरंगाई आहे असे म्हणता येत नाही. हिंदुत्ववाद्यांना पोलीस खात्यातील वरचे अधिकारी सामील झाले होते, असाच निष्कर्ष काढणे अधिक वास्तव आहे. हे सर्व पाहूनच प्यारेलाल यांनी गृहखात्यात संघाचे लोक 'इन्फिल्ट्रेट' झाले होते अशी साक्ष दिली आहे, ती अधिक प्रकाश टाकते! पुणे-नगरमध्ये ३० जानेवारी १९४८ च्या आधीच्या काळात बरेच बॉंबस्फोट झाले होते. त्यामुळे पोलीस खात्याला जाग आली असती तरीही गांधींचे प्राण वाचवता येणे शक्य होते. महात्मा गांधींचे प्राण वाचवता येणे अशक्यच होते यावर, पुढच्या प्रकरणातील अधिकृत माहिती विचारता घेता कोणाचाही विश्वास बसणार नाही! इच्छाशक्तीचा अभाव, गलथानपणा यामुळे महात्मा गांधींचा खून झाला आहे. नथुराम गोडसेच्या पिस्तुलातील गोळ्यांनी फार उशिरा गांधींचे प्राण घेतले. पिस्तुलातील गोळ्यांपेक्षा इच्छाशक्तीचा अभाव व गलथानपणा अधिक प्राणघातक ठरला आहे!

❑❑❑

निष्काळजीपणा

महात्मा गांधी यांचा खून होणार असल्याचे आधी समजलेले होते, हे जे लहानपणी कानावर पडले होते तेच वयाने मोठे झाल्यावर प्रत्यक्ष ऐकावयास मिळाले आणि त्यासंबंधीचा पुरावा स्वत:च्या डोळ्यांनी पाहावयास मिळाला हा किती दुर्मीळ योगायोग म्हणावा! गांधींसंबंधात काँग्रेस नेत्यांचे वर्तन पाहता ते त्यांच्याशी कृतघ्नपणानेच वागले असे म्हणावे लागते. विशेषत: त्यांच्या अखेरच्या काळात काही नेते अतिशय निष्ठुरपणानेच वागले. फाळणीला गांधी जबाबदार आहेत असा प्रचार केला जात असताना या बड्या नेत्यांपैकी कोणीही गांधींमुळे फाळणी झाली हे म्हणणे खरे नाही असे सांगण्याचा प्रयत्न केला नाही. २० जानेवारी १९४८ रोजी गांधींच्या प्रार्थना सभेत बॉंबस्फोट झाल्यावरही त्यापासून काहीही बोध घेतला नाही. गांधींचे धैर्य असामान्य होते. न. र. फाटक यांच्या 'भारतीय राष्ट्रवादाचा विकास' या पुस्तकातील काही वर्णनावरून त्यांच्या असामान्य धैर्याची कल्पना येऊ शकते. ''मुसलमानांना वाचवण्यासाठी व मुसलमानांना शांत करण्याकरिता गांधींनी खवळलेल्या दिल्लीत जी साहसे केली ती आश्चर्यकारक होती. एकदा तर गांधी तीस-चाळीस हजार मुसलमानांच्या वस्तीत एकटेच गेले! तसाच प्रकार त्यांनी एका मशिदीत जमलेल्या जमावात शिरून जगाला दाखवला. मुसलमानांच्या सांत्वनार्थ जाताना त्यांच्याबरोबर पोलिसांचा बंदोबस्त नसे. गांधींचे वय ७८ वर्षांचे होते. त्यांचे वयोमान लक्षात घेतल्यास त्यांच्या या साहसी हालचाली त्यांच्या कठोर कर्तव्यनिष्ठेची साक्ष पटविणाऱ्या ठरतात.'' असे फाटक यांनी म्हटले आहे. कसलेही संरक्षण न घेणाऱ्या वृद्धाचा खून करणे हे पराक्रमाचे लक्षण नव्हे! तो भ्याडपणाचा होता. 'महात्मा गांधीच्या वागणुकीचा जेवढा विपर्यास करणे शक्य तेवढा विपर्यास हिंदूंची अनेक वृत्तपत्रे करीत होती' असेही फाटक यांनी म्हटलेले आहे. हाच विपर्यास आता लोकांना खरा वाटत आहे. २० जानेवारी १९४८ च्या

प्रार्थना सभेत बॉंबस्फोट झाल्यावर मदनलाल पाहवा नावाच्या मुंबईच्या तरुणाला पोलिसांनी पकडले. या बॉंबस्फोटाची बातमी २१ जानेवारीस वृत्तपत्रांत प्रसिद्ध झाली. ती वाचून प्रो. जे. सी. जैन मुंबई प्रांताचे गृहमंत्री मोरारजी देसाई यांना भेटण्यास गेले. जैन यांना पाहवाची माहिती होती. स्वत: जैन चेंबूरच्या निर्वासितांच्या छावणीत निर्वासितांना मदत करण्यासाठी जात. त्यावेळी पाहवा त्यांच्या संपर्कात आला होता. जैन यांनी काही पुस्तके लिहिली आहेत. ती पुस्तके पाहवा विकत असे आणि त्याचे कमिशन जैन पाहवाला देत असत. कमिशनचे पैसे दिल्यावर एकदा पाहवा जैन यांच्याकडे गेला आणि त्याने पुन्हा पैशांची मागणी केली. 'परवाच तुला पैसे दिलेले आहेत. आता तुला कशाला पैसे हवे आहेत,' अशी विचारणा जैन यांनी पाहवाकडे केली. पण पाहवा कारण सांगेना. 'मला दिल्लीला जावयाचे आहे' एवढेच तो जैन यांना म्हणाला. दिल्लीला जाण्याचे कारण तो सांगत नाही हे पाहून पाहवाला बरोबर घेऊन जैन शिवाजी पार्कनजीक समुद्रावर गेले. तेथे पाहवाने जैन यांना एका नेत्याचा खून करावयास निघालो असल्याचे सांगितले. पण नेत्याचे नाव तो सांगण्याचे टाळू लागला. तेव्हा जैन यांनीच काही नेत्यांची नावे घेतली. ती नावे पाहवाने नाकारली. शेवटी जैन यांनी गांधींचे नाव घेतले. त्यावर त्याने गांधींचा खून करण्याची योजना असल्याचे कबूल केले. जैन हे कम्युनिस्ट आहेत. पण त्यांनी 'गांधी हा मोठा माणूस आहे. त्यांच्या खुनाचा विचार सोडून दे' असे पाहवाला पटवून देण्यास सुरुवात केली. पाहवाने जैन यांचे म्हणणे मान्य केल्यासारखे दाखविले आणि तो निघून गेला. पुढे पंधरा-वीस दिवस झाले तरी पाहवा जैनना भेटला नाही. निर्वासित गांधींविषयी संतापाने काहीबाही बोलतात तसाच पाहवाही बोलला असावा असा जैन यांचा समज झाला. पण २० जानेवारीच्या बॉंबस्फोटात मदनलाल पाहवाला पकडले आहे ही बातमी वाचल्यावर जैन यांची गांधींच्या खुनाबाबत खात्री झाली. म्हणून ही माहिती सांगण्याकरिता जैन हे मोरारजी देसाई यांना भेटले आणि त्यांनी मोरारजी देसाईंना त्यांच्याजवळील माहिती सांगितली. प्रो. जैन कम्युनिस्ट आहेत या एकाच कारणावरून मोरारजींनी त्यांना त्यांच्या दालनात भेटण्याचे नाकारले पण सचिवालयाच्या व्हरांड्यात जैन यांच्याकडून सर्व हकिगत मोरारजींनी ऐकली. प्रो. जैन यांनी २१ जानेवारीस महात्मा गांधींच्या खुनाच्या संबंधात आपल्याला माहिती दिली हे मोरारजी देसाई यांनीही न्या. कपूर आयोगापुढे मान्य केले आहे. प्रो. जैन यांनी त्यांच्याकडील माहिती पोलिसांना कळविली नाही, याबद्दल आयोगाने जैन यांना दोष दिला आहे. एक प्राध्यापक पोलिसांकडे जाऊन पोलिसांचा ससेमिरा आपल्यामागे लावून घेण्यास तयार होणार नाही, या शक्यतेचा आयोगाने विचार केलेला नाही. शिवाय अशी

माहिती खुद्द गृहमंत्र्यांना दिल्यावर पोलिसात त्याची नोंद करण्याचाही आवश्यकता प्रो.जैन यांना वाटली नसावी! जैन यांनी आपल्याला माहितीच दिली नाही, असे मोरारजींचे म्हणणे असते तर जैन यांनी पोलिसांना त्याची का माहिती दिली नाही असा प्रश्न उपस्थित होऊ शकला असता. पण मोरारजी देसाई यांनी जैन यांनी आपल्याला माहिती दिली होती हे मान्य केलेले असल्यामुळे जैन यांनी त्यांची माहिती पोलिसांना कळवली नाही हा मुद्दा गौण ठरतो!

न्या. कपूर आयोगापुढे मोरारजींची साक्ष झाली. प्रो. जैन यांनी दिलेल्या माहितीसंबंधी मुंबईचे पोलीस उपआयुक्त जे. डी. नगरवाला यांना चौकशी करण्यासाठी २९ जानेवारीस सांगितले आणि ही माहिती स्वत: सरदार वल्लभभाई पटेल यांना सांगण्यासाठी मी त्याच दिवशी अहमदाबादला गेलो. फोनवरून ही माहिती पटेल यांना सांगणे मला गुप्ततेच्या दृष्टीने इष्ट वाटले नाही. म्हणून प्रत्यक्ष माहिती देण्याकरिता अहमदाबादला गेलो अशी साक्ष मोरारजी देसाई यांनी दिली आहे. मी जेव्हा सरदार पटेल यांना जैन यांनी दिलेली माहिती सांगितली तेव्हा सरदार पटेल मला म्हणाले, 'माझ्याही सूत्रांकडून मला (पटेल) ही माहिती समजलेली आहे.'[२९]

मोरारजी देसाई यांच्या या साक्षीवरून सरदार पटेल यांना गांधींना मारण्याच्या योजनेची २२ जानेवारीपूर्वीही माहिती होती हे दिसून येते. शिवाय मोरारजी देसाई यांनी त्यासंबंधीची माहिती पटेल यांना २२ जानेवारीस दिलेली होती. मदनलाल पाहवाला २० जानेवारीस अटक झालेली होती आणि त्याने पोलिसांना आपल्या योजनेतील इतर काही साथीदारांची नावे सांगितली होती. मदनलाल पाहवाचे निवदेन दिल्ली पोलिसांच्या हातात होते. मुंबईच्या गृहमंत्र्याने केंदीय गृहमंत्री पटेल यांना प्रत्यक्ष भेटून माहिती दिली होती आणि पटेल यांनी म्हटल्याप्रमाणे त्यांना त्यासंबंधीची माहिती आधीच समजलेली होती. मदनलालने बॉंबस्फोट केला त्यानंतर बरोबर आठ दिवसांनी महात्मा गांधींचा खून करण्यात आला. ही पार्श्वभूमी लक्षात घेता पोलिसांनी आकाशपाताळ एक करून आधी मिळालेल्या माहितीच्या आधारे गांधींची हत्या करणाऱ्यांचा शोध घ्यावयास हवा होता आणि केंद्रीय गृहमंत्र्यांनी त्याकरिता खात्याला धारेवर धरून शोध घेण्याच्या बाबतीत त्यांना सळो की पळो करून सोडावयास हवे होते. त्या दृष्टीने कोणत्या हालचाली झाल्या? मोरारजी देसाई यांनी सरदार पटेल यांना गांधींच्या खुनाची योजना असल्याचे सांगितले त्यावेळी 'मलाही त्याची माहिती मिळाली आहे.' असे सरदार पटेल

---

२९. न्या. कपूर आयोग अहवाल, खंड २

मोरारजींजवळ म्हणाले होते, याला पटेल यांचे चिटणीस व्ही. शंकर व त्यांची कन्या मणीबेन पटेल यांनीही साक्षीत दुजोरा दिला आहे. रावसाहेब पटवर्धन यांच्या सभेत बॉंबस्फोट घडवून आणणारा मदनलाल पाहवा आणि दिल्लीला गांधींच्या प्रार्थना सभेत बॉंबस्फोट घडवून आणणारा मदनलाल पाहवा एकच होता. स्वत: मोरारजी देसाई यांनी पाहवाला अटक करण्याचे आदेश दिलेले असताना २० जानेवारीपूर्वी पाहवाला पोलिसांनी अटक केली नाही. रावसाहेब पटवर्धन यांच्या सभेतील बॉंबस्फोट प्रकरणी पाहवाला अटक झाली असती तरीही गांधींचा खून टळू शकला असता! त्याचप्रमाणे २० जानेवारी १९४८ च्या बॉंबस्फोटातील मदनलाल पाहवा व जैन यांनी सांगितलेला पाहवा एकच आहे हे लक्षात घेऊन अधिक गतीने तपास झाला असता तरीही गांधींना वाचवता येणे सहज शक्य होते. महात्मा गांधींचा खून होणार आहे अशी चर्चा बरेच दिवस ऐकावयास मिळत होती. पण त्यावेळी त्यावर विश्वास बसला नाही असे एकवेळ मानता येईल. पण २० जानेवारीला गांधींच्या प्रार्थना सभेत बॉंबस्फोट झाला, त्यामुळे या चर्चेची गंभीरता लक्षात यावयास हवी होती. स्फोटानंतर गांधींच्या खुनाची शक्यता वाढली होती हे लक्षात घेऊन खबरदारी घेण्याची जबाबदारी सरकारची होती. विशेषत: केंद्रीय गृहखात्याची होती. सरदार वल्लभभाई पटेल यांना गांधींच्या खुनाची माहिती मोरारजी देसाई यांनी देण्यापूर्वीही होती. पटेल यांनी गांधींशी त्यासंबंधी चर्चाही केली. गांधींनी पोलीस बंदोबस्त घेण्याला विरोध केला होता हेही खरे आहे. पोलीस बंदोबस्त ठेवणार असाल तर मी दिल्ली सोडून जाईन असे गांधींनी म्हटले होते हेही खरे आहे. प्रश्न असा निर्माण होतो की, गांधींनी पोलीस बंदोबस्त ठेवू नका असे म्हटले, पण त्यांचे तेवढेच म्हणणे सरदार पटेल यांनी का ऐकले? पोलीस बंदोबस्त ठेवू नका एवढेच गांधींनी सांगितले होते काय? कॉंग्रेस बरखास्त करून तिचे लोकसेवा संघात रूपांतर करा असेही गांधींनी सरदार पटेल आदींना सांगितले होते. इतकेच काय पण २९ जानेवारी १९४८ रोजी महात्मा गांधींनी कॉंग्रेस बरखास्त करण्यासंबंधीच्या ठरावाचा मसुदाही तयार केला होता. "कॉंग्रेसच्या नेतृत्वाखाली भारताने राजकीय स्वातंत्र्य मिळवले आहे. कॉंग्रेसचे सध्याचे जे स्वरूप आहे, तिचा जो ढाचा आहे तो प्रचारी साधनांचा आहे. संसदीय तंत्राचे ते एक यंत्र झाले आहे आणि म्हणूनच कॉंग्रेस सध्याच्या परिस्थितीत कालबाह्य संघटना झाली आहे. राजकीय पक्षांच्या स्पर्धेपासून कॉंग्रेसला वेगळी केली पाहिजे या व आणखी अशाच कारणांमुळे कॉंग्रेस बरखास्त करून तिचे रूपांतर लोकसेवा संघात करण्यात यावे," असा गांधींनी तयार केलेल्या ठरावाचा मसुदा होता. ३० जानेवारी रोजी गांधींची हत्या झाली. त्यामुळे कॉंग्रेस महासमितीच्या अधिवेशनास ठराव आणण्याचा प्रश्न निर्माण झाला नाही.

गांधींनी पोलीस बंदोबस्त ठेवण्यास नकार दिला म्हणून त्यांचे तेवढेच म्हणणे शिरसावंद्य मानण्यात आले.

पण काँग्रेसचे लोकसेवा संघात रूपांतर करावे हे गांधींचे म्हणणे सरदार पटेल यांनी का मान्य केले नाही? काँग्रेस जर बरखास्त करावयाची नसेल तर काँग्रेसच्या अध्यक्षपदी जयप्रकाश नारायण किंवा आचार्य नरेंद्र देव यांची निवड करा असा सल्ला महात्मा गांधींनी सरदार पटेल यांना दिला होता. त्यांचा तो सल्लाही पटेलांनी का मान्य केला नाही? आणि बंदोबस्त नको हाच तेवढा सल्ला मान्य का करण्यात आला? या प्रश्नांची उत्तरे मिळावयास हवीत! ती मिळाली की गांधींचा खून का शक्य होऊ शकला याचा शोध लागतो! महात्मा गांधींच्या खुनानंतर मुंबई प्रांताच्या विधानसभेत ए. जे. दोड्डामेटी यांनी अल्पसूचना प्रश्न विचारला होता. (प्रश्न क्रमांक ८६४ दि. २० फेब्रुवारी १९४८.). या प्रश्नाच्या उत्तराचा मसुदा नेहमीप्रमाणे अधिकाऱ्यांनी तयार केला होता आणि त्याला नोकरशाही छाप उत्तर दिले होते, 'गांधी खून कटाची चौकशी अद्याप पूर्ण व्हावयाची आहे.' त्यामुळे गांधींच्या खुनासंबंधी पूर्वसूचना मिळाली होती का? या दुसऱ्या प्रश्नाला 'नाही' असे उत्तर अधिकाऱ्यांनी तयार केले होते. उत्तराच्या या मसुद्यात मोरारजी देसाई यांनी स्वत:च्या हस्ताक्षरात दुरुस्ती करून त्यांनी विधानसभेत उत्तर दिले होते. मोरारजी देसाई यांनी दिलेले उत्तर असे होते : "२१ जानेवारी १९४८ रोजी सरकारला गांधींच्या खुनासंबंधात माहिती मिळाली होती. २२ जानेवारी १९४८ रोजी सकाळी गृहमंत्रालयाला (म्हणजे केंदीय गृहमंत्री सरदार पटेल यांना) त्याची माहिती कळविली होती." पटेल यांना गांधींच्या खुनाची आधी माहिती होती याविषयी शंका घेण्याचे त्यामुळे काही कारणच नाही. सरदार पटेल यांचे चिटणीस व्ही. शंकर यांनी आपल्या साक्षीत मोरारजींनी माहिती देण्यापूर्वी 'पुण्यात गांधींच्या खुनाचा कट शिजला आहे याची माहिती पटेल यांनी दिली,' असे म्हटले आहे. पुण्यात १९३४ साली गांधींवर बाँब टाकण्याचा प्रयत्न झाला होता. पुण्यातच गांधींच्या रेल्वेला अपघात करण्याचाही प्रयत्न झाला होता. आणि सेवाग्राम येथे गांधीविरोधी निदर्शकांपैकी ल. ग. थत्ते वा नथुराम गोडसे यांच्याजवळ जंबिया मिळाला होता याचा विसर कसा पडला? पुण्यात कट शिजला आहे याची माहिती गृहमंत्रालयाला २२ जानेवारी १९४८ पूर्वीच मिळाली होती. आणि पुण्यातील हिंदुत्ववाद्यांनी पहिले प्रयत्न केले होते, त्यावरून गांधींच्या प्रार्थना सभेत पोलीस बंदोबस्त गांधींच्या इच्छेनुसार ठेवला नाही तरी गांधींनी २२ जानेवारीपूर्वी मिळालेल्या माहितीनुसार संबंधितांचा शोध घेण्याला विरोध केलेला नव्हता! मग हा शोध का घेतला गेला नाही? त्यामुळेच जयप्रकाश नारायण गांधी खुनानंतर अनेक जाहीर सभांत एक प्रश्न करीत होते,

''संस्थाने खालसा केली हे श्रेय सरदार पटेल यांचे! हैदराबादची कारवाई केली हे श्रेय सरदार पटेल यांचे, तर मग महात्मा गांधींच्या खुनाची जबाबदारी कोणाची?'' गांधींच्या खुनानंतर गांधींचा खून का झाला याची कारणमीमांसा सरदार वल्लभभाई पटेल यांनी राजाजींजवळ केली होती. ''गांधींनी पाकिस्तानला पंचावन्न कोटी रुपये द्यावेत असा सल्ला दिला होता. त्याच्या संतापातून गांधींच्या खुनाचा कट करण्यात आला. पाकिस्तान भारताविरुद्ध लष्करी कारवाई करीत असताना गांधींनी हा सल्ला दिला. यावेळी असा सल्ला देऊन गांधींनी देशाचा घात केला आणि त्यांचे हे कृत्य अक्षम्य आहे असे महाराष्ट्रातील गांधीविरोधी लोकांना वाटत होते. त्यामुळे या मूर्ख संताला नाहीसे केल्याशिवाय देशाची त्याच्यापासून सुटका होणार नाही असे कटवाल्यांना वाटत होते.''[३०] असे सरदार पटेल यांनी राजाजींना सांगितले. पण काश्मीरध्ये घुसखोर घुसले आणि काश्मीरने सामिलीकरणाचा करार केला, तेव्हा महात्मा गांधींनीच सरदार पटेल यांना काश्मीरमध्ये या आधीच सैन्य का पाठविले नाही, असा प्रश्न पटेल गांधींचा सल्ला घेण्यास गेले तेव्हा केला होता. काश्मीरमध्ये पाकने घुसघोर पाठविले तेव्हा काश्मीर हे स्वतंत्र होते. त्यामुळे काश्मीरमधील घुसखोरांचा हल्ला हा भारतावरील हल्ला ठरत नव्हता. नियोजन मंडळाचे माजी सदस्य रा. कृ. पाटील यांनी यासंबंधी मांडलेली मतेही विचारात घेतली पाहिजेत. पटेल यांच्या या सांगण्यात खून करणाऱ्यांच्या बाजूने सहानुभूती नाही असे म्हणता येईल काय? वल्लभभाई पटेल यांची ही कारणमीमांसा खरी नाही. कारण १९३४ पासून गांधींच्या हत्येचे प्रयत्न झाले त्यावेळी मग त्यांच्या हत्येचे प्रयत्न का केले जात होते? आणि तेही पुण्यातील हिंदुत्ववाद्यांकडून? पटेलांनी या प्रश्नांची उत्तरे देण्याचा कधी प्रयत्न केलेला नाही. गांधींच्या खुनासाठी ५५ कोटी रुपयांचे एक निमित्त आहे. ५५ कोटी रुपये पाकला द्या असे म्हणणारे गांधी त्यासाठी दोषी ठरत असतील तर मग पाकिस्तानला ५५ कोटी रुपये देण्याचा करार करणारे दोषी नाहीत काय? मुळात हा करार कोणी केला? पटेल यांनी त्याला विरोध केला होता काय? अजिबात नाही! मग करार करणारे दोषी न धरता कराराचे पालन करा असे म्हणणाऱ्या महात्मा गांधींना दोषी ठरवून त्यांचा खून करणाऱ्यांचे समर्थन होईल अशी भूमिका घेणाऱ्यांचे हात गांधींच्या खुनात रंगलेले नाहीत असे मानावयाचे काय?

महात्मा गांधींच्या खुनाच्या आधी खुन्यांनी काय काय केले याचा आढावा घेण्यापूर्वी न्या. कपूर आयोगाने गांधीजींचे प्राण वाचविता येणे शक्य होते का,

---

३०. गांधीजीज टीचिंग्ज अ‍ॅण्ड फिलॉसॉफी, राजाजी

या संबंधात काय म्हटले आहे ते पाहणे उद्‌बोधक होईल. प्रार्थना सभेत बाँबस्फोट झाला होता. त्यापूर्वी मिळालेली माहिती आणि बाँबस्फोटानंतर स्वत: मदनलाल व प्रो. जैन यांनी दिलेली माहिती विचारात घेता गांधींच्या खुनाची शक्यता नजरेआड करणे योग्य नव्हते. गांधींनी त्यांच्या संरक्षणाची सूचना फेटाळली असताना पोलीस संरक्षणाचे अवडंबर न माजवताही गांधींना पोलीस संरक्षण देता येणे शक्य होते आणि तसे संरक्षण देण्याचा प्रयत्न करावयास हवा होता.[३१] न्या. कपूर आयोगाने '२० जानेवारीच्या स्फोटापूर्वी मिळालेली माहिती' असे म्हटलेले आहे. सरदार पटेल यांना स्फोटापूर्वी म्हणजे २० जानेवारीपूर्वी माहिती मिळालेली होती, त्या संदर्भात हे वाक्य नमूद केलेले आहे हे लक्षात घेतले पाहिजे. गांधींची हरकत राहणार नाही अशा पद्धतीने कसे संरक्षण देता आले असते याचाही ऊहापोह न्या. कपूर यांनी आपल्या अहवालात केलेला आहे. साध्या वेशातील पोलीस व काँग्रेसच्या निष्ठावान कार्यकर्त्यांचे कडे महात्मा गांधींच्या भोवती उभे करून गांधींना संरक्षण देता आले असते. निदान तसा प्रयत्न तरी करावयास हरकत नव्हती. ही साधी गोष्टही गांधींना संरक्षण देण्याच्या बाबतीत करण्यात आली नव्हती. अहवालात असे म्हटले आहे, "या प्रकारे कडे केले असते तर नथुराम गोडसेला गांधींच्या छातीवर पिस्तुल रोखून गोळ्या मारता येण्याची शक्यता राहिली नसती. सर्व शक्यतांचा विचार करून त्यावर उपाय योजणे हे सरकारचे कर्तव्य असते." सरदार पटेल यांच्या कारभाराच्या कार्यक्षमतेचा गौरव करण्यात येतो. असे असूनही त्यांच्यासारख्या नेत्याच्या हातात गृहखाते असताना राष्ट्रपित्याचे प्राण वाचवता आले नाहीत. गांधींची हत्या काही तशी अचानक घडलेली नाही. २० जानेवारीला बाँबस्फोट झालेला होता. त्यापूर्वी सरदार पटेल यांनीच आपल्याला गांधी हत्येसंबंधी माहिती मिळाली आहे असे सांगितले होते. मोरारजी देसाई यांनी २२ जानेवारी रोजी सरदार पटेल यांना जैन यांनी दिलेली माहिती सांगितली होती. मग त्यानंतरच्या दहा दिवसांत गांधींना संरक्षण देऊ काय, हे विचारण्यापलीकडे काय करण्यात आले? या पार्श्वभूमीवर जयप्रकाश नारायण संस्थाने खालसा केली हे पटेलांचे श्रेय, हैदराबादची कारवाई केली हे पटेलांचे श्रेय तर मग गांधींच्या खुनाची जबाबदारी कोणाची, हा जो प्रश्न करीत, तो का करीत होते हे समजून येते. गांधींना आपले सहकारी आपल्याबरोबर राहिलेले नाहीत याची जाणीव फाळणीच्या आधीपासूनच होऊ लागली होती. बॅ. पुरुषोत्तमदास त्रिकमदास गांधींना जानेवारी १९४८ च्या पहिल्या आठवड्यात भेटवायास गेले होते. समाजवाद्यांनी काँग्रेसमधून बाहेर पडण्याचा विचार केला आहे

---

३१. न्या. कपूर आयोग अहवाल, खंड २

हे सांगण्याकरिता बॅ. पुरुषोत्तम त्रिकमदास गेले होते. त्यावेळी त्यांच्याजवळ गांधी म्हणाले, "सरदार स्वतःला माझा चेला म्हणवून घेतात. जवाहरलाल मी त्यांचा (गांधी) मुलगा आहे असे म्हणतात. दोघेही मला वेडा समजत आहेत. 'मेरा कोई सुनता नही है।' 'मी एकाकी पडलो आहे' असे गांधी फाळणीच्या प्रश्नावरही अनेकदा म्हणाले होते. काँग्रेसने आपल्या ध्येयधोरणात 'सत्य-अहिंसा' यांचा समावेश करण्यास विरोध केला तेव्हा १९३४ मध्ये गांधींनी काँग्रेसचे सभासदत्व सोडले. पण समाजवाद्यांनी काँग्रेस सोडण्याचे ठरविले आहे असे बॅ. पुरुषोत्तमदास त्रिकमदास यांनी गांधींना सांगितले त्यावेळी गांधींनी त्यांना 'माझे उपोषण संपेपर्यंत तुम्ही काँग्रेसबाहेर पडू नका. काय सांगावे, कदाचित मीच तुमच्या पक्षात सामील होईन.' असे गांधी म्हणाले होते.[३२] बॅ. पुरुषोत्तमदास त्रिकमदास यांनी हे सांगितले आहे. त्यामुळे त्याविषयी संशयाला जागा राहात नाही. गांधी समाजवादी पक्षाच्या परिषदेला हजर होते, अशा त्यावेळच्या बातम्यांनाही दुजोरा मिळतो.

महात्मा गांधींनाही समाजवादी पक्षाविषयी वेगळ्या प्रकारे आकर्षण वाटत असावे. म्हणूनच गांधींच्या समाजवाद्यांकडून काही अपेक्षा होत्या. काँग्रेस बरखास्त केली तर ज्यांना विधायक कार्यात रस आहे असे काँग्रेसजन लोकसेवा संघात जातील आणि नेहरूंसारखे समाजवादी विचाराचे नेते समाजवादी पक्षात जातील. सरदार पटेल यांच्यासारख्या नेत्यांनी वाटल्यास उजव्या विचारांचा पक्ष स्थापावा असे काहीसे गांधींच्या मनात होते. म्हणून त्यांनी काँग्रेस बरखास्त करावी अशी सूचना केली असावी! काँग्रेसअंतर्गत काँग्रेस सोशॅलिस्ट पार्टीची १९३४ साली परिषद झाली. या परिषदेला स्वतः महात्मा गांधी हजर होते असा वृत्तान्त २ जुलै १९३४ च्या दैनिक 'सकाळ'मध्ये आलेला आहे. "काँग्रेसचे उपांग म्हणून या पक्षाची (काँग्रेस सोशॅलिस्ट पार्टी) स्थापना केली हे ठीक झाले आहे. तथापि या पक्षाचा कार्यक्रम अद्याप उत्तम तऱ्हेने झाला नाही. त्यात बऱ्याच गोष्टी सुधाराव्या लागतील. वर्गावर्गांत भांडणे, अहमहमिका आज सर्वत्र चालू आहे. त्यात अत्याचाराचा प्रादुर्भाव झाला म्हणजे कोणताही झगडा काँग्रेस ध्येयाशी विसंगत ठरतो हे विसरता कामा नये. आजच्या सोशॅलिस्ट पक्षास अनत्याचाराचे व्रत पाळावयाचे असल्यास मोठ्या आनंदाने या पक्ष स्थापनेस संमती द्यावयास तयार असल्याचे महात्माजींनी जाहीर केले." असा वृत्तान्त 'सकाळ'च्या या अंकात 'सोशॉलिस्ट पार्टीच्या परिषदेस महात्माजी' या शीर्षकाखालील बातमीत प्रसिद्ध झाला आहे. समाजवादी पक्षाविषयी सहानुभूती असल्यामुळेच महात्मा गांधींनी

---

३२ न्या. कपूर आयोग अहवाल, खंड २

बॅ. पुरुषोत्तम त्रिकमदास यांना 'थोडे थांबा. कदाचित मीही तुमच्या पक्षात सामील होईन' असे सांगितले असण्याची शक्यता अधिक वाटते.

महात्मा गांधींचा पोलीस बंदोबस्ताला विरोध असतानाही बंदोबस्त ठेवण्यात आला होता असे सांगण्यात येते. पण हा बंदोबस्त किती होता? सप्टेंबर १९४७ मध्ये बंदोबस्तावर एक फौजदार, चार पोलीस हवालदार होते. २० जानेवारी १९४८ च्या स्फोटानंतर हा बंदोबस्त वाढवला आणि एक असिस्टंट इन्स्पेक्टर, दोन फौजदार व सोळा पोलीस असे सर्व मिळून सव्वीसजणांचा बंदोबस्त ठेवलेला होता. ३० जानेवारी १९४८ रोजी त्यातील एक अधिकारी ए. एन. भाटिया बंदोबस्ताला आलेच नाहीत. भाटिया यांनी रजाही घेतलेली नव्हती आणि ते बंदोबस्तासाठीही आलेले नव्हते. सबइनस्पेक्टर अमरनाथ बंदोबस्ताच्या ठिकाणी उशिरा आला. बिर्ला हाऊसचा माळी रघुनाथ नाईक याने साक्षीत असे सांगितले की, त्याने गांधींवर गोळ्या झाडणाऱ्याला पकडले. त्याच्या मदतीला नंतर दोन पोलीस आले. एक इन्स्पेक्टर व एक सबइन्स्पेक्टर होते. त्यांनी गोडसेला पकडले नाही. २० जानेवारीच्या स्फोटापूर्वी पाचजण बंदोबस्ताला होते. त्यात वाढ करून सव्वीसजण ठेवले. त्यातील एक अधिकारी ३० जानेवारीला आलेलाच नव्हता आणि एक महाशय गांधींचा खून झाल्यावर आले. गोडसेला पकडले माळ्याने! त्याच्या मदतीला दोन पोलीस नंतर धावले! ही बंदोबस्ताची तऱ्हा! गांधींच्या खुनातील आरोपी १८ जानेवारीला संध्याकाळी प्रार्थना सभेच्या ठिकाणी जाऊन आले होते. १९ जानेवारीला मदनलालसह सर्वजण पुन्हा प्रार्थना सभेच्या ठिकाणी गेले. १९ जानेवारीस चार वाजता त्या सर्वांनी पुन्हा प्रार्थना सभेच्या ठिकाणी जाऊन पाहणी केली आणि पोलीस बंदोबस्ताची माहिती घेतली. त्या दिवशी सकाळी दहा वाजताही हे सर्वजण प्रार्थना सभेच्या ठिकाणी गेलेले होते. दिवसातून तीन-तीन, चार-चार वेळा गटागटाने ही मंडळी येऊन गेली. हे लोक वारंवार का येत आहेत असा संशयही बिर्ला हाऊसवर बंदोबस्तासाठी असलेल्या पोलिसांना आला नव्हता.

२० जानेवारीला गोडसे आजारी होता म्हणून हिंदू महासभा भवनातच राहिला. पण चारजण सकाळी साडेदहा वाजता प्रार्थना सभेच्या ठिकाणी पुन्हा जाऊन आले. २० जानेवारीला स्फोट झाला. मदनलालला पकडले. त्यावेळी त्याच्याजवळ हातबॉंबही मिळाला. त्याच दिवशी नथुराम गोडसे व नारायण आपटे कानपूर-अलाहाबाद मार्गे मुंबईला पोहोचले. १९३४ पासून हिंदुत्ववादी गांधींवर बॉंब फेकत होते. त्यानंतर पुण्यात व नगरमध्येही अनेक बॉंबस्फोट केल्याबद्दल मदनलाल व करकरे यांस अटक करण्याचे आदेश स्वत: मोरारजी देसाई यांनी दिले होते. पण

त्यांना पोलिसांनी अटक केली नाही. २० जानेवारीच्या स्फोटापूर्वी सरदार पटेल यांना गांधी हत्येच्या कटाची माहिती मिळाली होती. २२ जानेवारीला मोरारजी देसाई यांनी स्वत: सरदार पटेल यांना गांधी हत्येसंबंधातील माहिती दिलेली होती. खुनी २० जानेवारीपासून बिर्ला हाऊसची वारंवार पाहणी करून येत होते. हिंदू महासभेच्या कार्यालयापाठीमागे ते नेमबाजीचा सराव करीत होते तरी दिल्लीच्या पोलिसांना कटवाल्यांचा शोध घेता आला नाही. हे सर्व पाहता प्यारेलाल यांनी दिल्ली पोलिसांत रा. स्व. संघवाले व गांधींविरोधी असलेले 'इन्फल्ट्रेट' झालेले होते असे म्हटले आहे. ते या मतावर का आले यावर प्रकाश पडतो. २० जानेवारीच्या स्फोटाची बातमी देताना स्टेटस्मनने हा गांधींना ठार मारण्याचा कट होता असे म्हटले. बॉंब क्रॉनिकलने अशीच बातमी दिली होती. मदनलालने पकडल्यानंतर करकरेचे नाव व तो कोठे उतरला आहे, त्याच्याबरोबर आणखी कोणकोण आहेत त्याची सर्व माहिती पोलिसांना दिली होती. २१ जानेवारीला मदनलालला १५ दिवसांचा रिमांड मिळाला. त्या दिवशी त्याने पुण्याच्या 'हिंदू राष्ट्र' वृत्तपत्राच्या मालकाचे नाव सांगितले. (त्याचा मालक नुथराम गोडसे होता.) २३ जानेवारीला मरीना हॉटेलमधील हॉटेल बॉयने 'एन. व्ही. जी.' असे इंग्रजी अक्षरातील धोबी मार्क असलेले कपडे पोलिसांना दिले. ३० जानेवारीपूर्वी एवढा सबळ पुरावा मिळूनही पोलिसांना पुण्याच्या 'हिंदू राष्ट्र' या वृत्तपत्राचा मालक कोण आहे हे आणि त्याचा ठावठिकाणा शोधून काढता आला नाही. कार्यक्षम गृहखात्याचे पोलीस इतके कार्यक्षम होते! दिल्ली पोलिसांनी धोबी मार्कच्या कपड्यांची गोष्ट मुंबई पोलिसांना सांगितलेली नव्हती. २९ व ३० जानेवारीला बिर्ला मंदिराच्या मागच्या भागातही या लोकांनी नेमबाजीचा सराव केला.

महात्मा गांधींचा अंत्यविधी झाल्यानंतर रा. स्व. संघावर बंदी घालण्याचा निर्णय घेण्यात आला आणि या निर्णयाच्या गुप्त सूचना प्रांतिक सरकारांना रात्री कळवावयाच्या असा निर्णय झाला होता. गुप्तता राखून संघ बंदीची अंमलबजावणी करावयाची असे ठरले होते. पण मंत्रिमंडळाचा हा निर्णय काही तासातच संघाच्या लोकांना समजला आणि ते भूमिगत झाले. २० जानेवारीच्या स्फोटानंतर मदनलालने जे निवेदन केले त्याची माहिती मंत्रिमंडळाच्या बैठकीपर्यंत कोणालाही नव्हती, असे केंद्रीय गृहखात्याचे सचिव आर. एन. बॅनर्जी यांनी म्हटले आहे.[३३] पण मंत्रिमंडळाच्या बैठकीत सायंकाळी संघावरील बंदीचा निर्णय घेतला. तो रात्री उशिरा सर्व राज्य सरकारांना कळवावयाचा असे ठरले होते. पण सायंकाळ ते रात्री

---

३३. न्या. कपूर आयोगापुढील गृहसचिव आर. एन. बॅनर्जी यांची साक्ष

उशिरापर्यंतच्या मधल्या काही तासातच हा निर्णय संघाच्या लोकांपर्यंत पोहोचतो कसा? हा निर्णय कोणी फोडला असेल? हा गुप्त निर्णय संघापर्यंत लगेच पोहोचला, पण मदनलालचा कबुलीजबाब मात्र गृहसचिवापासूनही लपवून ठेवला गेला. मदनलालने २० जानेवारी १९४८ रोजी निवेदन केले. ती माहिती मात्र मंत्रिमंडळापासून गुप्त ठेवली गेली! मंत्रिमंडळाचा गुप्त निर्णय काही तासात संघाच्या नेत्यांना समजतो आणि मदनलालचे निवेदन मंत्रिमंडळापासून गुप्त राहते! हा काय कारभार म्हणावयाचा? जयप्रकाश नारायण यांचे १५ फेब्रुवारी १९४८ रोजी पाटण्यात भाषण झाले. टाइम्स ऑफ इंडियाच्या १८ फेब्रुवारी १९४८ च्या अंकात जयप्रकाश नारायण यांच्या त्या भाषणाचा वृत्तान्त प्रसिद्ध झाला आहे. "रा. स्व. संघाला काही प्रमुख मंत्र्यांनी खतपाणी घातले नसते आणि संघाच्या मेळाव्यांना ते हजर राहिले नसते तर महात्मा गांधी इतक्या तडकाफडकी आपल्यातून गेले नसते!" असे जयप्रकाश नारायण यांनी त्या भाषणात उद्गार काढले होते. जयप्रकाश नारायण, डॉ. राममनोहर लोहिया व कमलादेवी चट्टोपाध्याय यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेतली. 'बॉंबे क्रॉनिकल'मध्ये त्याचा ४ फेब्रुवारी १९४८ रोजी वृत्तान्त आला. 'मंत्रिमंडळात जातीयवादी मंत्र्यांना स्थान देऊ नये' अशी मागणी या नेत्यांनी केली होती. महात्मा गांधींच्या खुनानंतर रा. स्व. संघाला कॉंग्रेसची यूथ विंग म्हणून मानावे असा ठराव कॉंग्रेस कार्यकारिणीत होऊ नये याकरिता ज्या नेत्यांनी प्रयत्न केले होते त्यात तेव्हाचे महाराष्ट्र कॉंग्रेसचे सरचिटणीस यशवंतराव चव्हाण यांची कामगिरी मोलाची होती.

महात्मा गांधींचे प्राण वाचविता येणे सहज शक्य होते. कारणे काहीही असोत पण त्यांचे प्राण वाचविण्याचे प्रामाणिक प्रयत्न झालेले नाहीत. गांधींच्या राजकीय उदयापासून हिंदुत्ववाद्यांची त्यांच्याविषयीची भूमिका विरोधाचीच होती. गांधींविषयी सर्वसामान्य माणसात द्वेषाचीच भावना निर्माण होईल असा विषारी प्रचार केला जात होता. त्याकरिता बॉंबचा वापर केला जात होता. २० जानेवारीच्या बॉंबस्फोटानंतर मदनलालने गांधींच्या खुनाच्या कटामागे कोण आहे त्याची माहिती दिलेली होती. भारताचे पोलादी पुरुष गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांना २० जानेवारीपूर्वी गांधी खून कटाची माहिती होती. तरीही ३० जानेवारी १९४८ ची ती महाभंयकर संध्याकाळ रोखता आली नाही! कटाच्या गुप्ततेमुळे गांधी हत्या होईपर्यंत कटाचा सुगावा लागला नाही, अशी परिस्थिती नव्हती. किमान पंधरा दिवस आधी खून कटाचा सुगावा लागला होता. तरीही पोलिसांना त्याचा वेळीच शोध लावता आला नाही. यामागे केवळ पोलिसांचा गलथानपणा आहे असे मानावयाचे? पोलीस गलथान होते. परंतु सरकारात बसलेले नेते गलथान नव्हते? कटवाल्यांना शोधून

काढण्यासाठी सरकारांत बसलेल्यांनी पोलीस खात्याला धारेवर धरून त्यांच्याकडून कामे करून घ्यावयास नको होती का? हैदराबादची कारवाई करताना ही तप्तरता दाखवून दिलेली होती! संस्थाने खालसा करताना हा खंबीरपणा सिद्ध झाला होता! मग गांधी खुनाच्या वेळी कार्यक्षमता का कमी झाली?

बाँबस्फोटानंतर कटवाल्यांना पकडण्यासंबंधात पोलिसांचीही 'तप्तरता' जगातील सर्व पोलिसांना लाज आणणारी ठरावी! २५ जानेवारीला डी. आय. जी.- सी. आय. डी. यू. एच. राणा यांना मदनलालचे निवेदन दिले. कटवाल्यांना शोधून काढण्याकरिता त्यांना हे निवेदन दिले. राणांनी वास्तविक त्यासाठी तातडीने मुंबईला रवाना होऊन चौकशीची चक्रे जोराने फिरवावयास हवी होती. पण राणा दिल्लीहून मुंबईला आले ते अलाहाबाद मार्गे. विमानाचा प्रवास राणांना झेपत नव्हता म्हणून ते रेल्वेने प्रवास करावयाचे! त्यांना विमानाचा प्रवास झेपत नव्हता तर मदनलालचे निवेदन घेऊन दिल्लीहून विमानाने प्रवास करू शकणारा अधिकारी पाठवावयाचा किंवा विमानाने मुंबईला पोहोचून चौकशीच्या कामाची जबाबदारी आणखी कोणावर तरी सोपावावयाची! राणांचे रिझर्वेशन त्रिवेणीहून केलेले होते. अलाहाबाद मार्गाने मुंबईला पोहोचण्यास वेळ लागेल. त्या मानाने या मार्गाने म्हणजे त्रिवेणीहून ते लौकर पोहोचले असते. पण राणांनी रिझर्वेशन असतानाही अलाहाबादमार्गे प्रवास केला. त्यापेक्षा कबुतरामार्फत पाठविलेले निर्णय मुंबईला लौकर पोहोचले असते! दरम्यानच्या काळात २४ जानेवारीला दिल्लीचे अन्य काही पोलीस मुंबईला गेले होते; ते लगेच दुसऱ्या दिवशी परत दिल्लीला येऊन दाखल झाले. २४ जानेवारीस दिल्लीचे पोलीस गेले आणि २५ जानेवारीला लगेच का परतले, तर म्हणे मुंबई पोलिसांनी त्यांचे चांगले आदरातिथ्य केले नाही. चांगली वागणूक दिली नाही म्हणून गृहखात्याचे हे 'जावई' रुसून परत आले! राष्ट्रपित्याच्या खुनाच्या प्रयत्नात असलेल्यांचा शोध घेण्याच्या कामापेक्षा त्यांना आदरातिथ्याचे महत्त्व अधिक वाटत होते. डी.आय.जी.-सी. आय. डी. २७ जानेवारीला दिल्ली, अलाहाबाद असे करीत मुंबईला येऊन दाखल झाले. मुंबईचे पोलीस उपायुक्त जे. डी. नगरवाला, राणा व दिल्लीचे गुप्तचर विभागाचे वरिष्ठ अधिकारी संजिवी यांच्यात चर्चा सुरू झाली. त्यावेळी राणांनी नगरवालांना मदनलालचे निवेदन वाचावयास दिले. निवेदनाची जेमतेम दोन पाने वाचून होतात न होतात तोच त्यांच्याकडून ते निवेदन काढून घेतले. निवेदन खूपच मोठे आहे. ते वाचावयास वेळ लागेल. मी ते पुण्याहून पाठवून देतो, असे राणांनी नगरवालांना सांगितले. पण (अद्यापपर्यंत) मदनलालच्या निवेदनाची ती प्रत पाठवली गेलेली नाही! नथुराम गोडसेचे 'अग्रणी' हे वृत्तपत्र होते. २० जानेवारीच्या कबुलीजबाबात मदनलालने

त्याचीही माहिती दिली होती. हा सर्व तपशील न्या. कपूर आयोगाच्या अहवालात आहे. घटना समितीमध्ये अनंतशयनम् अय्यंगार यांनी बॉंबस्फोटाच्या घटनेपासून गांधींची हत्या होईपर्यंतच्या काळात गांधींचे प्राण वाचवण्याकरिता कोणते उपाय योजले, असा प्रश्न ६ फेब्रुवारी १९४८ रोजी गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांना विचारला होता. गांधींनी संरक्षण नाकारले याची तबकडी पटेल यांनी वाजविली. त्यावर उपप्रश्नांची सरबती झाली. ही उत्तरे संतापजनक होती. आता तर त्या उत्तरांमुळे हसूच येते! 'पुरेशी उपाययोजना केली होती, मदनलालच्या कबुलीजबाबाची प्रत मुंबईला पाठविली होती; मदनलालच्या निवेदनाप्रमाणे नथुराम गोडसे याला पकडले असते तर किंवा त्याला पकडण्याची घाई केली असती तर कटातील बाकीचे लोक भूमिगत झाले असते, या कारणामुळे आता कोणालाच अटक करावयाची नाही असा निर्णय दिल्ली पोलिसांनी मुंबई पोलिसांशी विचार करून घेतला' अशी उत्तरे देण्यात आली.

उपप्रश्न : संशयितांना पकडणे सोपे व्हावे म्हणून त्यांची छायाचित्रे मिळवण्याचा काही प्रयत्न केला होता?

उत्तर : हे सारे संशयित एकत्र नव्हते. त्यामुळे त्यांची छायाचित्रे मिळवता आली नाहीत.

संशयित आरोपींच्या लग्नाची छायाचित्रे छापावयाची नव्हती! त्यांच्या एकत्रित छायाचित्रांचा संबंध कोठे येत होता? मदनलालच्या निवेदनातून गांधींची हत्या करण्याच्या कटातील मुख्य सूत्रधार नथुराम गोडसे होता हे समजले होते. त्याला का पकडले नाही, तर म्हणे त्याचे इतर साथीदार पळून जातील! जे कोणी सापडतील त्यांना पकडून त्यांच्याकडून अधिक माहिती मिळवता आली असती. दिल्ली पोलिसांमधील दोन वरिष्ठ अधिकारी विमानाने मुंबईचे उपायुक्त नगरवाला यांना भेटण्यासाठी २१ जानेवारीला मुंबईला रवाना झाले. पण बॉंबस्फोटाची तपशीलवार माहिती व मदनलालचे निवेदन असलेली डायरी हे पोलीस अधिकारी दिल्लीलाच विसरले आणि कागदपत्राशिवाय कटवाल्यांचा शोध घेण्यासाठी ते मुंबईत दाखल झाले.[३४] कटवाल्यांची वर्णने नोंदवून घेतानाही दिल्ली पोलिसांनी इतका गोलमाल केला होती की त्यावरून कोणालाही कटवाल्यांचा शोध घेता येणे शक्य होऊ शकले नसते. इतकी उलटसुलट वर्णने त्यांनी नोंदविली होती. वरिष्ठ पातळीपासून गांधींविषयी रागाची, तिरस्काराची ~~व~~ उदासीनतेची भूमिका असल्याशिवाय संपूर्ण पोलीस दल इतके गलथान राहू शकणार नाही. लहान मुले 'पोलीस-पोलीस' खेळ

---

३४. न्या. कपूर आयोग अहवाल, खंड १

खेळू लागली तरी ती यापेक्षा अधिक अक्कलहुशारीने वागली असती!

प्रो. जे. सी. जैन यांनी मोरारजी देसाई यांना महात्मा गांधींच्या खुनासंबंधी आधी माहिती दिलेली होती हे न्या. कपूर आयोगाने मान्य केले आहे. मनोहर माळगावकर यांनी जैन यांनी आधी माहिती दिली होती याविषयी त्यांच्या गांधी खुनावरील पुस्तकात शंका व्यक्त केलेली आहे. पण न्या. कपूर यांनी जैन यांनी मोरारजींना आधी माहिती दिली असल्याचे मान्य केले असल्यामुळे माळगावकरांची शंका ही एखाद्या राजकीय विचारांच्या प्रभावामुळे आली असावी का असा प्रश्न पडतो. महात्मा गांधींच्या जीविताला पुण्यामधून काही धोका आहे असे आपल्याला वाटले नाही, हा मुंबई राज्याचे गृहमंत्री मोरारजी देसाई यांचा युक्तिवाद आयोगाने फेटाळून लावला आहे. महात्मा गांधी व काँग्रेसचे इतर काही नेते यांच्या हत्येसंबंधी पुण्याहून बातम्या मिळत असताना पुण्याहून हा धोका नाही हे समजणे योग्य नव्हते, हे म्हणणे पटणारे नाही. पुण्यामध्ये योग्य खबरदारी घेण्याची आवश्यकता वाटली नाही. मुंबई सरकारला यासंबंधातील आपली जबाबदारी टाळता येणार नाही, असे अहवालात म्हटले आहे.

महात्मा गांधींच्या अंत्यविधीनंतर ३१ जानेवारी १९४८ रोजी सरदार पटेल यांच्या निवासस्थानी गृहखात्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक भरली. या बैठकीत प्रथमच असे सांगण्यात आले की, स्फोटाच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे २१ जानेवारीस सकाळी दिल्ली पोलिसांजवळ मदनलालचे संपूर्ण निवेदन होते. गांधी खुनाच्या कटाची संपूर्ण योजना मदनलाल पाहवाच्या या निवेदनात होती. त्या निवेदनाच्या आधारे २३ जानेवारीसच गोडसे व आपटे यांना पकडता येणे सहज शक्य होते. पण कोणीही त्याप्रमाणे कारवाई योजली नाही. गृहखात्याला या निवेदनाची कसलीही माहिती दिल्ली पोलिसांनी सांगितलेली नव्हती. ३१ जानेवारीला पटेल यांच्या निवासस्थानी झालेल्या बैठकीतच प्रथम ही माहिती सांगण्यात आली.[३५] मदनलाल याचे हे निवेदन ३१ जानेवारी १९४८ रोजीच्या बैठकीत प्रथमच दाखवण्यात आले. या निवेदनातील माहितीचा उपयोग करून घेतला असता तर नथुराम गोडसे व नारायण आपटे यांना त्याच दिवशी दिल्लीत पकडता आले असते. २१ जानेवारीला सकाळी गोडसे व आपटे दिल्लीतच होते, असे गृहसचिव बॅनर्जी यांनी आपल्या साक्षीत सांगितले. दिल्लीचे वरिष्ठ पोलीस अधिकारी संजिवी यांना आयोगाने तुम्ही त्वरित कारवाई का केली नाही असे विचारले तेव्हा संजिवींनी 'सॉरी' एवढेच उत्तर दिले. हे सर्व पाहिले की देशाच्या

---

३५. *सिव्हिल सर्व्हंट इन इंडिया, के. एल. पंजाबी आणि न्या. कपूर अहवाल, खंड १*

राजधानीतील हे पोलीस दल होते की बाजारबुणग्यांचा तो अड्डा होता असा प्रश्न पडतो. पोलादी पुरुषाचाही पोलिसांना कसा वचक नव्हता? गृहखात्याचा हा सारा कारभार पाहूनच अच्युतराव पटवर्धन यांनी सरदार पटेल यांना मंत्रिमंडळातून काढून टाकावे अशी मागणी केली होती. सरदार पटेल व पं. नेहरू यांचे गांधींच्या हयातीत मंत्रिमंडळाच्या बैठकीत खटके उडत होते. पटेलांची कन्या मणीबेन पटेल यांनी त्यांच्या रोजनिशीत पटेलांनी गांधींना या मतभेदाची माहिती दिली होती, अशी नोंद केली आहे. सरदार पटेल यांना गांधींच्या खुनासंबंधात पश्चात्ताप वाटत असावा किंवा शल्य बोचत राहिले असावे असे मणीबेन पटेल यांच्या रोजनिशीवरून दिसते. 'मी गांधींना एकटेच जाऊ दिले. त्यांच्याबरोबर मीही जावयास हवे होते' असे पटले म्हणत, असा त्यांच्या रोजनिशीत उल्लेख आहे.

मदनलालला बॉंबस्फोटात अटक करण्यात आली. त्याचे निवेदन पोलिसांना मिळाले आणि तो मुंबईतील आहे, त्याचे सूत्रधार पुण्यातील आहेत, याची माहिती मिळाल्यानंतरही कटवाल्यांना मुंबई-पुण्याचे पोलीस ओळखू शकतील, असा विचार करून त्यांची मदत घ्यावयास हवी होती. पण अशी त्यांची मदत घेण्याचे दिल्ली पोलिसांनी टाळले. दिल्ली पोलिसांनी महाराष्ट्रातील पोलिसांना बोलावून घेऊन त्यांना गांधींच्या निवासस्थानाजवळ पाळत ठेवण्यास सांगावयास हवे होते. तशी पाळत दिल्ली पोलिसांनी ठेवली नाही असे गृहसचिव बॅनर्जी यांनी म्हटले आहे. मदनलालला बॉंबस्फोटात पकडले असल्याची बातमी आल्यावर मुंबई पोलिसांनी आपल्याला पाहिजे असलेला हाच तो मदनलाल पाहवा आहे हे लक्षात घेऊन स्वत: होऊन मुंबई पोलिसांतील कोणालाही दिल्लीला पाठविले नाही. आपल्या राज्यातील गुन्हेगारांचा शोध घेण्यासाठी दुसऱ्या राज्यांत पोलीस पाठवून कोणत्याही राज्याचे पोलीस तेथे शोध घेतात. बऱ्याच वेळा त्या राज्यातील पोलिसांची मदत घेऊनही गुन्हेगारांचा शोध घेतला जातो. गांधींच्या खुनानंतर ३१ जानेवारीत अंत्यविधी होईपर्यंत केंद्रीय गृहसचिव बॅनर्जी यांना गांधींचा खून करण्याचा कट असल्याचा मदनलालचा २०-२१ जानेवारीचा कबुलीजबाब दाखवलेला नव्हता. मोरारजी देसाईंनी २२ जानेवारीस सरदार पटेल यांना खुनासंबंधात माहिती दिली होती किंवा त्याहीपूर्वी पटेल यांना खुनाची माहिती मिळालेली होती, याची बॅनर्जी यांना पटेलांनी कल्पना दिलेली नव्हती. पण स्वत: पटेल यांना खुनासंबंधी आधी माहिती असल्यामुळे त्यांनी गृहसचिवांमार्फत किंवा वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांमार्फत मदनलाल पाहवाच्या अटकेनंतर कटवाल्यांचा शोध घेण्याच्या दृष्टीने कोणती उपाययोजना केली होती याची विचारणा करणे गरजेचे होते. पण पटेलांनी तीही विचारणा केलेली नव्हती. त्यांनी तशी विचारणा

केली असती तर गृहसचिव बॅनर्जी अथवा वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी तशी साक्ष दिली असती. पण यापैकी कोणीही यासंबंधात काय उपाययोजना करण्यात आली आहे असे पटेलांनी विचारले होते, किंवा ते विचारीत होते असे सांगितले नाही. गृहसचिव बॅनर्जी तर म्हणतात, "२० जानेवारीच्या रात्री व २१ जानेवारीच्या सकाळी दिलेल्या मदनलालच्या कबुलीजबाबातून जी माहिती मिळाली तिच्या आधारे कटवाल्यांचा शोध घेण्याच्या दृष्टीने प्रयत्नच झाले नाहीत. हे प्रयत्न झाले असते तर गोडसे-आपटे यांना अटक करता येणे सहजशक्य होते." या संदर्भात न्या. कपूर आयोगाने गृहखात्याच्या कारभारावर ताशेरे मारेल आहेत. मदनलाल पाहवाने मला १९८८-८९ च्या दरम्यान नेहरूंनाही मारण्याचा आमचा कट होता असे सांगितले होते; ते खरे असावे. पंतप्रधान पं. नेहरूंच्या सुरक्षिततेची व्यवस्था पाहणारे जी. के. हंडू यांनी साक्षीत त्याचा उल्लेख केलेला आहे. गोडसेने गांधींनंतर नेहरूंना मारण्याचे आमचे लक्ष्य होते असे हंडूंना सांगितले होते. या साक्षीनंतर न्या. कपूर आयोगाने आपल्या निष्कर्षात म्हटले आहे की, हे सर्व पाहता राजकीय व जातीय उद्दिष्टे साध्य करण्याकरिता **राजकीय नेत्यांचे खून करण्याच्या विचारसरणीचा हा गट होता हे स्पष्ट होते. गोडसेबरोबर असणाऱ्यांचा गट व त्यांच्या हालचाली अतिशय धोकादायक होत्या. मदनलालच्या निवेदनानंतर मुंबई पोलिसांनी या गटाच्या लोकांना ओळखू शकतील असे महाराष्ट्रातील पोलीस दिल्लीस तपासासाठी बोलवावयास हवे होते. मुंबई-पुण्याचे पोलीस दिल्लीला गेले असते किंवा दिल्ली पोलिसांनी त्यांची मदत मागितली असती तर रेल्वे स्टेशन, हॉटेल्स, धर्मशाळा व राजकीय पक्षांची कार्यालये, बिर्ला हाऊसची प्रवेशद्वारे व प्रार्थना सभेच्या ठिकाणी त्यांच्या तुकड्या ठेवता आल्या असत्या आणि महात्मा गांधींचा खून टाळता आला असता. महात्मा गांधींनी त्यांच्या प्रार्थना सभेच्या ठिकाणी पोलिसांना येऊ दिले नसते हे खरे आहे. पण माळी, बिर्ला हाऊसची देखभाल करणारे किंवा अशाच प्रकारच्या नोकरांच्या रूपाने साध्या वेशातील पोलीस तेथे ठेवता येणे सहज शक्य होते.**[३६] प्रार्थना सभेस येणारांची झडती घेण्यास महात्मा गांधींनी विरोध केलेला होता. परंतु गांधींना न सांगता आयोगाने म्हटल्याप्रमाणे महत्त्वाच्या ठिकाणी पाळत ठेवणे आणि महाराष्ट्रातून आलेल्या गटाला शोधून काढता येणे अशक्य कोटीतील गोष्ट नव्हती. गांधींशिवाय पं. नेहरू, आझाद, रफी अहमंद किडवाई यांनाही मारण्याचा कट होता हे गांधी खुनानंतर उघड झाले आहे. महात्मा गांधींच्या खुनाचे समर्थन करताना

---

३६. न्या. कपूर अहवाल, खंड १.

गांधीमुळे फाळणी झाली, गांधींच्या आग्रहामुळे पाकिस्तानला ५५ कोटी रुपये द्यावे लागले म्हणून गांधींचा खून झाला असे म्हटले जाते. पण इतर नेत्यांच्या खुनाचाही कट रचला होता त्याचे काय? या तिघांनी ५५ कोटी रुपये पाकिस्तानला द्या असा आग्रह धरलेला नव्हता. फाळणीला पहिली संमती सरदार वल्लभभाई पटेल यांनी दिलेली होती. मग नेहरूंनी त्याला मान्यता दिली होती. फाळणीला मान्यता दिली नसती तर देशभर यादवी झाली असती. या यादवीच्यावेळी ब्रिटिशांच्या अंमलाखालील लष्कर नि:पक्ष राहिले नसते. ते पक्षपाताने वागले असते आणि त्यातून फाळणीपेक्षाही भयानक अवस्था झाली असती असे नेहरूंना वाटले. म्हणून नेहरूंनी नंतर फाळणीला मान्यता दिली असे म्हटले जाते.

महात्मा गांधींच्या खुनामुळे गांधींना पळवून नेण्याच्या कटाकडे आणि ग्वाल्हेरच्या एका घटनेकडे दुर्लक्ष झाले. महात्मा गांधींच्या खुनाच्या किमान दोन महिने आधी ग्वाल्हेरमधील हिंदू महासभेच्या वृत्तपत्रात महात्मा गांध व पं. नेहरूंचा खून केला पाहिजे असा लेख छापून आला होता. महात्मा गांधींच्या खुनासाठी पिस्तूल आदींकरता ग्वाल्हेरच्या सरकारने पासष्ट हजार रुपयांचा चेक दिला असल्याचे त्या लेखात म्हटलेले होते. न्या. कपूर आयोगाला गोपीकृष्ण कात्रे नावाच्या राजकीय कार्यकर्त्याने प्रतिज्ञापत्र देऊन सांगितले की, खून करण्याकरिता सुपारी देणे, शस्त्रे खरेदी करणे याकरिता ६५ हजार रुपयांचा उपयोग करावा म्हणून ते दिले होते. परंतु गांधींच्या खुनामागे असलेल्या खऱ्या कटकारस्थानवाल्यांना शिक्षा झालीच नाही असे गोपीकृष्ण कात्रे यांचे म्हणणे होते. कात्रे स्वत: स्वातंत्र्यसैनिक होते. पासष्ट हजार रुपयांचा चेक आपण परचुरे नावाच्या गृहस्थास दिला असे त्यांचे म्हणणे आहे. लीलाधर जोशी ग्वाल्हेरचे पंतप्रधान झाल्यावर कात्रेंनी ही माहिती जोशींना सांगितली. यासंबंधात कोणतीही कारवाई करण्यापूर्वी मी सरदार पटेल यांच्याशी चर्चा करीन असे जोशी म्हणाले. दरम्यान ग्वाल्हेर संस्थानाने विलीनीकरणाला संमती दिली. त्यामुळे ग्वाल्हेरप्रकरणी कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. न्या. कपूर आयोगाने कात्रे यांची साक्ष खोटी आहे असे म्हटलेले नाही. "आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वात खुनापूर्वी त्याची माहिती होती का आणि तशी माहिती असणाऱ्याने ती माहिती सरकारला सांगितली होती काय याची चौकशी करण्याचे काम आयोगाचे आहे आणि या मार्गदर्शक तत्त्वांशी कात्रे यांचा पुरावा संबंधित नाही." असे न्या. कपूर आयोगाने म्हटले आहे. कात्रे यांची साक्ष खोटी आहे, अशी काही घटना घडलेली नाही असे मतप्रदर्शन आयोगाने केलेले नाही. न्या. कपूर आयोगाने यासंबंधात पुढे असे म्हटले आहे की, "ग्वाल्हेरच्या महाराजांचा गांधींच्या खुनात हात होता की नाही हे ठरविण्याचा प्रश्न

आयोगापुढे नाही. गांधींच्या खुनाची माहिती खुनापूर्वी होती की नाही याची चौकशी करण्याचे काम आयोगाला दिलेले आहे.'' कात्रे यांच्या साक्षीतून पुढे आलेली माहिती पूर्णत: खोटी आहे असे आयोग म्हणू शकला असता. या प्रकरणाची वेगळी चौकशी झाली असती तर ६५ हजार रुपये हिंदू महासभेला दिले होते की नाही याचा खरेखोटेपणा कळून आला असता. त्यामुळे ग्वाल्हेर प्रकरण गुलदस्त्यातच राहिले आहे. कात्रे यांनी आयोगाला कोणताही पुरावा दिलेला नाही, या एका जोरावरच कात्रे यांच्या साक्षीची आयोगाने दखल घ्यावयास नको होती. पण ते आयोगाने केले नाही. कात्रेंच्या साक्षीत डॉ. परचुरे यांचा उल्लेख आहे. त्यांना गांधी खुनाबाबत शिक्षा झाली होती. पण अपिलामध्ये ते सुटले.

महात्मा गांधींच्या हत्येचा कट असल्याची माहिती प्रो. जैन यांनी मोरारजी देसाई यांना दिली. त्यानंतर नऊ दिवसांनीच गांधींचा खून झाला. पण मधल्या काळात गांधींना पळवून नेण्याच्या कटाची माहिती मिळाली. गांधींचा खूनच झाल्यामुळे पळवून नेण्याच्या कटाच्या माहितीला महत्त्व राहिले नव्हते. त्यामुळे आज त्याचा कोणी विचारत करीत नाही. पण महाराष्ट्रात प्रामुख्याने हिंदुत्ववाद्यांचा दहशतवादी, हिंसक कारवायांवर विश्वास ठेवणाऱ्यांचा गट कसा काम करत होता, याच्या अभ्यासकांना गांधींना पळवून नेण्याच्या कटाची माहिती असणे आवश्यक आहे. खून आधीच झाल्यामुळे परिणामांच्या दृष्टीने पळवून नेण्याच्या त्या कटाचा उपयोग होणार नाही. मोरारजी देसाई यांनी जे. डी. नगरवाला यांना गांधी खून कटाची माहिती दिली आणि त्याचा तपास करण्यास सांगितले. नगरवाला त्यावेळी मुंबईचे पोलीस उपायुक्त होते. पोलीस आयुक्तांना ही माहिती न देता उपायुक्तांवर कटाचा शोध घेण्याची कामगिरी गृहमंत्री मोरारजी देसाई यांनी सोपविली. यामागचे कारण काय? जैन यांच्याकडून मिळालेल्या माहितीसंबंधात मुंबईचे पोलीस आयुक्त कोठेच आलेले नाहीत हे का घडावे? नगरवाला पारशी होते. त्यामुळे ते हिंदुत्ववाद्यांविषयी सहानुभूती बाळगणाऱ्यांत मोडत नव्हते. त्यांतील कोणाविषयी नगरवाला यांना सहानुभूती असावयाचे कारण नव्हते. म्हणून नगरवाला अधिक योग्य प्रकारे चौकशीचे काम करतील असा मोरारजी देसाई यांचा विश्वास होता. नगरवाला हे मोरारजींच्या अधिक विश्वासातील होते. या कारणांनीही मोरारजींनी पोलीस आयुक्तांवर ही कामगिरी सोपविण्याऐवजी नगरवाला यांच्यावर चौकशीचे काम सोपविले होते. आपण गांधींच्या खुनाच्या कटाचा शोध घेत असताना माझ्या सूत्रांकडून मला महात्मा गांधींना पळवून नेण्याचा कट असल्याची माहिती मिळाली असे नगरवालांनी आयोगाला सांगितले. त्यामुळे नगरवालांनी खुनाच्या कटाचा शोध घेत असतानाच पळवून नेण्याच्या कटाचा छडा लावण्यावर भर दिलेला होता.

गृहमंत्री देसाई यांनी नगरवाला यांना गांधींच्या खुनाची योजना असल्याचे सांगितले होते. मंत्र्यांच्या आदेशानुसार काम करण्याची अधिकाऱ्यांची प्रवृत्ती असते. या प्रकारच्या गंभीर बाबींची चौकशी करताना अधिकाऱ्यांच्या दृष्टिकोणाचा विचार केला तर मंत्र्यांनी सांगितल्याप्रमाणे काम केले तर त्याच्या अनिष्ट परिणामांचा अधिकाऱ्यावर कमी दोष येतो. मंत्र्यांच्या माहितीनुसार मी चौकशी करीत होतो अशी सबब सांगून त्यातून अधिकाऱ्यांना सुटण्याची संधी मिळते. मोरारजींनी खून होणार असल्याची माहिती दिली होती. समजा, गांधींचा खून न करता खरोखरच गांधींना पळवून नेण्याची घटना घडली असती तर नगरवाला त्यावेळी असे म्हणू शकले असते की, गृहमंत्र्यांनी गांधींच्या खुनाची माहिती मला दिली होती. त्यामुळे मी त्या संबंधाने शोध घेणे हे माझे कर्तव्य होते. गृहमंत्र्यांच्या सूचनेबरहुकूम मी तपास करीत होतो. नगरवालांनी असे सांगितले असते तर त्यांच्यावर पळवून नेण्याच्या घटनेचा शोध लावला नाही याचे खापर फुटणार नव्हते. पण येथे उलटा प्रकार घडला आहे. गृहमंत्र्यांनी गांधींचा खून होणार असल्याची माहिती नगरवालांना दिली होती आणि नगरवालांना गांधींना पळवून नेण्याच्या कटाचा सुगावा लागला. नगरवालांनी खुनापेक्षा पळवून नेण्याच्या कटाचा छडा लावण्यावर भर दिला होता. यावरून गांधींना पळवून नेण्याच्या कटाची नगरवालांना मिळालेली माहिती तितकीच विश्वसनीय असली पाहिजे. मुस्लिमांना जबरदस्तीने भारताबाहेर घालवण्याचा बेत आखला जात होता. त्यातच गांधींना पळवून नेण्याचा कट होता असे नगरवालांचे म्हणणे होते.

गांधींना पळवून नेण्याच्या 'सिद्धान्ता'मागे तुम्ही का लागलात असा प्रश्न न्या. कपूर यांनी नगरवालांना केला होता. त्यावर नगरवाला म्हणाले, "हा माझा सिद्धान्त किंवा कल्पना नव्हती तर माझी ती माहिती होती. म्हणून मी खुनाच्या कटापेक्षा गांधींना पळवून नेण्याचा कट शोधून काढण्याच्या मागे अधिक लागलो होतो. मला आमच्या अतिशय विश्वसनीय सूत्रांकडून गांधींना पळवून नेले जाणार असल्याची माहिती मिळाली होती. गांधींना पळवून नेण्याच्या कटाची माहिती बरोबर आहे याविषयी डायरेक्टर इंटिलिजीन्स ब्युरो, मुंबईचे आयुक्त, पुणे विभागाचे डी. आय. जी.-सी. आय.डी. व गृहमंत्री यांचीही खात्री झाली होती." असे नगरवालांनी साक्षीत सांगितले होते. पण गांधींना पळवून नेण्याचा कट होता याची माहिती नगरवाला यांनी मला सांगितलेली नव्हती असे मोरारजी देसाई यांचे म्हणणे होते. यू. एच. राणा त्यावेळी पुण्याचे डी. आय. जी.-सी. आय. डी. होते. राणा व नगरवाला या दोघांनी ३० जानेवारी १९४८ रोजी सकाळी ७ वाजता दिल्लीचे वरिष्ठ पोलीस अधिकारी संजिवी यांना गांधींना पळवून नेण्याचा कट असल्याचे

ट्रंककॉल करून कळवले. फोनवर झालेले बोलणे कळवण्याची नगरवालांच्या कामाची पद्धत होती. त्याप्रमाणे ३० जानेवारीला नगरवालांनी संजिवी यांना फोनवर झालेले बोलणे पुन्हा पत्राने कळवले होते. मोरारजी देसाई यांनी सांगितल्याप्रमाणे खुनाच्या कटाचा शोध घेण्याच्या कामात नगरवाला अयशस्वी ठरले. पण त्यामुळे गांधींना पळवून नेण्याच्या कटाची माहिती मिळाली. ती अविश्वसनीय होती असेही म्हणता येणार नाही.

पळवून नेण्याच्या कटाची माहिती मिळाल्यावर त्याचाही शोध घेणे माझे कर्तव्य होते असे नगरवालांनी सांगितले. ते बरोबर होते. माझा त्या माहितीवर विश्वास होता. नव्हे तसा कट असावा याविषयी माझी खात्री होती हे नगरवाला यांनी वारंवार सांगितले होते. न्या. कपूर आयोगापुढील महाराष्ट्र सरकारचे वकील आर. बी. कोतवाल यांनीही नगरवालांच्या पळवून नेण्याच्या माहितीचे समर्थन केलेले आहे. गांधींच्या 'हिंदूविरोधी' भूमिकेला आवर घालणे हे (हिंदुत्ववाद्यांचे) उद्दिष्ट होते. अशा काळात पळवून नेण्याच्या कटाच्या माहितीसंबंधात ही माहिती बिनबुडाची आहे म्हणून दुर्लक्ष करता येण्यासारखी बाब नव्हती. ५५ कोटी रुपये पाकिस्तानला दिले जाऊ नयेत याकरिता आवाज उठविला जात होता. गांधींना ओलीस ठेवून ५५ कोटी रुपये पाकिस्तानला देण्याच्या निर्णयापासून सरकारला परावृत्त करावयाचे. खुनापेक्षा पळवून नेणे हे कमी क्रूरपणाचे होते. त्यामुळे पळवून नेण्याच्या कटाचा शोध घेणे आणि तशा माहितीवर विश्वास बसणे स्वाभाविकच आहे असे कोतवाल यांचे म्हणणे होते. २० जानेवारी रोजी मदनलालने बॉंबस्फोट केला. त्याचे त्यामागे उद्दिष्ट तेच होते. स्फोटामुळे प्रार्थना सभेत गोंधळ उडवून द्यावयाचा आणि त्या गोंधळाची संधी साधून गांधींना पळविण्याची योजना होती असे कोतवाल यांनी न्या. कपूर यांच्यापुढे मांडले होते. संजिवी या दिल्लीतील वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याने आपल्याला राणा यांनी २७ जानेवारीच्या संध्याकाळी गांधींना पळवून नेण्याच्या कटाची माहिती दिली होती, अशी साक्ष दिली. "ही एक मोठी संघटना आहे. त्यांनी वीस-वीस जणांचे वीस गट निर्माण केले आहेत. त्यांच्याजवळ फार मोठ्या प्रमाणावर शस्त्रास्त्रे, बॉंब; प्राणघातक हत्यारे यांचा साठा आहे," असे राणांनी त्या दिवशी आपल्याला सांगितले होते असे संजिवी म्हणाले. गांधींच्या खुनानंतर गांधींना पळवून नेण्याच्या कटाचे प्रकरण आपोआपच मागे पडले. आयोगानेसुद्धा नगरवाला यांना पळवून नेण्याच्या कटाच्या योजनेची माहिती कोणी दिली, यासंबंधातील हकिगत बाहेर यावी याकरिता नगरवालांना प्रश्न विचारले नव्हते. गांधींचा खून झाला असल्यामुळे पळवून नेण्याच्या कटाची महिती घेण्याची गरज त्यांना वाटली नसावी किंवा त्यांच्या मार्गदर्शक तत्त्वांत हा मुद्दा येत नसल्यामुळे

न्या. कपूर यांनी त्यावर भर दिला नसावा. राणांनी संजिवी यांना २० जणांच्या २० तुकड्या आहेत. त्यांच्याजवळ प्रचंड शस्त्रांचा, बाँबचा साठा आहे, याचाही तपशील सांगितला होता. एवढी तपशीलवार माहिती मिळाल्यानंतर त्यापैकी एकालाही पोलीस कसे पकडू शकले नाहीत हाही प्रश्नच आहे!

कोणीच अमरत्वाचा पट्टा घेऊन जन्माला आलेला नाही. मृत्यू अटळ आहे. पण ३० जानेवारी १९४८ रोजी महात्मा गांधींना हौतात्म्य आले. त्यांचे त्या दिवशीचे मरण टाळता येणे सहज शक्य होते. राष्ट्रपित्याच्या हत्येसंबंधात किमान पंधरा दिवस आधी माहिती मिळालेली होती आणि गांधींच्या मृत्यूपूर्वी दहा दिवस आधी गांधींची हत्या कोण करणार आहेत याची तपशीलवार माहिती व काहींची नावे समजलेली होती. मदनलालचे निवेदन २० व २१ जानेवारीस पोलिसांच्या हातात होते. त्यात कटातील लोकांची नावे होती. गोडसे-करकरे यांचा त्यात हात आहे हे मदनलाल पाहवाने सांगितले होते. पुण्यातील त्यांचे ठिकाण, 'हिंदूराष्ट्र'चा मालक म्हणून नावानिशी पत्ता हातात होता. खुनापूर्वी देशाचे गृहमंत्री तसेच मुंबई प्रांतांचे गृहमंत्री यांना गांधींच्या हत्येची माहिती होती. तरीही गांधींचे प्राण वाचवता येऊ नयेत? त्यावेळच्या सत्ताधाऱ्यांना विशेषत: गृहखात्याला गांधींच्या हत्येच्या पापाचे धनी मानावेच लागेल. नथुराम गोडसेने गांधींच्या छातीवर पिस्तुल रोखून त्यांची हत्या केली. पण गृहखात्याच्या गलथानपणामुळे गांधींवर पिस्तुल रोखण्याकरिता खुन्यांना पायघड्याच घातल्या गेल्या होत्या. पंधरा दिवस आधी गांधींच्या खुनाची माहिती मिळालेली असताना त्यांना मारण्याचा कट करणाऱ्यांचा शोध लावल्याशिवाय राज्यकर्त्यांना झोपा कशा येत होत्या हे समजण्याच्या पलीकडचे आहे!

❑❑❑

फाळणी : विरोध आणि आंदोलन

महात्मा गांधींचा फाळणीला कसा व किती विरोध होता, फाळणी टाळण्याकरिता त्यांनी वेगवेगळे पर्याय वेळोवेळी कसे सुचवले होते याचा ऊहापोह सुरुवातीच्या प्रकरणात केला आहे. फाळणीसंबंधीची माहिती घेतली की मग फाळणीच्या कारणामुळे महात्मा गांधींचा खून केला हा हिंदुत्ववाद्यांचा दावा किती खोटा आहे हे सहजपणे लक्षात येते. फाळणी अटळ आहे असे दिसत असले तरी तिची अपरिहार्यता स्वीकारण्याची गांधींची व काँग्रेस नेत्यांची मानसिक तयारी नव्हती आणि फाळणीविरुद्ध ठाम भूमिका घेऊन तिच्या परिणामांसाठी तयार राहण्यास ते राजी नव्हते. फाळणीविरुद्ध गांधी का उभे राहिले नाहीत, असा सवाल महाराष्ट्रातील एका विद्वान संपादकांनी केला आहे. महात्मा गांधी वगळता काँग्रेसने फाळणीची अपरिहार्यता स्वीकारली होती. हंगामी सरकारमध्ये अर्थमंत्री लियाकत अली यांनी तयार केलेल्या अंदाजपत्रकाने काँग्रेसच अडचणीत आली होती. या अनुभवानंतर सरदार वल्लभभाई पटेल यांनी माउंटबॅटनना फाळणीची कल्पना आपल्याला मान्य असल्याचे परभारेच सांगितले होते. त्या पाठोपाठ नेहरूंनीही फाळणीला आपली संमती दिली होती. फाळणीची अपरिहार्यता ओळखूनच त्यांनी फाळणीला मान्यता दिलेली होती आणि काँग्रेसने फाळणीचा शब्द दिलेला असेल तर माझा फाळणीला विरोध आहे की नाही याचा विचार न करता काँग्रेसचा शब्द खाली पडता कामा नये या अगतिकतेतून गांधींनी नाइलाजाने फाळणीला मान्यता दिली होती. फाळणीविरुद्ध ठाम भूमिका घेणे म्हणजे काय? फाळणी मान्य नाही असे शब्दांनी नुसते म्हणण्याला काही अर्थ नव्हता. फाळणीविरुद्ध ठाम भूमिका घ्यावयाची याचा अर्थ फाळणीविरोधात देशाला 'पुन्हा एकदा आयुष्याच्या मशाली पेटवा' असे सांगावयाचे आणि आयुष्याच्या मशाली पेटविण्याकरिता लोकांना उभे करावयाचे! काँग्रेस संघटनेचे महात्मा गांधींनी अठ्ठावीस वर्षे नेतृत्व केले आणि

संघटनेच्या जोरावर लोकांचा स्वातंत्र्यलढ्यात सहभाग मिळवला होता. एका रात्रीत हे घडलेले नव्हते. गांधींनी नेतृत्व केले आणि विविध क्षेत्रात वावरणाऱ्यांना बरोबर घेऊन गांधींनी त्यांना नेते बनविले होते. या नेत्यांची साथ घेऊन गांधींनी लढे केले. सेनापती तयार केले. सैन्य बांधले. मग अहिंसक, सत्याग्राही मार्गांनी लढा तीव्र केला होता. अठ्ठावीस वर्षांचा प्रयत्न त्या मागे होता. गांधींचे हेच सहकारी गांधींच्या अपरोक्ष जाऊन लॉर्ड माउंटबॅटनना भेटत होते आणि फाळणीला संमती देत होते. त्यामुळे गांधी एकाकी पडले होते. फाळणीच्या विरोधात आंदोलन उभारावयाचे तर संघटना बरोबर असावयास लागते. काँग्रेसने फाळणी स्वीकारल्यावर फाळणीविरुद्धच्या आंदोलनाकरिता दुसरी संघटना बांधावी लागली असती किंवा तीस वर्षांच्या सहकाऱ्यांशी झुंजत राहून काँग्रेस संघटना त्यासाठी फोडावी लागली असती. गांधींसारखा माणूस काँग्रेस फोडण्याची भूमिका घेऊ शकत नव्हता. फाळणीविरोधात गांधींच्या बरोबर कोण होते? सरहद्द गांधी खान अब्दुल गफार खान, मौलाना आझाद, जयप्रकाश नारायण, डॉ. राममनोहर लोहिया व त्यांच्यासारखे आणखी काही हाताच्या बोटावर मोजता येतील असे नेते! जयप्रकाश व लोहिया वगळता इतर नेते वृद्ध झाले होते. फाळणी तर फाळणी. पण जे स्वातंत्र्य मिळते आहे ते घ्यावे म्हणून जनताही उत्साहित झाली होती. देशाच्या काही भागात कत्तली होत असतानाही जनता स्वातंत्र्य मिळाले म्हणून बेहोष झाली होती. अशा वेळी फाळणीविरुद्ध गांधींनी आंदोलन उभे केले असते तरी जनता त्या आंदोलनात स्वातंत्र्य चळवळीसारखी सामील झाली नसती! अखंड भारताची भाषा बोलणारेही गांधींच्या मागे उभे राहण्यास तयार नव्हते किंवा स्वत:चे वेगळे आंदोलन उभारण्याची हिंदुत्ववाद्यांत हिंमत नव्हती. गांधी फाळणीविरुद्धचे आंदोलन कोणाच्या जोरावर उभे करू शकले असते? महात्मा गांधी जगले असते तर त्यांनी निश्चितच लोकांना आपल्याबरोबर घेण्याचा प्रयत्न केला असता. ठरल्याप्रमाणे पाकिस्तानला ५५ कोटी द्या, अशी भूमिका गांधींनी घेतली होती. त्यात नैतिकतेची भूमिका होतीच. पण खळखळ न करता पाकला पैसे दिले गेले असते तर दिल्लीतील उपोषणानंतर गांधी पाकिस्तानला जाण्याची शक्यता होती. त्यांनी तसे बोलूनही दाखवले होते. लोकांची सदिच्छा मिळवावयाची असेल तर डावपेचाची, अडवणुकीची भूमिका घेता कामा नये या भावनेनेही गांधींनी ५५ कोटी रुपये पाकला द्यावेत अशी भूमिका घेतली असण्याची शक्यता आहे. लोकांची सदिच्छा असल्याशिवाय कोणत्याही विचाराला पाठिंबा मिळत नाही. पाकिस्तानमध्ये जाऊन गांधींनी नेमके काय केले असते? त्यांच्या त्या प्रयत्नांना यश आले असते का? इतकी वर्षे एकत्र असताना जे घडले नाही ते पाकिस्तानच्या निर्मितीनंतर गांधींना

घडवून आणता आले असते का? अशीच का, याहीपेक्षा अधिक प्रश्नांची मालिका उभी करता येईल! पण गांधी स्वस्थ बसले नसते एवढे मात्र नक्की. त्यांनी लोकांना आपल्याबरोबर उभे करण्याचा निश्चितच प्रयत्न केला असता. डॉ. राममनोहर लोहिया यांनीही गांधींनी फाळणीला सक्रिय विरोध केला असता तर काय झाले असते असा सवाल केला असून त्यांनीच उत्तरे देण्याचा प्रयत्न केला आहे. ''गांधीजींना मारून किंवा तुरुंगात ठेवून नेहरू भारतात किंवा जीना पाकिस्तानात राज्य करू शकले असते? फाळणीपूर्वीच्या आपल्या दैनंदिन प्रार्थना प्रवचनांतूनही गांधीजी जनतेत फाळणीविरुद्ध असंतोष निर्माण करू शकले नाहीत. प्रार्थना प्रवचनात गांधीजी फाळणीविरुद्ध बोलत. पण त्यांनी असंतोष निर्माण केला नाही. काँग्रेस पार्टीच्या तरुण नेतृत्वात काहीशी कमतरता होती. हे मानावयास मी तयार आहे.'' **''गांधीजींनी आपल्या पद्धतीने वारंवार आम्हाला चाचपले आणि आम्ही लायक नाही असे त्यांना आढळले.''** असे डॉ. लोहिया यांनी म्हटले आहे. गांधींनी फाळणीविरुद्ध आंदोलन का केले नाही याचे उत्तर यातच सापडते. गांधींनी तरुण नेत्यांची चाचपणी केली आणि ते आंदोलनास तयार होणार नाहीत असे दिसताच गांधींनी आंदोलनाचा विचार सोडून दिलेला असावा. 'अखंड भारत, अखंड भारत' अशी नुसती जपमाळ ओढून अखंड भारत होणार नव्हता. हिंदुत्ववाद्यांनी त्याकरिता काय प्रयत्न केले? डावपेचाचा एक भाग म्हणून तरी हिंदुत्ववाद्यांनी गांधींना कधी असे सांगितले होते का की, अखंड भारतासाठी तुम्ही आंदोलन करा. आम्ही आमची सारी ताकद तुमच्यामागे उभी करतो! गांधींच्यामागे अखंड भारतासाठी ताकद उभी करतो असे हिंदुत्ववाद्यांनी सांगितले असते आणि गांधींनी त्यांचा पाठिंबा घेण्याचे नाकारले असते तर मग गांधींना फाळणीचे गुन्हेगार ठरविणे रास्त ठरले असते आणि हिंदुत्ववाद्यांच्या या आरोपाला काही अर्थ राहिला असता! अखंड भारताच्या प्रयत्नाकरिता कोणीही गांधींच्या मागे आपली शक्ती उभी करण्याचा प्रयत्न तर सोडाच, पण तसा विचारही मांडला नाही. स्वातंत्र्य मिळाले त्या दिवशी नुसता सुतक दिवस पाळून अखंड भारत होणार नव्हता. म्हणूनच डॉ. लोहिया यांनी असे म्हटले आहे की, ''अखंड भारताची उच्च स्वरात घोषणा करणारा जनसंघ आणि हिंदुत्वाचा भ्रष्ट पुरस्कार करणारे त्याच्या आधीचे हिंदुत्ववादी यांनी ब्रिटिशांना व मुस्लिम लीगला फाळणीच्या कामी वास्तविक साहाय्यच केले आहे. मग त्यांच्या मनात काहीही असो. मुसलमानांनी हिंदूंबरोबर एकाच राष्ट्रात राहावे म्हणून या लोकांनी (हिंदुत्ववाद्यांनी) कोणतेही प्रयास केलेले नाहीत. उलट हिंदू-मुसलमान यांचे संबंध दुरावतील असेच प्रयत्न केले. या दोन धर्मीयांतील दुरावा हेच खरे फाळणीचे मूळ कारण आहे. हा दुरावा ज्यांनी निर्माण केला ते सर्व प्रामाणिक

लोक होते असे मानले तरी त्यांचे हिंदू-मुसलमानातील विलगता वाढविण्याचे तत्त्वज्ञान आणि त्यावेळी अखंड भारताची ते करीत असलेली घोषणा ही घोर आत्मवंचनाच होय. अखंड भारताची घोषणा करणे आणि हिंदू-मुसलमानांतील वैर वाढविण्याचे प्रयत्न त्याच वेळी करत राहणे यामुळे पाकिस्तानच्या मागणीला खतपाणी आणि जीवदान मात्र मिळत राहिले. हिंदुस्थानातील मुसलमानांचा विरोधक हा पाकिस्तानचा मित्रच होय. जनसंघी आणि सारे अखंड भारतवादी हिंदुनिष्ठ हे वस्तुत: पाकिस्तानचे दोस्तच आहेत.'' डॉ. लोहिया यांचे हे विचार अतिशय मूलग्राही आहेत. गांधीच काहीतरी चमत्कार घडवून आणतील असे लोहियांना वाटत होते. 'भारतातील हिंदू-मुसलमानांत मानसिक व सांस्कृतिक जवळीक निर्माण होईल आणि त्या नंतर किंवा त्याच वेळी भारत व पाकिस्तान हे देशही एकमेकांच्या अधिक निकट येतील व त्यातूनच पुनश्च पूर्वीचा हिंदुस्थान बनेल, ही एक इच्छा आहे, प्रार्थना आहे आणि संभाव्यताही आहे' असे लोहिया म्हणत.

गांधींच्या नेतृत्वाखाली अखंड भारतासाठी आंदोलन करण्याची हिंदुत्ववाद्यांची तयारी नव्हती. मग त्यांनी स्वत:चे आंदोलन त्याकरिता का केले नाही? आंदोलन करण्यासाठी लोकांचा पाठिंबा असावा लागतो आणि लोकांनी त्यांचे नेतृत्व स्वीकारावे लागते. तरच आंदोलनाचा विचार केला जाऊ शकतो. हिंदुत्ववाद्यांच्या मागे जनता नव्हती. त्यामुळे हिंदुत्ववादी अखंड भारताकरिता आंदोलन करण्याचा विचारही करू शकत नव्हते. त्यांच्याजवळ तसा लढाऊपणाही नव्हता. जनता हिंदुत्ववाद्यांच्या मागे का जात नव्हती? तर त्यांची विचारसरणी ही जनतेला आपली विचारसरणी आहे असे वाटत नव्हते. हिंदुत्ववादी विचारामध्ये आपेल हित सामावलेले नाही ही जनतेची धारणा होती. हे महात्मा गांधींच्यामुळे घडलेले होते. त्यामुळे हिंदुत्ववादी गांधींचा द्वेष करीत होते. हिंदुत्ववाद्यांच्या विचारसणीचा पायाच मुळी द्वेषावर उभारलेला होता. मग कधी मुस्लिमद्वेष तर कधी गांधीद्वेष! द्वेषाच्या राजकारणाने समाज कधीच सांधला जात नाही आणि समाज सांधला गेला नाही तर स्वातंत्र्य, अखंडत्व टिकू शकत नाही हे हिंदुत्ववाद्यांना कधी समजलेच नाही.

आपण फाळणीला विरोध का करू शकलो नाही आणि फाळणीविरुद्ध आंदोलनाचा विचार का केला नाही याचे स्पष्टीकरण महात्मा गांधींनी केलेले आहे. फाळणीला मान्यता देण्याच्या काँग्रेस कार्यकारिणीच्या ठरावानंतर गांधींना असंख्य पत्रे आली. त्यातील महत्त्वाच्या पत्रांना गांधींनी उत्तरे दिलेली असून ती प्यारेलाल यांच्या 'द लास्ट फेज'च्या दुसऱ्या खंडात आहेत. ''भारताच्या फाळणीमुळे माझ्याइतके कोणाचे मन विषण्ण झाले असेल असे मला वाटत नाही. पण मी आंदोलनाचे आश्वासन देऊ शकत नाही. ही फाळणी गैर आहे असेच माझे मत

आहे. त्यामुळे फाळणीच्या पापात मी सामील होऊ इच्छित नाही. पण काँग्रेसने फाळणीला मान्यता दिलेली आहे. तेव्हा मी त्याला नाइलाजाने पाठिंबा देत आहे. काँग्रेसविरुद्ध मी आंदोलन करू शकत नाही. कोणत्याही परिस्थितीत काँग्रेसविरोधी आंदोलनाच्या पावलाचे समर्थन होऊ शकत नाही. फाळणीच्या योजनेत काँग्रेसने स्वत:ला जखडून टाकले आहे तर मी आंदोलन कसे करू शकतो?'' डब्लिन येथून एकाने गांधींना पत्र पाठवले. आयर्लंडमधील भारतीयांना भारताची फाळणी मान्य नसल्याचे कळविले. आम्ही आयर्लंडमधील भारतीय फाळणीचा निषेध करतो. आयर्लंड सोडताना ब्रिटिशांनी आयर्लंडची भारतासारखीच अवस्था केली होती. या पत्राला उत्तर देताना गांधी म्हणाले, ''मी एकाकी आहे. माझा नाइलाज आहे. भारत व आयर्लंड यांची अवस्था एकसारखीच कशी आहे हे मला समजत नाही. पण काँग्रेस व मुस्लिम लीग यांनी फाळणीला मान्यता दिलेली आहे. काँग्रेसने अनिच्छेने मान्यता दिलेली आहे ही गोष्ट खरी आहे.'' ''काँग्रेसच फाळणीची भागीदार बनली आहे तर माझ्या उपोषणाचा काय उपयोग होणार आहे? काँग्रेसबरोबर माझे मतभेद आहेत म्हणून मी उपोषण करीन म्हटले तर त्याचा उपयोग होणार नाही. काँग्रेस औद्योगिकीकरणाच्या बाजूची आहे आणि माझा त्याला विरोध आहे म्हणून मी उपोषण करावे काय?'' असे एका पत्राला गांधींनी उत्तर दिलेले आहे. देशाच्या फाळणीच्या आधी माझ्या देहाची फाळणी होईल असे गांधी म्हणाले होते. त्याची आठवण गांधींना एकाने करून दिली. ९ जून १९४७ च्या प्रार्थना सभेत गांधींनी त्याला उत्तर देताना असे म्हटले की, ''लोकांच्या पाठिंब्याच्या कल्पनेमुळे त्यावेळी मी ते म्हणालो होतो. मी लोकांचे मत व्यक्त केले आहे अशी माझी त्यावेळी समजूत होती. पण लोकमतच जर ते (फाळणीसह स्वातंत्र्य) स्वीकारीत असेल तर मी काय करू शकतो?'' गांधींनी फाळणीला विरोध केला पाहिजे होता असे म्हटले जाते. गांधींचाही फाळणीला विरोध होता. पण या दोन भूमिकांमध्ये कोणता सारखेपणा होता. या प्रश्नाचे उत्तर 'फाळणीला विरोध' या गोष्टीपुरताच सारखेपणा होता. हिंदू-मुस्लिमांचे ऐक्य झाले तर फाळणी टळू शकते हे गांधींचे म्हणणे होते आणि फाळणीला विरोध करणाऱ्यांमध्ये एक गट हिंदू-मुस्लिम ऐक्य म्हणजे मुस्लिमांचा अनुनय आहे असे म्हणणारा होता. गांधी हिंदू-मुस्लिम ऐक्यावर भर देतात म्हणून त्यांना मुस्लिमधार्जिणे ठरविणारा हा गट होता. काहीजण तर गांधींना 'मौलाना गांधी' असे म्हणत होते. गांधींचा फाळणीला विरोध होता आणि या गटाचाही फाळणीला विरोध होता. पण या एकसारखेपणाशिवाय मूलभूत विचारात कोणताच सारखेपणा नव्हता. हिंदू-मुस्लिम ऐक्याशिवाय अखंड भारत निर्माण होऊच शकत नव्हता! त्याकरिता स्वामी विवेकानंद, लोकमान्य टिळक यांच्यापासून महात्मा

गांधीपर्यंत ज्यांनी हिंदू-मुस्लिम ऐक्याला महत्त्व दिले होते ते स्वीकारण्याची हिंदुत्ववाद्यांची तयारी असती तर फाळणीची वेळच आली नसती! गांधींच्या विचारांविषयी द्वेष फैलावयाचा, गांधींनी फाळणी स्वीकारली असा प्रचार करावयाचा आणि गांधींनी फाळणी टाळावयाचे प्रयत्न करावयास हवे होते असे म्हणावयाचे हे न्यायोचित नाही.

हिंदू महासभेच्या दोन कार्यकर्त्यांनी महात्मा गांधींना 'तुम्ही महात्मा' नाही. तुम्ही अहिंसा सांगून हिंदूंना कमकुवत करत आहात असे म्हटले. त्यावेळी गांधी म्हणाले, "मला 'महात्मा' म्हटले गेले त्याचवेळी मी कोणी 'महात्मा' नाही, असे म्हटले होते, हे तुम्हाला माहिती नाही. पाकिस्तानमधील अत्याचारांचा बदला घ्यावयाचा असेल तर मग तुम्ही पाकिस्तानात जाऊन तो घ्या!" अर्थात असे म्हणण्यापूर्वी गांधींनी अहिंसेचे महत्त्व त्या दोन कार्यकर्त्यांना सांगितले होते आणि अहिंसेच्या मार्गांनीच अत्याचार रोखले पाहिजेत- हे पटवून देण्याचा प्रयत्न केला होता. हे कार्यकर्ते गेल्यावर राजेंद्रप्रसादना गांधी म्हणाले, "मी कामातून मोकळा झालो की संपूर्ण देशाचा दौरा करून तरुणांना विधायक कामात गुंतवणारी चळवळ सुरू करणार आहे. महात्मा गांधींविषयी द्वेष वाढविण्याचे काम हिंदूंची वृत्तपत्रे करीत होती असे न. र. फाटक यांनी म्हटलेलेच आहे. महात्मा गांधी हे हिंदूंच्या हिताचे महान शत्रू आहेत व त्यांना अधिक जगू दिल्याने हिंदूंचे आणखी किती नुकसान होईल याचा भरवसा नाही असा प्रचार केला जात होता. फाळणी हे राजाजी किंवा गांधी यांचे अपत्य नव्हते. १९०९ सालापासूनच्या घटनांचा तो परिपाक होता. हिंदू-मुस्लिम यांच्यात अविश्वासाचे वातावरण पसरविण्याच्या राजकारणाचा आणि राजकीय नेत्यांच्या दुखावलेल्या अहंकाराचा तो परिणाम होता. लोकमान्य टिळकांनी पुढाकार घेऊन लखनौ करार केला आणि मुसलमानांना विधिमंडळात साडेतेहतीस टक्के जागा दिल्या. हिंदू व मुसलमान या दोन मोठ्या समाजघटकांत सामंज्यस व एकोपा राहिला नाही तर भारताला स्वातंत्र्य मिळणे अवघड होईल हे लोकमान्यांनीही ओळखले होते. हिंदू-मुसलमान यांच्यात एकोपा राहावा आणि त्यांना त्याकरिता विधिमंडळात झुकते माप देऊन अधिक जागाच द्याव्यात असे न मानता **लोकमान्य टिळक यांनी मुसलमानांच्या हातात देशाची सर्व सत्ताच द्यावी असेही म्हटले होते.** गोविंद तळवलकर यांनी 'सत्तांतर : १९४७' खंड २ मध्ये असेही म्हटले आहे की जीनांना पंतप्रधानपद द्यावे असे गांधी म्हणाले होते ते लोकमान्य टिळकांच्या या मताचा पडसाद म्हणावा लागेल! महात्मा गांधी हिंदू-मुस्लिम ऐक्याचे पुरस्कर्ते होते तसेच लोकमान्य टिळकही होते. पण हिंदुत्ववाद्यांना गांधींच तेवढे मुस्लिमधार्जिणे वाटतात. लोकमान्यांच्या तशाच भूमिकेबाबत

हिंदुत्ववादी मूग गिळून गप्प बसतात.

महात्मा गांधींचे राजकारण याआधी म्हटल्याप्रमाणे नैतिकतेवर उभे होते. त्यामुळे त्यांनी पाकिस्तानला ५५ कोटी रुपये द्यावयाचे ठरले आहे, त्याप्रमाणे त्यांना ते पैसे देऊन टाकले पाहिजेत; दुसरा कोण कसा वागतो त्यावर आपले वागणे अवलंबून असता कामा नये, याच नैतिकतेमुळे त्यांनी ही भूमिका घेतली होती. शांतता प्रस्थापित व्हावी म्हणून दिल्लीत सुरू केलेले बेमुदत उपोषण संपल्यानंतर गांधी पाकिस्तानात जाण्याचाही विचार करीत होते. पाकिस्तानमधील हिंदूंवर अत्याचार होत होते. तेथील हिंदूंना दिलासा द्यावा, त्यांच्यामध्ये आत्मविश्वासाची भावना निर्माण व्हावी आणि मुस्लिम जनतेच्या सदसद्विवेकबुद्धीला आवाहन करून शांतता निर्माण करण्याचे गांधींच्या मनात होतेच. मला येऊ दिले तर मी पाकमध्ये जाईन असे ते म्हणालेही होते. भारत सरकारने कबूल केल्याप्रमाणे पैसे दिले नसते तर गांधींच्या पाकिस्तान दौऱ्याचा उपयोग झाला नसता! आपण नैतिकता पाळली नाही तर इतरांनी नैतिकता पाळावी असे सांगून त्याचा उपयोग होत नाही. पाकिस्तानमध्ये जाण्यासाठी नैतिक अधिष्ठान राहावे याकरिता गांधींनी ५५ कोटी रुपये द्यावेत असेही म्हटले असण्याची अधिक शक्यता आहे. शिवाय, पहिल्याच आंतरराष्ट्रीय करारातील शर्तींचे पालन केले नाही तर जगामध्ये भारताची इभ्रत राहणार नाही म्हणूनही गांधींनी तशी भूमिका घेतली असावी. गांधी मुस्लिमधार्जिणे होते हा हिंदुत्ववाद्यांचा आरोप होता व आहे. पण गांधींना मुस्लिमधार्जिणेपणा करून काय साधावयाचे होते? त्यांना मुस्लिमांच्या पाठिंब्यावर सत्ता हस्तगत करावयाची नव्हती! ज्यांना सत्ता सहज मिळाली असती तरी त्यांनी सत्ता नाकारली अशी जगात फार थोडी उदाहरणे आहेत. पण जी थोडी उदाहरणे आहेत त्यांत भारतातील व्यक्तींचे प्रमाण अधिक आहे. महात्मा गांधींना स्वतंत्र भारतात कोणतेही पद मिळू शकले असते. पण त्यांनी सत्तेची अपेक्षा कधीच धरली नव्हती. या संदर्भात जयप्रकाश नारायण यांचेही नाव घेता येईल! गांधींना निवडणुकीचे राजकारण खेळावयाचे नव्हते. मतांसाठी मुस्लिमांचा अनुनय चालविला आहे असेही गांधींच्या बाबतीत म्हणता येत नाही. गांधींना मुस्लिमधार्जिणे ठरविण्याकरिता त्यांच्या धार्जिणेपणासाठी कारणे तरी सांगता आली पाहिजेत. निवडणुकीसाठी गांधींनी मुस्लिमधार्जिणेपणा केला, मुस्लिमांच्या पाठिंब्यामुळे त्यांना पंतप्रधानपद मिळत होते म्हणून त्यांनी तो धार्जिणेपणा केला असे म्हणावे तर ते निवडणुकीच्या राजकारणातही नव्हते आणि कोणत्याही पदाकरिता ते उत्सुक नव्हते. मग गांधींनी मुस्लिमधार्जिणेपणा कशासाठी केला, हे हिंदुत्ववाद्यांनी सांगितले पाहिजे. गांधींनी मुस्लिमांना थोडेसे झुकते माप दिले असेल, त्यांच्या चार-दोन चुकांकडे दुर्लक्ष केले असेल तर राष्ट्राच्या स्वातंत्र्याचा

लढा अधिक धारदार, निर्णायकी स्वरूपाचा व्हावा याकरिताच त्यांनी तशी भूमिका घेतली. सर्व जातीधर्माच्या लोकांच्या सहभागाशिवाय स्वातंत्र्याचा लढा व्यापक बनू शकणार नाही. किंवा स्वातंत्र्यलढ्याच्या वेळी आपापसात लढत बसलो तर आपलीच ताकद खच्ची होईल हे गांधींनी बरोबर हेरले होते. गांधींच्या हातातून चुकाच झालेल्या नाहीत असेही नाही. गांधींनीच आपल्या चुकांच्या बाबतीत 'हिमालयाएवढी मोठी चूक झाली' असे म्हटलेले आहे. जो लढे करतो, आंदोलन चालवतो त्याच्या हातातून चुका या होत असतात! जो लढ्यात नाही, आंदोलनात नाही, त्याच्या हातातून चुका होण्याचे काहीच कारण नाही. स्वत: निष्क्रिय राहून दुसऱ्यांच्या चुका शोधणाऱ्यांना जनता फारशी किंमत देत नाही. हिंदुत्ववाद्यांच्या वाट्याला हाही अनुभव आलेला होता. गांधी द्वेषाच्या त्यांच्या राजकारणामागचे हेही एक कारण आहे. हे राष्ट्र एकत्र ठेवावयाचे असेल तर धर्मनिरपेक्षता हवी ही गांधींची धारणा होती. तीच लोकमान्य टिळकांचीही होती. गांधींचा राष्ट्रवाद धर्मनिरपेक्षतचा होता आणि तोच राष्ट्राच्या हिताचा आहे. काँग्रेसच्या स्थापनेपासून काँग्रेसनेच धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाला महत्त्व दिले होते. धर्मनिरपेक्षता हाच काँग्रेसच्या राष्ट्रवादाचा पाया होता. गांधींनी त्याचा पाठपुरावा केला. जो कोणी भारतात जन्मला आणि वाढला, दुसऱ्या देशाकडे त्यांची दृष्टी नाही अशा सर्व लोकांचा हा देश आहे. हिंदूंचा जितका हा देश आहे तितकाच तो मुस्लिम, ख्रिश्चन, पारशी आदींचा आहे. स्वतंत्र भारत हे हिंदू राष्ट्र असणार नाही ते भारतीय राष्ट्र असेल. भारतीय राज्य असेल. हिंदू राज्य असणार नाही. कोण्या एका धर्माच्या बहुमताचे, पंथाच्या बहुमताचे किंवा जमातीच्या बहुमताचे राज्य असणार नाही. भारतीय नागरिकांच्या प्रतिनिधींचे भारतीय राज्य असेल, असे गांधींनी म्हटले होते. धर्मनिरपेक्ष नागरिकत्व, धर्माच्या पालनाचे स्वातंत्र्य, उपासना-स्वातंत्र्य, विचार, प्रचार व आचार स्वातंत्र्य, धर्म व सरकार यांची फारकत हे आधुनिक शासनपद्धतीचे आधारस्तंभ आहेत. १९३१च्या कराची काँग्रेसमध्ये असाच ठराव केलेला होता. आणि भारताच्या घटनेने याचीच हमी दिलेली आहे. गांधी स्वत: धार्मिक होते. पण प्रत्येक माणसाची परमेश्वराबाबतची संकल्पना वेगवेगळी आहे हे ते मान्य करीत आणि म्हणूनच धर्माच्या बाबतीत सरकार या संस्थेने तटस्थ राहिले पाहिजे असे गांधी म्हणत. गांधींच्या या भूमिकेमुळे हिंदुत्ववाद्यांच्या धर्मराष्ट्राचा पायाच उद्ध्वस्त होतो. म्हणून त्यांचा गांधींना विरोध आहे. गांधी धार्मिक होते. परमेश्वरावर ते विश्वास ठेवीत होते. पण सरकारच्या पैशातून सोरटी सोमनाथच्या मंदिराचा जीर्णोद्धार करण्यास गांधींनी विरोध केलेला होता. यातही गांधींच्या नैतिक राजकारणाचेच दर्शन घडते. पाकिस्तानला ५५ कोटी रुपये देण्यास सरदार पटेल यांचा कडवा विरोध होता.

हंगामी सरकारात असताना अर्थमंत्री लियाकत अली खान यांनी काँग्रेसची आणि पटेल यांची फटफजिती केली होती. तोच डाव पटेल पाकिस्तनाविरुद्ध खेळू पाहत होते. पाकिस्तानच्या निर्मितीनंतर पं. नेहरू, पटेल, आचार्य कृपलानी 'पाकिस्तान टिकणार नाही.' असे जाहीर भाषणातून सांगत होते. या तिघांनाही पाकिस्तान आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य होणार नाही, असे वाटत होते. ५५ कोटी रुपये पाकिस्तानला दिले नाहीत तर पाकिस्तानची आर्थिक कोंडी होईल आणि ते दिवळखोरीत जाईल; किंबहुना त्याची तशीच अवस्था व्हावी म्हणून पटेल यांनी पाकला पैसे न देण्याचीही भूमिका घेतली असण्याची शक्यता आहे!

महात्मा गांधींनी राजकीय चळवळीबरोबर सामाजिक सुधारणांचीही सांगड घातली. सामाजिक सुधारणांचा कार्यक्रम गांधींनी हातात घेतला. गांधींनी अस्पृश्यता निवारणाची मोहीम घेतली. स्वातंत्र्याची चळवळ व्यापक करण्याची त्या मागे दृष्टी होतीच पण विविध समाजघटक एकजिनसी झाले नाही तर राष्ट्र बलवान बनत नाही. ते आक्रमकांच्या आक्रमणाला नेहमीच बळी पडत असते, हा इतिहासापासून गांधींनी बोध घेतला होता आणि सर्व समाज एकजिनसी करण्यावर त्यांनी भर दिला होता. हिंदुत्ववाद्यांना पूर्वापार चालत आलेल्या चालीरीती, परंपरा, रूढी आणि नीतिनियम यांसह हिंदुत्ववादाची पुनर्स्थापना करावयाची होती. गांधींच्या सुधारणांच्या कार्यक्रमामुळे हिंदुत्ववाद्यांच्या धर्माच्या संकल्पनेला सुरुंग लागत होता आणि ते रोखण्याची ताकद हिंदुत्ववाद्यांच्या विचारसरणीत नव्हती आणि लोकांच्या गळी आपले तत्त्वज्ञान उतरवण्याजोगे प्रभावी नेतृत्वही त्यांच्यापाशी नव्हते. हा दोन विचारांचा संघर्ष होता. नव्या तत्त्वज्ञानाशी मुकाबला करण्याजोगे समर्थ तत्त्वज्ञान नाही आणि नेतृत्वही नाही म्हणून त्यांनी गांधींना मारले तर आपल्या विचारांची डाळ शिजेल अशी समजूत करून घेतली आणि त्यातून गांधींचा खून करण्यात आला.

महात्मा गांधी समन्वयवादी होते. नैतिकता, सत्य व अहिंसा हा त्यांच्या राजकारणाचा पाया होता. त्यामुळेच त्यांनी कबूल केल्याप्रमाणे ५५ कोटी रुपये द्यावे ही भूमिका घेतली होती. पाकिस्तानला ५५ कोटी रुपये द्यावे या मागणीकरिता त्यांनी उपोषण केलेले नव्हते. हिंदू-मुस्लिमांच्या ऐक्याशिवाय राष्ट्र सामर्थ्यशाली होणार नाही ही त्यांची धारणा होती. त्यात मुस्लिमांचा अनुनय करण्याचा भाग नव्हता. देशाच्या हिताकरिता जे जे करणे आवश्यक आहे ते ते केले पाहिजे यावर गांधींचा भर होता. आचार्य शंकरराव जावडेकर यांनी द्विराष्ट्रवादासंबंधात 'हिंदू-मुस्लिम ऐक्य' या ग्रंथात फार चांगले विश्लेषण केलेले आहे. "या देशात जो धनिकवर्ग निर्माण झाला आहे तो ब्रिटिश राज्ययंत्राच्या आश्रयानेच निर्माण होऊन

वाढलेला आहे व ब्रिटिशांच्या हातची सत्ता हिसकावून ती आपल्या हाती घेण्याइतके सामर्थ्य त्यांच्या अंगी येऊ शकत नाही. त्यातून जो भांडवलदारवर्ग अलीकडे पुढारला आहे तो राष्ट्रीय बनून ब्रिटिशांशी सत्ता संपादनासाठी भांडू लागताच त्याला खच्ची करण्यासाठी भांडवलशाही स्पर्धेत मागासलेल्या मुसलमान समाजाच्या भांडवलदारांना पुढारलेल्या भांडवलदारांची भीती दाखवून पाकिस्तानचे ध्येय ब्रिटिशांनी प्रेरित केले. औद्योगिक प्रगतीत मागासलेल्या मुसलमान भांडवलदारांना व व्यापाऱ्यांना त्याचे आकर्षण वाटले तरी सर्वसामान्य मुसलमान जनतेचे आर्थिक हित करण्याची शक्ती पाकिस्तानात नाही.'' हे आचार्य जावडेकर यांनी म्हटले आहे. त्यातील काही गोष्टी आज कालबाह्य झाल्यासारख्या वाटत असल्या तरी सामान्य मुस्लिमांचे हित पाकिस्तानच्या मागणीत नाही हे मुसलमानांना पटवून देत असताना हिंदूंबरोबर मुसलमानांनी आणि मुसलमानांबरोबर हिंदूंनी सलोख्याचे संबंध ठेवले नाहीत तर स्वातंत्र्य लांबणीवर पडते म्हणून हिंदू-मुस्लिम ऐक्याला गांधी महत्त्व देत होते. 'हिंदू-मुसलमानांचे जे तंटे सुरू झाले ते ब्रिटनविरुद्ध हिंदी जनतेचा चाललेला स्वातंत्र्याचा लढा यशस्वी होऊन हिंदुस्थानच्या सर्व विभागातून ब्रिटिश साम्राज्य नष्ट होईपर्यंत हे तंटे एक ना दुसऱ्या स्वरूपात सतत चालत राहणार, याची जाणीव हिंदुस्थानच्या राष्ट्रीय नेत्यांना झालेली आहे. असे असले तरी ज्यांना हा राष्ट्रीय लढा चालवावयाचा असतो त्यांना तो चालविण्यासाठी हिंदू मुसलमानांचे ऐक्य साधावे लागले.' असे आचार्य जावडेकर यांनी सांगितले आहे. गांधींनी हिंदू-मुस्लिम ऐक्यावर भर का दिला होता याचे सारे सार यात आलेले आहे. हिंदुत्ववाद्यांनी याचा कधी विचारच केलेला नाही. लोकमान्य टिळकांनाही हा विचार करावा लागला होता. लॉर्ड डफरीन याने द्विराष्ट्रवादाची बीजे पेरली होती. १८८५ साली काँग्रेसची स्थापना झाली. १८८८ पासून चळवळ करणारी संस्था असे स्वरूप काँग्रेसला येऊ लागले. काँग्रेसमध्ये हिंदू-मुसलमानांचे प्रतिनिधित्व दिसू लागले. पण लोकसंख्येच्या प्रमाणातच काँग्रेसमध्ये हे प्रतिनिधित्व होते. हे पाहून लॉर्ड डफरीन याने 'इंडिया'त हिंदू व मुसलमान अशी दोन राष्ट्रे आहेत; काँग्रेसमध्ये हिंदू अधिक आहेत त्यामुळे ती हिंदूंची संस्था आहे, मुसलमानांनी त्यात सामील होऊ नये असा प्रयत्न केला. त्याला सर सय्यद अहमद बळी पडले. त्यांनी काँग्रेसविरुद्ध प्रचार सुरू केला होता. ब्रिटिशांचे फोडा आणि झोडा हे धोरण डफरीननंतरही चालूच राहिले होते. ब्रिटिशांच्या कुटिल नीतीला त्यांच्या हातातले हेतुत: अथवा अप्रत्यक्षरूपाने बाहुले बनून विरोध करता येणार नव्हता. धर्माच्या नावाने राजकारण व धर्माचे राष्ट्र ही भूमिका ब्रिटिशांचेच हात बळकट करणारी होती. सत्ता अबाधित राहावी म्हणून डफरीनने काँग्रेस ही हिंदूंची संघटना आहे असा अ प्रचार चालविला

होता. त्यावर हिंदू-मुस्लिम ऐक्य हेच उत्तर होते. १८९३-९४ साली मुंबई प्रांतात हिंदू-मुसलमानांचे पहिले दंगे झाले. १८५७ च्या बंडात हिंदू-मुसलमान एक होऊन लढले होते. त्यामुळे ब्रिटिशांना दोघांतील ताणतणाव वाढलेले हवेच होते. मुंबई इलाख्यात काँग्रेसची चळवळ त्या काळात अधिक जोरात होती. हिंदू-मुसलमान यांच्यात फूट पाडण्याची ब्रिटिशांना आवश्यकता वाटत होती आणि घडलेही तसेच! काँग्रेसची चळवळ जेथे जोरात आहे त्याच प्रांतांत हिंदू-मुसलमानांचे पहिले दंगे सुरू झाले. बंगालच्या फाळणीमुळे नंतर बंगालमध्ये दंगे सुरू झाले. पूर्व बंगाल मुसलमानांचा प्रांत व्हावा म्हणून बंगालच्या फाळणीचे कारस्थान रचण्यात आले होते. त्या पाठोपाठ प्रांतांच्या विभागणीपेक्षा भयंकर असे तत्त्व मोर्ले मिंटो यांनी स्वतंत्र मतदारसंघ निर्माण करून ते हिंदू राज्यघटनेत समाविष्ट केले. त्या संबंधात तर सुलतान अहमद यांनी काय म्हटले आहे ते पाहण्यासारखे आहे. ''मोर्ले-मिंटो सुधारणातून स्वीकारलेल्या १९०९च्या कायद्यामुळे भारतीय संविधानाच्या इतिहासातील एक गंभीर प्रकरण सुरू झाले आहे. विभक्त मतदारसंघ निर्माण करून जातीय प्रतिनिधित्वाची सोय करून ठेवली गेली आहे. लोकशाहीच्या मूलभूत सिद्धान्ताच्या विरोधातील हे पाऊल आहे. विभक्त मतदारसंघाची निर्मिती करून फुटीरपणाची बीजेच पेरली गेली आहेत.''[३७] स्वतंत्र मतदारसंघानंतर माँटेग्यू चेम्सफर्ड सुधारणांची चर्चा सुरू झाली. तेव्हा हिंदू-मुसलमानांचे ऐक्य साधावे व काँग्रेसच्या मागणीला मुस्लिम लीगचा पाठिंबा मिळावा म्हणून लोकमान्य टिळक यांनी याच विभक्त मतदारसंघाचे तत्त्व आधाराला घेऊन लखनौचा करार केला. लखनौ करारानुसार मुसलमानांना पंजाबमध्ये पन्नास टक्के, बंगालमध्ये चाळीस टक्के, बिहारमध्ये पंचवीस टक्के, मध्य प्रांत व मद्रासमध्ये प्रत्येकी पंधरा टक्के, मुंबई प्रांतात एकतृतीयांश जागा दिल्या जाव्यात असे मान्य करण्यात आले होते. मुस्लिम लीगचा पाठिंबा मिळावा याकरिता लोकमान्य टिळक यांनी लखनौ करार केला होता. मुसलमानांच्या अनुनयाच्या राजकारणाची ही सुरुवात होय, असे मग म्हणावे लागेल! विभक्त मतदारसंघ हा त्याचा पाया होता असे म्हणावे लागेल. लखनौ कराराचे समर्थन करताना लोकमान्य टिळक म्हणाले होते, ''आम्हाला परकीय सरकारशी भांडावयाचे आहे. हे भांडण यशस्वी करावयाचे तर आपापसातील भांडणे कशीही करून मिटवली पाहिजेत आणि सर्व जातिभेद, धर्मभेद व मतभेद मिटवून आपण एकमुखी मागणी केली पाहिजे. असे करताना मुसलमानांना अधिक हक्क मिळाले, किंबहुना सर्व राज्य ब्रिटिशांनी त्यांना किंवा

---

३७. अ ट्रीटी बिट्वीन इंडिया अँण्ड द युनायटेड किंग्डम, सर सलतान अहमद

हिंदुस्थानातील कोणत्याही जमातीला दिले तरी हरकत नाही. पण हिंदुस्थानातून परकीय सत्ता जाऊन हे राष्ट्र स्वतंत्र होऊ दे, या वृत्तीने हा करार आपण केला आहे.'' महात्मा गांधींनी जीनांना मंत्रिमंडळ बनवू द्यावे यासंबंधीची योजना जीनांपुढे ठेवली होती. ती लोकमान्य टिळकांपासून प्रेरणा घेऊन तयार केली होती, असे गोविंद तळवलकर यांनी आपल्या 'सत्तांतर'मध्ये म्हटले आहे ते याच्याच आधारे असावे! तळवलकर यांचे हे म्हणणे बरोबरच आहे. लखनौ करारानंतर हिंदू-मुसलमान यांच्यात ऐक्य झाले. त्यामुळेच राष्ट्रीय मुसलमानांचा गट वाढत गेला. १९२० साली काँग्रेसच्या लढ्यात मुसलमानांनी इतरांप्रमाणेच स्वातंत्र्याकरिता त्याग केला होता. १९२५ नंतर असहकाराच्या चळवळीच्या वेळी ब्रिटिशांनी जनतेच्या असंतोषाला धर्मभेदाचे रूप दिले. या संदर्भात आचार्य जावडेकर यांनी दिलेले उदाहरण महत्त्वाचे ठरते. ''मलबार प्रांतात मोपले लोकांच्या बंडात मुसलमान मवाल्यांनी हिंदूंवर अनन्वित अन्याय केले. याबद्दल राष्ट्रीय मुसलमान पुढाऱ्यांनी तीव्र निषेधही प्रकट केला. तथापि, यानंतर राजकीय चळवळीचा भर ओसरून हिंदू-मुसलमान दंग्यांना ठिकठिकाणी ऊत आला. मोपल्यांच्या दंग्यामागे सावकार व कुळे यांतील आर्थिक हितविरोधाचेही कारण होते. मलबारातील जमिनीचे मालक बहुतेक सर्व नंबुद्री ब्राह्मण असून त्यांच्या सावकारी पाशात येथील दरिद्री मोपले अडकलेले असतात. या आर्थिक वर्गविरोधातून वर्गविग्रह निर्माण होण्यात अनुकूल परिस्थिती नेहमीच असते. पण या आर्थिक वर्गविग्रहाला धर्मभेद व जातिभेद यांनी मूढ बनलेल्या हिंदी जनतेकडून जातिद्वेषाचे अथवा धर्मकलहाचे स्वरूप दिले जाते. हिंदी लोक प्रत्येक वर्गविरोधाकडे आर्थिक दृष्टीने न बघता जातीय दृष्टीने पाहतात व अज्ञानी जनतेच्या आर्थिक किंवा राजकीय उठावाला धर्मद्वेषाची दिशा लावणे सोपे असते.'' आचार्य जावडेकर यांची ही मीमांसा आजही कायम आहे. हिंदू मुसलमानांत ज्या ज्या वेळी ऐक्य निर्माण झाले त्या त्या वेळी ब्रिटिशांनी दोघांनाही एकमेकांविरुद्ध लढविण्याची शक्कल शोधून काढली. या कामी मुस्लिम धर्मीयांचा त्यांनी उपयोग करून घेतला. तसाच त्यांनी हिंदू धर्मांधांचासुद्धा उपयोग करून घेतलेला आहे. १९०५ ची बंगालची फाळणी आणि १९०९ साली विभक्त मतदारसंघ निर्माण करून ब्रिटिशांनी भेदनीती रुजवली. १८१६ मध्ये लोकमान्य टिळक यांनी केलेला लखनौ करार, १९३७ साली स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी मांडलेला द्विराष्ट्रवादाचा सिद्धान्त, नेहरूंचे १० जुलै १९४६ चे निवेदन यामुळे बीजे रुजली. तिलाच पुढच्या राजकारणात द्विराष्ट्राचे फळ लागले. यात महात्मा गांधींच्या राजकारणाचा कसलाच संबंध येत नाही. लखनौ कराराबरोबरच लोकमान्य टिळक हे मुस्लिमधार्जिण्या राजकारणाचे प्रणेते ठरावयास हवे होते! पण टिळक काय किंवा गांधी काय या

दोघांवरही तसा आरोप करणे अप्रामाणिकपणाचे ठरेल! देशातील परिस्थिती, ब्रिटिशांचे डावपेच यांचा कसलाही विचार हिंदुत्ववाद्यांनी केलेला होता असे दिसत नाही. मुस्लिम व गांधीद्वेष हीच त्यांच्या राजकारणाची बैठक होती. विचारांची बैठक नसली आणि तिला आर्थिक कार्यक्रमाची जोड नसली की द्वेषाचे राजकारण जन्म घेत असते. द्विराष्ट्रवादाच्या सिद्धान्ताला काही मुस्लिम नेत्यांनी विरोध केला होता. हे सांगण्याचा प्रामाणिकपणाही हिंदुत्ववाद्यांकडे नाही. विभक्त मतदारसंघ १९०९ साली निर्माण झाले. त्यावेळी भारतीय राजकारणात महात्मा गांधींचा उदयही झालेला नव्हता. टिळकांनी जीनांबरोबर १९१६ साली करार केला त्याच्याही सात वर्षे आधी विभक्त मतदारसंघ निर्माण झाले होते. लोकमान्य टिळक यांनीसुद्धा विभक्त मतदारसंघांना विरोध केला नाही. परंतु महात्मा गांधींनी नंतरच्या राजकारणात हरिजनांकरिता असलेले मतदार संघ उपोषणाने रद्द करून घेतले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी गांधींचे प्राण वाचावेत म्हणून हरिजनांकरिता असलेले मतदारसंघ रद्द करण्यास मान्यता दिली होती. १९०९ च्या विभक्त मतदारसंघांना सर सुलतान अहमद यांनी विरोध केला होता. ''भारतीय संविधानाच्या इतिहासातील १९०९ चा कायदा (विभक्त मतदारसंघ करणारा) हे अनिष्ट वळण देणारे प्रकरण आहे. जातीय तत्त्वावर विभक्त मतदारसंघ निर्माण करणे हे लोकशाहीच्या मूलभूत सिद्धान्ताच्या विरोधी आहे. विभक्त मतदारसंघामुळे विभक्तपणाची बीजे रुजवली जात आहेत.'' असे सर सुलतान अहमद यांनी त्या काळी म्हटलेले होते. तर ए.एम.ए. शुस्तरी यांनी 'आऊट लाईन ऑफ इस्लामिक कल्चर' या पुस्तकात द्विराष्ट्रवादालाच विरोध केला होता. शुस्तरी म्हणतात, ''सर्व धर्माच्या लोकांचे राष्ट्र बनवण्याची कला सर्व धर्माच्या लोकांनी आत्मसात केली तरच या देशाचा प्रश्न सुटणार आहे. धर्म व राष्ट्रीयत्व यांचा संकर करून हा प्रश्न सुटणार नाही. हिंदू राष्ट्र व मुसलमान राष्ट्र या धर्मविशिष्ट राष्ट्रभावना आता बुद्धिपूर्वक व आग्रहपूर्वक टाकून देण्यानेच हिंदुस्थानचे राष्ट्रीयत्व आपणास निर्माण करता येईल.'' रेझाऊल करीम यांनी असे म्हटले होते की, ''मुस्लिम राष्ट्र बनवण्याची कल्पना आता टाकून दिली पाहिजे. धर्माच्या नावाने राष्ट्र बनविण्याची कल्पना आता कालबाह्य झाली आहे. आता नवनवे प्रश्न निर्माण झाले असून ते सोडविण्याकरिता नवेच उपाय अवलंबले पाहिजेत. मुस्लिम राष्ट्र निर्माण करता येईल ही कल्पनाच मूर्खपणाची आहे. हजारो वर्षांपूर्वीची नागरिकत्वाची कल्पना न नवी संकल्पना यात महदंतर पडले आहे हे लक्षात घेतले पाहिजे. मुस्लिम मुस्लिमेतर यांचे ऐक्य घडवून आणून एकच राष्ट्र उभारले पाहिजे. त्या दोघांनी राष्ट्रीय सरकार स्थापन केले पाहिजे. धर्म व राजकारण यांची अपवित्र युती ही एक राष्ट्रीयत्वाच्या मार्गातील धोंड ठरणार

आहे.'' रेझाऊल करीम किंवा सर सुलतान अहमद यांच्यासारख्यांचा प्रभाव राजकारणात राहिला नाही. त्याला ब्रिटिशांची फोडा व झोडा ही नीतीच कारणीभूत झाली.

सर सुलतान अहमद यांनी पाकिस्तानच्या मागणीत मुसलमानांचे कसे अहित आहे हे सतत मांडलेले होते. ज्या विभागात मुसलमानांची संख्या बहुसंख्य आहे त्या विभागात एक किंवा दोन स्वतंत्र राज्ये स्थापन करून हिंदू-मुसलमानांचा वाद मिटवावा हा युक्तिवाद मुसलमानांच्या दृष्टीने घातक आहे हे सांगताना सर सुलतान अहमद यांनी 'अ ट्रीटी बिट्वीन इंडिया ॲण्ड द युनायटेड किंग्डम' या पुस्तकात अशी कारणमीमांसा केली आहे की,

१. पाकिस्तानची कल्पना मुसलमानांच्या स्वयंनिर्णयावर उभारलेली असल्याने स्पष्टपणे कळू शकते. पण पाकिस्तानच्या चतु:सीमा अद्यापि कोणी ठरवू शकला नाही. या चतु:सीमा कशाही ठरल्या तरी पुढील प्रश्नांना उत्तरे देणे पाकिस्तानवाल्यांना कठीण आहे.

अ) शिखांनी जर स्वयंनिर्णयानुसार हिंदू संयुक्त राज्यात सामील होण्याचे ठरविले तर पाकिस्तानवाले काय करणार? शिखांना कोणता प्रदेश देणार?

आ) अंबाला व जालंधर हे विभाग काही झाले तरी पाकिस्तानात सामील करावयाचे काय? जर करावयाचे तर तसे करण्यात कोणत्या तत्त्वांचा आधार घेण्यात येईल?

इ) अमृतसर हे पाकिस्तानात येईल काय? (तसे करण्यास शीख केव्हाही कबूल होणार नाहीत असे सुलतान अहमद यांचे मत होते.)

ई) ईशान्य पाकिस्तानची राज्यभाषा कोणती?

उ) ईशान्य व वायव्य पाकिस्तान यांची राज्ये जोडणारा प्रदेशाचा पट्टा लागेल काय? जर लागणार असले तर त्याची व्यवस्था काय?

ऊ) कलकत्ता हे शहर पाकिस्तानात येणार किंवा नाही? (ते येऊ शकणार नाही असे मत अहमद यांनी दिले होते.)

ए) जर सीमा प्रांतातील मुसलमानांनी पाकिस्तानात येणार नाही असे ठरविले तर पाकिस्तानची अवस्था काय होईल?

या अडचणी सांगून अहमद यांनी असे म्हटले की जे मुसलमान हिंदुप्रधान प्रांतात राहतील त्यांची परिस्थिती पाकिस्तानमुळे सुधारणार नाही. उलट ती अधिकच वाईट होईल. कारण, या प्रांतात मुसलमान हे अल्पसंख्य परकीय ठरतील व जातीय निवाड्यामुळे त्यांना जे हक्क मिळाले आहेत ते नष्ट होतील.'' महात्मा गांधी पाकिस्तान करावयाचे असेल तर ब्रिटिश निघून गेल्यावर करूया, असे का म्हणत

असावेत त्याची कल्पना अहमद यांनी जे प्रश्न निर्माण केले होते, त्यावरून येऊ शकते. पाकिस्तानचे तुमचे चित्र तुम्ही कमी करा, असे गांधी जीनांना म्हणत होते, तेही याच अडचणीच्या कारणामुळे म्हणत असावेत! ब्रिटिशांनी भारताला स्वातंत्र्य दिल्यावर फाळणी केली असती तर त्या पाकिस्तानचे स्वरूपचे वेगळे झाले असते. जीनांनाही याची पूर्ण कल्पना असल्यामुळे त्यांनी गांधींची सूचना फेटाळून लावली होती.

भारताला सातत्याने ज्या कारणांनी पारतंत्र्यात राहावे लागले होते त्या कारणांचे समूळ उच्चाटन करण्याचा मार्ग गांधींच्या विचारसरणीत होता. पण हा मार्ग दाखवणाऱ्या महात्मा गांधींनाच हिंदुत्ववादी 'देशद्रोही' ठरवू लागले आहेत. इस्लामच्या आक्रमणापासून भारतीय संस्कृती म्हणजेच हिंदू संस्कृती आपले दौर्बल्य प्रकट करू लागली. इस्लामच्या पहिल्या चढाईत बौद्ध धर्म नाहीसा झाला. श्रुती, स्मृती व पुराणे यांच्या प्रभावाखाली हिंदूंची समाजसंस्था राजकीयदृष्ट्या कमकुवत आहे हे इस्लामच्या आक्रमणामुळे स्पष्ट झाले. आक्रमकांच्या टोळ्या सातशे-आठशे जणांच्या होत्या. त्या फार मोठ्या झुंडीने आलेल्या नव्हत्या. तरीही भारतीय जनता त्यांचा पराभव करू शकली नाही. जातिसंस्था त्याला कारणीभूत होती. उच्चनीच भेदांमुळे सामाजिक समरसता नव्हती. हिंदू समाज जातिव्यवस्थेमुळे कधीच एकसंध नव्हता. साहजिकच आक्रमणाचा एकजुटीने प्रतिकार करावा ही भूमिका भारतीय समाजात कधीच आली नाही. गांधींनी हिंदू समाजांतील ही वैगुण्ये हेरली होती आणि त्यांनी देश एकसंध राष्ट्र म्हणून उभा करावयाचा असेल तर समाजातील फुटीरता नष्ट केली पाहिजे असे मानून सर्व समाजघटकांना सहभागी करून घेणारा स्वातंत्र्यलढ्याचा मार्ग अवलंबला. त्यातील काही घटकांना झुकते माप द्यावे लागले तरी चालेल, ही टिळकांसारखी भूमिका घेऊन स्वातंत्र्यलढा प्रखर बनवण्याचा गांधींनी प्रयत्न केला. भारतीय समाजातील फूट कायम राहिली तर ब्रिटिशांविरुद्धचा लढा निर्णायकी ठरणार नाही असेच गांधींचे मत होते आणि टिळकांचेही तेच मत होते. म्हणून टिळकांनी लखनौ करार केला आणि गांधींनी मुसलमानांबाबत सहानुभूतीची भूमिका घेतली होती. हिंदुत्ववाद्यांना ब्राह्मणी वर्चस्वाचे राज्य प्रस्थापित करावयाचे होते म्हणून हिंदुत्ववादी टिळकांच्या मुस्लिम अनुनयावर गांधींसारखी जहरी टीका व प्रचार करीत नव्हते! गांधी व टिळक यांची मुस्लिमासंबंधातील भूमिका जवळ जवळ सारखीच असताना हिंदुत्ववादी टिळकांवर टीका करीत नाहीत आणि गांधीवर करतात यामागचे रहस्य काय? मुस्लिम अनुनयामुळे देशाची फाळणी झाली असेल तर या अनुनयाला महात्मा गांधींपेक्षा पहिले दोषी लोकमान्य टिळक ठरतात! मुस्लिम अनुनयाच्या पहिल्या 'गुन्हेगारा'विषयी हिंदुत्ववाद्यांची एक

भूमिका आणि दुसऱ्या 'गुन्हागारा'ला मात्र गुन्हेगार म्हणून त्यांनी गांधींना या जगातून घालवले! म्हणजेच हिंदुत्ववादी प्रामाणिक नाहीत. लोकमान्य टिळक व महात्मा गांधी यांना एकच फूटपट्टी ते लावू इच्छित नाहीत! या अप्रामाणिकपणातून सुटण्याकरिता ते गांधींचा ५५ कोटी रुपयांकरिता खून केला असे सांगतात! पुन्हा तोच प्रश्न येतो, १९३४ साली ५५ कोटी रुपयांचा प्रश्न निर्माण झालेला नव्हता. १९४६ सालीही हा प्रश्न नव्हता मग पुण्यात त्यांना ठार मारण्याचे प्रयत्न त्यावेळी का झाले? लोकमान्य टिळक यांच्यापेक्षा मुसलमानांबाबतची महात्मा गांधींची भूमिका वेगळी नव्हती. मुसलमानांच्या हातात सर्व सत्ता द्या, पण तुम्ही निघून जा असे टिळक म्हणत आणि गांधीही तेच म्हणत. मग महात्मा गांधी मुस्लिमधार्जिणे ठरतात. पण लोकमान्य टिळकांना हिंदुत्ववादी मुस्लिमधार्जिणे म्हणत नाहीत. स्वामी विवेकानंद हे काही राजकारणी नव्हते. ते अध्यात्मवादी होते. परंतु भावी भारताचा उदय कसा होईल हे सांगताना विवेकानंद यांनीही हिंदू-मुस्लिम ऐक्याचाच पुरस्कार केला आहे. "आपल्या मायभूमीच्या दृष्टीने विचार करता हिंदू धर्म आणि इस्लाम धर्म यांचा समन्वय-मिलाफ हेच एकमेव आशास्थान होय. वेदान्ती मेंदू व इस्लामी देह धारण करून भावी भारत उदयास येणार आहे." असे स्वामी विवेकानंद यांनी म्हटलेले आहे. त्यांच्या या म्हणण्यात हिंदू-मुस्लिम ऐक्याचाच पुरस्कार नाही काय? त्या साठी विवेकानंद यांना मात्र मुस्लिमधार्जिणे म्हटले जात नाही. न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांचे १९०१ साली निधन झाले. न्या. रानडे यांनीही हिंदू-मुस्लिम ऐक्याचा पुरस्कार केलेला आहे. "हिंदू-मुस्लिम हे दोघेही एक झाल्यावाचून या विस्तृत देशाची प्रगती मुळीच होणार नाही, हाच धडा आपण पूर्वीच्या इतिहासापासून शिकला पाहिजे. अकबर व त्याचे सल्लागार यांनी जो मार्ग दाखवून दिला त्याच मार्गाने जाण्याचा आपण निर्धार केला पाहिजे आणि त्याचा पणतू जो औरंगजेब याने ज्या चुका केल्या त्या आपण निश्चयपूर्वक टाळल्या पाहिजेत." असे न्या. रानडे यांनी म्हटले आहे. न्या. रानडे यांनीही हिंदू-मुस्लिम ऐक्याचाच पुरस्कार केला होता. पण महात्मा गांधींप्रमाणे त्यांना कोणी मुस्लिमधार्जिणे म्हणत नाही. स्वामी विवेकानंद, न्या. रानडे व लोकमान्य टिळक यांनी हिंदू-मुस्लिम ऐक्याचा पुरस्कार केलेला होता. तरी त्यांना मुस्लिमधार्जिणे न म्हणता महात्मा गांधींना मुस्लिमधार्जिणे म्हटले जाते. त्याच्या मुळाशी हेच कारण होते की गांधींच्या राजकारणामुळे वरिष्ठ जातींमधील काहींच्या हातातून गेलेली सत्ता पुन्हा हातात येणार नव्हती. त्यामुळे गांधींविषयी हिंदूंच्या मनात द्वेष निर्माण करण्याकरिता गांधींना हिंदुत्ववादी मुस्लिमधार्जिणे म्हणत! "भारतीय संविधानाच्या इतिहासातील १९०९चा कायदा हे अनिष्ट वळण देणारे प्रकरण आहे. जातीय तत्त्वांवर विभक्त

मतदारसंघामुळे विभक्तपणाची बीजे रुजवली जात आहेत.'' सर सुलतान अहमद यांनी त्यावेळी भाकीत केल्याप्रमाणेच हे घडले आहे. मुस्लिम नेत्यांचे हे विचार हिंदू-मुसलमानांत पसरविण्याऐवजी हिंदुत्ववाद्यांनी मुस्लिमद्वेषाचेच राजकारण केले. ब्रिटिशांनी हिंदू-मुस्लिमांत फूट पाडली. तेच कार्य हिंदुत्ववाद्यांनीही आपल्या भूमिकेने केले आहे. काही मुस्लिम नेत्यांनी विभक्त मतदारसंघामुळे विभक्तपणा निर्माण होईल असा इशारा देऊन ठेवलेला असतानाही १९१६ साली लोकमान्य टिळक यांनी जीनांबरोबर लखनौ करार केला. त्याचे कारण हेच होते की हिंदू-मुस्लिम ऐक्याशिवाय दुसरा पर्याय नव्हता. महात्मा गांधींनी हिंदू-मुस्लिम ऐक्यावर भर देताच त्यांना मुस्लिमधार्जिणे म्हणणाऱ्या हिंदुत्ववाद्यांची, गांधींना मौलाना गांधी म्हणणाऱ्या हिंदुत्ववाद्यांची टिळकांच्या बाबतीत मात्र दातखिळी बसते. हे असे का व्हावे? विवेकानंद राजकारणी नव्हते. ते अध्यात्मी होते. त्यांच्यामुळे राजकीय परिणाम घडून येण्याची शक्यताच नव्हती. न्या. रानडे, लोकमान्य टिळक हे ब्राह्मण. न्या. रानडे यांच्या चळवळीचा परिणामही मर्यादित होता. सामाजिक सुधारणांना त्यांचा पाठिंबा होता. पण त्याचा प्रत्यक्ष स्वीकार करण्यास ते तयार झाले नाहीत. यामुळे न्या. रानडे यांच्यामुळेही मूलभूत स्वरूपाचा फरक घडून येण्याची आशा नव्हती. १९१६ साली लोकमान्य टिळकांनी जीनांबरोबर लखनौ करार केला. तरी १९१७ साली अथणीच्या भाषणात लोकमान्यांनी शेतकरी, शिंपी, वाणी यांच्या संबंधात ज्या प्रकारे उल्लेख केला तो पाहता लोकमान्य टिळकांची एकूण विचारसरणी ब्राह्मणी श्रेष्ठत्व सांगणारीच आहे अशी हिंदुत्ववाद जोपासणाऱ्यांची कल्पना दृढमूल झालेली होती. त्यामुळे त्यांनी लोकमान्य टिळकांना मुस्लिमधार्जिणे म्हटलेले नाही. फक्त महात्मा गांधी हेच नेते असे होते की जे सामाजिक सुधारणांचा आग्रह धरून सर्व सत्ता बहुजन समाजाच्या हातात जाईल, असा विचार मांडीत होते आणि हा विचार मांडीत असताना त्यांच्या मागे जनतेच्या पाठबळाचा सागर उभा राहात होता, हा पोटशूळ हिंदुत्ववाद्यांचा होता.

❑❑❑

हिंसेचे राजकारण

हिंदुत्ववादी राजकारणाच्या अगदी प्रारंभापासून पाहिल्यानंतर महात्मा गांधींचा खून या विचारसरणीकडून व्हावा हे अपरिहार्यच होते. कारण हिंदुत्ववादी राजकारणाचा तो भागच आहे. लोकमान्य टिळकांच्या वेळेपासूनच्या राजकारणात चित्पावन ब्राह्मणांचा सहभाग राहिला आहे. ब्रिटिशांच्या आगमनामुळे ब्राह्मण वर्चस्वाला धक्का बसला तरी याच वर्गातील काही लोकांना ब्रिटिशांच्या दरबारात मानाच्या जागाही मिळाल्या होत्या. ज्या गटाला स्थान राहिले नव्हते तो गट असंतुष्ट होता. असंतुष्ट वर्ग प्रामुख्याने टिळकांच्या चळवळीत सामील झाला. न्या. रानडेंच्या मागे गेलेला वर्ग घटनात्मक मार्गांनी राजकीय सुधारणा घडवून आणाव्यात या मतप्रणालीचा होता. लोकमान्य टिळकांचा मार्ग असंतोष निर्माण करून आपले हक्क हिसकावून घेतले पाहिजेत असे मानणारा होता. न्या. रानडे व लोकमान्य टिळक काही काळ बरोबर होते. पण पुढे दोघांचे मार्ग भिन्न झाले. टिळकांच्या बाजूला आक्रमक पद्धतीचा ब्राह्मणी गट राहिला. टिळकांचे राजकारण या गटाने समजून घेतले नव्हते किंवा टिळकांचे राजकारण समजून घेण्याइतकी क्षमता या ब्राह्मणवर्गाकडे नव्हती. त्यामुळे ते लोकमान्यांच्या राजकारणातून विपरीत अर्थ काढीत गेले. १८९३ च्या जातीय दंगलीनंतर लोकमान्य टिळकांनी मुस्लिमांवर टीका केली होती. पण ही टीका हेच टिळकांचे राजकारण आहे असा या गटाने अर्थ करून घेतला. टिळकांनी लखनौ करार कोणत्या भावनेने केला हे त्यांनी समजून घेतले नाही. येथेच लोकमान्य टिळक, त्यांचे राजकारण आणि हिंदुत्ववादी यांची फारकत होते. १८९३ च्या जातीय दंगलीनंतर ब्रिटिशांनी मशिदीवरून वाद्ये वाजवत जाण्यास बंदी केली, हा लोकांच्या मूलभूत स्वातंत्र्यावरील हल्ला आहे अशी भूमिका टिळकांनी घेतली. हिंदुत्ववाद्यांनी त्याचा मुस्लिमद्वेष रुजवण्याकरिता वापर केला. हिंदुत्ववाद्यांजवळ राजकीय विचारसरणीचा अभाव होता पण त्यांचे विचार

व मार्ग भडक स्वरूपाचे राहिले. त्यात त्यांना क्रांतिकारकत्व आहे असे वाटायचे! क्रांतीकरिता मुख्य म्हणजे विचारसणीच्या आधारे आर्थिक कार्यक्रम असावा लागतो आणि तो कार्यक्रम राबविण्याकरिता हिंसेचा मार्ग अवलंबून सत्ता हस्तगत करण्याचे ध्येय असलेली कार्यकर्त्यांची फौज असावी लागते. हिंदुत्ववाद्यांकडे यापैकी 'हिंसा' वगळता काहीच नव्हते. त्यामुळे ते क्रांतिकारकही नव्हते. व्यक्तिगत हिंसेचे त्यांच्याकडून समर्थन केले जायचे! त्यांच्या राजकारणात व्यक्तिगत हिंसा हा प्रमुख भाग होता. जोपर्यंत या विचारातून ब्रिटिशांची व्यक्तिगत हत्या होत होती तोपर्यंत भारतीय माणसाला त्याच्या भीषण परिणामांची कल्पना आली नाही. व्यक्तीच्या हत्येमुळे दहशतवाद निर्माण झाला तर त्यातून स्वातंत्र्य मिळणार नाही. कारण ती क्रांती नव्हती हा फरक करण्याइतकी प्रगल्भता आलेली नव्हती. हिंदुत्ववाद्यांच्या चळवळीचा भर कशावर होता हे वॅलेंटाईन चिरोल यांनी 'इंडियन अनरेस्ट'मध्ये नमूद केलेले आहे. त्यांचे हे पुस्तक १९१० मधील आहे. "हिंदुत्वाच्या पुनरुज्जीवनाचे असंख्य—म्हणजे हिंदू धर्माची जेवढी असंख्य रूपे आहेत तेवढे—प्रकार आहेत. पण महत्त्वाची बाब अशी आहे की ज्या ज्या वेळी राजकीय चळवळ अत्यंत जहरी रूप धारण करते त्या त्या वेळी उपद्व्यापासाठी या ना त्या प्रसिद्ध देवदेवतांचा आश्रय ते घेतात." चिरोल यांनी हिंदुत्ववाद्यांसंबंधात केलेले हे विवेचन आजही या संघटनांना जसेच्या तसे लागू पडते. संघाचे कार्यही गुप्ततेनेच चालते. हिंदू महासभेचे कार्यही लोकशाही पद्धतीने आणि खुलेआम चालत नव्हते. सरदार पटेल यांनी सरसंघचालक मा. स. गोळवलकर यांना ११ सप्टेंबर १९४८ रोजी पाठविलेल्या पत्रात 'संघातील माणसांनी व्यक्तिद्वेष, सभ्यता, शिष्टाचार सोडून केलेली विषारी भाषणे यामुळे देशातील वातावरण स्फोटक बनले. त्यांच्या जातीय भाषणांनी बनलेल्या वातावरणातून महात्मा गांधींचा खून झाला आणि गांधी हत्येनंतर संघाने मिठाई वाटून आनंद व्यक्त केला. यामुळे लोक प्रक्षुब्ध झाले. ते तुमच्या बाजूला कधी नव्हतेच' असे म्हटले असून डॉ. श्यामप्रसाद मुखर्जी यांना १८ जुलै १९४८ रोजी पाठविलेल्या पत्रात सरदार पटेल यांनी संघाच्या कारवायांनी सरकारच्या अस्तित्वालाच धोका निर्माण झाले असल्याचे म्हटले आहे. ४ फेब्रुवारी १९४८ रोजी सरदार पटेल यांनी काढलेल्या पत्रकात संघाच्या कारवायांमुळे व्यक्तिगत हत्येचे आणि हिंसेचे वातावरण निर्माण झाले असून त्यातूनच गांधींचा खून झाला आहे असे म्हटले आहे. चिरोल यांनी हिंदुत्ववाद्यांसंबंधात केलेले विश्लेषण आणि स्वतंत्र भारताचे पहिले गृहमंत्री सरदार पटेल यांची ही पत्रे हिंदुत्ववाद्यांच्या त्याच जुन्या स्वरूपावर प्रकाशझोत टाकतात. संघामुळे सरकारच्या अस्तित्वालाच धोका निर्माण झाला आहे असे पटेल यांनी म्हटले आहे. याचा

तपशील पटेल यांच्या या पत्रात मिळत नाही. पण पटेल यांनी हे कोणत्या संदर्भात म्हटले असावे याची कल्पना न्या. कपूर आयोगापुढे साक्षीच्या निमित्ताने अधिकाऱ्यांनी जी माहिती दिली आहे त्यावरून येते. जे. एन. सहानी यांनी असे म्हटले आहे की, २० जानेवारी १९४८ रोजी गांधींच्या प्रार्थनासभेत बाँबस्फोट झाला त्या सुमारास सहा लाख स्वयंसेवकांची एक गुप्त संघटना सरकार उलथून टाकण्याचा कट आखीत होती. या संघटनेची देशभर केंद्रे होती. संघटनेचे गोळवलकर, भोपटकर किंवा डॉ. खरे हे नेते आहेत असेही म्हटले जात होते. या संघटनेच्या स्वयंसेवकांना अल्वार, भरतपूर येथे प्रशिक्षण दिले जात होते. वरिष्ठ नेत्यांचा खून करून सत्ता हस्तगत करण्याचे या संघटनेचे उद्दिष्ट होते. गांधींचा खून झाल्यानंतर या कटाचाच एक भाग म्हणून गांधींचा खून करण्यात आला होता असे मानले जात होते. ब्रिटिशांनी या देशातून काढता पाय घेतला तेव्हा सत्ता बळकावण्याच्या उद्देशाने गुप्त संघटना काम करीत होती. तिला काही संस्थानिक पंचमस्तंभी बनून मदत करीत होते.[३८] सहानी यांनी या संघटनेच्या संदर्भात संघाचे नाव घेतलेले नव्हते पण त्या संघटनेच्या प्रमुख नेत्यांची नावे घेतली होती. सरदार पटेल यांच्या पत्रात बंडाचा उल्लेख आहे तो याच संदर्भात असला पाहिजे. हिंदू महासभेने लोकशाहीवादी बनून जातिभेदावर आधारित राजकारणाचा आणि जातिद्वेषाचा त्याग करावा, महासभेने राजकारण सोडून द्यावे आणि केवळ सामाजिक व सांस्कृतिक संघटना म्हणून काम करावे असा सल्ला हिंदू महासभेचे अध्यक्ष असताना १९४३ साली डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी दिला होता. पण तो हिंदू महासभेला मान्य झाला नाही. तेव्हा डॉ. मुखर्जी यांनी हिंदू महासभेचा राजीनामा दिला. हिंदू महासभेच्या जातीय, पंथीय व धर्मीय द्वेषाच्या राजकारणाचे परिणाम गांधींच्या खुनानंतर डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या लक्षात आले. हिंदुत्ववादी संघटनांचे विचार, त्यांच्या कामाची पद्धती, गुप्ततेवर त्यांचा असलेला भर पाहता चिरोल यांनी या संघटनांसंबंधात जे म्हटले त्याला पुष्टी मिळते! डॉ. हेडगेवार यांच्यापासून संघाच्या नेत्यांनी गांधी हे मुस्लिमधार्जिणे असल्याचा प्रचार केलेला होता. महात्मा गांधींनी राजकारणातून निवृत्त व्हावे अशी मागणी हिंदुत्ववादी करीत. पण गांधींनी प्राण असेतोवर आपण आपले कार्यक्षेत्र सोडणार नाही असे जाहीर केले. न. र. फाटक म्हणतात, "गांधींनी राजकारणातून निवृत्त होण्यास नकार देताच गांधींविषयी दारुण वैरबुद्धी बाळगणाऱ्यांना मोठा पेच पडला. ते राजकारणातून बाहेर पडत नाहीत व लौकर मरणाच्या गोष्टी बोलत नाहीत तेव्हा त्यांच्या जीविताचा

३८. न्या. कपूर आयोग अहवाल, खंड २, परि. १९.५६

नाश करणे हा उपाय महाराष्ट्रात कित्येकांना सुचला. महाराष्ट्रातील टिळकांच्या तालमीतला वर्ग गांधींच्या चळवळीशी बहुधा असहकाराचे 'सुखं च मे शयनं च मे' अशी वृत्ती धरून वागला. पण याच वेळी त्याच वर्गातील काही जणांना 'गांधीचा नाश' या कल्पनेचा हृदरोग जडला.''[३९] स्वामी श्रद्धानंदांनी बाटून मुसलमान झालेल्यांना परत हिंदू धर्मात घेण्याची चळवळ हिंदू महासभेच्या रूपाने केली. न. र. फाटक यांच्या मते या चळवळीचे तत्त्व 'शुद्धी व संघटन' असे होते. मुसलमानांच्या 'ताझिम तबलिघ' या शब्दाचा हा तर्जुमा असल्याने हिंदू महासभा ही मुस्लिम लीगची हिंदू पडछाया म्हटल्यास चूक ठरणार नाही. हिंदू महासभेच्या राजकारणासंबंधात न. र. फाटक यांनी तिचे वाभाडेच काढलेले आहेत. ''मुस्लिम लीगची औलाद वाटण्यासारखी जी हिंदू महासभा तिने पाकिस्तानच्या कल्पनेला बळ चढू देण्याला मदत केली आहे,'' असे फाटक म्हणतात. पाकिस्तान महात्मा गांधींमुळे निर्माण झाले नाही तर लीग व हिंदू महासभा या दोघांनी एकमेकाला पूरक होईल असेच राजकारण केले. त्यातून पाकिस्तानची निर्मिती झाली आहे. हे सत्य दडवून हिंदुत्ववादी फाळणीचे खापर गांधींवर फोडतात. हिंदू महासभेच्या राजकारणावर फाटक यांनी भाष्य केले आहे ते पाहण्यासारखे आहे. ''हिंदू महासभेचे राजकारण अगदी साधे व सोपे होते. काँग्रेस, मुसलमानांना हिंदूंच्या डोक्यावर मिरे वाटावयास संधी देत आहे, हिंदू समाजाचा क्षय करीत आहे ही विचारसरणी घोळून घोळून हिंदू जनतेच्या कानी घालावयाची व तिच्या पुष्ट्यर्थ महात्मा गांधींना शिव्या द्यावयाच्या! काँग्रेसची व गांधींची मनमुराद बदनामी, मुसलमानांची त्या मानाने सौम्य नालस्ती, अंतिम ध्येयासंबंधी (म्हणजे स्वातंत्र्य) उदासिनता अशी हिंदू महासभेची सामान्य नीती होती.'' असे फाटक यांनी 'भारतीय राष्ट्रवादाचा विकास' या पुस्तकात म्हटले आहे. गांधींची बदनामी अधिक करावयाची आणि त्या तुलनेत मुसलमानांची नालस्ती सौम्य करायची इतकी गांधीद्वेषाची कावीळ हिंदुत्ववाद्यांना झाली होती व त्यात आजही फरक पडलेला नाही. हिंदुत्ववाद्यांची भूमिकाही फाळणीला कारणीभूत झाली असे डॉ. लोहिया यांनी म्हटलेले आहे. मुस्लिमद्वेषाचे जेवढे राजकारण करण्यात येई तेवढे मुस्लिम, पाकिस्तानवादी बनत. मुस्लिम पाकिस्तानवादी होत तसे हिंदुत्ववाद्यांच्या राजकारणाला जीवदान मिळत होते. आर्थिक किंवा सामाजिक सुधारणा त्याचप्रमाणे विधायक कार्यक्रमाशी हिंदुत्ववाद्यांचा संबंध नव्हता. त्यामुळे त्यांच्या अस्तित्वाकरिता द्वेषाचेच वातावरण उपयुक्त ठरत होते. तोच त्यांच्या राजकारणाचा आधार होता. त्यामुळे द्वेष वाढीस लावण्याकरिता

---

३९. भारतीय राष्ट्रवादाचा विकास, इतिहास संशोधक न. र. फाटक

मुस्लिम लीगची हिंदुत्ववाद्यांना गरज होती आणि लीगच्या लोकांना हिंदुत्ववाद्यांच्या राजकारणाची आवश्यकता भासत होती. एकमेकांच्या द्वेषाच्या पायावर हिंदू व मुस्लिम धर्मवाद्यांच्या राजकारणांचा इमला उभा होता. पाकिस्तानची निर्मिती झाली नसती तर ५५ कोटी रुपयांचाही प्रश्न उपस्थित झाला नसता. मग हिंदुत्ववाद्यांनी कशाच्या आधारे राजकारण केले असते? फार तर पाकिस्तान झाले नाही म्हणून लीगच्या राजकारणात आक्रमकता आली असती आणि त्या आक्रमकतेविरुद्ध हिंदुत्ववाद्यांना त्यांचे राजकारण करता आले असते. पण शेवटी त्याचा अर्थ हाच होतो की मुस्लिम द्वेष त्याचबरोबर ज्या विचारसणीमुळे हिंदुत्ववाद्यांचे राजकारण रोखले जात होते ती काँग्रेस आणि तिचे नेते गांधी यांचा द्वेष करण्याशिवाय हिंदुत्ववाद्यांचे दुसरे राजकारणच शिल्लक राहत नव्हते. डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी हे ओळखले होते. द्वेष हा राजकारणाचा चिरस्थायी पाया राहू शकत नाही हे त्यांच्या लक्षात आल्यावर त्यांनी जाती-धर्म-भेदाच्या राजकारणाचा त्याग करावा किंवा सर्व जाती-पंथ-धर्माच्या लोकांना पक्षाची दारे खुली केली तरच हिंदू महासभा राष्ट्रीय पातळीवरील संघटना बनू शकेल. अथवा एखाद्या नव्या पक्षात विलीन व्हावे, हिंदू महासभेने व्यापक राजकारण करावे हा डॉ. मुखर्जी यांचा प्रयत्न होता. पण हिंदू महासभेची त्याला तयारी नसल्यामुळे अखेरीस डॉ. मुखर्जी यांनी हिंदू महासभेच्या अध्यक्षपदाचाच राजीनामा दिला. १९५१ साली एन. सी. चतर्जी हे डॉ. मुखर्जी यांच्या राजीनाम्यानंतर महासभेचे अध्यक्ष बनले. त्यांनीही व्यापक राजकारण करावे असा पर्याय पुढे ठेवला पण मुखर्जी यांच्याप्रमाणेच चतर्जी यांनाही अपयश आले. पुढे डॉ. मुखर्जी यांनी जनसंघाची स्थापना केली आणि जनसंघालाही व्यापक राजकारणाची बैठक द्यावी अशी भूमिका घेतली. मुखर्जी यांनी रा. स्व. संघाच्या मदतीने जनसंघ स्थापन केला. काश्मीरच्या तुरुंगात डॉ. मुखर्जी यांचा मृत्यू झाला. पण जनसंघाच्या पहिल्या तीन अध्यक्षांचा मृत्यू हा संशयास्पद मृत्यू ठरलेला आहे. डॉ. रघुवीर हे अपघातात गेले. दीनदयाळ उपाध्याय यांचा खून झाला आणि या तीनही अध्यक्षांनी पक्षाला व्यापक बैठक देण्याचे प्रयत्न केले होते. हा विचित्र योगायोग आहे! डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांचा सल्लाही हिंदुत्ववाद्यांना मानवला नाही, तेथे महात्मा गांधींची विचारसरणी त्यांच्या पचनी कशी पडावी? डॉ. मुखर्जी यांनी धर्मवादी राजकारणाचा पूर्णपणे त्याग केला होता अशातलाही भाग नाही. त्यांनी संघाच्या मदतीने जनसंघाची स्थापना केली. पण धर्मवादी राजकारणाला थोडी मुरड घालण्याचा सल्ला हिंदुत्ववाद्यांना पटला नव्हता. महात्मा गांधींचा द्वेष हिंदुत्ववाद्यांच्या राजकारणात होता; यामागे या आधी म्हटल्याप्रमाणे पेशवाई गेल्यानंतर ब्रिटिशांच्या काळात ब्राह्मणवर्गाला काही मानमरातबाच्या जागा

मिळाल्या. पण त्यांची समाजजीवनावरील व राजकीय नियंत्रणाची पकड गेली होती. टिळकांच्या राजकारणामुळे हे नियंत्रण पुन्हा आपल्या हातात येईल अशी आशा या वर्गाला वाटत होती. परंतु महात्मा गांधी यांच्या सर्वसमावेशक राजकारणामुळे या वर्गाची सारी आशाच धुळीला मिळाली. ज्या ब्राह्मणवर्गाने बदलाला मान्यता दिली. बदल अपरिहार्य आहेत, हे बदल स्वीकारले नाहीत तर आपली प्रगती होणार नाही असे ओळखलेला ब्राह्मण समाजातील मोठा वर्ग निष्ठेने, तत्त्वाने गांधींच्या चळवळीत सामील झाला. त्यातील कित्येकांनी प्रागतिक चळवळ पुढे नेण्याची मोठी कामगिरी बजावलेली आहे. पण हिंदुत्ववादी या प्रवाहापासून कोरडेच राहिले! हिंदुत्ववाद्यांच्या कल्पनेतील हिंदू राष्ट्र उद्या अस्तित्वात आले तर सर्वसामान्य जनतेचे तर सोडाच, पण त्यांच्या हिंदुत्वाला पाठिंबा देणाऱ्यांच्या दैनंदिन जीवनातील प्रश्न सोडविण्याकरिता हिंदुत्ववाद्यांकडे कोणता कार्यक्रम आहे? असा कार्यक्रम नसतो तेव्हा द्वेष वाढवूनच संघटना जगवावी लागते. सत्य सांगून वाढवता येत नाही. म्हणून खऱ्या-खोटेपणाची पर्वा केली जात नाही. धर्मांधांचा खरा शत्रू 'सत्य' हाच आहे मग हिंदू धर्मांध असोत वा मुस्लिम धर्मांध असोत! सत्य सांगितले तर आपण उघडे पडतो. त्यामुळे लोक आपल्यामागे येत नाहीत म्हणून खोट्याचा आधार घेऊन ते असत्य अधिकाअधिक भडक करून सांगण्याचा अट्टाहास धरला जातो. त्यामुळेच संघाच्या लोकांनाही खोट्या प्रचाराचा आधार घ्यावा लागतो. भारतीय जनता पक्षही तेच करतो. हिंदू महासभावालेही तेच करतात आणि मुस्लिम धर्मवादी संघटनाही आपल्या समाजाचा पाठिंबा मिळविण्याकरिता खोटा प्रचार करतात. 'इस्लाम खतरे में है' ही आरोळी त्यातीलच आहे आणि हिंदू या देशात अल्पसंख्य होतील असा हिंदुत्ववादी कांगावा करतात! जेव्हा विकासाचा वेग मंदावतो तेव्हा धर्मवादी शक्ती डोके वर काढीत असतात. जर्मनीत हिटलरचा उदय कोणत्या परिस्थितीत झाला याचा विचार केला तर याची चांगली कल्पना येईल. पहिल्या महायुद्धानंतर जर्मनीची आर्थिक परिस्थिती ढासळली. ती सावरण्याला ज्या प्रकारच्या नेतृत्वाची गरज होती ते नेतृत्व जर्मन लोकांना लोकशाहीतून मिळाले नाही. ख्रिश्चन लोकशाहीवादी व समाजवादी लोकशाहीवादी हे दोन प्रमुख पक्ष होते. ते अर्थव्यवस्था सुधारू शकले नव्हते. हे एकीकडे चालले होते आणि दुसरीकडे एक कम्युनिस्ट दुसऱ्या कम्युनिस्ट गटाला पाण्यात पाहात होता. समाजवादी गट दुसऱ्या समाजवादी गटाला नामशेष करण्याच्या प्रयत्नात होता. लोकशाहीवादी लोक दुसऱ्या लोकशाहीवाद्यांच्या गटाला नेस्तनाबूत करण्यात पराक्रम मानीत होते. त्यामुळे जर्मन लोकांचा लोकशाहीविषयी संभ्रम निर्माण झाला होता. या पार्श्वभूमीवर हिटलरच्या नाझी पक्षाचा उदय सुरू झाला. जर्मन लोकांच्या मनातील ही संभ्रमावस्था, नैराश्य काढून टाकण्यासाठी

हिटलरने महान असत्य जोरजोराने ओरडून सांगण्यास सुरुवात केली. ते महान असत्य होते, 'लोकहो, जर्मन वंश हा या विश्वातील सर्वश्रेष्ठ, सर्व गुणांनी परिपूर्ण असा वंश आहे. त्याचे राज्य प्रस्थापित करणे हे आपले परम पवित्र कर्तव्य आहे.' जर्मन वंश सर्व गुणांनी परिपूर्ण आहे तर मग जर्मनीची ही अवस्था का निर्माण झाली? हा प्रश्न विचारला की हिटलर म्हणावयाचा, जर्मन वंश शुद्ध राहिला नाही म्हणून ही अवस्था आली. जर्मन संस्कृती टिकली नाही. त्याची भेसळ झाली वगैरे वगैरे. युद्धाच्यावेळी हिटलर एकाच सभेत एका पाठोपाठ विसंगत विधाने करावयाचा! किंमती वाढू देणार नाही असे म्हणावयाचा आणि लगेच किंमती कमी होऊ देणार नाही असेही सांगवयाचा! त्याने आपल्या वंशवादाच्या, आर्य रक्ताच्या शुद्धतेच्या विचारातून ज्यूंना देशाबाहेर घालवा, त्यांना मारा, त्यांचा निर्वंश करा याचा अंगीकार केला. हिटलरच्या जर्मनीचा इतिहास मधेच का सुरू झाला असे क्षणभर वाटण्याची शक्यता आहे. पण आजची भारतातील परिस्थिती हिटलरच्या जर्मनीतील परिस्थितीशी कशी सुसंगत आहे हे दाखवून देण्याकरिता त्याचा उल्लेख महत्त्वाचा ठरतो! भारताची आर्थिक परिस्थिती बिघडलेली आहे. विद्यमान नेतृत्वाला ही ढासळणारी परिस्थिती सावरण्यात कितपत यश येईल याविषयी शंकाच आहे. सत्ताधाऱ्यांच्या नाकर्तेपणामुळे लोकांचे प्रश्न अधिकच गंभीर बनले आहेत. त्यामुळे लोकांच्या मनात लोकशाहीविषयी संभ्रम निर्माण झाला आहे. लोकशाहीपेक्षा हुकुमशाही हवी असे काहींना वाटत आहे. 'शहरी लोकातील अठ्ठावन्न टक्के लोकांना देशाच्या प्रगतीसाठी हुकुमशाही पाहिजे. मुंबई-मद्रासमध्ये सत्तर टक्के लोक आणि दिल्लीतील चाळीस टक्के लोकांनी लोकशाहीपेक्षा हुकुमशाही आपले प्रश्न सोडवील असे मत व्यक्त केले असल्याचे एका पाहणीत आढळून आले आहे. (टाइम्स ऑफ इंडिया, २८ डिसेंबर १९९३) हे मत व्यक्त करणारे ७.४ टक्के शिक्षक, ७ टक्के डॉक्टर्स, ६.२ टक्के पत्रकार, ४.१ टक्के पोलीस, ४.५ टक्के दूरदर्शन कर्मचारी आहेत. पण हुकुमशाही लोकांचे प्रश्न सोडवू शकलेली नाही. *हुकुमशाहीत प्रश्न सुटतात आणि भ्रष्टाचार नसतो हा केवळ भ्रम आहे.*

काँग्रेसमध्ये दोनापेक्षा अधिक गट असून त्यांच्यात लाथाळ्या आहेत. जनता दलातील गटबाजीला दलदल म्हटले जाते. एक गट दुसऱ्या गटाला संपवण्यात धन्यता मानीत आहे. डावे कम्युनिस्ट उजव्या कम्युनिस्टांना आणि उजवे कम्युनिस्ट डाव्या कम्युनिस्टांना नेस्तनाबूत करण्यात पराक्रम मानीत आहे. हिंदुत्ववादी भारताला पुन्हा वैभवाच्या शिखरावर नेण्याची आशा लोकांना दाखवत आहेत. हिंदू धर्म, त्याची संस्कृती सर्वश्रेष्ठ आहे. ती राखण्याकरिता हिंदू राष्ट्र झाले पाहिजे असे सांगत आहेत. वंशाची शुद्धता राखली पाहिजे असे सांगत असताना आम्ही

आर्यवंशाचे आहोत हा अभिमान रुजवण्याची त्यांची धडपड चालू असून मुसलमानांमुळे आमची सर्वश्रेष्ठ संस्कृती नष्ट होत आहे म्हणून मुसलमानांना देशातून हाकलून लावले पाहिजे किंवा आम्ही सांगतो तसे जीवन त्यांनी जगले पाहिजे असे म्हणत आहेत. मुस्लिमद्वेष वाढविण्याकरिता मंदिर-मशीद प्रश्न निर्माण करीत आहेत. धर्मवाद वाढावा याकरिता हिंदुत्ववाद्यांनी आताच द्वेषाचे वातावरण निर्माण केलेले नाही. ते स्वातंत्र्य चळवळीपासून हे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहेत. महात्मा गांधींचा द्वेष त्यातूनच आला आहे. स्वातंत्र्य चळवळीत प्रागतिक विचार प्रभावी होता. त्यामुळे हिंदुत्ववाद्यांच्या द्वेषाच्या राजकारणाला पाठिंबा मिळत नव्हता. आता प्रागतिक विचारांतच फाटाफूट झाली आहे. आर्थिक प्रश्नावरील आंदोलने निष्प्रभ झाली आहेत. आर्थिक परिस्थिती ढासळली आहे. त्यामुळे हिंदुत्ववादाला बाळसे धरल्यासारखे वाटत आहे पण हे बाळसे नाही. ती अनिष्ट प्रकारे होत असलेली वाढ आहे.

हिंदुत्ववादी विचारांना रोखणारी गांधींची चळवळ होती. म्हणून गांधीद्वेषाने हिंदुत्ववादी पेटले होते. हिंदू महासभेची स्थापना करणारे मोठे नेते १९२७ सालीच हिंदू महासभेला रामराम ठोकून बाहेर पडले होते. गांधींना दोष देणे हे त्यांचे भांडवल होते. महात्मा गांधी हे हिंदूंच्या हिताचे महान शत्रू आहेत. त्यांना अधिक जगू दिले तर हिंदूंचे आणखी नुकसान होईल ही हिंदुत्ववाद्यांची विचारसरणी बळावत गेली. त्यातून गांधींचा खून झाला, असे फाटक यांनी म्हटले आहे. गांधींना ठार मारले की आपल्या मार्गातील अडसर दूर होईल हाच विचार हिंदुत्ववादी सातत्याने करीत होते. "१९१८ सालापासून गांधींच्या नेतृत्वाखाली जी प्रत्यक्ष प्रतिकाराची चळवळ सुरू झाली तेव्हापासून महाराष्ट्रातील बुद्धिजीवी ब्राह्मणवर्गातील एक विशिष्ट गट राष्ट्रातील मुख्य प्रवाहापासून वेगळा होऊ लागला. त्याला असे स्पष्ट दिसू लागले की, राजकारणाची नाव जनता संघटनेच्या व जनता आंदोलनाच्या धारेला लागली की, आपल्या हाती या चळवळीची सूत्रे राहणे अशक्य आहे. आपली जी सामाजिक व आर्थिक प्रतिष्ठा आहे, ती गांधींनी सुरू केलेल्या भट्टीत शेवटी वितळून जाणार हे उमगताच त्यांनी सवतासुभा मांडला."[४०] मतपेटीद्वारा सत्ता मिळवता येणे शक्य नाही. कारण त्याकरिता आवश्यक असणारा आर्थिक, सामाजिक कार्यक्रम हिंदुत्ववाद्यांच्या हातात नाही. त्यामुळे सत्ता मतपेटीद्वारा मिळत नाही. मग सर्वच डाव्या-उजव्या गटांना आपल्या अपूर्व व्यक्तिमत्त्वाच्या बंधनांनी जोडून घेणारा महापुरुषच नष्ट करावा म्हणजे मग आपला मार्ग निर्वेध होईल, असे वाटले.

---

४०. ना. ग. गोरे, जनवाणी, ८ फेब्रुवारी १९४८

याकरिता महात्मा गांधींचा हिंदुत्ववाद्यांनी खून केला. गांधींचा खून झाल्यावर ना. ग. गोरे म्हणाले होते, ''पुन्हा नेतृत्व मिळण्याची आशा नष्ट झालेल्या, महाराष्ट्रातील कमालीच्या अहंकारी, अधिकारलोलूप, प्रतिगामी, वर्गनिष्ठ व स्वभावत:च जनताविरोधी अशा मध्यमवर्गीय ब्राह्मणवर्गाने आपले आसन स्थिर करण्याचा व हिंदुस्थानातील प्रतिक्रांतीचे नेतृत्व मिळवण्याचा अखेरचा प्रयत्न म्हणून घातलेला घाव होता.'' (ना. ग. गोरे, जनवाणी, ८ फेब्रुवारी १९४८). महात्मा गांधींच्या खुनामागे देशाची फाळणी किंवा पंचावन्न कोटी रुपये हे कारण नाही. गांधी विचारांमुळे येणाऱ्या परिवर्तनामुळे समाजाची सामाजिक, राजकीय, आर्थिक नियंत्रणे आपल्या हातात राहात नाहीत, या द्वेषमूलक विचारधारेतून महात्म्याची अखेर केली आहे. हा केवळ वैचारिक सिद्धान्त नाही तर त्याला महात्मा गांधींच्या हत्येचे १९४७ पूर्वी झालेल्या प्रयत्नांचे पुरावेही आहेत. त्याच आधारे फाळणी, पंचावन्न कोटी रुपयांकरिता महात्मा गांधींचा खून झालेला नाही.हा सिद्धान्त सिद्ध होतो.

❑❑❑

विचारसरणी

देशाची फाळणी आणि पंचावन्न कोटी रुपये यासाठी महात्मा गांधींचा खून झाला नाही. याविषयी असलेले पुरावे मांडलेले आहेत. गांधींच्या खुनाच्या कारणांचेही आधीच्या प्रकरणातून विवेचन करण्याचा प्रयत्न केला आहे. मी गांधीवादी नाही. पण गांधी हे मला दिवसेंदिवस मोठे वाटत आहेत. कालच्यापेक्षा ते आज आणखी मोठे वाटतात. हे असे का घडले? तर, गांधींच्या राजकारणाचा जो पाया होता त्यामुळे तर हे वाटतेच. पण देशातील आजचे राजकारण पाहत असताना आणि पत्रकार या नात्याने ते जवळून पाहण्याची संधी मिळत असताना मला असे वाटते की, आपण गांधींना विसरत चालल्यामुळे, त्यांच्या विचारांना विसरत चालल्यामुळे देशाची आजची परिस्थिती बनली आहे. नैतिकतेचा, साधनशुचितेचा, सत्यासत्यतेचा विचार न करता आज राजकारण खेळले जात आहे. त्यामुळेही गांधी दिवसेंदिवस मोठे वाटत चालले आहेत. जगात गांधींचे विचार हेच उपयुक्त ठरतील असे जगातील तत्त्ववेत्ते म्हणू लागले आहेत. त्यामुळे गांधींच्या राजकारणाचा थोडा आढावा घेणे हेही प्रसंगोपात ठरेल. गांधींचा भारतीय राजकारणात उदय झाल्यानंतर राजकारणाला नवे चैतन्य मिळाले आणि देश प्रतिकाराच्या भावनेने पेटून उठला. गांधींच्या लोकप्रियतेत चढ-उतार झाले. त्यांना समजून घेण्याची क्षमता नसल्यामुळे त्यांच्या राजकारणाविषयी गैरसमजही झाले. गांधींचे राजकारण शंभर टक्के परिपूर्ण होते असे महात्मा गांधींनाही कधी वाटले नसेल. पण त्या त्या काळातील प्राप्त परिस्थितीचा विचार करता गांधींच्या राजकारणापेक्षा दुसरा अधिक चांगला पर्यायही उपलब्ध नव्हता किंवा तो उपलब्ध असला तरी त्यामागे लोक गेले नाहीत. म्हणूनच, पुरोगामी कार्यक्रमांची पताका खांद्यावर घेतलेल्या पक्षांच्या नेतृत्वाखाली या देशाचा स्वातंत्र्यलढा यशस्वी झाला नाही. त्यांचे नेतृत्व हे पक्ष करू शकले नाहीत. तो यशस्वी होण्याला गांधींचेच नेतृत्व अतिशय मोठ्या प्रमाणावर कारणीभूत ठरले

आहे. गांधींच्या चळवळींच्या काळात तेवढ्याच तोलामोलाचे असंख्य नेते झाले. राजाजी, पंडित नेहरू, वल्लभभाई पटेल, राजेंद्रप्रसाद, मौलाना आझाद अशी किती नावे घ्यावीत! ही सर्व नेते मंडळी १९४२ सालापर्यंत वीस-बावीस वर्ष श्रद्धेने आणि निष्ठेने गांधींच्या बरोबर उभी राहिली होती. पण सत्य-अहिंसा यांचा काँग्रेस पक्षाने ध्येयधोरण म्हणून स्वीकार केला पाहिजे असे जेव्हा गांधी म्हणू लागले, त्यावेळेला या नेत्यांची कसोटी लागली आणि त्यांनी त्याचा काँग्रेसच्या ध्येयधोरणात स्वीकार करण्यास नकार दिला. कारण त्यावर त्यांची श्रद्धा, निष्ठा नव्हती. नाइलाज म्हणून त्यांनी स्वातंत्र्यलढ्यात अहिंसेचा स्वीकार केला. ते सोयीचे होते म्हणून त्याचा स्वीकार केला. याच मुद्द्यावर गांधी व काँग्रेसचे अन्य नेते यांच्यात मतभेद होत गेले. फाळणीच्या प्रश्नावर तर दोघांतील हे मतभेद अधिकच वाढू लागले. काँग्रेसचे अन्य नेते आणि गांधी यांच्यात फारकत झाली. काँग्रेस व मुस्लिम लीग यांच्यातील वाटणीच्या वेळी गांधींच्या मताला फारशी किंमत न देण्याची भूमिका काँग्रेस नेत्यांनी घेतली आणि फाळणी तर गांधींना अंधारात ठेवूनच मान्य करण्यात आली. फाळणीच्या विरोधात ठाम भूमिका घेण्याला गांधींजींनी ज्यांना आपले डावे-उजवे हात मानले होते, चेले-वारस समजले होते; ते गांधींबरोबर उभे राहिले नाहीत. म्हणूनच गांधींना फाळणीला नाइलाजाने मान्यता द्यावी लागली. त्यामुळेच 'एकेकाळी माझा होयबा म्हणवून घेण्यात वल्लभभाईंना अभिमान वाटत होता, तेच वल्लभभाई आता माझे ऐकेनासे झाले आहेत' असे म्हणण्याचा प्रसंग गांधींवर आला. मला जेव्हा राष्ट्रपिता म्हटले तेव्हा त्याचे कारण असे होते की, आफ्रिकेतून आल्यावर काँग्रेसचे काम करताना काँग्रेसचे स्वरूप व्यापक होण्यात माझा मोठा वाटा होता म्हणून म्हटले गेले. पण आता मात्र माझा काँग्रेसवर प्रभाव आहे असे मी म्हणू शकत नाही असे गांधी म्हणू लागले. काँग्रेसवरील गांधींचा प्रभाव कमी होऊ लागला; तो गांधींची धोरणे बदलली म्हणून कमी झाला नव्हता. तर गांधींबरोबर असणाऱ्यांच्या भूमिका बदलल्या होत्या म्हणून प्रभाव कमी होत गेला. मग कोणाला सत्तेची स्वप्ने पडू लागल्यामुळे भूमिका बदलू लागल्या असतील, तर काहींना गांधींचे विचार पेलवण्याची ताकद राहिली नसेल म्हणून बदलल्या असतील.

गांधींनी राजकीय नेते आणि कार्यकर्ते आपल्या तालमीत घडवले. त्याचप्रमाणे त्यांनी विधायक कार्याला वाहिलेल्या कार्यकर्त्यांचीही फौज उभी केली. समन्वय, तडजोड, मतपरिवर्तन ही भूमिका मांडत असतानाच प्रत्यक्ष प्रतिकारासाठी सर्वसामान्य माणसाचीही मानसिकता गांधींनी निर्माण केली. ब्रिटिशांच्या लाठ्याकाठ्या आणि प्रसंगी बंदुकीच्या गोळ्याही झेलत असताना त्या मारणाऱ्यांविरुद्ध हात उगारायचा नाही अशा वृत्तीचे कार्यकर्ते गांधींनी तयार केले होते. विधायक कार्याची

प्रवृत्तीही वाढावी म्हणून ब्रिटिशांविरुद्धचा लढा नसेल तेव्हा कार्यकर्त्यांना विधायक कार्यात त्यांनी गुंतवून ठेवले. जेव्हा सैन्यामध्ये लढाई नसते तेव्हा लष्कराला बराकीत ठेवले जाते. लष्कर प्रमुखाच्या आदेशानुसार ते रणांगणावर उतरते. अशा लष्कर प्रमुखाला सत्तेमुळे काही अधिकार प्राप्त झालेले असतात. त्यांचे अधिकार न मानणाऱ्याला कोर्ट मार्शल केले जाते किंवा तशीच कडक शिक्षा दिली जाते. या व्यवस्थेमुळे तो पाहिजे त्यावेळी लष्कराला बराकीत पाठवतो. गांधींजवळ हे काहीच नव्हते. असे असताना तेच फक्त कार्यकर्त्यांना आणि जनतेला योग्यवेळी लढ्यात उतरवत आणि लढा नसेल तेव्हा विधायक कार्याच्या 'बराकीत' पाठवत. तेथे कोर्ट मार्शलचा प्रश्नच नव्हता. ही जी 'हुकुमत' होती ती गांधींनी आपल्या विचार आणि नेतृत्वातून निर्माण केली होती. गांधींना शिक्षा झाली तेव्हा त्यांनी आपले कार्य चालविण्याकरिता गांधी सेवा संघ नावाची संस्था स्थापन केली. काँग्रेसने खादीची अट नामंजूर केली तेव्हा विधायक कार्यक्रमासाठी आणि कार्यकर्त्यांनी गुंतवून ठेवण्याकरिता गांधींनी अखिल भारतीय चरखा संघ स्थापना केला. गांधींचे डावपेच समजण्याची ज्यांच्यात कुवत नव्हती ते गांधींना 'चरखा चला चला के' स्वातंत्र्य कसे मिळणार आहे, असा हेटाळणीचा सवाल करीत. तर गांधींच्या चळवळीतून मिळालेल्या स्वातंत्र्यामुळे हातातून सुटलेल्या ब्राह्मणी वर्चस्वाचे नियंत्रण पुन्हा प्रस्थापित होणार नाही, याची खात्री असलेले सनातनी विचारसरणीवाले 'रणाविना स्वातंत्र्य कोणा मिळाले' अशी भावना पसरवत होते. हिंदू महासभेचे धोरण नुसते काँग्रेसविरोधी होते. एवढेच नव्हे तर ब्रिटिशांना प्रत्यक्ष सहकार्य देण्याचे होते. हिंदू महासभेच्या अध्यक्षपदावरून बोलताना सावरकर म्हणाले की, "मला आजच्या परिस्थितीत तपशिलाचा अगर तत्त्वाचा महत्त्वाचा मुद्दा दिसत नाही की, ज्यासाठी आज लष्कर भरतीमुळे हिंदू समाजाचे लष्करीकरण करण्याची संधी व सोय चालून आली आहे. त्याचे फायदे सोडून कायदेभंग सुरू करावा." (काँग्रेस कथा, गो. आ. देशपांडे). कारण गांधींच्या चळवळीतून मिळणाऱ्या स्वातंत्र्यात या वर्गाच्या हातात सत्ता येणार नव्हती. जी सत्ता आपल्या हातात येणार नाही ते स्वातंत्र्य नव्हे असा विचार मांडण्याची केविलवाणी धडपड सुरू होती. ग्रामोद्योग संघ, हरिजन सेवक संघ अशा विचाराने काँग्रेसशी संलग्न असलेल्या पण कामाच्या बाबतीत स्वतंत्र असलेल्या संस्थांची स्थापना त्यांनी केली. सामुदायिक प्रतिकाराचा लढा सुरू झाला की, या संस्थातून काम करणारे कार्यकर्ते आपापल्या संस्थांचे काम बंद ठेवून प्रतिकाराच्या लढ्यात उडी घेत. गांधींमुळे अशा कार्यकर्त्यांमध्ये प्रखर ध्येयनिष्ठा, स्थार्थत्याग, कष्ट सहन करण्याची तयारी हे गुण निर्माण झाले आणि त्यांचा प्रभाव सामान्य माणसांवर पडत होता. खेड्यापाड्यांतून लोकांना काँग्रेस कार्यकर्ता हा

आधार वाटत असे. आता काँग्रेस कार्यकर्ता गावात असणे म्हणजे गावातील उचापती, लांड्यालबाड्या, भ्रष्टाचार हेच डोळ्यांपुढे येते. हे का घडले? तर गांधींच्या विचाराचा कार्यकर्ता राहिला नाही म्हणून हे होत आहे. गांधींच्या सामर्थ्याचे चांगले कार्यकर्ते हे मर्म होते आणि म्हणूनच 'गांधीबाबा'चा शब्द हा परवलीचा शब्द झाला होता; नव्हे, तो मंत्र मानला जात होता.

गांधींची अहिंसा ही आज जगभर मान्यता पावत आहे. अगदी अलीकडचे उदाहरण द्यावयाचे झाले तर सोविएत युनियनमधील कम्युनिस्ट राजवट कोसळत असताना रणगाडे रस्त्यावर आले. या रणगाड्यावर बोरिस येलत्सीन चढले. पण रणगाडे तोफांचे गोळे ओकू शकले नाहीत. येलत्सीन गांधींचा मार्ग म्हणत रणगाड्यावर चढले नाहीत हे खरे. पण लोकशक्ती उभी केली तर शस्त्रदले कुचकामी ठरतात ह्या गांधींच्या अहिंसक मार्गातील सिद्धान्ताचा अवलंब त्यांनी तेथे केला. गांधींच्या सिद्धान्ताचे महत्त्व सांगताना आइनस्टाईन यांनी म्हटले आहे की, आणखीन काही वर्षांनी या भूतलावर गांधी नावाचा हाडामासाचा माणूस झाला होता यावर लोकांचा विश्वास बसणार नाही. यापेक्षा गांधींचे मोठेपण समर्थपणे आणखी कोणत्या शब्दांत सांगता येईल? मार्टिन ल्यूथर किंग यांनी गांधींच्या मार्गानेच लढा चालू ठेवला होता. मार्टीन ल्यूथर किंग यांच्या दालनात इतरांचे फोटो नव्हते पण गांधींचा होता. गांधींची अहिंसा ही भेकडांची अहिंसा नव्हती. 'एका गालावर थप्पड मारल्यावर मी दुसरा गाल पुढे करीन' हे गांधींचे विधान मूळ संदर्भापासून वेगळे काढले गेले असल्यामुळे त्याला चुकीचा अर्थ प्राप्त झाला आहे. हरिजनांवर आम्ही इतके अत्याचार केले आहेत की, त्या अत्याचारातून त्यांनी 'माझ्या एका गालावर मारले तर मी दुसरा गाल मी पुढे करीन' या संदर्भात हे विधान केले. शिवाय आपल्या क्रोधावर काबू मिळवून शांत राहणे यात अहिंसेची कसोटी लागते. हाही संदर्भ त्यात होता हे लक्षात घेण्याची गरज आहे. गांधींनी प्रत्यके गोष्टीचा दूरदृष्टीने विचार केला होता. त्याच्या उपयुक्ततेच्या मर्यादांचाही विचार केलेला होता. काँग्रेस हा महासागर होता. या महासागरात विविध विचारांचे प्रवाह होते. हे प्रवाह एकत्र आल्याशिवाय स्वातंत्र्याची चळवळ प्रभावी होणार नाही. वर्गीय संघटना बांधली असती तर, त्या त्या वर्गीय हितसंबंधापुरते लोक संघटित झाले असते. शेतकरी शेतकऱ्यांच्या संघटनेत, कामकरी कामकऱ्यांच्या संघटनेत, अशा प्रकारे जनतेची ताकद विखुरली गेली असती. काँग्रेसचे स्वरूप सर्वसमावेशक ठेवून तिची शक्ती ब्रिटिशांविरुद्धच्या लढ्याकरिताच केंद्रित केलेली होती. ती विभागण्याने स्वातंत्र्य चळवळीची शक्ती विभागली असती. मुसलमानांना काही जादा अधिकार मिळाले तरी हरकत नाही पण, त्यांचाही सहभाग घेऊन स्वातंत्र्य चळवळ अधिक शक्तिशाली बनवावी हा

लोकमान्य टिळकांसारखाच विचार गांधींनी केलेला होता. काँग्रेस बरखास्त करून तिचे रूपांतर लोकसेवा संघात करावे हा गांधींचा विचार होता. त्यामागे त्यांची दूरदृष्टीच होती. काँग्रेस ही विविध विचारांच्या लोकांची आघाडी आहे. परकीय सत्तेविरुद्धची लढाई जिंकण्यासाठी ही आघाडी आवश्यक होती. पण स्वातंत्र्यानंतर परस्परविरोधी हितसंबंधांच्या लोकांच्या संघटनेऐवजी विशिष्ट विचारसरणी असलेली संघटना निर्माण झाली तर आपल्या हिताच्या ठरणाऱ्या संघटनेचा लोक स्वीकार करतील किंवा त्यांनी तो करावा म्हणून, काँग्रेस बरखास्तीची भूमिका त्यांनी घेतली होती. ज्यांचा विधायक कार्यावर विश्वास आहे अशा काँग्रेसमधील लोकांनी लोकसेवा संघात काम करावे आणि वर्गीय हितसंबंधाच्या संघटनांच्या राजकारणात ज्यांना रस आहे, त्यांनी आपापल्या संघटना काढाव्यात असे त्यांना वाटत होते. तसे झाले असते तर, स्वातंत्र्यानंतर जे सत्तेवर बसले त्यांच्या हातात कदाचित सत्ताही गेली नसती. त्यामुळे त्यांना काँग्रेस बरखास्त करण्याचा विचार गैरसोयीचा वाटला. काँग्रेस ठेवायची असेल तर समाजवादी नेते जयप्रकाश किंवा आचार्य नरेंद्र देव यांना काँग्रेसचे अध्यक्ष करावे असे गांधी म्हणाले. ते या दोघांवरील प्रेमापोटी नव्हे तर, जर समाजवादी नेते काँग्रेसचे अध्यक्ष झाले तर काँग्रेसची कार्यकारिणी अध्यक्षाच्या बहुमताची होईल आणि काँग्रेसला श्रमजीवी, शेतकरी, गोरगरीब यांच्या हिताचे राजकारण करणारी संघटना अशी मान्यता मिळेल आणि त्याला विरोध असणारे आपला वेगळा मार्ग अनुसरतील किंवा त्यांनी तो अनुसरावा, म्हणून गांधींनी ही सूचना केली असण्याची शक्यता अधिक आहे. त्यातूनच त्यांनी समाजवादी पक्षाचे नेते बॅं. पुरुषोत्तमदास त्रिकमदास यांना गांधींनी थोडे दिवस काँग्रेसमधून बाहेर पडू नका. माझे उपोषण संपल्यावर (१३ जानेवारी १९४८) कदाचित मी तुमच्या पक्षात येईन असे म्हटले होते. ते वरपांगी नसावे. गांधी खरोखरच समाजवादी पक्षात गेले असते तर पंडित जवाहरलाल नेहरू, मौलाना आझाद हे काय काँग्रेसमध्ये राहिले असते? त्यांनाही समाजवादी पक्षात जावे लागले असते आणि लोकसेवा संघ स्थापन न करताही गांधींना जे अपेक्षित होते ते त्यांनी घडवून आणले असते, हा माझा कयास आहे. याच्या पुष्ट्यर्थ गांधींची विधाने आणि त्यावरील तर्क हाच आधार आहे. त्यामुळे तो पटला तर स्वीकारावा नाही तर सोडून द्यावा!

गांधींनी आपल्या 'हिंद स्वराज्य' या पुस्तकात ब्रिटनमधील संसदीय लोकशाहीला विरोध केला आहे. परंतु त्यांनी त्याचबरोबर व्यक्तिस्वातंत्र्याचा आग्रह धरला आहे आणि सत्तेच्या केंद्रीकरणाला विरोध केला आहे. ब्रिटनच्या सांसदीय लोकशाहीबद्दल 'हिंद स्वराज्यं' या पुस्तकात गांधी म्हणतात, ''इंग्लंडात आज जी

स्थिती आहे ती खरोखरच दयाजनक आहे. आणि माझे तर ईश्वरापाशी मागणे आहे की तशी स्थिती हिंदुस्थानची कधी न होवो. तुम्ही ज्याला पार्लमेंटची माता मानता ते इंग्लंडचे पार्लमेंट वांझोटे आहे आणि वेश्या आहे. हे दोन्ही शब्द कडक असले तरी त्याला बरोबर लागू पडणारे आहेत. मी त्याला वांझोटे म्हटले कारण की, आजपर्यंत पार्लमेंटने आपण होऊन एकसुद्धा चांगले काम केलेले नाही. त्याच्यावर बाहेरून दडपण आणणारे कोण नसेल तर ते काहीच करणार नाही. अशी त्याची स्वाभाविक स्थिती आहे आणि ते वेश्या अशासाठी म्हणायचे की जे प्रधानमंडळ त्याला हातात ठेवील त्याच्यापाशी ते (पार्लमेंट) राहाते.'' याचा अर्थ त्यांनी व्यक्तिस्वातंत्र्याचा हक्क नाकारता नव्हता. ही गोष्ट खरीच आहे की, बाहेर चळवळी नसतील किंवा त्यांचे दबाब नसतील तर संसद स्वत:हून सुधारणांचा कायदा करत नाही. पण आजच्या घडीला संसदीय लोकशाही पद्धतीपेक्षा दुसरी चांगली पद्धती कोणती आहे? लोकशाहीविषयी महात्मा गांधींचे विचार हे ठोकशाही हवी असे मांडणारे नाहीत तर त्यांना ब्रिटनमधील ही व्यवस्था योग्य वाटत नव्हती. त्यापेक्षा त्यांना भारतातील ग्रामस्वराज्य हे अधिक लोकशाहीप्रधान वाटत होते. भांडवलदारी समाजात आर्थिक सत्तेचे जे केंद्रीकरण होते ते सामाजिक न्याय आणि उपयुक्तता या दोघांना घातक ठरते. म्हणून त्यांना केंद्रीकरण मान्य नव्हते. प्रत्येक माणूस आपापल्या अंत:प्रेरणेप्रमाणे वागू लागल्यास दुसऱ्याच्या अंत:प्रेरणेमध्ये विरोध होईल आणि त्यातून अराजक माजण्याचा धोका संभवतो म्हणून व्यक्तिस्वातंत्र्यावर सामाजिक बंधने असली पाहिजेत. पण ही बंधने कमी असावीत. आणि न्यायाच्या तत्त्वाशी सुसंगत आणि सर्वांना सारखीच लागू पडणारी असावीत. समाजाच्या गरजेनुसार बहुसंख्य लोकांच्या संमतीने त्यात बदल करण्यात यावा असे त्यांचे म्हणणे होते. गांधींनी स्वयंशासित समाज हे राजकीय चळवळीचे अंतिम ध्येय मानले होते. सशस्त्र क्रांतीमधून एक शासन नष्ट होऊन दुसरे शासन येईल. पण ते हिंसेवरच आधारलेले असेल आणि हिंसेवर आधारलेले शासन जुलूम केल्यावाचून राहणार नाही. हिंसेतून हिंसा वाढते आणि प्रतिपक्षास आपले म्हणणे मान्य करावयास लावण्यावरच सर्व शक्ती एकवटली जाते. त्यामुळेच त्यातून स्वयंस्फूर्तीने सहकार्याची भावना निर्माण होत नाही. म्हणून गांधींनी हिंसेचा व सक्तीचा मार्ग टाळला आहे. त्यांचे तत्त्वज्ञान 'हे' मार्ग टाळणारे होते. लोकांची मने सुधारणेला अनुकूल करून घेऊन समाजजीवनाच्या प्रवाहाला योग्य ते वळण देणे हाच सामाजिक परिवर्तनाचा राजमार्ग होय, असे ते मानीत. साधनशुचितेचे पथ्य पाळून सत्याच्या मार्गावर एकेक पाऊल जरी टाकता आले तरी तेवढ्यावर आपण समाधान मानले पाहिजे, यावर त्यांचा भर होता. समाजावर जुन्या परंपरेचे संस्कार आहेत.

सामाजिक सुधारणांना त्यांचा विरोध होणार. अशा वेळी युक्तिवादाने या सुधारणांची आवश्यकता लोकांना पटवून देऊन मतपरिवर्तन करणे हा मार्ग आहे.

एकराष्ट्रत्व जोपासण्याच्या बाबतीत गांधी म्हणत की, ''हिंदुस्थानात नाना धर्मांची माणसे राहतात. त्यामुळे कांही त्याचे एकराष्ट्रत्व नष्ट होत नाही. नवी माणसे दाखल झाली तरी ती राष्ट्रीय ऐक्य नष्ट करतातच असे नाही. ती लोकांत मिसळून जातात. असे झाले म्हणजेच अमुक देश एक राष्ट्र आहे असे म्हणता येईल. अशा देशात इतर माणसांचा समावेश करून घेण्याचा गुण असला पाहिजे, तसे हिंदुस्थानात होते आणि आहे. एक राष्ट्र होऊन राहणारी माणसे एकमेकांच्या धर्मात ढवळाढवळ मुळीच करत नाहीत. जगातल्या कोणत्याही भागात एका राष्ट्राचा अर्थ एक धर्म असा केलेला नाही. या गांधींच्या म्हणण्यामुळे, गांधी हिंदू-मुस्लिम ऐक्याचे पुरस्कर्ते का होते हे लक्षात येईल. गांधी सनातनी हिंदू असले तरी गांधींची विचारसरणी हिंदुत्ववाद्यांपेक्षा वेगळी होती. हिंदुत्ववादी मूलतत्त्ववादी होते. मनुष्यमात्राचे नैसर्गिक अधिकार आणि सर्व मानवांची समानता हे हिंदुत्ववाद्यांना त्यांच्या मूलतत्त्ववादामुळे मान्य नाही. म्हणून शुद्र आणि स्त्रिया यांना समान अधिकार मिळवून देणाऱ्या सामाजिक व आर्थिक व्यवहारावर हिंदूंचेच वर्चस्व असावे अशी त्यांची (हिंदुत्ववाद्यांची) खरी निष्ठा आहे. म्हणून ते हिंदू धर्मनिष्ठेला आवाहन करून हिंदू लोकांना संघटित करू पाहतात. त्यासाठी इतर धर्मीयांबद्दल द्वेष निर्माण करण्याची पराकाष्ठा करतात. गांधींचे विचार याला छेद देणारे होते. कोणत्याही धर्माबद्दल गांधींच्या मनात आपपरभाव नव्हता. वास्तविक पाहता मुस्लिमांमुळे या देशाची अधोगती झालेली नाही. मुस्लिम भारतात येण्यापूर्वीच भारताच्या अधोगतीला सुरुवात झालेली होती. मध्ययुगात एका हिंदू राजाने दुसऱ्या हिंदू राजावर स्वाऱ्या केलेल्या आहेत. त्यांच्यात लढाया झालेल्या आहेत. हिंदू राजांनी हिंदूची मंदिरे फोडली, लुटली आहेत. त्यामुळे धर्म हा राष्ट्रवादाचा आधार होऊ शकत नाही. गांधींना राष्ट्राच्या ऐक्यासाठी सर्व जाती-जमाती, धर्म, पंथ यांचे सहकार्य महत्त्वाचे वाटत होते. त्यातून त्यांनी राजकीय व सामाजिक प्रश्नांच्या बाबतीत सर्वधर्मसमभाव व धर्मनिरपेक्ष राष्ट्रवाद यांची भूमिका घेतली होती. हिंदू धर्म व आधुनिक मानवतावाद यांचा गांधींनी समन्वय केला. हे त्यांच्या लोकप्रियतेचे कारण होते. गांधीजींचे हे सर्व राजकारण ज्यांच्या पचनी पडले नाही, त्यांना गांधी हे आपल्या हितसंबंधविरोधातले आहेत आणि आपल्या हातात पूर्वीप्रमाणे समाजाचे नियंत्रण पुन्हा येईल असे वाटत होते, पण तसे गांधींमुळे घडणार नाही याची पक्की खात्री झाली. म्हणून गांधींनाच संपवून टाकले पाहिजे या विचाराने त्यांच्या मनात घर केलेले होते. आपल्या विरोधकांची राजकीय हत्या करणे यावरच ज्यांची भिस्त

होती त्यांनी आपल्या विचारसरणीविरोधी जाणाऱ्या गांधी-विचारसरणीचा काटा काढून टाकावा या हेतूनेच महात्मा गांधींचा खून केला. हे सांगण्याचे सामर्थ्य आणि प्रामाणिकपणा त्यांच्याजवळ नसल्याने हिंदुत्ववाद्यांनी फाळणी व पंचावन्न कोटीसाठी खून केला हे कारण पुढे केले. पण या आधी वारंवार म्हटल्याप्रमाणे १९३४ चा पुण्यातीलद बाँबहल्ला, जुलै १९४४ मधील पाचगणीचा प्रयत्न, ऑगस्ट १९४४ मधील सेवाग्राम येथील गांधींच्या जीवावर बेतलेली घटना आणि जून १९४६ मधील रेल्वेचा अपघात करून गांधींना मारण्याचे झालेले अयशस्वी प्रयत्न हे फाळणी व पंचात्र कोटी रुपयांच्या प्रकरणापूर्वीचे आहेत. १९४६ साली गांधींनी मी सव्वाशे वर्षं जगणार असे म्हणताच नथुराम गोडसे यानेच, पण जगू कोण देतो असे म्हणून, गांधींना ठार माण्याचा आपला उद्देश बोलून दाखविला होता. त्यावेळेला फाळणी व पंचावन्न कोटी रुपये ही प्रकरणेच नव्हती. म्हणून त्यासाठी गांधींचा खून केला हे समर्थन सत्याच्या कसोटीवर टिकत नाही. त्याचप्रमाणे १३ जानेवारी १९४८ चे गांधींचे उपोषण हे पंचावन्न कोटी रुपयांसाठी नव्हते, हे उपोषण सोडण्यासंबंधीच्या अटी वाचल्यानंतर समजून येतेच. महात्मा गांधींचा खून करणार याची माहिती पंधरा दिवस आधी केंद्रीय गृहमंत्री, पोलीस, मुंबई प्रांताचे गृहमंत्री यांना कळूनही गांधींचे प्राण वाचवता आले नाहीत. गांधींचे प्राण वाचवता येणे कसे शक्य होते, याचेही पुराव्यानिशी विवेचन केलेले आहे. सरकारचा गलथानपणा, हिंदुत्ववाद्यांशी असलेली 'अंतस्थ' हातमिळवणी, व्यक्तिगत रागलोभ यामुळे गांधींचा खून होऊ शकला. सरकारने म्हणजे पोलिसांनी अक्कलहुशारीने काम केले असते तर निश्चितच महात्म्याची अखेर ज्या पद्धतीने झाली ती झाली नसती. फाळणीला गांधी जबाबदार नव्हते. गांधींच्या एकूण नैतिक राजकारणातून पंचावन्न कोटी रुपये पाकिस्तानला ठरल्याप्रमाणे द्यावेत, हे गांधींचे मत होते. पण गांधीना मारण्याचे १९३४ सालापासून जे प्रयत्न होत होते, त्यातील ३० जानेवारी १९४८ रोजी गांधींच्या खुनाचा प्रयत्न यशस्वी झाला. समतेवर आधारित समाजव्यवस्था आणू पाहणाऱ्या आणि राष्ट्रऐक्यासाठी सर्वधर्मसमभावाचा आग्रह धरणाऱ्या विचारसरणीच्या प्रणेत्याचा या विचारांना विरोध असलेल्या विचारसरणीने खून केला आहे. पण अशा हत्येमुळे परिवर्तनाचे चक्र रोखता येणार नाही. ते काही काळ रोखल्यासारखे भासेलही. पण परिवर्तनाचे चक्र गतिशीलच असते. तात्पुरता विजय या विचारसरणीला कायमचे समाधान देऊ शकणार नाही.

❑❑❑

- महात्मा गांधी २५ जून १९३४ रोजी पुण्यात आले होते. तेव्हा त्यांच्यावर बॉम्ब टाकण्यात आला. २५ जून १९३४ रोजी फाळणी झाली होती? त्या वेळी पाकिस्तानला ५५ कोटी रुपये देण्याचा प्रश्न निर्माण झाला होता? मग महात्मा गांधींच्या खुनाचा प्रयत्न पुण्यातच का व्हावा?

- सप्टेंबर १९४४ मध्ये महात्मा गांधी सेवाग्राम आश्रमातून रेल्वेने मुंबईला निघाले असता आश्रमाच्या बाहेर हिंदू महासभेच्या कार्यकर्त्यांनी महात्मा गांधींना धक्काबुक्की केली. त्या वेळी पोलिसांनी नथुराम गोडसे व ल. ग. थत्ते यांच्याकडून जांबिया जप्त केला. हा प्रयत्न झाला तेव्हा फाळणी झाली होती? ५५ कोटी पाकिस्तानला देण्याचा प्रश्न आला होता? नाही! मग हा प्रयत्न कशासाठी होता?

- ''रा. स्व. संघ व हिंदू महासभा विशेषत: संघाच्या कारवाया आणि त्याने देशभर निर्माण केलेल्या वातावरणामुळेच महात्मा गांधींच्या खुनाची भयानक घटना घडली, असे आमचे अहवाल सांगतात. गांधींच्या खुनाच्या कटात हिंदू महासभेच्या भडक विचारांचा गट सामील झाला आहे, याविषयी माझ्या मनात तिळमात्रही संशय नाही. रा. स्व. संघाच्या कारवायांमुळे देश व सरकार यांनाच धोका निर्माण झाला आहे.'' असे सरदार वल्लभभाई पटेल यांनी डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांना पाठविलेल्या पत्रात म्हटले आहे. (सरदार पटेल्स कॉरस्पॉण्डन्स, खंड ६, पृष्ठ ३२३)

- ''संघाच्या नेत्यांची भाषणे जातिवादाच्या विखाराने भरलेली आहेत. संघाच्या विखारानेच महात्मा गांधींची हत्या झाली. गांधींच्या खुनाबद्दल संघाच्या लोकांनी मिठाई वाटून आनंद व्यक्त केला आहे.'' असे सरदार वल्लभभाई पटेल यांनी सरसंघसंचालक गोळवलकर गुरुजी यांना ११ सप्टेंबर १९४८ रोजी पाठविलेल्या पत्रात म्हटले आहे.

महात्म्याची अखेर | जगन फडणीस | लोकवाङ्मय गृह

ISBN 81-86995-78-1